नं. ७८ ७८ म. ग्रं. सं. ठाणें

विषय: इतिहास

लेखक: रावजी शास्त्री गोडबोले

सन: १८८२

संग्रहालय क्रमांक: ४६७

पुस्तकाचें नांव: हिंदुस्थानचा इतिहास

७८
४६७
इतिहास

# हिंदुस्थानचा इतिहास

This book belongs to Mr. Trimbak Waman Pendse 27th August 1888.

School Sanna

मराठी ग्रंथ संग्रहालय

३९३५













The Department of Public Instruction, Bombay.

# THE HISTORY OF INDIA.

BY

HENRY MORRIS, M.C.S.,

TRANSLATED INTO MARATHI

BY SEVERAL TRANSLATION EXHIBITIONERS.

REVISED BY

RÁVAJI SHÁSTRI GÔDBÔLE.

NINTH EDITION.—5,000 Copies.

*Registered for copy-right under Government of India's Act XXV. of 1867.*

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1882.

(ALL RIGHTS RESERVED.)

*Price Nine Annas.*



BOMBAY:

PRINTED AT THE INDIAN PRINTING PRESS.



मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# हिंदुस्थानाचा इतिहास.

हा ग्रंथ

हेन्‌री मारिस साहेबाच्या मूळ इंग्रेजी पुस्तकावरून

ट्रान्सलेशन् एक्झिबिशनर ह्यांनीं केला होता

तो

## रावजी शास्त्री गोडबोले

ह्यांनीं शोधून तयार केला.

आवृत्ति नववी—५,००० प्रती.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्ता-
प्रमाणें नोंदिली आहे.

मुंबई :
गवर्नमेंत सेंत्रल बुक-दिपो.

सन १८८२.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार सरकारानें आपणाकडे ठेविले आहेत.

किंमत ०९ आणे.

मुंबईमध्यें
इंडियन प्रिन्टिंग छापखान्यांत छापिला.

इं. क्र. ७६

# हिंदुस्थानाचा इतिहास.

## भाग पहिला.

## प्राचीन मुसलमान राजांच्या ताब्यांत हिंदुस्थान असतां त्याची स्थिति.

इसवी सन १५५६ पर्यंत.

हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासाविषयीं गैरमाहिती—अलेक्झांदर ह्याची स्वारी—प्राचीन काळची सुधारणा—मुसलमान लोकांची स्वारी—गिजनीचा महमूद—त्याची शेवटची स्वारी—सोमनाथास वेढा—महंमद गोरी—कुतुबुद्दीन—गुलामवंशांतील राजे—खिलज़ी घराणें—तघलख वंश—महंमद तघलख, त्याचीं वेडेपणाचीं कृत्यें—फिरोजशाह—त्याचें सुखावह राज्य—तैमूरलंग—दिल्लींतील कत्तल—हिंदुस्थानांतील अंधाधुंदी—बाबर—पानिपतची लढाई—बाबराचे गुणदोष—रजपूत—शिकरीची लढाई व बाबराचा जय—हुमायून—शीरशाह त्यास पदच्युत करतो—शीरशाहाचें चांगलें राज्य—हुमायून आपली गादी पुनः मिळवितो—त्याचें पार्शिया येथें पळून जाणें व परत येणें—त्याचा मृत्यु.

हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासासंबंधी हिंदुकवींनीं पुष्कळ गोष्टी सांगितल्या आहेत. परंतु त्यांनीं सूर्यवंश, चंद्रवंश, रामकृष्णादिकांचे पराक्रम, कौरवपांडवादिकांचीं युद्धें, इत्यादि ज्या गोष्टी वर्णिल्या आहेत, त्या सर्वांशीं खऱ्या आहेत असें आपण मानूं नये; कारण त्यांमध्यें अतिशयोक्ति फार आहे. अतिशयोक्ति करून वर्णन करणें हें काम कवींचें आहे, इतिहासकर्त्याचें नव्हे; त्यानें जें खरें असेल तेंच सांगितलें पाहिजे.

ग्रीस देशांतील मासिदोनिया प्रांताचा राजा अलेक्झांदर (ज्यास इकडे शिकंदर बादशाह म्हणतात) ह्यानें हिंदुस्थानावर स्वारी करून सुमारें बावीसशें वर्षें झालीं; त्याच्या पूर्वीची हिंदुस्थानाविषयीं माहिती फार-

शी लागत नाहीं. परंतु इतकें खचीत दिसतें कीं, फार प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील राहणारे लोक काळे व अडाणी होते. भील, कोळी वगैरे हे त्यांचेच वंशज आहेत. प्राचीनकाळीं, (अमक्याच वेळेस असें पक्कें समजत नाहीं, परंतु त्यास तीन हजारांवर वर्षें झालीं असावीं) कोणी गौरवर्ण नवीन लोक वायव्य दिशेकडून हिंदुस्थानांत आले, ते आपणांस आर्य म्हणजे श्रेष्ठ किंवा संभावित म्हणत. आर्य प्रथमतः वायव्य दिशेकडील प्रांतांत आले, आणि त्यांनीं क्रमानें उत्तरेकडील व मध्यदेशांतील काळ्या रानटी लोकांस आपल्या अमलाखालीं आणिलें. आर्य त्या रानटी लोकांस म्लेंच्छ म्हणत. आर्यांनीं त्या त्या ठिकाणीं आपली संस्कृत भाषा, आपले कायदे, व आपला धर्म हीं चालू केलीं. आर्यांपासून चार वर्णांची उत्पत्ति झाली आहे. हे आर्यलोक आरंभीं जेथून आले तेथून त्यांच्याच जातीचे कांहीं लोक फार प्राचीन काळीं युरोपखंडांत जाऊन चोहींकडे पसरले. हल्लींचे युरोपांतील लोक त्यांचेच वंशज आहेत. ह्यावरून हिंदूंचें व इंग्रेजांचें एकच मूळ आहे असें दिसतें.

हिंदुस्थान आर्यांच्या हस्तगत झाल्यावर त्यांचा मोठा भरभराट झाला. अलेक्झांदराच्या वेळेस आर्यावर्तांत (हिमालय व विंध्याद्रि ह्यांच्या मधील प्रदेशांत) मोठे प्रबळ हिंदु राजे राज्य करीत होते. परंतु तेव्हांपासून पराक्रम, विद्या, कला व व्यापार ह्या गोष्टींविषयीं त्या लोकांचें पाऊल पुढें न पडतां उत्तरोत्तर आंतच येत गेलें, असें दिसतें. ते परराष्ट्रांतील शत्रूंच्या हस्तगत सहज झाले. हा जो त्यांचा उत्तरोत्तर ऱ्हास झाला, ह्याचें कारण काय असावें? जे हिंदुलोक आपल्या देशांतील लोकांवर प्रीति करितात व त्यांच्या सुखाची इच्छा धरितात, त्यांनीं ह्या प्रश्नाचा विचार करून उत्तर सांगितल्यास फार उपयोग होईल. सध्यां असें म्हणण्यास चिंता नाहीं, कीं समदृष्टि व परहितेच्छु अशा ब्रितिश सरकारच्या राज्यांत विद्याप्रसारें करून हिंदुस्थानाचा पुनः उदय होण्याचा काळ जवळ आला आहे.

आर्यांच्या पाठीमागून मुसलमान लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या; ते फार निराळ्या तऱ्हेचे होते. त्यांनीं हिंदुस्थान जिंकून तेथें आपलीं राज्यें स्थापिलीं. तीं राज्यें पुढें शेंकडों वर्षें चाललीं.

पहिल्यानेंच ज्या मुसलमान सरदारानें हिंदुस्थानावर स्वारी केली त्याचें नांव महमूद असें होतें. हिंदुस्थानाच्या वायव्य दिशेस पंजाबच्या पलीकडील डोंगरी प्रदेशांत जें गिजनी म्हणून शहर आहे तेथें तो राज्य करीत होता. त्यास स्वराज्यांत स्वस्थता करण्याविषयीं पुष्कळ दिवस फार झटावें लागलें. स्वराज्यांत स्वस्थता झाल्यावर महमुदाच्यानें उगेंच बसवेना, म्हणून तो दुसरा कांहीं उद्योग पाहूं लागला. कारण तो स्वभावानें फार चपळ

होता, व त्याजवळ जे पुष्कळ लढाऊ लोक होते त्यांसही कांहीं काम नव्हतें. तेव्हां महमुदास असें वाटलें कीं, हिंदुस्थानावर स्वारी केली असतां फार फायदा होईल. नंतर त्यानें आपले जे लोक लढाया करण्याविषयीं उत्सुक होते त्यांस बरोबर घेऊन हिंदुस्थानावर स्वारी केली. त्यानें हिंदुस्थानावर एकंदर बारा स्वाऱ्या केल्या. प्रत्येक स्वारींत तो पुष्कळ संपत्ति मिळवून गिजनीस परत जाई.

सरतेशेवटल्या स्वारींत महमुदाचा फार नाश झाला व त्याचें पुष्कळ सैन्य मेलें. ह्या स्वारींत तो गुजराथेंत सोमनाथापर्यंत आला होता. तेथें एक फार सुंदर देवालय होतें. त्या देवालयांत फार द्रव्य होतें व त्यासभोंवतीं तटबंदी करून त्याचा पक्का बंदोबस्त केला होता. त्या देवस्थानाच्या संरक्षणार्थ पुष्कळ रजपूत वगैरे शूर लोक जमले होते. मुसलमान लोकांनीं त्या देवालयावर पुष्कळ हल्ले केले, परंतु त्यांस तेथील लोकांनीं पुष्कळ दिवस दाद दिली नाहीं. इतक्यांत मुसलमान लोकांनीं आपल्या पूज्य देवस्थानावर हल्ला केला हें पाहून आसपासच्या राजे रजवाड्यांस फार राग आला, आणि ते मोठ्या आवेशानें महमुदाच्या सैन्यासभोंवतीं जमले. महमुदानें, त्या नवीन शत्रूंवर जाण्याकरितां, देवळास जो वेढा घातला होता, तो उठविणें त्याला प्राप्त पडलें. ह्या प्रसंगीं महमुदाचें व त्या राजांचें जें मोठें भयंकर युद्ध झालें, तें फार वेळ चाललें होतें. हिंदु लोक मोठ्या आवेशानें फार उत्तम प्रकारें लढले. त्यामुळें मुसलमान लोक अगदीं हटत चालले होते. इतक्यांत महमुदानें आपल्या घोड्यावरून खालीं उडी टाकिली, आणि स्वकीय सैन्यासमोर गुडघे टेंकून आपणास जय मिळावा म्हणून ईश्वराची मोठ्यानें प्रार्थना केली. नंतर त्यानें आपल्या घोड्यावर बसून सैन्यासहवर्तमान एकदम शत्रूंवर हल्ला केला, तेव्हां हिंदु लोक पळून गेले आणि महमुदाचा जय झाला. सोमनाथ येथील जे रखवालदार होते ते जिवावर उदार होऊन तटाबाहेर आले, आणि हाणमार करीत समुद्रापावेतों जाऊन तेथें मचव्यांत बसून जलमार्गानें पार झाले. महमुदानें देवळांत शिरून तेथील सर्वांहून मोठी मूर्ति आपल्या हातानें फोडून टाकिली; व तेथील सर्व संपत्ति लुटून घेतली.

त्याची बारावी स्वारी सोमनाथावर. इ० स० १०२४.

महमूद स्वदेशास परत जातांना कांहीं दिवस गुजराथेंत राहून तेथें एक नवीन राजा गादीवर बसवून आपण पुढें चालता झाला. परंतु असें झालें कीं, ज्या वाटेनें महमूद हिंदुस्थानांत आला होता त्या वाटेंत अजमीरचा राजा पुष्कळ सैन्यानिशीं उतरला

त्याचें गुजराथेंत राह-

णें व गिजनीस परत येणें.

होता. हें महमुदास समजल्यावर त्यानें असा निश्चय केला, कीं ही वाट सोडून देऊन सिंध देशाचे पूर्वेस जें रेतीचें मैदान आहे त्यामधून नवीन वाट काढून जावें. महमूद त्या वाटेनें जात असतां त्याची फार खराबी झाली. त्याचे हजारों लोक अत्यंत थकून प्यावयास पाणी न मिळाल्यानें व उष्णतेनें मरण पावले. ह्या प्रकारें त्याच्या सैन्याचा फार नाश झाला.

महमदगोरी. इ०स०११८६.

महमुदाच्या पाठीमागून जे राजे त्याच्या गादीवर बसले त्यांविषयीं येथें वर्णन करण्याची गरज नाहीं; कारण कीं त्यांचा हिंदुस्थानाच्या इतिहासाशीं फारसा संबंध नाहीं. महमुदाच्या घराण्यांतील शेवटल्या राजास महंमदगोरी ह्यानें पदच्युत केलें आणि आपलें एक नवीन घराणें तेथें स्थापित केलें; त्यास गोरीचें घराणें असें ह्मणतात. ह्या घराण्यांतील पुष्कळ पुरुषांनीं पुढें हिंदुस्थानांत राज्य केलें. महमदगोरी ह्यानें दिल्ली व अजमीर इकडील देश काबीज केला. कुतुबुद्दीन ह्मणून महमदगोरीचा एक सरदार होता, त्यानें वर सांगितलेलीं दोन शहरें घेतलीं. महमदापाशीं पुष्कळ गुलाम होते, त्यांतलाच कुतुबुद्दीन हा एक गुलाम होता. महमदास पुत्रसंतान नव्हतें; ह्मणून

कुतुबुद्दीन. इ० स० १२०६.

त्यानें कुतुबुद्दीन ह्यास चांगल्या रीतीनें पालनपोषण करून वाढविलें, व मोठ्या योग्यतेस चढविलें. महमद इ० स० १२०६ ह्या वर्षीं मेल्यानंतर कुतुबुद्दीन व तसेच त्याचे दुसरे दोन गुलाम होते ते स्वतंत्र झाले, आणि निरनिराळ्या ठिकाणीं स्वतः अंमल करूं लागले. कुतुबुद्दीन ह्यानें दिल्लीचें राज्य बळकाविलें.

गुलाम राजे व खिलजी घराणें.

कुतुबुद्दीन ह्याच्या वंशांत जे राजे झाले त्यांस गुलाम राजे असें ह्मणतात. गुलाम राजे झाल्यानंतर खिलजी घराण्यांतील राजे झाले. खिलजी घराण्यांतील पुरुष राज्य करीत असतां मुसलमान लोकांचा अंमल दक्षिणेपावेतों बसला. ह्या खिलजी घराण्याचा शेवट सन १३२१ ह्या वर्षीं झाला.

तघलख घराणें.

ह्या घराण्यांतील राजांनंतर तघलख घराण्यांतील राजे झाले. तघलख घराण्यांतील दुसरा राजा ज्यास महमद तघलख ह्मणतात, त्याच्या आंगीं विद्वत्ता, शौर्य इत्यादि बरेच उत्तम गुण होते, परंतु त्याचीं कांहीं कृत्यें फार मूर्खपणाचीं होतीं. त्यानें आपली राजधानी बदलण्याविषयीं यत्न केला. त्याच्या मनांत दिल्ली शहर सोडून दक्षिण हिंदुस्थानांत एखाद्या शहरांत आपली राजधानी करावी असें होतें. त्यावरून त्यानें दिल्लींतील सर्व लोकांस असा

इतिहास ७८



हुकूम केला कीं, तुम्ही हें शहर सोडून मजबरोबर दक्षिण हिंदुस्थानांत चला. त्यानें दुसरें असें केलें, कीं चीन देशावर स्वारी करावी म्हणून हिमालय पर्वताच्या पलीकडे एक लक्ष सैन्य रवाना केलें. परंतु त्या सैन्यांतील लोकांचा पराभव होऊन त्यांस माघारें फिरणें प्राप्त पडलें. परत येतांना त्या सैन्यांतील लोकांचे इतके हाल झाले, कीं बहुतेक वाटेनेंच मरण पावले. तो आपणास रंजविण्याकरितां रयत लोकांस कधीं कधीं ठार मारी; तसेंच कोणी त्याच्या जुलुमास त्रासून बंड केलें असतां सर्व प्रदेशास सैन्याचा वेढा घालून आंतील सर्व लोकांस ठार मारावें असा हुकूम करी. ह्या वर सांगितलेल्या गोष्टींवरून असें दिसून येतें, कीं महमद तघलख ह्यास लोकांचा जीव घेणें ह्यांत कांहींच वाईट वाटत नव्हतें. असें असून त्याची स्वतःची एक अशी गोष्ट आहे कीं, त्याचा एक दिवस दांत पडला, तो त्यानें मोठ्या समारंभानें नेऊन पुरून त्यावर मोठी कबर बांधली.

महमद तघलख इ० स० १३२५. त्याचीं वेडेपणाचीं कृत्यें.

महमद तघलखाच्या पाठीमागून फेरोजशाह गादीवर बसला. तो महमद तघलखापेक्षां फार चांगला होता. आरंभीं जे मुसलमान धर्माचे राजे होऊन गेले त्या सर्वांपेक्षां ह्याची फार मोठी कीर्ति झाली. फेरोजशाह आपल्या प्रजेचें हित करण्याविषयीं फार झटत असे. त्यानें लोकहितार्थ दवाखाने, पूल, व तळीं आपल्या राज्यांत बांधलीं. पहिल्यानें जो हिंदुस्थानांत कालवा बांधला तो ह्यानेंच. तो कालवा शेंकडों वर्षें रिकामा पडला होता. पुढें तो कालवा एकदा अकबर बादशाहानें दुरुस्त केला होता, तो फिरून बंद झाला. तो हल्लीं इंग्लिशांनीं चालू केला आहे. फेरोजशाह मरण पावला त्या वेळेस त्याचें वय नव्वद वर्षांचें होतें.

फेरोजशाह.

त्याचें चांगलें राज्य. इ० स० १३५१–१३८८.

फेरोजशाह मेल्यानंतर दहा वर्षांनीं त्याचा नातू राज्य करीत असतां, तैमूरलंग ह्यानें हिंदुस्थानावर स्वारी केली. हा स्वभावानें फार क्रूर व रानटी होता. त्यास हिंदुस्थान जिंकण्यास फारसे श्रम पडले नाहींत. तो जेव्हां दिल्लीवर गेला तेव्हां त्यानें वाटेनें फार अघोर कर्मे केलीं व मार्गावरील सर्व गांवें व घरें जाळून टाकिलीं. एका प्रसंगीं त्याजवळ इतके पाडाव केलेले लोक जमले होते, कीं त्यांचें काय करावें हें त्यास सुचेना. तेव्हां त्यानें निर्दयपणें असा हुकूम केला, कीं जे पंधरा वर्षांखालीं असतील ते राखून बाकीच्यांस मारून टाकावें. ह्याप्रमाणें त्यानें एक लक्ष लोक मारिले. ह्यानें दिल्ली सर केली तेव्हां तेथील लोकांस तुमचें संरक्षण करीन असें वचन दिल्यावरून ते लोक त्याच्या हस्तगत झाले. नंतर तेथें त्याच्या

तैमूरलंग ह्याची स्वारी इ० स० १३९८.

लोकांनीं जीं दुष्ट कर्मे केलीं त्यांचें वर्णन करतांनाही आंगावर कांटा उभा राहतो. ते लोक जेव्हां दिल्लींत शिरले, तेव्हां ते आपल्या रिवाजाप्रमाणें तेथेंही लुटूं लागले, व जेव्हां तेथील रहिवासी लोक त्यांस प्रतिबंध करूं लागले तेव्हां त्या दुष्ट लोकांनीं मोठी कत्तल आरंभिली. सर्व रस्ते मेलेल्या माणसांनीं भरून गेले, व त्यांतून पाण्याच्या प्रवाहासारिखे रक्ताचे पाट चालले. नंतर त्या लोकांनीं घरें जाळलीं व सर्व प्रकारचे अनर्थ केले.

दिल्लीची लूट इ० स० १३९८.

तैमूरलंग ह्यानें दिल्लीचा बादशाह मी, असा जाहीरनामा लावला. नंतर तो स्वदेशास परत गेला. त्यानें जातांना पुष्कळ संपत्ति व शेकडों माणसें गुलाम करून बरोबर नेलीं. हा बादशाह ज्या ज्या मुलखांतून गेला ते ते मुलूख अगदीं उद्वस्त होऊन गेले. पुढें पुष्कळ वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत झोटिंगबादशाही चालली होती. दिल्लीच्या एकछत्री राज्याचे तुकडे तुकडे होऊन सर्वत्र स्वतंत्र राज्यें उत्पन्न होऊं लागलीं; व निरनिराळ्या पक्षांतील लोकांच्या एकमेकांशीं लढाया होऊं लागल्या. ते वेळेस दिल्लीस एक बादशाह होता. परंतु तो नांवाचा मात्र असे; त्याच्या अमलाखालीं थोडाच मुलूख होता.

तैमूरलंग हिंदुस्थान सोडून जातो.

देशाची स्थिति.

बाबर हा तैमूरलंग ह्याच्या वंशांतला साहावा पुरुष होता. त्यानें आपल्या पूर्वजांप्रमाणें हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्लीचें राज्य पुनः घेतलें. बाबराच्या कारकिर्दीत हें राज्य कांहींसें पूर्वस्थितीवर आलें. तोंपर्यंत तेथें झोटिंगबादशाहीच चालली होती. तैमूरलंग ह्याचा उद्देश जसा केवळ लुटालूट करण्याचाच होता, तसा बाबराचा नव्हता. बाबराचे मनांत हिंदुस्थानांत नवीन राज्य स्थापावें असें होतें.

जेव्हां बाबर ह्यानें हिंदुस्थानावर स्वारी केली, तेव्हां इब्राहीम लोदी ह्मणून बादशाह दिल्लीचें राज्य करीत होता. तो नांवाचा मात्र बादशाह होता. इब्राहीम लोदी हा राज्य करीत असतां त्याच्या राज्यांत पुष्कळ बंडें झालीं होतीं; तेव्हां असें झालें, कीं पंजाब येथील सुभेदारानें इब्राहीम लोदी ह्याच्या राज्यांतील एक बंड मोडण्याकरितां बाबर ह्यास साहाय्यास बोलाविलें. तेव्हां बाबर त्यास साहाय्य करण्याकरितां मोठ्या आनंदानें आला. उत्तर हिंदुस्थानांत वायव्य दिशेकडील प्रांतांत पुष्कळ लढाया केल्यावर बाबर ह्यानें दिल्लीवर चाल केली. ते वेळेस इब्राहीम लोदी बरोबर पुष्कळ सैन्य घेऊन बाबराशीं युद्ध करण्याकरितां निघाला. पानिपत ह्मणून एक दिल्लीजवळ गांव आहे तेथें

बाबर इब्राहीम लोदीचा पराभव करतो.

पानिपत

इब्राहीम लोदी व बाबर ह्यांची मोठी लढाई झाली. ती येणेंप्रमाणेंः—बाबर ह्याचें सैन्य फार थोडें होतें. तरी दोन्ही पक्षांच्या लोकांतून कोणीच लढाईस आरंभ करीना. दोन्हीकडल्या सेनाधिपतींनीं असें केलें, कीं ते आपापल्या लष्करासभोंवतीं खंदक खणून आंत राहिले. नंतर प्रथमतः इब्राहीम लोदी हल्ला करण्याकरितां बाहेर आला. परंतु त्याचा अगदीं मोड होऊन त्याच्या सर्व सैन्याची दाणादाण झाली व तो मरण पावला. त्यामुळें बाबर ह्याचा जय झाला. ह्या प्रकारें दिल्लीचें तक्त ह्या लढाईंत तैमूरलंग ह्यांच्या वंशांतील पुरुषाचे हातांत गेलें. पुढें तैमूरलंग ह्याच्या वंशांतील जे राजे दिल्लीच्या तक्तावर बसले त्यांस मोंगल ह्मणतात.

येथील लढाई. इ० स० १५२६.

बाबर दिल्लीच्या तक्तावर बसतो.

बाबर हा स्वभावानें मोठा आनंदी असून त्यास माणसाचा कंटाळा नव्हता. तो सर्वांशीं मिळून असे. तो सामान्य पुरुष नव्हता. असे पुरुष जगतांत फार विरळा उत्पन्न होतात. तो मोठा तरवारबाहादर असून, लिहिण्याच्या कामांतही फार कुशळ होता. त्यानें स्वकीय चरित्राच्या कांहीं गोष्टी लिहिल्या आहेत; त्या वाचल्या असतां सर्व मनुष्यांस आनंद वाटण्याजोग्या आहेत. त्यानें आपल्या दोषांचेंही त्यांत वर्णन केलें आहे. दुसरें असें त्या गोष्टींत दिसून येतें, कीं त्यास सत्याची प्रीति फार असे; व तो तसाच सदसद्विचारवान् व रसिकही होता. ह्या गोष्टींवरून सर्व लोक सर्वदां त्यास चाहतात.

बाबराचा स्वभाव.

त्याचा वृत्तांत.

बाबर ह्यानें दिल्लीचें राज्य पांच वर्षेंच केलें. त्यानें आपला हा सर्व काळ बंडखोर लोकांस आपल्या अमलाखालीं आणण्यामध्यें घालविला. जे मुसलमान राजे होते त्यांस त्यानें लवकर जिंकिलें; परंतु हिंदु लोकांस जिंकण्यास त्यास फार प्रयास पडले.

महमूद व दुसरे राजे ह्यांस हिंदुस्थानांतील लोकांपासून कसा अडथळा झाला ह्याविषयीं वर्णन पूर्वीं केलें. आतां मोंगल घराण्यांतील राजांना कोणत्या लोकांपासून कसा अडथळा झाला, हें सांगणें योग्य आहे. ते वेळेस बहुतेक हिंदु लोक स्वभावानें फार गरीब व दुर्बल होते, ह्मणून त्यांस जिंकावयास फारसा आयास पडत नसे. परंतु त्यांतच रजपूत ह्मणून एक जात होती, त्या जातीचे लोक फार शूर होते. ते लोक बहुतकरून उत्तर हिंदुस्थानांत वायव्य दिशेस राहत असत. त्यांस दुसऱ्याच्या अमलाखालीं राहणें आवडत नसे. रजपूत लोक अजूनही उत्तर हिंदुस्थानांत आहेत; व ते तसेच शूर आहेत.

रजपूत लोक.

मुसलमान लोकांच्या राज्यांत त्या लोकांवर पुरता अंमल कधींच बसला नव्हता. पुढें ते लोक मोंगल राजांच्या अमलाखालीं आले. ह्याचें कारण असें झालें, कीं त्या घराण्यांतील कांहीं बादशाहांनीं त्यांस फार चांगल्या रीतीनें वागविलें ह्मणूनच ते त्यांस वश झाले, नाहीं तर कधींही झाले नसते.

रजपूत लोकांच्या रीतिभाती.

रजपूत जातीचे लोक इतर हिंदु लोकांसारिखे नव्हते. त्यांच्या रीतिभाती फार निराळ्या होत्या. त्यांचा युद्ध वगैरे करण्याचा क्रमही इतरांसारखा नव्हता. त्यांस अब्रूचा मोठा अभिमान असून अपकीर्तीचें फार भय वाटत असे. अनेक प्रसंगीं त्यांच्या अशा गोष्टी घडून आल्या आहेत कीं, एखादे वेळेस लढाईंत त्यांचा पराभव होऊन अब्रू गेली असतां त्यांनीं आपल्या किल्ल्यांस आग लावून आपल्या बायकापोरांस ठार मारून मोठ्या आवेशानें शत्रूंवर धांवून जावें, आणि शत्रूंशीं युद्ध करून सर्वांनीं प्राण द्यावे.

शिक्री येथें संगाशीं बाबराची लढाई. ता० १६ मार्च इ० स० १५२७.

बाबर ह्यास अशा लोकांशीं लढावयाचें होतें. पुष्कळ रजपूत लोक, संग ह्मणून मेवाडचा राजा होता, त्यास मुख्य करून आग्र्याकडे बाबरावर हल्ला करण्याकरितां आले. तेथें बाबराची व रजपूत लोकांची मोठी निकराची लढाई झाली. ती अशी कीं, प्रथमतः बाबराच्या कांहीं सैन्याचा पराभव होऊन ते लोक मागें हटले; परंतु रजपूत लोकांनीं ही संधी न साधल्यामुळें बाबरास आपल्या लष्कराचा चांगला बंदोबस्त करण्यास वेळ सांपडला, व. तितक्यांत शत्रूंनीं पुनः हल्ला करूं नये ह्मणून त्यानें तजवीज केली. बाबराच्या सैन्याचा आरंभीं पराभव झाला होता, तेणेंकरून त्या लोकांचें धैर्य अगदीं खचलें, आणि असा सुमार दिसूं लागला कीं, आतां रजपूत लोकांस जय मिळतो; परंतु बाबर ह्यास तसें न वाटून त्यानें आपल्या सैन्यांतील सर्व सरदारांस एकत्र जमा करून त्यांस अशी विनंती केली कीं, तुह्मी माझा पक्ष सोडून देऊन निराश होऊं नका, धैर्य धरून ह्या प्रसंगीं तुह्मी युद्ध केलें असतां तुमची मोठी वाहवा होऊन तुह्मांस मोठें वैभव प्राप्त होईल, व तशीच तुमची मोठी प्रतिष्ठा होईल. तेव्हां जे सरदार लोक तेथें जमले होते त्यांनीं शपथ वाहून असें सांगितलें कीं, तुमचा पक्ष आह्मी सोडणार नाहीं, व आह्मी शत्रूस जिंकूं अथवा आपला प्राण देऊं. असें झाल्यानंतर बाबर आपलें सैन्य घेऊन लढाई करण्यास चालून आला. त्या वेळीं त्याच्या लोकांस इतका आवेश आला होता कीं, त्यांनीं लढून शत्रूच्या सैन्यास समरांगणापासून हाकून दिलें.

परंतु पुढेंही तो मरेपर्यंत त्यास रजपूत लोकांपासून फार त्रास सोसावा

लागला. एक दिवस असें झालें कीं, चंदेरी म्हणून एक किल्ला रजपूत लोकांच्या स्वाधीन होता. त्यास वेढा घालून तो लढत असतां, मागें सांगितल्याप्रमाणें रजपूत लोकांनीं साहस करून सर्वांचे प्राण जात तोंपर्यंत निकराची लढाई केली. चंदेरीचा वेढा. ता० २०जानेवारी इ० स० १५२८.

बाबरास अयोध्या व बेहार ह्या प्रांतांतील मुसलमान लोकांपासूनही पुष्कळ त्रास झाला; तेथें बंडें होत तीं ह्यास मोडावीं लागत. परंतु जे वेळेस बाबर मरण पावला ते वेळेस पूर्वीचें जेवढें दिल्लीचें राज्य होतें तेवढें बहुतेक त्याच्या अमलाखालीं आलें होतें. बखेडे. त्याच्या मरणाची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात. ती अशी कीं, हुमायून ह्मणून त्याचा आवडता मुलगा होता, त्याच्या आयुष्याचें संरक्षण व्हावें ह्मणून बाबरानें त्याचें मरण कांहीं कृत्यें करून ईश्वरापासून आपणावर आणिलें. पण बाबरानें आपल्या पुत्राबद्दल आपण मरावें ह्मणून जीं कृत्यें केलीं त्यांच्या योगानें मनांत धास्ती पडून त्यास विकृति होऊन तो मरण पावला असावा, असें दिसतें. बाबराचा मृत्यु.इ०स० १५३०.

बाबर मेल्यानंतर त्याच्या घराण्याची अवस्था उत्तरोत्तर वाईट होत चालली. त्याचें राज्य त्याच्या मुलांनीं वांटून घेतलें. त्या वांटणींत कामरान ह्मणून जो मुलगा होता त्याजकडे काबूल, कंदाहार व पंजाबाचा कांहीं भाग इतके देश गेले. हुमायून जो वडील मुलगा होता त्यास बादशाहीचीं वस्त्रें मिळालीं. परंतु ह्या व्यवस्थेनें असें झालें कीं, पूर्वी जसा बाबर आपल्या सैन्यांत भरती करण्याकरितां सिंधुनदापलीकडील प्रांतांतील लोक आणीत असे; तसें हुमायून ह्यास करण्यास अडथळा झाला. हुमायून इ० स०१५३० त तक्तावर बसतो.

जे वेळेस हुमायून राज्य करूं लागला ते वेळेस आरंभीं पुष्कळ बंडें उत्पन्न झालीं. तीं बंडें मोडून टाकण्यापुरतें त्यास सामर्थ्य नव्हतें.

हुमायून ह्यास पुष्कळ शत्रु झाले; त्यांत शिरशाह ह्मणून एक पठाण जातीचा मुसलमान होता, तो फार प्रबळ होता. त्यानें मोठ्या पराक्रमानें व अत्यंत चातुर्यानें बहार प्रांतांत आपणास मोठी योग्यता मिळविली, व सरशेवटीं तो इतका प्रबळ झाला कीं, हुमायून ह्याजबरोबर युद्ध करून त्यानें त्यास पदच्युत केलें. शिरशाह. इ.स.१५३८. त्यामुळें हुमायुनास राज्य सोडून पळून जावें लागलें. शिरशाह हुमायुनाचें राज्य करीत असतां त्यानें लोकहितकारक अशा पुष्कळ गोष्टी केल्या, व देशाची पुष्कळ सुधारणा के- तो हुमायुनास पद-

च्युत करतो. इ० स० १५४०.

ली. त्यानें फक्त पांच वर्षें राज्य केलें, तरी तितक्या काळांत त्यानें जितक्या लोकहितार्थ गोष्टी केल्या तितक्या पूर्वींच्या कोणत्याही राजानें केल्या नव्हत्या. त्यानें वसूल घेण्याची रीति बदलली, व सर्व अंधाधुंदी मोडून टाकून सर्व लोकांची दाद पूर्वीपेक्षां सुलभ रीतीनें लागेल असें केलें. तसेंच त्यानें प्रजेच्या सुखाकरितां पुष्कळ तळीं वगैरे बांधिलीं. हा राजा जेव्हां मरण पावला तेव्हां सर्व प्रजा फार हळहळली.

त्याचा मृत्यु. इ० स० १५४५.

हुमायून आपलें राज्य पुनः मिळवितो. इ० स० १५५५.

इ० स० १५४५ ह्या वर्षीं शिरशाह मरण पावला. तो त्या वेळेस एका रजपूत लोकांच्या शहरास वेढा घालून तें घेण्याच्या कामांत गुंतला होता. शिरशाहानंतर त्याचा मुलगा राज्य करूं लागला; परंतु पुढें शिरशाहाच्या घराण्यांतील जे पुरुष राज्य करूं लागले त्यांनीं वाईट रीतीनें राज्य केलें, ह्यामुळें पुढें जेव्हां हुमायून आपलें राज्य पुनः मिळविण्याकरितां उद्योग करूं लागला, तेव्हां राज्यांत इतक्या फळ्या झाल्या होत्या, सैन्यांत इतकी अव्यवस्था झाली होती, व कारभारी लोकांची वर्तणूक इतकी वाईट होती कीं, हुमायून ह्यास फार आयास करावे लागले नाहींत.

हुमायुनाचें हिंदुस्थानांतून पळून जाणें.

इकडे शिरशाहानें हुमायुनाचा पराभव केल्यावर तो इराणांत पळून गेला. वाटेनें जातांना त्याचा फार नाश झाला. त्याजबरोबर जे लोक गेले त्यांचे प्रवासांत इतके हाल झाले कीं, ते बहुतेक वाटेनेंच मरण पावले. हुमायून अशा प्रवासांत व विपत्तींत असतां त्यास अकबर ह्मणून एक पुत्र झाला.

हिंदुस्थान परत घेण्याविषयीं त्यास इराणचा बादशाह मदत करितो. त्याचा मृत्यु. इ.स. १५५६.

जेव्हां हुमायून आपलें राज्य परत मिळविण्यासाठीं इराणच्या बादशाहाकडे मदत मागण्याकरितां गेला तेव्हां त्यानें असें दाखविलें कीं, माझीं धर्माविषयीं मतें अगदीं बदललीं आहेत. तेणेंकरून बादशाह फार संतुष्ट होऊन त्यानें त्याच्या स्वाधीन पुष्कळ सैन्य केलें. तें सैन्य घेऊन हुमायून ह्यानें कामरान ह्मणून जो त्याचा भाऊ काबूल व कंदाहार येथें राज्य करीत होता, त्यास तेथून हांकून लाविलें. तेणेंकरून शेवटीं तो इतका प्रबळ झाला कीं, त्यानें आपलें राज्य शिरशाहाच्या घराण्यांतील पुरुषांपासून परत घेतलें. परंतु राज्य मिळाल्यावर तो एका वर्षानें मरण पावला.

**पहिला भाग समाप्त.**

रे. क्र. ११४
ता. ६-१९

# भाग दुसरा.

## मोंगल बादशाहांविषयीं.

इसवी सन १५५६ पासून सन १७४४ पर्यंत.

अकबर—त्याचा बहिराम प्रधान—अकबराची चांगली व फार दिवसांची कारकीर्द—चांगल्या गोष्टींविषयीं त्याचे बेत—जाहानगीर—नूरजहान—जाहानगीराच्या कारकीर्दीच्या अखेरीचीं बंडें—शहाजहान—त्याची आपल्या पुत्रांशीं वर्तणूक—त्याचे गुणदोष—बादशाहाचें दुखणें—त्याच्या पुत्रांची गादीविषयीं आपसांत लढाई—औरंगजेब व मुराद हे दाराबरोबर युद्ध करितात—दाराचा पराजय—औरंगजेब सुजाचा पराभव करितो—औरंगजेबाचा जय—शहाजाहानाचा मृत्यु—मराठे—त्यांचा उदय—त्यांची लढाई करण्याची रीति—शिवाजी—त्याची धूर्तता व दगाबाजी ह्यांचें एक उदाहरण—मराठ्यांशीं लढाई—बादशाह दक्षिणेंत जातो—त्याची अयोग्य रीतीनें रजपूत लोकांशीं वर्तणूक—बंडें—औरंगजेबाचा मृत्यु—त्याच्या राज्याचा लय—नादिरशाहाची स्वारी—दिल्लीची कत्तल—राज्य मोडकळीस येऊन स्वतंत्र सत्ताधारी यांचा उद्भव—नवे लोक राज्य जिंकण्यास व राज्यकारभार करण्यास येतात—हिंदुस्थान मुसलमानांच्या अमलाखालीं असतां त्याची स्थिति.

अकबर ज्या वेळेस राज्यावर बसला त्या वेळेस त्याच्या राज्यांत बरीच स्वस्थता झाली होती; व असा संभव दिसत होता कीं, राज्य चांगलें चालेल. ज्या वेळेस अकबराचा बाप मरण पावला त्या वेळेस तो फार लहान होता, ह्मणून राज्यकारभार बहिराम ह्या नांवाचा मुख्य प्रधान होता त्याच्या हातांत दिला होता. बहिराम ह्यानें फार जपून मोठ्या हुशारीनें तें राज्य चालविलें. बहिरामाच्या कारकीर्दींत बहुतेक सर्व देश हस्तगत झाला. परंतु बहिराम ह्यानें पुढें आपल्या हातांतून अधिकार गेला ह्मणून फार त्रासून बंड केलें, आणि त्यानें जी धन्याची मोठ्या विश्वासानें चाकरी केली होती तीस तेणेंकरून बट्टा आणिला. अकबर जेव्हां मोठा झाला व स्वतः राज्य करूं लागला, तेव्हां राज्यांत बरीच स्वस्थता होती. त्यानें फार दिवस राज्य केलें. आजपावेतों ज्या मुसलमानांनीं हिंदुस्थानांत राज्य केलें त्या सर्वांपेक्षां अकबर चांगला होता. तो आपल्या प्रजेस कोणत्या रीतीनें

अकबर दिल्लीचा बादशाह होतो. इ० स० १५५६.

बहिरामाच्या हातीं राज्यकारभार येतो.

सुख होईल ह्याविषयीं बहुतकरून विचार करीत असे. त्यानें इतक्या उत्तम रीतीनें राज्य केलें कीं, त्याच्या राज्यांत स्वस्थता असून सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक जितके सुखी होते तितके मुसलमान राजांपैकीं कोणाच्याही कारकीर्दीत नव्हते. अकबराच्या सैन्यांत निरनिराळ्या जातीचे लोक होते. त्या सर्व लोकांचीं परस्पर वैमनस्यें मोडून टाकून सर्वांचें एकचित्त करावें असा त्यानें प्रथमतः निश्चय केला; कारण तसें केलें असतां आपणास पूर्वीं जसे बाहेरून हिंदुस्थानांत सैन्याची भरती करण्याकरितां लोक आणावे लागले होते तसे आणावयाची गरज पडणार नाहीं; व प्रसंग पडला असतां आपलें संरक्षण इतर मुलखांतून लोक आणल्याशिवाय आपणास करतां येईल, असें त्यास वाटलें. त्यानें दुसरें असें केलें कीं, हिंदु लोकांस राज्यांतील मोठमोठीं कामें सांगितलीं, व त्यांजवर जे पूर्वीं बहुत अयोग्य कर बसविले होते ते उठविले. शिरशाहाची जी वसूल घेण्याची रीत होती तींत फेरफार करून ती नीट केली; चांगले कायदे केले; तसेंच क्रूर क्रूर दंड करण्याच्या रीति होत्या, त्या मना केल्या; आणि सती बंद करण्याविषयींही त्यानें पुष्कळ उद्योग केला. सारांश, अकबरानें जेणेंकरून आपल्या प्रजेस सुख होऊन तिचा उत्कर्ष होईल अशा रीतीनें सर्व राज्यव्यवस्था चालविली होती.

*अकबराची चांगली व फार दिवसांची कारकीर्द. इ० स० १५५६—१६०५. त्याचे उत्तम प्रकारचे बेत.*

अकबर बादशाहाच्या पाठीमागून त्याचा मुलगा सेलिम ह्मणून होता तो गादीवर बसला. सेलिम ह्यानें आपणास जहानगीर (ह्मणजे जगाचा जिंकणारा) असें नांव ठेविलें. हा राजा आळशी व सुस्त असा होता, तरी अकबराच्या कारकीर्दीत राज्यांत इतकी चांगली व्यवस्था झाली होती कीं, तिच्या योगानें जहानगीर ह्यास पुष्कळ दिवस सुखानें राज्य करावयास सांपडलें. बंडें वगैरे झालीं नाहींत. जहानगीर ह्यानें एक नूरजहान ह्मणून सुंदर व बुद्धिमान् स्त्री होती तिच्याशीं लग्न केलें. ही गोष्ट तो स्वस्थपणें राज्य करीत असतां घडून आली, ती चमत्कारिक आहे.

*जहानगीर तक्तावर बसतो. इ० स० १६०५.*

*त्याचे गुणदोष.*

अकबर जिवंत असतां सेलिम ह्याची त्या स्त्रीवर प्रीति बसून त्याच्या मनांत तिशीं लग्न करावें असें आलें होतें; परंतु अकबरास ही गोष्ट मान्य न झाल्यामुळें ती स्त्री शेर अफगाण नांवाच्या कोण्या एका मोठ्या पदवीच्या गृहस्थास दिली होती. तथापि जेव्हां सेलिम राज्य करूं लागला, तेव्हां त्यानें आपला मनोरथ

*नूरजहान हिशीं बादशाहाचें लग्न.*

सिद्धीस नेण्याचा निश्चय केला. त्यानें नूरजहान हिच्या नवऱ्यास ठार मारवून तीस जनानखान्यांत आणून ठेविलें; परंतु मग त्याची मीति तिजवरून उडाली. तरी ती तेथेंच होती; पण तो तिजकडे अगदीं लक्ष देत नसे. तथापि पुढें नूरजहान हिनें पुनः बादशाहाची मीति संपादिली. तेव्हां बादशाहानें तिच्याशीं लग्न लाविलें, आणि तीस पट्टराणी करून ठेविलें. नंतर तो मरेपर्यंत तिच्याच बोलण्याप्रमाणें बहुतकरून चालत होता.

जहानगीर ह्यास पुष्कळ मुलगे होते; त्यांतील एकजण फार बेफाम होता. ह्यामुळें व नूरजहान हिला आपल्या हातीं राज्याधिकार असावा असें वाटत होतें, म्हणून त्या राज्यांत शेवटीं बंडें उत्पन्न होऊन अव्यवस्था झाली. तेव्हां असें झालें कीं मोबतखान म्हणून एक सरदार होता, त्यानें नूरजहान हिनें आपणास वाईट रीतीनें वागविल्यावरून बंड केलें होतें. मोबतखान ह्यानें त्या बंडांत जहानगीर ह्यास कैद केलें. पुढें जहानगीर कैदेंतून सुटल्यावर लागलाच मरण पावला. नंतर त्याचा मुलगा, ज्यानें एक स्वतंत्र बंड केलें होतें, तो गादीवर बसला. त्याचें नांव शहाजहान होतें.

त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस बंडें; जहानगिराचा मृत्यु; शहाजहान तक्तावर बसतो. ता० २७ अक्टंबर स. १६२७.

शहाजहान ह्याच्या राज्याच्या आरंभीं काबुलांत व दक्षिण हिंदुस्थानांत लढाया लागल्या होत्या. ह्या राजानें आपल्या पुत्रांस फार चांगल्या रीतीनें वागविलें, ही एक विशेष गोष्ट त्याच्या कारकीर्दीत ध्यानांत ठेवण्याजोगी घडून आली. पूर्वीं दिल्लीच्या बादशाहांची अशी चाल होती कीं, ते आपल्या घराण्यांतील पुरुषांस राज्यांतील मोठमोठे अधिकार देत नसत. आजपावेतों ही चाल कोणी मोडली नव्हती; ती शहाजहान ह्यानें मोडून टाकिली; परंतु ह्या गोष्टीपासून परिणामीं त्याचा फार नाश झाला. शहाजहान ह्यानें आपल्या पुत्रांवर पूर्ण भरंवसा ठेवून निःशंकपणें त्यांस मोठीं मोठीं विश्वासाचीं कामें सांगितलीं; व सर्व सैन्याचा अधिकार दिला. त्या मुलांचीं नांवें दारा, सुजा, औरंगजेब, व मुराद अशीं होतीं. ते सर्व निरनिराळ्या स्वभावाचे होते. दारा हा मोठा रागीट होता; सुजा हा विषयी होता; मुराद म्हणून जो त्याचा धाकटा मुलगा होता तो अगदीं मूर्ख होता; व औरंगजेब मोठा कपटी, महादक्ष, हव्यासी व मसलती असा होता.

बादशाहाची आपल्या पुत्रांबरोबर वर्तणूक.

त्यांचे गुणदोष.

इसवी सन १६५७ नांत शहाजहानास फार मोठें दुखणें लागून त्याच्यानें राज्यकारभार अगदीं चालवेनासा झाला. नंतर शहाजहानानें आपला जो दारा म्हणून वडील मुलगा होता त्यास राज्यकारभार सांगितला.

शहाजहानाचें दुखणें व राजसत्तेविषयीं त्याच्या पुत्रांची आपसांत लढाई. स. १६५७.

असें होतांच त्याचे दुसरे मुलगे राज्याकरितां भांडूं लागले. सुजा ह्मणून जो त्याचा मुलगा बंगाल्यांत होता, त्यानें प्रथमतः भांडण्यास आरंभ केला. इकडे लढाईची तयारी होत आहे तों शहाजहान ह्याची प्रकृति बरी झाली, व दारा ह्यानें राज्याचा सर्व अधिकार त्यास परत दिला. परंतु जेव्हां ही गोष्ट सुजा ह्यास कळली, तेव्हां त्यानें मला तें खरें वाटत नाहीं असें दर्शवून आपलें सैन्य घेऊन दिल्लीवर स्वारी केली; पण सालिमन ह्मणून एक दारा ह्याचा मुलगा होता त्यानें त्यास मागें हटविलें.

इकडे असें चाललें असतां औरंगजेब व मुराद हे उगीच बसले नव्हते. औरंगजेब ते वेळेस दक्षिण हिंदुस्थानांत होता, व मुराद गुजराथेंत होता.

औरंगजेबाचें कापट्य.

औरंगजेब बाह्यात्कारी असें ह्मणूं लागला कीं, मला बादशाह होण्याची इच्छा नाहीं व माझ्या मनांत असें आहे कीं, बाकी राहिलेलें आयुष्य धर्मकृत्यांत घालवावें; पण ज्या अर्थी माझे दुसरे दोघे भाऊ राज्य करण्यास अयोग्य आहेत त्या अर्थी मी केवळ परहितबुद्धीनें मुराद ह्यास साहाय्य करीन.

ते यशवंतसिंगाचा पराभव करतात. एप्रिल स० १६५८.

मुराद ह्यास औरंगजेबाचें बोलणें खरें वाटून तो त्याच्या सैन्यांत येऊन मिळण्याकरितां निघाला. इकडे यशवंतशिंग ह्मणून एका रजपूत सरदारास दारा ह्यानें औरंगजेबावर पाठविलें होतें; परंतु तो बुद्ध्या मुराद येण्याची वाट पाहत होता. त्यास असें वाटत होतें कीं, मुराद येऊन औरंगजेबास मिळाला ह्मणजे दोघांस एकदम जिंकून टाकावें. परंतु पुढें असें न होतां त्या रजपूत सरदाराचाच त्यांनीं पराभव केला. नंतर ते दोघे भाऊ दारा ह्याजवर चालून गेले. आपणास यश मिळेल असें दारा ह्यास पक्कें वाटत होतें, त्यामुळें त्याचा मुलगा सालिमन हा त्यास साह्यास येऊन मिळे तोंपर्यंत देखील त्यानें वाट पाहिली नाहीं. त्या प्रसंगीं त्यांची मोठी भयंकर लढाई झाली.

दाराचा पराभव होतो. जून सन १६५८.

औरंगजेब व मुराद हे जेथें मोठी हाणमार चालली होती तेथें होते. ज्या हौद्यांत मुराद बसला होता तो हौदा बाणांच्या वृष्टीनें आच्छादित झाला होता. तेव्हां दैववशात् एक चमत्कारिक गोष्ट घडून आली, तेणेंकरून त्या दोघां बंडखोर भावांस जय प्राप्त झाला. ती अशी कीं, दारा त्या दिवशीं सकाळपासून ज्या हत्तीवर बसला होता त्या हत्तीवरून कांहीं कारणास्तव तो उतरला; मग त्याच्या सैन्यांतील लोकांनीं त्या हत्तीवरील हौद रिका-

मा पाहिला, तेव्हां त्यांस आमचा धनी लढाईंत मारला गेला, असें वाटून ते लागलेच अत्यंत भयभीत होऊन पळून गेले. इकडे औरंगजेब समरांगणांत तसाच होता, त्याचें सर्वांग धुळीनें व रक्तानें भरून गेलें होतें. तो तसाच मुराद ह्याजकडे जाऊन त्यास ह्मणाला कीं, तुला ह्या लढाईंत जय मिळून राज्य प्राप्त झालें; ही मोठी आनंदाची गोष्ट झाली.

ते जेव्हां आग्र्यास आले तेव्हां त्यांनीं शहाजहानास कैद केलें. इतके दिवसपर्यंत औरंगजेब ह्यानें आपल्या मनांतील भाव गुप्त ठेविला होता. औरंगजेबास आतां असें दिसून आलें कीं, तो भाव प्रसिद्ध केला असतां कांहीं हरकत होणार नाहीं. ह्यावरून तो आपणास बादशाह असें ह्मणवूं लागला; व मुराद ह्यास कैदेंत घालून आपण स्वतः राज्याधिकार करूं लागला.

*शहाजहानास कैद करतात.*

परंतु त्याचा सुजा ह्मणून जो एक भाऊ होता त्याच्याशीं औरंगजेबाला अद्यापि लढावयाचें होतेंच. तो बरोबर पुष्कळ सैन्य घेऊन त्याजवर येत होता; ह्या दोघां भावांची मोठी भयंकर लढाई झाली. त्या लढाईंत यशवंतशिंग ह्मणून जो पूर्वीं सांगितला, व ज्यास औरंगजेबानें क्षमा केली होती, त्यानें विश्वासघात केला, तेणेंकरून औरंगजेब ह्याचा पराभव होण्याचा बेत आला होता. यशवंतशिंग ह्यानें औरंगजेबानें केलेली क्षमा न स्मरून ह्या प्रसंगीं औरंगजेबाच्या सैन्याच्या पृष्ठभागीं जे लोक रक्षणार्थ ठेविले होते त्यांवर हल्ला केला, परंतु शेवटीं औरंगजेबासच यश आलें. औरंगजेब व सुजा ह्यांचीं सैन्यें सभोंवतीं एकमेकांशीं लढत असतां ते दोघेही हत्तींवर बसून एकमेकांशीं लढत होते. तेव्हां सुजा ह्याजकडील एका सरदारानें आपल्या धन्याच्या पुढें येऊन त्याच्या हत्तीस औरंगजेबाच्या हत्तीवर घालून त्यास पाडाव केलें. त्या वेळेस औरंगजेब अगदीं हत्तीवरून खालीं उतरण्याच्या बेतांत आला होता, तों त्याच्या एका चाकरानें त्यास उतरूं दिलें नाहीं. तो ह्मणाला कीं, ह्या वेळेस हत्तीवरून खालीं उतरूं नका; जर उतराल तर राज्यास मुकाल. हें चाकराचें बोलणें ऐकून औरंगजेब हत्तीवर तसाच बसला; तेणेंकरून त्याचा बचाव झाला. परंतु सुजा ह्यानें तसें केलें नाहीं; तो हत्तीवरून उतरला; तेणेंकरून सुजा ह्याचा त्या लढाईंत पराभव झाला. ह्यापुढें कांहीं दिवसपर्यंत सुजा तसाच औरंगजेबास उपद्रव करीत होता, परंतु सरशेवटीं तो जिंकला गेला. नंतर सुजा ज्या राजाचा आश्रय करून होता त्यानें त्यास मारून टाकिलें. महंमद

*औरंगजेब आपणास बादशाह ह्मणवूं लागतो. ता० २० आगष्ट स० १६५८.*

*औरंगजेब व सुजा ह्याच्यामध्यें लढाई. ता० ३ जानेवारी, स० १६५९.*

सुजाचा पराभव. ह्मणून औरंगजेबाचा मुलगा होता, त्यानें सुजा ह्याच्या कन्येशीं लग्न करण्याकरितां आपल्या बापास सोडून दिलें होतें. त्यानें सुजा ह्यास एकदां साहाय्य केलें, परंतु औरंगजेबानें महंमदाचा पराभव करून त्यास जन्मभर कैद करून ठेविलें.

दारा ह्मणून जो त्याचा भाऊ होता तोही त्याच्या हातीं सांपडला. दारा सुटून जात होता, परंतु त्यास एका कृतघ्न सरदारानें धरून औरंगजेबाच्या स्वाधीन केलें. त्या सरदारावर दारा ह्यानें दोन वेळ उपकार केले होते, परंतु ते त्यानें ह्या प्रसंगीं स्मरले नाहींत. औरंगजेबानें दारा ह्यास कांहीं दिवस कैदेंत ठेवून मारून टाकिलें.

दाराचें दुर्दैव.

पुढें कांहीं वर्षांनंतर त्याचा बाप शहाजहान, ज्यास पदच्युत केलें होतें, तो मरण पावला. शहाजहान, मेल्यानंतर औरंगजेब दिल्लीच्या सर्व राज्याचा मालक झाला. त्याशीं भांडण करण्यास कोणीच उरला नव्हता; परंतु दक्षिण हिंदुस्थानांत मराठे लोक प्रबळ झाले होते. मराठे लोक मूळचे अडाणी व डोंगरांतील राहणारे असे होते. ते मुख्यत्वेंकरून मुंबईच्या आसपासच्या प्रांतांत राहत असत. औरंगजेबाचे वेळेस त्या लोकांत कोणी एक थोर पुरुष उदयास आला. त्याच्या हाताखालीं ते प्रबळ होत होत औरंगजेबा ह्याशीं तो मरेपर्यंत लढत होते. ते जेव्हां पुढें फारच प्रबळ झाले, तेव्हां उत्तरोत्तर असा सुमार दिसूं लागला कीं, मराठे लोक मुसलमान लोकांचें राज्य घेऊन पुनः हिंदुस्थानांत हिंदूंचें राज्य स्थापित करतील. मराठे लोकांची लढाई करण्याची रीति मोंगल लोकांच्या पेक्षां निराळी होती. त्यांच्या सैन्यांत मुख्यत्वेंकरून घोडेस्वार असत. ते बहुतकरून लढाईची वाट पाहत नसत. ते असें करीत कीं, लढाईचा प्रसंग आला असतां लढाई न करितां ह्या स्थलाहून त्या स्थलावर लूट करीत जात. त्यांवर शत्रूंनीं हल्ला केला असतां ते निरनिराळे होऊन पळून जात; व जेव्हां शत्रु पाठलाग करीत असतां त्यांचे सैन्याच्या टोळ्या व बाजारबुणगे चहूंकडे पसरत, तेव्हां ते पुनः एकत्र जमून त्यांवर हल्ला करीत. सारांश, मराठे लोकांच्या सैन्यास सैन्य ह्मणावयाची योग्यता नव्हती. जसा एखादा चोरटे लोकांचा जमाव आपला कोणी एक धनी करून लुटारूपणा करीत असतो तसें ते लोक करीत असत.

शहाजहानाचा मृत्यु. दिसेंबर स० १६६६.

मराठ्यांचा उदय.

मराठ्यांची लढाई करण्याचीरीति.

मराठे लोकांनीं ज्यास मुख्य केलें होतें त्यास शिवाजी असें ह्मणत. तो शिवाजी प्रथमतः लहान लहान चोऱ्या करीत असे, नंतर मोठमोठ्याही

करूं लागला. ह्याप्रमाणें तो पुढें मोठा प्रबळ झाला. प्रथमतः आपणाजवळ थोडथोडे लोक जमवून जसजसा तो प्रबळ होत चालला तसतसे तेथील डोंगरी किल्ले एकामागून एक घेऊन सरशेवटीं एक मोठा देश त्यानें आपल्या हस्तगत केला. जेव्हां शिवाजी इतक्या योग्यतेस आला, तेव्हां औरंगजेबास भय पडूं लागलें.

शिवाजी राजा.

शिवाजीच्या राज्याच्या शेजारींच विजापूरचें राज्य होतें. तेथील सरकारानें शिवाजीस जिंकून त्याचा उत्कर्ष कमी करावा ह्मणून पुष्कळ उपाय केले; त्या सरकारानें शिवाजीस जिंकण्याकरितां एक सैन्य पाठविलें होतें. त्या सैन्याचा शिवाजीनें पराभव केला, तो येणेंप्रमाणें:—शिवाजीनें बाह्यात्कारीं आपण भ्यालों आहों असें दाखवून त्या सैन्यावरील मुख्य अधिकाऱ्यास सांगून पाठविलें कीं, मी वश होण्यास राजी आहें; तर अशी विनंती आहे कीं, आपली एकांतीं गांठ घेऊन तह करावा व त्या स्थळीं आपण दोघांनीं एकेक चाकर मात्र घेऊन बिनहत्यारी यावें. असा ठराव झाल्यानंतर तो सरदार बरोबर कांहीं शस्त्र न घेतां कराराप्रमाणें शिवाजीस भेटावयास आला. परंतु शिवाजीनें तसें केलें नाहीं. त्यानें आपल्या डोक्यावर पागोट्याखालीं शिरस्त्राण घालून आंगांत मोठ्या पांढऱ्या झग्याखालीं चिलखतही घातलें होतें, आणि हातांत वाघनखें घालून बाहीच्या आंत कट्यार ठेविली होती. तो मुसलमान सरदार जवळ आला, तेव्हां शिवाजीनें भ्याल्याचें सोंग घेतलें; परंतु तो भेटावयास पुढें सरसावला, तेव्हां शिवाजीनें आपलीं वाघनखें त्याच्या पोटांत खुपसून त्यास फाडून त्याचे तुकडे तुकडे केले. इकडे मुसलमान लोकांचें सैन्य स्वस्थ बसलें होतें. त्या लोकांस आपणावर हल्ला येईल असें वाटत नव्हतें. परंतु इकडे शिवाजीनें असें कर्म केल्यावर त्याच्या लोकांनीं त्यांवर हल्ला करून त्यांचा पराभव केला.

त्याच्या दगाबाजीचें व धूर्ततेचें एक उदाहरण. स. १६५९.

ह्या प्रकारच्या विश्वासघातानें व छटपणानें शिवाजी उदयास आला. उत्तरोत्तर त्याचें सैन्यही पुष्कळ वाढलें. नंतर तो दक्षिण हिंदुस्थानभर लुटालूट करीत फिरूं लागला. त्यानें पुढें मोठा समारंभ करून मराठे लोकांचा राजा ह्मणून स० १६७४ त आपणास राज्याभिषेक करून घेतला.

शिवाजीचा त्वरित उदय. स० १६६५.

शिवाजी मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा राज्य करूं लागला. त्यानें व त्याचे पाठीमागून जे राजे झाले त्यांनीं मराठ्यांचा अंमल तसाच राखिला. औरंगजेब व मराठे ह्यांच्या लढाया तशाच चालल्या होत्या. औरंगजेब विजापूरच्या राजाशीं व गोंवळकोंड्याच्या राजाशींही लढत होता.

औरंगजेबाच्या दक्षिणेंत लढाया.

त्यानें गोंवळकोंडयाच्या राजास त्याच्या राजधानींत सात महिनेपर्यंत सभोंवता सैन्याचा वेढा घालून कोंडून ठेविलें होतें. तो मराठयांशींही लढत होता, परंतु त्याच्यानें त्यांचें कांहीं झालें नाहीं. तो दक्षिण हिंदुस्थानींत मराठे लोकांबरोबर पुष्कळ वर्षें लढत होता, परंतु असें होई कीं मराठे लोकांचा एकींकडे मोड होतो इतक्यांत ते दुसरीकडे उठत; ह्यामुळें औरंगजेबास आपलें मोठें सैन्य त्यांजवर लागलेंच नेण्यास सांपडत नसे.

औरंगजेबाच्या उतारवयांत बंडें.

औरंगजेबाच्या राज्यांत दुसरे ठिकाणींही बंडें उत्पन्न झाल्यामुळें त्यास फार इजा सोसावी लागली. औरंगजेबाची आपल्या धर्मावर पक्की श्रद्धा होती, व त्यास असें वाटत होतें कीं, आपला धर्म प्रसृत करावा; परंतु मुसलमान लोकांच्या शास्त्रांत तो धर्म प्रसृत करण्याचा जो मार्ग सांगितला आहे तो अशा तऱ्हेचा आहे कीं, तेणेंकरून इतर लोकांचा द्वेष झाल्यावांचून राहणार नाहीं. आजपावेतों अकबरापासून जे दिल्लीस बादशाह झाले, त्यांनीं रजपूत लोकांस चांगल्या रीतीनें वागविलें होतें; परंतु औरंगजेब फार धर्मवेडा होता तेणेंकरून त्यास असें वाटलें कीं, रजपूत लोकांस गांजून त्यांस जबरीनें मुसलमान करावें आणि ते मुसलमान न होतील तर अकबरानें जो कर त्यांजवरचा उठविला होता तो पुनः बसवावा. अकबरानें जो कर उठविला होता तो मोठ्या शहाणपणानें उठविला होता. परंतु औरंगजेबानें तसें केलें नाहीं. त्याचा परिणामही तसाच झाला. रजपूत लोकांनीं बंडें केलीं, त्या एका बंडांत औरंगजेबाचा चवथा मुलगा येऊन मिळाला. औरंगजेब मरे तोंपर्यंत रजपूत लोक तशींच बंडें करीत होते. औरंगजेब मेल्यानंतर त्याच्या पाठीमागून जे राजे झाले त्यांस त्यांनीं लढाईच्या अथवा दुसऱ्या एखाद्या अडचणीच्या प्रसंगीं साहाय्य केलें नाहीं. ह्या प्रकारें औरंगजेबाच्या राज्याचा क्षय लवकरच झाला.

तो रजपूत लोकांस अयोग्य रीतीनें वागवितो.

औरंगजेबाचें मरण. ता० २१ फेब्रुवारी स० १७०७. राज्याचा लय.

अशा लढाया व दंगे चालले असतां औरंगजेब मरण पावला. औरंगजेब राज्य करीत असतांच त्या राज्याला उतरती कळा लागली होती. मग तर अर्थातच तें लवकर क्षयास जाऊं लागलें. कारण कीं त्याच्या पाठीमागून जे राजे झाले ते दुर्बल व मूर्ख असे होते. त्यांस तें मोठें राज्य नीट आपल्या अमलाखालीं राखण्याची शक्ति नव्हती. तितक्यांत इराणचा बादशाह नादिरशाह ह्यानें हिंदुस्थानावर स्वारी केली, तोमुळें औरंगजेबाच्या राज्याचा क्षय लवकरच

झाला. ह्या स्वारींत तैमूरलंगाप्रमाणेंच ह्यानें दुष्ट व अघोर कर्मे केलीं.

नादिरशाह ह्यास स्वारी करण्याचें कारण असें झालें कीं, औरंगजेब ह्यानें अफगाण लोकांबरोबर लढाई करीत असतां त्यांस फार वाईट रीतीनें वागविलें, तेणेंकरून नादिरशाह ह्यास फार राग आला. तो दिल्लीवर मोठ्या त्वरेनें चालून आला, व त्याजवर जें सैन्य पाठविलें त्यास त्यानें जिंकिलें आणि दिल्ली शहर घेतलें. तें शहर घेतल्यानंतर दोन दिवसपर्यंत तेथें कांहीं गडबड झाली नाहीं. इतकी मात्र वदंता उठली होती कीं, नादिरशाह मरण पावला. परंतु तिसरे दिवशीं रात्रीं दिल्लींतल्या लोकांनीं बंड केलें. ते वेळेस कत्तल व जुलूम हीं चालू झालीं. दुसरे दिवशीं सकाळीं नादिरशाह स्वतः बाहेर येऊन असें हुकूम करूं लागला कीं, ज्या ज्या रस्त्यांवर इराणी लोकांचें प्रेत सांपडेल तेथील राहाणाऱ्या लोकांस मारून टाकावें. ह्याप्रमाणें तीस हजार लोक मारले गेले. असें अघोर कृत्य करून बरोबर पुष्कळ संपत्ति घेऊन नादिरशाह स्वदेशास परत गेला.

नादिरशाहाची स्वारी. नवेंबर, स० १७३८.

दिल्लींतली कत्तल. मार्च, स० १७३९.

ह्या स्वारीनंतर औरंगजेबाच्या राज्याचे अगदीं तुकडे तुकडे झाले. दक्षिण हिंदुस्थानांत निजाम ह्मणून एक मुसलमान सरदार होता तो स्वतंत्र झाला. तसाच बंगाल देश दुसऱ्या एकानें घेतला; व अयोध्या येथें तिसरा निराळाच राज्य करूं लागला. शीख ह्मणून सोळाव्या शतकाच्या आरंभीं नवीन लोक उत्पन्न झाले होते, व ज्या लोकांनीं औरंगजेबास त्रासून बंडें केलीं होतीं, त्यांनीं पंजाब देश घेतला. मराठे लोकही तसेच उत्तरोत्तर प्रबळ होत चालले होते. जरी त्यांचा राजा दुर्बल व निरुपयोगी असा होता, तरी त्यांच्या राज्यांतील पुणें येथील पेशवे मुख्य प्रधान व नागपूर येथील सेनाधिपति ह्या मुख्य अधिकाऱ्यांनीं मराठे लोकांचें प्राबल्य तसेंच राखिलें होतें.

मोंगलांच्या राज्याचा लय व स्वतंत्र राजे व लोक ह्यांचा उदय.

परंतु ह्या वेळेस कोणी नवीनच लोक हिंदुस्थानांत प्रबळ झाले. ते शेवटीं मुसलमान लोकांस, मराठे लोकांस, व शीख लोकांस जिंकून त्यांजवर अंमल करूं लागले. सत्रावे शतकामध्यें पश्चिमेकडील एका दूरच्या बेटांतील कांहीं व्यापारी लोक हिंदुस्थानांत येऊन, कांहीं येथें, कांहीं तेथें, असे राहिले. प्रथमतः त्या लोकांनीं केवळ व्यापाराकडेसच लक्ष दिलें, व ते त्याच कामाकरितां आले होते. परंतु शेवटीं, त्यांस कांहीं प्रसंगामुळें हातांत तरवार घ्यावीच लागली. नंतर उत्तरोत्तर त्यांस राज्य मिळू

हिंदुस्थानांत इंग्लिशाच्या सत्तेचा उद्भव.

लागलें. सर्व प्रांत एका पाठीमागून एक त्यांच्या हातांत येऊन शेवटीं सर्व हिंदुस्थान त्यांचेंच झालें.

हिंदुस्थान मुसलमानांच्या अमलाखालीं असतां त्याची स्थिति.

हिंदुस्थानांत मुसलमान लोकांच्या राज्यांत ज्या मोठमोठ्या गोष्टी झाल्या त्यांचें एवढा वेळ वर्णन केलें. कांहीं मुसलमानी राज्यांत अशीं कांहीं अघोर कर्मे झालीं कीं, त्यांचा विचार केला असतां अंगावर कांटाच येतो. दुसऱ्या कांहीं राज्यांत राजे संपत्तिमान होते, व लोकही सुखी होते; परंतु फिरोजशाह, शिरशाह, व अकबर ह्यांच्या राज्यांत जसें प्रजेच्या कल्याणाकडे वास्तविक लक्ष होतें, तसें इतर राज्यांत नव्हतें. हीं राज्यें खेरीज करून महमुदाच्या कारकीर्दीपासून औरंगजेबाच्या कारकीर्दीपर्यंत हिंदुस्थानांत निरंतर आपसांत लढाया, जुलूम व भयंकर दुष्ट कर्मे चाललीं होतीं. मधून मधून मात्र थोडेंसें प्रजेस सुख होई.

दुसरा भाग समाप्त.

# भाग तिसरा.

## हिंदुस्थानांत इंग्लिशांचा उत्कर्ष.

### इसवी सन १७४४ पासून सन १७५३ पर्यंत.

इंग्लंद व फ्रान्स ह्यांच्यामध्यें लढाई—हिंदुस्थानांतील फ्रेंच लोक—दुप्ली—हिंदुस्थानांत इंग्लिश लोक—लाबरदोन्स मद्रास घेतो—फोर्तसेंतदेवीद ह्यास वेढा—तंजावर येथें एक लहानशी लढाई—युरोपामध्यें शांतता असून हिंदुस्थानांत लढाई चालते—दक्षिण हिंदुस्थानांतील राज्यकारभाराची स्थिति—नासिरजंग व मुजफरजंग—अनवरुद्दीन व चंदासाहेब—हैदराबाद व अर्काट येथील अधिकाराविषयीं तंटा—ह्यांत फ्रेंच लोक एक पक्ष स्वीकारतात व इंग्लिश लोक दुसरा पक्ष स्वीकारितात—एम् बुसी—फ्रेंच लोक विजयी होतात—सलाबतजंगास निजाम करतात—दुप्लीचा जय व आनंद—महमदअल्लीस फ्रेंच लोक त्रिचनापल्ली एथें वेढा घालून कोंडितात—राबर्त क्लैव—तो अर्काट घेतो—तेथील लोक शहराचें पराक्रमानें संरक्षण करितात—अरणी येथील जय—मद्रासेजवळ राजा साहेबाचा पराभव—लारेन्स साहेब त्रिचनापल्ली सोडवितो—सेरिंगहम येथील फ्रेंच लोकांचे शिपायांचें शरण येणें—चंदासाहेब शरण येतो—लारेन्स साहेब फ्रेंचांचा बाहूर येथें पराभव करितो—क्लैव साहेब कोवेलांग व चिंगलपट घेतो व इंग्लंदास परत जातो.

ब्रितिश लोकांनीं हिंदुस्थान जिंकून राज्य कसें मिळविलें, ह्याचें आतां वर्णन करितों. ह्याविषयींचा इतिहास खरा असून जितका चमत्कारिक आहे तितका दुसरा कोठें आढळत नाहीं. पहा, दूरवरच्या देशांतून थोडेशा लोकांनीं हिंदुस्थानांत येऊन तेथें आपल्या देशाला एवढें मोठें राज्य मिळवून दिलें कीं, त्याच्या योगानें त्या देशाची शक्ति वाढून त्यास अत्यंत संपत्तिही मिळाली.

इंग्लिशांच्या राज्याधिकाराच्या इतिहासास आरंभ.

इ० स० १७४४ सांत इंग्लिश आणि फ्रेंच ह्या लोकांत भांडण लागलें. ते वेळेस हिंदुस्थानांत त्या दोन्ही लोकांच्या मोठमोठ्या वसाहती होत्या. तेव्हां अर्थातच हिंदुस्थानांतही तो कज्जा त्या दोन्ही लोकांत चालू होऊन लढाया चालू झाल्या.

इंग्लंद व फ्रान्स ह्यांच्यामध्यें लढाई. स० १७४४.

त्या वेळेस हिंदुस्थानांत फ्रेंच लोकांचें सैन्य सर्वांच्यापेक्षां पुष्कळ होतें. त्यांचें मुख्य शहर पांदेशरी ह्मणून होतें, व त्यांचा जो मुख्य धनी होता तो फार बुद्धिमान् होता, व त्यास हव्यासही फार होता. त्याचें नांव दुप्ली असें होतें.

हिंदुस्थानांत फ्रेंच लोक.

प्रथमतः त्याच्याच मनांत ही कल्पना आली कीं, हिंदुस्थानांतील लोकांस जर युरोपियन कामगारांकडून कवाईत शिकवून तयार करविलें, तर ते लोक शौर्यानें युरोपांतील लोकांची बहुतेक अंशीं बरोबरी करतील. हेंही त्याचे मनांत आलें कीं नेहमीं येथील राजेरजवाड्यांचीं आपसांत भांडणें होतात, ती संधी साधून आपल्या देशाचें कल्याण करून घ्यावें. हिंदुस्थान आपल्या अमलाखालीं आणावें हा त्याचा प्रथमतः मुख्य उद्देश होता, आणि तो सिद्धीस नेण्याकरितां त्यानें आपलें सर्व सामर्थ्य व अक्कल हीं खर्चिलीं. तो महाकपटी होता, व त्यास इकडची माहितगारी फार होती, व त्यास आपला उत्कर्ष व्हावा असें वाटत होतें.

दुप्ली.

परंतु इकडे इंग्लिश लोकांकडे हिंदुस्थानांत फ्रेंचांसारखा कोणी मुख्य सरदार नव्हता. ते लोक अगदीं थोडे होते व त्यांस लढाईचीही माहिती फारशी नव्हती. त्यांस व्यापाराची मात्र पुष्कळ माहिती होती.

युरोप खंडांत फ्रेंच व इंग्लिश ह्यांच्यामध्यें लढाई सुरू होतांच, फ्रेंच सरकारानें हिंदुस्थानच्या दक्षिणेस फार लांब बोरबोन व अईल आफ् फ्रान्स ह्या दोन जागा आहेत, तेथें लाबरदोनूस ह्मणून जो त्यांचा मुख्य सरदार होता त्याजकडून पुष्कळ लढाऊ गलबतें जमवून फोर्तसेंतजार्ज (इंग्लिशांचा मद्रास एथील किल्ला) ह्यावर हल्ला करण्यास त्यास परवानगी दिली. फोर्तसेंतजार्ज येथें इंग्लिशांची मुख्य वसाहत होती.

लाबरदोनूस ह्याचा मद्रासेवर हल्ला. ता० १० सप्तंबर स० १७४६. दुप्लीची अयोग्य वर्तणूक.

लाबरदोनूस पुढें थोडक्याच दिवसांनीं त्या ठिकाणीं येऊन पोहोंचला. नंतर इंग्लिशांची व फ्रेंचांची लढाई चालू झाली. इंग्लिशांनीं पांच दिवसपर्यंत लढून शेवटीं मद्रास व तो किल्ला फ्रेंच लोकांस दिला आणि त्यांच्या ते हस्तगत झाले. ते वेळेस लाबरदोनूस ह्यानें असें वचन दिलें कीं थोडीशी खंडणी घेऊन तुमच्या जागा तुह्मांस परत देऊं. परंतु दुप्ली ह्मणून जो तेथें फ्रेंचांचा मुख्य सरदार होता, त्याच्या मनांत लाबरदोनूस ह्यास जय मिळाला ह्याविषयीं मत्सर उत्पन्न होऊन त्यानें लाबरदोनूस ह्यानें जें वचन दिलें होतें तें मान्य न करून इंग्लिश लोकांस कैद करून पोंदेशरी येथें रवाना केलें, व तेथें त्यानें त्या लोकांस अशा रीतीनें वागविलें कीं, तेणेंकरून फ्रेंच लोकांस व त्यास मोठा बट्टा लागून त्याची फार अपकीर्ति झाली.

फोर्तसेंत देविद ह्याजवर हल्ला. दिसेंबर स. १७४६.

नंतर त्यानें फोर्तसेंत देविद ह्मणून दक्षिणेस पोंदेशरीजवळ एक किल्ला इंग्लिशांच्या ताब्यांत होता तो घेण्याविषयीं यत्न आरंभिला. त्यानें करनाटकच्या नवाबास इंग्लि-

शांबरोबर लढाई करण्यास साहाय्य मागितलें. तेव्हां तो नवाब फ्रेंचांस मिळाला.

इतक्यांत इंग्लंदाहून इंग्लिशांचें सैन्य येऊन पोहोंचलें. हें फ्रेंचांस कळतांच फोर्तसेंतदेविद ह्याजवर जो ते हल्ला करणार होते, तो सोडून देऊन ते पोंदेशरी येथें परत आले. तेथें त्यांस इंग्लिशांनीं वेढा घातला.

इंग्लंदाहून आरमारें येऊन पोंदेशरीस वेढा घालतात. मार्च स. १७४८.

इंग्लिश लोक जरी ह्या वेळेस सर्वांपेक्षां प्रबळ झाले होते, तरी त्यांस तें शहर घेण्यापुरती शक्ति आली नव्हती; ह्मणून कांहीं वेळ फ्रेंचांशीं युद्ध करणें सोडून देऊन तंजावर ह्मणून एक अंवळ प्रांत आहे तेथें एक लहानशी लढाई चालली होती, तींत ते जाऊन मिळाले. तंजावरच्या राजास त्याच्या भावानें पदच्युत करून आपण राज्य बळकावलें होतें. त्या पदच्युत झालेल्या राजानें इंग्लिशांशीं असा करार केला कीं, तुह्मी जर मला साहाय्य करून पुनः गादीवर बसवाल, तर मी तुह्मांस देवीकोटचा किल्ला बक्षीस देईन. नंतर इंग्लिशांनीं आपलें थोडेंसें सैन्य त्या किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां पाठविलें. परंतु थोडयाच दिवसांनीं हा तंटा मिटला; कारण कीं जो भाऊ राज्य करीत होता त्यानें तो किल्ला व भोंवतालचा सर्व प्रदेश इंग्लिशांस देऊं करून त्यांस असें सांगितलें कीं तुह्मी माझ्या भावास अतःपर साहाय्य करूं नये. असें झाल्यावर इंग्लिशांनीं लागलाच त्याचे भावाचा पक्ष सोडून दिला.

तंजावर प्रांतांतील एका लहानशा लढाईंत इंग्लिश जाऊन मिळतात.

देवीकोट त्यांस मिळतो. स० १७४८.

इकडे युरोप खंडांत इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांचेमध्यें तह होऊन लढाया बंद झाल्या. परंतु हिंदुस्थानांतील त्या लोकांच्या लढाया बंद होईनात. जेव्हां युरोपांत लढाई बंद झाली, तेव्हां हिंदुस्थानांत इंग्लिश व फ्रेंच हे पुढारी होऊन लढेनातसे झाले, व एकमेकांच्या सैन्यावर हल्ले करून एकमेकांचीं शहरें घेण्याकरितां त्यांस वेढा घालीनातसे झाले खरे, परंतु हिंदुस्थानांतील जे राजे परस्पर उघड लढाया करीत होते, त्यांस साहाय्य करून व विरुद्ध पक्षाचा स्वीकार करून पूर्वीप्रमाणें लढत असत.

युरोपांत शांतता होते, परंतु हिंदुस्थानांत लढाई चालते.

ह्यापुढें ज्या गोष्टी झाल्या त्या चांगल्या समजण्याकरितां दक्षिण हिंदुस्थानाची ह्या वेळीं जी स्थिति होती तिचें वर्णन अगोदर केलें पाहिजे, ह्मणून तें करितों.

दक्षिण हिंदुस्थानांतील स्थिति.

ह्या वेळेस दक्षिण हिंदुस्थानांत दोन मोठीं राज्यें होतीं. एक निजामाचें

दुसरें करनाटकच्या नवाबाचें. निजामाचें राज्य पूर्वीचें व फार मोठें होतें आणि त्याची दरबाराची जागा हैदराबाद ही होती. निजाम हा पूर्वी दिल्लीच्या बादशाहाचा चाकर ह्मणून राज्य करीत असे, परंतु पुढें दिल्लीचा बादशाह नांवाचा मात्र धनी होता. करनाटकच्या नवाबाची राजधानी अर्काट ही होती, व तो निजाम सरकारच्या अमलाखालीं होता.

ह्या वेळेस हीं राज्यें रिकामीं झालीं होतीं; तेव्हां नासिरजंग ह्मणून शेवटच्या निजामाचा एक मुलगा होता, तो निजामाच्या गादीवर बसला; व करनाटकच्या नवाबाच्या गादीवर अनवरुद्दीन ह्मणून एक बसला. त्या दोघांसही दोन प्रतिपक्षी होते. नासिरजंग ह्यास मुजफरजंग ह्मणून जो त्याचा पुतण्या होता, तो प्रतिपक्षी झाला; व अनवरुद्दीन ह्यास चंदासाहेब ह्मणून पूर्वीच्या नवाबाचा जांवई होता, तो प्रतिपक्षी झाला. मुजफरजंग व चंदासाहेब ह्या दोघांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून फ्रेंचांपाशीं साह्य मागितलें, तेव्हां फ्रेंचांनीं मोठ्या उत्कंठेनें व आनंदानें त्यांस साहाय्य दिलें. डुप्ले ह्मणून जो फ्रेंच लोकांचा सरदार होता, त्यास हेंच पाहिजे होतें. त्यानें लागलेच चारशें फ्रेंच लोक व दोन हजार काळे लोक त्यांच्या साहाय्यास पाठविले. ते वेळेस एक लढाई झाली; तींत मुजफरजंग व चंदासाहेब, जे अन्यायानें राज्य घेण्यास पाहत होते, त्यांस यश आलें. अनवरुद्दीन त्या लढाईत मारला गेला, व महंमदअली ह्मणून त्याचा मुलगा होता तो बाकी राहिलेले सैन्यासहवर्तमान त्रिचनापल्लीस पळून गेला. ते वेळेस बुसी ह्मणून एक फ्रेंच लोकांचा सरदार हिंदुस्थानांत होता, तो फार शूर व हुशार होता. त्यानें पुष्कळ लढाया जिंकून मुजफरजंग ह्यास गादीवर बसविलें. परंतु मुजफरजंग ह्यानें राज्याचा उपभोग फार दिवस घेतला नाहीं. कारण पुढें त्याच्याच राज्यांत एक बंड झालें; तें मोडण्याकरितां तो झटत असतां लढाईत मारला गेला. नंतर बुसी ह्यानें त्याच्या जागीं सलाबतजंग ह्मणून नासिरजंग ह्याचा धाकटा भाऊ होता त्यास गादीवर बसविलें. चंदासाहेबासही जें राज्य पाहिजे होतें तें प्राप्त झालें.

हैदराबाद व अर्काट येथील गादीकरितां लढाई.

मुजफरजंग व चंदासाहेब ह्यांस डुप्ले साहाय्य करितो.

एम्. बुसी.

डुप्लेचे हे दिवस उदय होण्याचे आले होते. निजाम व करनाटकचा नवाब हे त्यानेंच बसविलेले राजे होते. दक्षिण हिंदुस्थानांत जितकी वास्तविक सत्ता ह्याच्या हातांत होती तितकी दुसऱ्या कोणाच्याही नव्हती; डुप्ले ह्याची वाहवा होऊन त्यास मोठाल्या पदव्या मिळाल्या; आणि त्याचे सर्व मनोरथ पूर्ण झाले

डुप्लेचा जय व आनंद. स. १७५०.

असें दिसूं लागलें. तेव्हां आनंदाच्या भरांत त्यानें आपणास ज्या स्थळीं मुख्य यश प्राप्त झालें त्या स्थळाजवळ एक स्तंभ पुरून त्यावर आपली स्तुति लिहिली, व त्या स्तंभासभोंवतीं दुप्ले ह्याच्या जयाचें शहर ह्मणून एक गांव वसविलें.

इंग्लिश दुसऱ्या पक्षास अनुकूळ झाले होते; परंतु फ्रेंचांनीं आपल्या पक्षांतील लोकांस पुष्कळ साह्य केलें; तसें इंग्लिशांनीं जो पक्ष स्वीकारला होता त्यास त्यांनीं केलें नाहीं. इंग्लिशांनीं महंमदअल्ली ह्यास करनाटकचा नवाब असें मानून त्याच्या साहाय्यास थोडेसे लोक पाठविले होते खरे, परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. महंमदअल्ली ह्यास त्रिचनापल्ली येथें वेढा घालून फ्रेंचांनीं कोंडून ठेविलें होतें. त्यानें जेव्हां असें पाहिलें कीं फ्रेंच लोकांसच सर्वत्र यश प्राप्त झालें, तेव्हां तो अगदीं, आपणास साह्य करणारे इंग्लिश लोक ह्यांस सोडून, शत्रूंस मिळण्याच्या व तें शहर त्यांच्या स्वाधीन करण्याच्या बेतांत आला होता. तितक्यांत एक गोष्ट घडून आली, तिणेंकरून त्याचे विचार अगदीं बदलले.

इंग्लिश लोकांचा उदासीनपणा.

त्याच्या मित्राची अवस्था.

फोर्तसेंत देविद येथें इंग्लिश कौन्सलदारांस एका कप्तानानें त्या प्रसंगीं असें सुचविलें कीं, करनाटकच्या नवाबाची जी अर्काट ह्मणून राजधानी आहे तिजवर हल्ला करावा. असें केलें असतां, त्रिचनापल्ली येथील वेढा उठेल; कारण, जेव्हां चंदासाहेबास असें समजेल कीं, आपल्या मुख्य राजधानीस धोका आला, तेव्हां तो अर्थातच त्रिचनापल्लीचा वेढा उठवून तें शहर सोडून जाईल. हा बेत कौन्सलदारांनीं मान्य केला, आणि ज्यानें हा बेत सुचविला होता त्यासच त्याप्रमाणें करण्यास परवानगी दिली.

ज्या कप्तानानें ही वरील मसलत सांगितली त्याचें नांव क्लैव असें होतें. तो मोठा धैर्यवान् व विचारी असून महाचतुर होता. इंग्लिशांस जें हिंदुस्थानांत राज्य प्राप्त झालें, तें ह्याच्या ह्याच गुणांनीं प्राप्त झालें, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. तो मोठा धीट, अभिमानी व फार तलख अशा स्वभावाचा होता. असें असून त्याच्या ठिकाणीं योजनाशक्ति, बुद्धि, व दूरदृष्टि हेही गुण होते. त्यास आरंभीं इंग्लंदांतून सिविल खात्यांत काम करण्याकरितां हिंदुस्थानांत पाठविलें होतें. परंतु त्यास तें काम आपणास योग्य नाहीं असें वाटून त्यानें तें सोडून दिलें आणि लष्करी खात्यांत शिपाईगिरीचें काम पतकरलें. पुढें लवकरच त्याच्या शौर्यैकरून व धीट स्वभावेंकरून असें दिसून आलें कीं, त्यास शिपाईगिरीचेंच काम योग्य होतें.

रावर्त क्लैव.

इसवी सन १७५१ नांत आगस्ट महिन्याच्या २६ वे तारखेस दोनशें इंग्लिश लोक व तीनशें काळे लोक बरोबर घेऊन क्लैव साहेब मद्रासेहून निघाला. त्याच्या बरोबर दुसरें आठ मुख्य अधिकारी होते; परंतु त्यांस लढाईविषयीं माहितगारी फारशी नव्हती. तो मोठया त्वरेनें अर्काट येथें चालून आला. ते वेळेस तुफान सुटलें होतें, तथापि तो तसाच पुढें चालता झाला. विजा चमकत आहेत, पावसाची धार लागली आहे व मेघगर्जना होत आहेत, अशांतून तो आपले थोडेसे लोक बरोबर घेऊन त्या जुन्या किल्ल्याजवळ येऊन पोहोंचला; आणि तो आंत शिरतांक्षणींच शत्रूंनीं तो किल्ला सोडून दिला.

क्लैव साहेबाचें अर्काटावर सांहस. स. १७५१.

नंतर त्यानें त्या किल्ल्याची दागदुजी करण्यास आरंभ केला. त्याच्या भिंती पडावयाला झाल्या होत्या त्यांसभोंवता शत्रूंचा वेढा पडला असतां पडूं नयेत, ह्मणून त्या त्यानें नीट करून बळकट केल्या. आंत जे काळे लोक राहिले होते ते फार भयभीत झाले होते, त्यांचें भय नाहींसें केलें, व आंत जी मालमत्ता सुरक्षित राहण्याकरितां ठेविली होती ती जतन करून ठेविली. जे शत्रूंचे लोक किल्ल्याभोंवतीं भोंवतीं हिंडत होते त्यांजवर त्यानें वारंवार हल्ले केले, आणि तितकेही वेळ त्यासच जय आला. असें चाललें असतां किल्ल्याच्या बंदोबस्ताचें कामही खूब जलद चालविलें होतें; कारण त्यास असें वाटत होतें कीं, शत्रूंचा मोठा वेढा लवकरच पडेल.

तो किल्ला घेतो.

वेढा पडला असतां त्याच्या रक्षणाविषयीं त्याची मोठी तयारी.

पुढें थोडक्याच दिवसांनीं तो प्रसंग आला. चंदासाहेब ते वेळेस त्रिचनापल्ली येथें होता; त्यास आपलें मुख्य शहर शत्रूंनीं घेतलें असें लवकरच समजलें. नंतर लागलेंच त्यानें राजासाहेब ह्मणून एक नवाबाचा मुलगा होता, त्याच्या हाताखालीं सुमारें दहा हजार लोक देऊन आपल्या सैन्यांतून तत्काळ त्यास रवाना केलें. दहा हजारांपैकीं दीडसें फ्रेंच लोक होते.

चंदासाहेब अर्काटास सैन्य पाठवितो. ता० २३ सप्तंबर स. १७५१.

इकडे अर्काटच्या किल्ल्यावर जे इंग्लिशांचे लोक होते त्यांतील पुष्कळ लोक मरण पावले. तेथें एकशें वीस इंग्लिश लोक व दोनशें काळे लोक मात्र उरले होते; परंतु ते जरी थोडे होते, तरी ते धैर्यवान् होते. त्यांनीं सरशेवटपर्यंत धैर्य सोडिलें नाहीं. शत्रूंचा वेढा पन्नास दिवसपर्यंत पडला होता. शत्रूंकडील लोक पुष्कळ असून त्यांनीं हल्ला मोठ्या नेटानें चालविला होता. दररोज

शिपाई लोकांचें धैर्य.

किल्ल्यास अधिक अधिक भोंकें पडत चाललीं, व त्यांचे जवळची सामग्री संपून खावयालाही पोटभर मिळेनासें झालें. अशा संकटसमयीं इंग्लिश लोक व काळे लोक सर्व जात्यभिमान सोडून देऊन मित्राप्रमाणें वागूं लागले. काळे लोक जरी स्वतः उपाशीं मरत होते, तरी त्यांनीं क्लैव साहेब ह्याजकडे जाऊन अशी विनंती केली कीं, आम्हांस भाताची पेज पुरे होईल, बाकीचा राहिलेला भात आमच्या इंग्लिश शिपाई लोकांस देण्यास आम्हांला परवानगी द्यावी. ह्याप्रमाणें तेथील लोकांनीं एकमेकांस साहाय्य करण्याचा व एकमेकांकारितां झटून पडण्याचा दृढ निश्चय केला. असले शिपाई लोक शत्रूस पळवून लावतील ह्यांत काय नवल आहे?

शिपाई लोकांचें औदार्य.

मद्रासेहून त्या लोकांस शत्रूंचे हातून सोडविण्यास कांहीं कुमक येणार होती, ती तेव्हां आली नाहीं; पण पुढें लवकरच आली. अर्काटपासून जवळच करनाटकाच्या तोंडाशीं मुऱ्हारराव ह्मणून एक सरदार मराठे लोकांची पुष्कळ फौज घेऊन उतरला होता. त्याचा इंग्लिशांस साहाय्य करावें कीं फ्रेंचांस साहाय्य करावें ह्याचा निश्चय झाला नव्हता. अर्काटच्या किल्ल्याचें इतक्या चांगल्या रीतीनें संरक्षण केलें हें पाहून त्यास आवेश आला; व जेव्हां त्यास क्लैव साहेबानें साहाय्य होण्याविषयीं विचारिलें, तेव्हां त्यानें त्यास सांगितलें कीं, ज्या अर्थी तुह्मी आपले आपण लढाई करण्यास समर्थ आहां, त्या अर्थी तुमच्या पक्षास मिळावयाची माझी खुषी आहे.

मुऱ्हारराव ह्यानें कबूल केलेली मदत.

हें जेव्हां राजासाहेबास समजलें, तेव्हां त्यास असें वाटलें कीं, आतां वाट पाहूं नये. त्यानें रखवालदारांस वश होण्याविषयीं मोठ्या निकरानें सांगितलें. त्यानें त्यांस लांच देऊं केला व भयही घातलें, परंतु कांहीं झालें नाहीं. नंतर त्यानें असा निश्चय केला कीं, एकदां सरशेवटचा हल्ला करावा. तो हल्ला करण्याकरितां त्यानें तयारी केली. हा हल्ला करण्याकरितां मोहरम महिन्यांतील जो मुसलमान लोकांचा सणाचा दिवस असतो तो दिवस नेमला. त्याचे सैन्यांतील लोक ते दिवशीं अगदीं भांगेनें उन्मत्त झाले असतां, व कत्तलच्या रात्रीं ज्या गोष्टी त्यांच्या लोकांत घडल्या त्यांचें स्मरण होऊन त्यांस मोठा आवेश आला असतां, त्यांस किल्ल्याच्या भिंतीस जेथें भोंकें पडलीं होतीं तेथें हल्ला करावयास त्यानें आणिलें; परंतु इकडे क्लैव साहेब ह्यानेंही तयारी केली होती. शत्रु येतांच त्यानें त्यांवर हल्ला करून त्यांस अगदीं मागें हटविलें. जेथें त्यांची लढाई झाली तेथें

हल्ला. ता० १४ नवंबर स. १७५१.

शत्रूकडील चारशें लोक मेले. ज्या लोकांनीं वेढा घातला होता, ते दुसरे दिवशीं तिसरे प्रहरापासून मध्यरात्रपर्यंत मधून मधून तोफा मारीतच होते. नंतर ते थांबले. तिसरे दिवशीं सकाळीं सूर्योदयीं पहातात तों अर्काटच्या भोंवतीं जें येवढें मोठें सैन्य जमलें होतें तें नाहींसें झालें.

क्लैव याचा जय.

नंतर लागलीच मद्रासेहून क्लैव साहेबास कांहीं कुमक येऊन पोहोंचली. ही कुमक येतांच तो शत्रूचें सैन्य परत चाललें होतें, त्याचा पाठलाग करीत गेला; आणि अरणी ह्मणून एक गांव आहे त्याजवळ राजासाहेबाचे सैन्यास गांठून त्यानें त्याचा अगदीं पराभव केला. ह्या प्रसंगीं इंग्लिश लोकांस पुष्कळ फायदा झाला. फ्रेंचांनीं कवाईत शिकवून तयार केलेले सहाशें काळे लोक आपलें लष्कर सोडून इंग्लिशांस येऊन मिळाले, व शत्रूचा सर्व खजिनाही इंग्लिशांच्या हातीं सांपडला. नंतर क्लैव साहेब फोर्तसेंत देविद येथें परत आला. वाटेनें येतां येतां कांजेवेरम येथील किल्ला फ्रेंच रखवालदारांच्या ताब्यांत होता तो त्यानें हस्तगत करून घेतला; ह्याप्रमाणें क्लैव साहेबाचा सर्व मनोरथ सिद्धीस गेला. त्रिचनापल्लीस जो वेढा घातला होता, तो उत्तरोत्तर कमी होत चालला. शत्रूची सामग्रीही संपत आली, व महंमदअली ह्यास करनाटकचा नवाब असें बहुतेक सर्वांनीं मान्य केलें.

अरणी येथील लढाई. स. १७५१.

कांजेवेरम येथील किल्ला क्लैव घेतो. त्याचा बेत सिद्धीस जातो.

परंतु ही गोष्ट झाल्यावर कांहीं दिवसपर्यंत इंग्लिश लोक, जसे ते पूर्वी निकरानें लढत होते, तसे लढेनातसे झाले. जसा त्यांनीं चांगल्या रीतीनें आरंभ केला होता, तसें त्यांनीं काम पुढें चालविलें नाहीं. ते आळशी होऊन कशाची काळजी न बाळगतां स्वस्थ राहिले.

पुढें सुमारें तीन महिन्यांनीं राजासाहेब बरोबर मोठें सैन्य घेऊन फोर्तसेंतजार्ज किल्ल्यावर आला. त्या सैन्यांत चारशें फ्रेंच लोक होते. क्लैव साहेब त्यास लढाई देण्याकरितां बाहेर आला; परंतु राजासाहेब लढाईची वाट न पहातां माघारा परतला. असें दिसतें कीं, तो क्लैव साहेबाचें नांव ऐकून भिऊन पळाला. क्लैव साहेबानें शत्रूचा तसाच पाठलाग करून कोवेरपंक येथें त्यास गांठलें आणि तेथें त्याचा पराभव करून पुष्कळ नाश केला. ही लढाई झाल्यावर राजासाहेबाच्या सैन्याची फुटाफूट झाली. त्या सैन्यांतील फ्रेंच लोकांची टोळी पोंदेशरीस परत गेली. क्लैव साहेब फोर्तसेंत देविद एथें ही लढाई

राजासाहेब मद्रासेवर चालून जातो, परंतु क्लैव समोर येतांच मागें हटतो.

कोवेरपंक येथें क्लैव सा-

जिंकून परत येत असतां दुप्ली ह्याचा स्तंभ व शहर ह्यांजकडून आला. ते वेळेस त्यानें असा हुकूम केला कीं, हीं दोन्ही मोडून टाकावीं, कारण तो मोठा शहाणा होता, ह्मणून त्यास असें वाटलें असेल कीं ह्या॰लोकांस बाहेरला डामडौल फार आवडतो, तेव्हां हें पाहून त्यांच्या मनांत फार भय उत्पन्न होईल.

*हेब त्याचा पराभव करतो. फेब्रुवारी स. १७५२.*

इकडे त्रिचनापल्लीस जो वेढा पडला होता तो तसाच होता. इंग्लिशांस ह्या प्रसंगीं असें वाटूं लागलें कीं, त्रिचनापल्ली शत्रूच्या हातून पक्केपणीं सोडविली पाहिजे. ह्यावरून इंग्लिश सरकारानें क्लैव साहेब ह्यास तिकडे पाठविण्याचा निश्चय केला; परंतु इकडे त्यावरील जुना मुख्य अधिकारी जो मेजर॰लारेन्स ह्मणून इंग्लंदास गेला होता, तो परत आला, तेव्हां अर्थातच मजर लारेन्स ह्यास क्लैव साहेबाच्या जागयावर नेमणें भाग पडलें. नंतर क्लैव साहेब ह्यास त्याच्या हाताखालीं नेमून पाठविलें.

*त्रिचनापल्लीस कुमक पाठवितीत. ता. १७ मार्च स. १७५२.*

हे इंग्लिश लोक त्रिचनापल्लीस पोहोंचल्यावर पाहतात तों महमदअल्ली ह्यास नुकतीच म्हैसुराहून १४००० लोकांची व ६००० मराठे लोकांची कुमक मिळाली होती; आणि तंजावराहूनही कांहीं लोक आले होते.

*इंग्लिशांस नवे लोक सहाय मिळतात.*

हें सैन्य जेव्हां जवळ येऊन पोहोंचलें, तेव्हां चंदासाहेबाकडील लोकांनीं त्यास सोडिलें, आणि फ्रेंच लोक जे त्याकडे होते ते सेरिंगहम ह्मणून एक त्रिचनापल्लीजवळ मोठें बळकट देऊळ आहे तेथें माघारे गेले. त्या ठिकाणीं इंग्लिशांनीं व त्यांच्या पक्षाकडील लोकांनीं त्यांस वेढा घातला. पोंदेशरी येथें जे फ्रेंच लोक होते त्यांनीं आपल्या लोकांस सोडविण्याविषयीं पुष्कळ उपाय केले, व इंग्लिश लोकांच्या लष्करावर त्यांनीं मोठया आवेशानें हल्ला केला, परंतु तें सर्व क्लैव साहेबाच्या मोठया व निरंतर दक्षतेमुळें व्यर्थ गेलें. ते फ्रेंच लोक कांहीं दिवसपर्यंत मोठया धिट्टाईनें लढून शेवटीं हस्तगत झाले.

*फ्रेंचलोकांस सेरिंगहम येथें वेढा पडून ते हस्तगत होतात. ता॰ ३ जून स॰ १७५२.*

चंदासाहेबास जेव्हां असें दिसून आलें कीं, आपणास सर्वांनीं सोडून दिलें व आतां कोणाचा आश्रय राहिला नाहीं, तेव्हां तंजावराहून जें सैन्य इंग्लिशांकडे आलें होतें त्यावरील मुख्याच्या तो स्वाधीन झाला. त्या सरदारानें चंदासाहेबास असें वचन दिलें होतें कीं, तुला मी सुरक्षित ठेवीन; परंतु पुढें त्यानें आपलें वचन मोडून चंदासाहेबाचें डोकें मारलें. चंदासाहेब ते वेळेस फार दीनदशेंत आला होता. इंग्लिशांकडील मुख्य सरदारांनीं त्या सरदारास

*चंदासाहेबाचा खून ता. ११ जून स. १७५२.*

कांहीं चार गोष्टी सांगावयाच्या होत्या, परंतु तसें केलें नाहीं, ही गोष्ट फार वाईट झाली.

त्रिचनापल्ली इंग्लिशांच्या हातीं येते.

त्रिचनापल्ली येथें शेवटीं दोन वर्षेपर्यंत वारंवार लढाया होत होत्या; तें शहर इंग्लिशांच्या स्वाधीन झालें. लारेन्स साहेब कांहीं लोक त्याच्या संरक्षणार्थ ठेवून फोर्तसेंत देविद एथें गेला. वाटेनें जातां जातां त्यानें जिंजीचा किल्ला घेण्यास यत्न केला,

बाहूरयेथील लढाई. स० १७५२.

परंतु त्यांत त्याचा पराभव होऊन तो हटला. तरी पुढें लवकरच बाहूर ह्मणून एक गांव आहे त्याजवळ त्यास कांहीं फ्रेंचांचें सैन्य भेटलें, त्या सैन्याचा त्यानें अगदीं पराभव करून टाकला.

इकडे क्लैव साहेबास कोव्हेलंग व चिंगलपट ह्मणून मद्रासेजवळ दोन

कोव्हेलंग व चिंगलपट हे किल्ले क्लैव साहेब घेतो. सप्तंबर व अक्टंबर, स. १७५२.

किल्ले आहेत ते घेण्याकरितां पाठविलें होतें. त्याजबरोबर जे लोक होते ते नुकतेच इंग्लंदांतून आलेले होते, व दुसरे कांहीं थोडेसे जुने लोकही होते. त्याच्या हाताखालीं असे जरी लोक होते, तरी त्यानें त्या लोकांनिशीं आपलें काम बजाविलें. ह्या प्रसंगीं तर त्याचा शिपाईपणा व हुशारी फारच दिसून आली. परंतु कांहीं दिवसांपासून त्याची प्रकृति बिघडत चालली होती, ह्मणून तो पुढें लवकरच प्रकृति नीट करण्याकरितां इंग्लंदास परत गेला.

क्लैव साहेबास हिंदुस्थानांत येऊन आठ वर्षें झालीं होतीं. परंतु तो

क्लैव साहेब इंग्लंदास परत जातो. स. १७५३.

जेव्हां येथें आला तेव्हां दक्षिण हिंदुस्थानांतील कारोमांडलच्या किनाऱ्यानजीकची स्थिति अगदीं निराळी होती; व पुढें जेव्हां परत गेला तेव्हां ती अगदीं निराळी झाली होती. ते वेळेस फ्रेंच लोकांची सत्ता उत्तरोत्तर वाढत चालली होती, पण हल्लीं ती झपाट्यानें नाहींशी होत होती. ते वेळेस दुप्लेच्या मसलती सिद्धीस जात होत्या, पण हल्लीं त्या अगदीं व्यर्थ

करनाटकांत इंग्लिशांची स्थिति.

जाऊं लागल्या होत्या. ते वेळेस इंग्लिश लोक केवळ व्यापाराच्या कामांत मात्र गुंतले होते. ते कीर्द खतावण्या लिहीत असत व व्यापाराच्या मालाचा हिशेब राखीत असत; परंतु ह्या वेळेस त्या लोकांस करनाटकांत स्वामित्व प्राप्त झालें होतें. ते लोक मोठ्या शौर्यानें युद्ध करीत व कसला जरी संकटसमय आला तरी धीर धरून राहत, तेणेंकरून असें दिसून येऊं लागलें होतें कीं, जी सत्ता त्यांना हळू हळू प्राप्त होत होती, तिचा उपभोग घेण्यास ते योग्य आहेत.

**तिसरा भाग समाप्त.**

# भाग ४.

## ब्लाकहोल. योग्य बक्षीस.

(इसवी सन १७५३ पासून १७५७ पर्यंत.)

लढाई धिमेपणानें चालते —फ्रेंच व इंग्लिश ह्यांच्यामध्यें तह—क्लैव साहेबाचें परत येणें—घेरिया किल्ल्याचा नाश—सुराजउद्दवला—तो कलकत्ता घेतो—ब्लाकहोल (आंधारकोठडी)—सूड उगविणाराचें येणें—कलकत्ता पुन्हा घेतात—नवाबाचे सैन्याचा पराभव—नवाबाशीं तह—चंद्रनगर घेतात—सुराजउद्दवलाची विरुद्ध वर्तणूक—त्याच्या विरुद्ध कट—मीरजाफर—ब्रितिश लोक हे सुराजउद्दवला ह्यास पदच्युत करण्याच्या मसलतींत गुंततात, व तिचा मोड उमीचंद करितो—त्याचा लोभ—त्यास उलट फसवितात—इंग्लिश मुर्शिदाबादेकडे जातात—प्लासी येथील लढाई—जय—इंग्लिश हे राजधानीस पोहोंचतात—मीरजाफरास नवाब करतात—उमीचंदाचा शेवट—सुराजउद्दवलाचा खून.

क्लैवसाहेब गेल्यानंतर ती लढाई तशीच सुरू होती. परंतु इंग्लिश व फ्रेंच हे दोघेही झटून लढाई चालवीनातसे झाले. त्रिचनापल्ली हें शहर इंग्लिशांच्या स्वाधीन होतें खरें, परंतु त्या शहराविषयीं इंग्लिशांचे व मराठे वगैरे जे त्यांच्या पक्षांत होते त्यांचे वारंवार तंटे होऊं लागले. त्यांचा परिणाम असा झाला कीं, ते जे सर्व एकत्र होते त्यांची फुटाफूट झाली; त्यांतील पुष्कळ राजे इंग्लिशांस सोडून फ्रेंचांस मिळाले.

लढाई मंदावते.

पुढें थोडेच दिवसांनीं फ्रेंच लोकांशीं तह झाला. डुप्ली ह्यानें जें सर्व केलें होतें तें फ्रेंच सरकारास मान्य न होऊन त्यांनीं त्यास परत येण्याविषयीं हुकूम पाठविला; डुप्ली हा स्वदेशास परत गेल्यावर त्याचे फार हाल होऊन व मोठी अप्रतिष्ठा होऊन तो सन १७६४ त पारिस शहरामध्यें मरण पावला. फ्रेंच सरकारानें इंग्लिशांशीं तह करण्याकरितां एक गोधू ह्मणून कामगार पाठविला होता. ते वेळेस इंग्लिश लोकांस अनुकूल असा तह ठरला. असें होण्याचें कारण असें झालें कीं, इंग्लिश कामगारांस ते येथेंच होते ह्मणून त्यांस उपयुक्त गोष्टी कोणत्या हें चांगलें समजत होतें; आणि फ्रेंच लोकांचा हा सरदार तर हिंदुस्थानांत नवीनच आला होता, व त्यास माहितीही चांगली नव्हती.

फ्रेंचांबरोबर तह.ता.११ जानेवारी स.१७५५.

फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांच्यामध्यें तह होऊन युरोपांतील व हिंदुस्थानांतील परस्पर तंटे मोडले. परंतु इंग्लिश सरकारास असा पक्का सुमार दिसून आला कीं, पुनः लवकर ल-

लढाई पुन्हा सुरू होण्याचा संभव.

ब्रिटिश सरकार क्लैव साहेबास पुनः हिंदुस्थानांत पाठवितें. अक्तोबर स० १७५५.

ढाई उत्पन्न होईल. तेव्हां त्या सरकारच्या मनांत असें आलें कीं, आपल्या स्वाधीन ज्या जागा हिंदुस्थानांत आहेत त्यांचें संरक्षण होण्याकरितां लढाई सुरू होण्याच्या पूर्वीं कांहीं बंदोबस्त केला पाहिजे. ह्याकरितां धोक्याच्या प्रसंगास क्लैव साहेबच योग्य आहे ह्मणून त्यास हिंदुस्थानांत पाठवावें. हा निश्चय झाल्यावर त्यांनीं त्यास फोर्तसेंत देविद येथील गवरनर नेमिलें.

घेरियाचा नाश. ता० १३ फेब्रुवारी, स० १७५६.

तो हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यानें प्रथमतः जे मराठे चांचे लोक पुष्कळ वर्षेपर्यंत उपद्रव करीत होते, त्यांचा अगदीं नाश करून टाकिला. त्या लोकांचा घेरिया ह्मणून एक मुख्य किल्ला होता त्यावर समुद्रांतून व जमिनीवरून हल्ला करून त्यानें तो घेतला. तो किल्ला गेल्यानंतर ते लोक दुर्बळ होत चालले.

इंग्लिश लोकांची बंगाल्यांत हेलना झाली तीबद्दल खबर.

परंतु ह्या कामापेक्षां मोठमोठीं कामें त्यास करावयाचीं होतीं. तो फोर्तसेंत देविद एथें येऊन पोहोंचल्यावर लागलीच त्यास एक फार वाईट बातमी समजली. त्यानें असें ऐकिलें कीं, बंगाल्यांत नवाबानें कलकत्ता शहर हस्तगत करून जे इंग्लिश लोक सांपडले त्यांचे त्यानें हालहाल करून वध केला. येणेंकरून इंग्लिशांच्या नांवास मोठा कलंक लागला; त्यामुळें दक्षिण हिंदुस्थानांतील जे त्यांचे स्वदेशीय होते त्यांचें चित्त तो सूड उगवण्याकडे लागलें.

आलिवर्दीखान.

हिंदुस्थानाच्या ईशान्य दिशेस जे बंगाला, ओरिसा व बहार ह्मणून प्रांत आहेत तेथें पुष्कळ दिवसपर्यंत अलिवर्दीखान ह्मणून मोठा प्रबळ राजा राज्य करीत होता. तो अलिवर्दीखान इतर नवाबांप्रमाणें व राजांप्रमाणें दिल्लीच्या बादशाहाच्या अमलाखालीं पूर्वीं होता; परंतु पुढें तो स्वतंत्र झाला होता. स्वतंत्र असें त्यास नांव मात्र मिळालें नव्हतें. तो इसवी सन १७५६ नांत मरण पावला.

सुराजउद्दवला.

त्याच्या पाठीमागून त्याचा नातू सुराजउद्दवला ह्मणून होता तो राज्य करूं लागला. तो मूर्ख, स्वभावानें क्रूर व आपलपोट्या असा होता. सुराजउद्दवला इंग्लिशांचा पूर्वींपासूनच नेहमीं फार द्वेष करीत असे. तो द्वेष तो राज्यावर बसल्यानंतर लागलाच प्रसिद्धीस आला. कलकत्ता येथें जे इंग्लिश व्यापारी लोक होते त्यांनीं असा विचार केला कीं, आपणाजवळच फ्रेंचांची एक वसाहत

आहे, व फ्रेंचांशीं लढाई सुरू होण्याचा समय जवळच आला आहे, ह्याकरितां आपण बंदोबस्त केला पाहिजे; ह्मणून ते लोक कलकत्ता येथील किल्ल्याची दागदुजी करूं लागले. हें पाहून सुराजउद्दवला ह्यास फार राग आला. त्यानें तें काम बंद करण्याविषयीं हुकूम केला; परंतु तो त्यांनीं मानला नाहीं. त्या कारणानें व त्याचा कोणी संबंधी पळून कलकत्त्यास गेला होता, त्यास त्यांनीं देण्याचें मान्य केलें नाहीं, ह्या दोहों कारणांनीं अत्यंत क्रोधायमान होऊन त्यानें आपलें सैन्य जमा केलें, आणि तो इंग्लिशांवर चालून आला. इंग्लिशांचा कलकत्ता येथील किल्ला चांगला तयार झाला नव्हता; त्याच्या भिंती जुन्या झाल्या होत्या, व त्याजवर संरक्षणार्थ लोक थोडे असून त्यांचीं हत्यारें वगैरे चांगलीं नव्हतीं. अशी जरी स्थिति होती तरी, इंग्लिशांनीं त्या किल्ल्याचें संरक्षण तीन दिवसपर्यंत केलें. परंतु पुढें त्यांस असें दिसून आलें कीं शत्रु फार प्रबळ आहे, त्याच्या पुढें आपलें कांहीं चालणार नाहीं. जेव्हां किल्ल्यावर हल्ला होण्याची वेळ जवळ आली, तेव्हां त्याचें अगदीं धैर्य सुटलें. गवरनर व त्यांचा जो मुख्य होता तो व दुसरे पुष्कळ लोक पळून गेले, आणि तेथील नदींत जाऊन जहाजावर बसून त्यांनीं आपले प्राण वांचविले.

इंग्लिशांच्या वर्तणुकीचा त्यास राग येऊन तो कलकत्त्यावर चालून जातो.

परंतु १९० लोक त्या किल्ल्यांत राहिले होते, त्यांनीं हालवेल साहेब ह्मणून एक त्यांमध्यें होता त्यास मुख्य केलें. नंतर चवथे दिवशीं तो किल्ला नवाबानें घेतला, तेव्हां लागलेच त्याचे शिपाई लोक आंत शिरले. नवाबही लागलाच तेथें आला, आणि त्यानें त्या सर्व किल्ल्यांतील सांपडलेल्या लोकांस पुढें आणून त्यांस खजिना कोठें आहे ह्मणून विचारिलें. त्यास असें वाटत होतें कीं, इंग्लिशांचा खजिना किल्ल्यांतच आहे. त्यानें इंग्लिश कैदी लोकांस चांगल्या रीतीनें वागवून त्यांस असें वचन दिलें कीं, तुमच्या जिवास धका लागणार नाहीं. असें झाल्यावर त्यानें त्या कैदी लोकांस ज्या शिपायांच्या पाहाऱ्यांत दिलें त्या शिपायांनीं त्यांस एकीकडे नेऊन त्या किल्ल्यांतील एका अंधेऱ्या कोठडींत नेऊन ठेविलें. ते सुमारें १४६ होते व ती खोली औरसचौरस २० फुटांची होती. इंग्लिश लोकांनीं असें जेव्हां पाहिलें तेव्हां हे आपणांस येथें कोंडून मारतील अशी शंका त्यांस आली नाहीं; कारण त्यांस, तुमच्या जिवास धका लागणार नाहीं, असें नवाबानें वचन दिलें होतें; परंतु त्यांची ही भ्रांति लवकरच

कलकत्त्यास वेढा घालून नवाब तो घेतो. ता॰२० जून स॰ १७५६.

दूर झाली. त्या शिपायांनीं त्या सर्व कैदी लोकांस त्या खोलींत खचून भरून खोलीचें दार बंद करून कुलूप लाविलें.

त्या कैदी लोकांस ती सारी रात्र तेथेंच काढावयाची होती. आंतील सर्व लोक अत्यंत भयभीत होऊन त्यांचीं तोंडें सुकून गेलीं. त्यांनीं आपली तेथून सुटका होण्याचा कोणताही उपाय करण्याचें ठेविलें नाहीं. पाळी-पाळीनें त्यांनीं तडफड करून त्या पहारेकरी लोकांची काकळूत केली; तें मोठ्यानें आरडूं लागले; व त्यांनीं रखवालदारांस कांहीं लांचही देऊं केला; परंतु तें सर्व व्यर्थ गेलें. ते रडत आरडत, तिकडे त्या रखवालदार लोकांनीं कांहींच लक्ष दिलें नाहीं, उलटे हातांत दिवे धरून त्यांस पहाण्याकरितां व ते अशा दुःखांत असतां त्यांचा उपहास करण्याकरितां ते खिडकीच्या गजांशीं येत; तेव्हां त्या कैदी लोकांनीं विनंती केली कीं, आमची नवाबास ही दशा सांगावी. तेव्हां त्या शिपायांनीं उत्तर दिलें कीं, नवाबसाहेब निजले आहेत, तर त्यांची झोंप मोडली असतां ते आम्हांस रागें भरतील. भरउन्हाळा असल्यामुळें गरमी अतिशयित होऊन त्यांस फारच तहान लागली, म्हणून त्यांनीं पाणी मागितलें; तेव्हां शिपायांनीं थोडेंसें पाणी आणून दिलें. परंतु पाण्याचे भांड्याशीं हिसकाहिसक केल्यामुळें त्यांतील पाणी सांडून गेलें. नंतर ते शिपाई अधिक पाणी आणीनातसे झाले.

ब्लाकहोल (अंधारकोठडी) ता. २० जून स० १७५६.

जसजशी रात्र अधिक होत चालली, तसतसे त्यांचे हाल अधिक होत चालले. ते नानाप्रकारें विनवणी करीत, शाप देत, देवाचा धांवा करीत, त्या ओरडण्याच्या नादानें ती सर्व खोली भरून गेली. ते एकमेकास तुडवीत व निराश होऊन एकमेकांशीं भांडत; परंतु ह्या गोष्टी हळूहळू बंद झाल्या. शेवटीं उष्णतेनें व तृषेनें अत्यंत व्याकुळ होऊन व अत्यंत निराश होऊन त्य खोलींत प्राण सोडावा म्हणून ते पडले. सकाळीं जेव्हां खोलीचें दार उघडलें, तेव्हां त्यांत तेवीस असामी मात्र जिवंत राहिले होते; पण त्यांस हातपाय हालविण्याची देखील शक्ति राहिली नव्हती.

नवाब आपल्या राजधानीस जयजयकार करीत परत जातो.

हें जें मोठें घोर कृत्य झालें, त्याविषयीं नवाबास कांहींच माहिती नव्हती. परंतु तें त्यास समजलें तेव्हां त्याच्या मनास त्या मेलेल्या माणसांविषयीं कांहींच वाटलें नाहीं, व ज्या लोकांनीं हें कृत्य केलें, त्या लोकांस तो रागें भरला नाहीं. पुढें लवकरच तो नवाब आपल्या राजधानीस जयजयकार करीत व आपण जो जय मिळविला त्याची मोठी बढाई करीत परत आला.

परंतु त्याचा सूड पुढें इंग्लिशांनीं लवकरच उगाविला. हीं जीं त्यानें चाइट कृत्यें केलीं त्यांची बातमी पूर्वीच मद्रासेस लागली होती. तेथें तत्काल एक सैन्य तयार होऊन अडमिरल वाटसन् ह्याच्या जहाजांत अक्टोबर महिन्याच्या सोळावे तारखेस रवाना झालें. त्या सैन्यावर मुख्य क्लैव साहेब ह्यास नेमिलें होतें. हें सैन्य मोठ्या त्वरेनें जात होतें; परंतु वारा प्रतिकूळ लागला ह्मणून बंगाल्यास जाण्यास त्यास सुमारें अडीच महिने लागले.

सूड उगविणाराचें येणें

क्लैव साहेब बंगाल्यास येऊन पोहोंचतांच पुढें चालू झाला. त्यानें वाटेंत पुष्कळ किल्ले घेऊन नवाबाच्या सैन्यास हटविलें. पुढें लवकरच पुनः कलकत्ता घेऊन हुगळीं येथील किल्ला व शहर हीं त्यानें हस्तगत केलीं. सुराजउद्दवला ह्यास हें कळल्यावर तो पूर्वीपेक्षां मोठें सैन्य घेऊन त्याजबरोबर लढाई करण्यास आला, परंतु क्लैव साहेब ह्यानें ह्याही सैन्याचा पराभव करून त्यास हटवून लाविलें. ह्या लढाईत नवाबाचा फार नाश झाला.

क्लैव साहेब पुनः कलकत्ता घेतो. ता० २ जानेवारी स० १७५७.

हीं त्यांचीं कृत्यें पाहून नवाब अत्यंत भयभीत झाला, आणि तह करण्याविषयीं विनंती करूं लागला. क्लैव साहेबास असें करणें बरें वाटलें नाहीं तरी, नवाबाचें ह्मणणें त्यास मान्य करावें लागलें; कारण इंग्लंद व फ्रान्स ह्यांच्यामध्यें त्या वेळेस लढाई सुरू झाली होती. त्या वेळेस जर तो नवाबाशीं लढता तर फ्रेंच लोकांस इंग्लिशांवर हल्ला करण्यास फार सोपें गेलें असतें. तेव्हां क्लैव साहेबास असें वाटलें कीं, एकट्या फ्रेंचांकडेसच लक्ष असलें ह्मणजे त्या लोकांस आपणावर हल्ला करण्यास तितकें सोपें जाणार नाहीं. ह्यावरून इंग्लिशांचा व नवाबाचा तह झाला. त्या तहांत बंगाल्यांत जीं इंग्लिशांचीं ठाणीं होतीं तीं त्यांस परत मिळालीं, नवाबाच्या राज्यांत इंग्लिशांच्या मालावर कर घेत असत तो माफ झाला, आणि कलकत्ता येथील किल्ल्याचा बंदोबस्त करण्यास इंग्लिशांना परवानगी मिळाली.

नवाब तह करावयास इच्छितो.

तह. ता ०९ फेब्रुवारी स. १७५७

नंतर क्लैवसाहेब फ्रेंचांविषयीं विचार करूं लागला. कलकत्त्याच्या नजीक उत्तरेस चंद्रनगर ह्मणून एक शहर आहे, तेथें फ्रेंच लोकांची एक मोठी वसाहत होती. क्लैवसाहेबानें तिजवर हल्ला करण्याचा निश्चय केला. ह्या कृत्याकरितां त्यानें नवाबास परवानगी विचारली. नवाबानें पुष्कळ मागें पुढें पाहून सरशेवटीं परवानगी दिली. नंतर इंग्लिशांचीं जहाजें व सैन्य नदीं-

चंद्रनगरावर हल्ला. ता० २३ मार्च स० १७५७.

तून त्या शहरापाशीं गेल्यावर त्यांच्याशीं फ्रेंचांनीं मोठ्या निकरानें युद्ध केलें, तरी तें शहर लवकरच इंग्लिशांच्या हस्तगत झालें.

नवाबाची राग्टिपणाची व विसंगतपणाची वागणूक.

इंग्लिशांस हा जय प्राप्त झाला, तेणेंकरून ते पूर्वीपेक्षां फार प्रबळ झाले. हें पाहून नवाबास फार वाईट वाटलें. आपले नवीन साह्यकारी इंग्लिश लोक ह्यांपासून आपणांस फार धोका आहे असें त्याच्या मनानें घेतलें; व जोंपर्यंत हे आपल्या देशांत आहेत तोंपर्यंत आपलें काय होईल ह्याचा भरंवसा नाहीं; ह्मणून चांगली एखादी संधी पाहून इंग्लिशांशीं जो आपण तह केला आहे तो मोडून टाकून त्यांपासून वेगळें व्हावें, असें त्यास वाटूं लागलें, व तेणेंकरून त्याच्या वर्तणुकींत फार अंतर पडूं लागलें. एके दिवशीं त्यानें इंग्लिशांशीं मोठें सख्य दाखवावें; एके दिवशीं, दक्षिण हिंदुस्थानांत फ्रेंच लोकांचा सरदार असे, त्यास इंग्लिशांशीं लढण्याकरितां सहाय होण्याविषयीं विनंती करावी; एके दिवशीं क्लैवसाहेबाच्या पत्राचा मोठा तिरस्कार करावा व एके दिवशीं त्या पत्राचे मोठ्या आर्जवानें जबाब लिहावे; तेथें वाटसाहेब ह्मणून रेसिडेंत होता त्यास एखादे वेळेस असें भय घालावें कीं, मी पुष्कळ हाल करून तुला ठार मारीन, व एखादे वेळेस मोठ्या आदरसत्कारानें त्यास दरबारांत आणून त्याची मोठी मानमान्यता करावी. ह्या प्रकारचें त्याचें विरुद्धाचरण पाहून, व तो आपल्या प्रजेस वारंवार फार त्रास देई, तेणेंकरून, सर्व लोकांस त्याचा इतका त्रास आला कीं, त्याचे कांहीं मुख्य अधिकारी होते त्यांनीं कट केला आणि त्यास पदच्युत करण्याचा व त्याचे जागीं त्याचा मीरजाफर ह्मणून सेनाधिपति होता तो बसविण्याचा बेत केला.

नवाबाविरुद्ध बेत.

हा बेत क्लैवसाहेबास व कलकत्ता येथील कौन्सलदारांस समजला. कौन्सलदारांच्या मनांत त्या गोष्टीपासून अगदीं अलग राहावें असें होतें. परंतु क्लैवसाहेबानें त्याचें भय कमी करून त्यांस चार गोष्टी सांगून मीरजाफर ह्यास साहाय्य करण्यास व त्याच्याशीं पत्रव्यवहार चालू करण्यास त्यांचें मन वळविलें. ह्याप्रमाणें त्या कटांत इंग्लिश लोक शिरल्यावर तो सुरळीत चालला होता; परंतु तो कट सिद्धीस नेण्याचे दिवस जेव्हां जवळ आले, तेव्हां उमीचंद ह्मणून एक मोठा वजनदार व्यापारी होता, त्याच्या योगानें तो मोडण्याचा रंग आला होता.

ब्रिटिश लोक हे एका मसलतींत गुंततात.

उमीचंद.

उमीचंद पहिल्यापासून ह्या कटांत मिलाफी होता, परंतु इकडे नवाबाचा पूर्ण भरंवसा त्याजवर होता, ह्मणून त्यानें असें मनांत आणिलें कीं, ह्या संधीस आपण आपलें कांहीं तरी हित करून घ्यावें.

स्वभावानें फार लोभी होता. त्यास असें वाटलें कीं, ह्या वेळेस आपणास पुष्कळ पैसा मिळवितां येईल. नंतर त्यानें क्लैव साहेबास असें कळविलें कीं, हा बेत मीं गुप्त राखावा अशी इच्छा असल्यास मला तुह्मी तीस लक्ष रुपयांचें खत लिहून द्या; नाहीं तर हा बेत मी नवाबाचे कानावर घालीन.

त्याचा लोभीपणा व विश्वासघातकीपणा.

हें पाहून कलकत्त्यांतील कौन्सलदारांचें धैर्य खचलें. परंतु क्लैव साहेबानें त्यास लबाडी करून ठकविण्याचा बेत केला. त्यानें कौन्सलदारांकडून दोन करारनामे तयार करविले; एक जो खरा करारनामा होता, तो पांढऱ्या कागदावर लिहविला होता, त्यांत उमीचंदाचें नांव कोठेंही दाखल केलें नव्हतें; व दुसरा जो खोटा तयार करविला होता, तो तांबड्या कागदावर लिहविला होता, त्यांत जें उमीचंदास बक्षीस द्यावयाचें तें देऊं ह्मणून वचन दिलें होतें. त्या करारनाम्यावर सर्व कौन्सलदारांनीं सह्या केल्या, परंतु अदमिरल वॉतसन् ह्यानें मात्र सही केली नाहीं. त्यानें सांगितलें कीं, मी ह्या कामांत अगदीं पडणार नाहीं. परंतु क्लैवसाहेबानें असा निश्चय केला कीं, कसेंही करून हा बेत सिद्धीस न्यावा. त्यानें लबाडीनें त्या करारनाम्यावर अदमिरल वॉतसनची खोटी सही घालून तांबडा करारनामा उमीचंदास दाखविला. तेव्हां तो पाहून त्यास मोठा आनंद झाला. ह्या प्रकारें उमीचंदाचें तोंड बंद झालें.

क्लैवसाहेब त्यास उलटें फसवितो.

क्लैवसाहेबानें नवाब ह्यास स्नेहाच्या रीतीनें असें लिहून पाठविलें कीं, तुमच्या मनांत आह्मांविषयीं कांहीं शंका आली आहे असें दिसतें. तर तुह्मी ती मनांत अगदीं आणूं नये; परंतु वॉतसन साहेब ह्यास लिहून पाठविलें कीं, जलदी करून बंड उठविण्याची तयारी करावी. मीरजाफर हा अनुकूळ होण्यास कांकूं करूं लागला, तेणेंकरून क्लैव साहेबास फार त्रास पडला. त्यानें असा निश्चय केला कीं, एकदम कामास लागून बेत सिद्धीस न्यावयाचा, तो ठेवायाचा नाहीं.

क्लैवसाहेब मुरशिदाबादेवर जातो.

त्यानें सुराजउद्दवला ह्यास लिहून पाठविलें कीं, तुह्मी फ्रेंचांपाशीं साहाय्य मागत होतां हें मोठें विश्वासघाताचें काम केलें, ह्याकरितां आह्मी तुमच्या राजधानीस येण्याकरितां निघालों आहों; आह्मी तेथें आलों ह्मणजे तुमच्या दरबारांतील मुख्य लोकांच्या कानावर हें घालूं व ते काय ह्मणतात तें पाहूं. हें लिहिण्याचा अभिप्राय वस्तुतः लढाई करण्याचा होता. नवाबासही तोच अभिप्राय वाटून त्यानें आपलें सैन्य जमा करून इंग्लिशांब-

नवाब लढाईची तयारी करितो.

रोबर लढाई करण्याकरितां त्यांजवर चालून जाण्याचा निश्चय केला.

इकडे क्लैवसाहेब चंद्रनगराहून निघाला. त्याजवळ दोन हजार इंग्लिश लोक व तीन हजार काळे लोक इतके मात्र होते. त्यांजबरोबर आठ तोफा होत्या. हें सैन्य इतकें लहान होतें तरी त्यांतील लोक आवेशाचे असून त्यांस पक्की खातरी होती कीं, आपणास यश मिळेल. परंतु क्लैवसाहेब जेव्हां शत्रूच्या फौजेच्या जवळ आला, तेव्हां त्याच्यानें एकदम त्यांवर हल्ला करवेना. तशांत मीरजाफर ह्याविषयीं त्याला कांहीं आलीकडे वर्तमान समजलें नव्हतें. त्या प्रसंगीं क्लैवसाहेब मोठ्या अडचणींत सांपडला होता. त्याजवळ फौज फार थोडी होती, भोंवतालचे सर्व प्रदेशांतील लोक प्रतिकूळ होते, व शत्रूचें सैन्यही फार मोठें होतें. त्यास ह्या प्रसंगीं असें वाटलें कीं, आतां जर शत्रूचा पराभव आपल्या हातून झाला नाहीं, तर इंग्लिश लोकांचा अंमल बंगाल्यांतून नाहींसा होईल इतकेंच होणार नाहीं, तर सर्व हिंदुस्थानांत कोठेंही तो राहणार नाहीं. तो एका नदीजवळ लष्करासुद्धां उतरला होता. त्यास असें वाटलें कीं नदी उतरून पलीकडे गेलों तर पुन्हा माघारें येण्याची अडचण पडेल. ह्मणून त्यानें आपल्या सैन्यांतील मुख्य अधिकाऱ्यांची सभा भरवून त्यांस मसलत विचारली कीं, आपण ही नदी उतरून जाऊन युद्ध करावें अथवा येथें राहावें ?

*क्लैव साहेबाचें सैन्य.*

*लढाईतील मुख्य अधिकाऱ्यांची सभा.*

क्लैव साहेबाचें व दुसरे बहुतेक असामींचें असें मत पडलें कीं, लागलेंच जाऊन लढाई करूं नये. सभा उठल्यावर क्लैवसाहेबानें तेथील एका आंबराईत जाऊन एक तासभर स्वस्थपणें ह्याविषयीं विचार केला. तेव्हां त्यानें असा निश्चय केला कीं, जें होईल तें होवो, शत्रूस लढाई दिल्यावांचून क्षणभरही राहूं नये. नंतर तो आपल्या लष्करांत परत आला, आणि आपल्या लोकांस त्यानें असा हुकूम केला कीं, उद्यां सकाळीं शत्रूवर जाण्यास सिद्ध असावें.

शत्रूचें सैन्य प्लासी ह्मणून एक खेडें आहे, तेथें उतरलें होतें. क्लैवसाहेब ह्याचेंही सैन्य त्या ठिकाणाजवळ एका दिवसांत येऊन दाखल झालें. क्लैवसाहेब ह्याच्या प्रतिपक्षाकडील फौज फार मोठी होती; त्यांत किमानपक्ष ५०,००० तरी लोक होते. त्या लोकांपैकीं १५,००० घोडेस्वार होते. ५० तोफा होत्या व त्या तोफांवर एक फ्रेंच सरदार मुख्य होता.

*प्लासी येथें लष्कराचा मुक्काम.*

क्लैवसाहेब ह्यानें आपलें सैन्य घेऊन शत्रूच्या फौजेपासून एका कोसावर एका आंबराईत तळ दिला. इंग्लिशांचे लष्करांत शत्रूच्या फौजेकडून

शिंगें, तुताऱ्या वगैरे वाद्यांचा शब्द ऐकूं येई, व त्यांच्या सैन्यांत हजारो लोक जमले होते त्यांचा कलकलाट दुरून कानीं पडे.

दुसऱ्या दिवशीं सूर्योदयीं युद्धास आरंभ झाला. प्रथमतः नवाबानें तोफांची सुरुवात केली. इंग्लिश लोक ज्या आंबराईत उतरले होते, तिच्या भोंवतालीं मातीची उंच दरड होती, तिच्या योगानें त्यांचा पुष्कळ बचाव झाला. इंग्लिशांपाशीं थोड्या तोफा होत्या तरी जेव्हां त्यांनीं त्या तोफा मारण्यास आरंभ केला, तेव्हां त्या ते मोठ्या नेमानें मारीत, तेणेंकरून नवाबाच्या सैन्यांतील लोकांचा फार नाश झाला. ह्याप्रमाणें दोन प्रहर दिवस येई तोंपर्यंत चाललें होतें. नंतर मोठी पावसाची सर पडूं लागली. तेणेंकरून नवाबाच्या सैन्यांतील दारूगोळा वगैरे सामान खराब झालें. तेव्हां त्याच्या सैन्यांतील तोफांचा भडिमार कमी झाला. पुढें त्याच्या घोडेस्वारांनीं हल्ला केला; परंतु इंग्लिशांनीं नेमानें थोड्याशा तोफा मारून त्यांस हटविलें.

प्लासी येथील लढाई. २३ जून १७५७.

पाऊस थांबल्यावर पुढें तीन वाजत तोंपर्यंत तोफा सुटतच होत्या. तीन वाजतां इंग्लिशांस अशी बातमी लागली कीं, शत्रु परत जाऊं लागले. ही बातमी ऐकून त्यांस फार आनंद झाला; व तेणेंकरून त्यांस उत्तेजन आलें. नवाबाच्या सैन्यांत त्याच्या मुख्य सरदारांपैकीं एक सरदार तोफेचा गोळा लागून मरण पावला होता. तेणेंकरून नवाब फार भयभीत झाला व त्यास त्याच्या कारभाऱ्यांनीं लबाडी करून जी मसलत सांगितली, तीस त्यानें रुकार दिला, आणि सैन्यास माघारें फिरण्याविषयीं हुकूम दिला. नवाबाचें सैन्य कांहीं वेळपर्यंत व्यवस्थेनें परत जात होतें, परंतु क्लैवसाहेबानें त्या आंबराईतून पुढें येऊन फ्रेंच लोक ज्या एका लहानशा तलावावर होते तो घेतला; तेणेंकरून क्लैवसाहेबास तोफा मारण्यास चांगली माऱ्याची जागा सांपडली. नंतर क्लैवसाहेब तसाच झपाट्यानें पुढें आला आणि शत्रु ज्या छावणींत परत जात होते तीवर त्यानें हल्ला केला. त्या छावणीसभोंवता खंदक खणिला होता. तेव्हां नवाबाच्या सैन्याचा मोड होऊन अगदीं दाणादाण झाली; आणि त्या सैन्यांत हजारों अडाणी लोक होते ते पराभूत होऊन पळून गेले.

ह्याप्रमाणें क्लैवसाहेबास जय प्राप्त झाला. नंतर त्यानें तीन कोसपर्यंत शत्रूंचा पाठलाग केला; आणि तेथें मुक्कामाकरितां तळ दिला. पुढें लवकरच मीरजाफर त्यास भेटायास आला, तो क्लैवसाहेबास जय मिळाला हें ऐकून मोठा आनंदी होऊन त्याकडे आला होता. परंतु त्यास अशी शंका वाटत होती कीं, क्लैवसाहेब आपलें आगतस्वागत चांगल्या रीतीनें करणार

नाहीं; कारण त्या लढाईत त्यानें अगदींच साहाय्य केलें नव्हतें. तो उदासीन राहून कोणत्याही पक्षास मिळाला नव्हता. असें असतां क्लैवसाहेबास जेव्हां मीरजाफर भेटावयास गेला, तेव्हां तो तंबूबाहेर सामोरा आला; व त्याचा मोठा आदरसत्कार करून त्यानें बहार, ओरिसा आणि बंगाला, ह्या देशांचा नवाब ह्या नात्यानें त्यास मान दिली.

क्लैव मुरशिदाबादेस येऊन नव्या नवाबास अधिकारावर बसवितो. ता० २९ जून स० १७५७.

नंतर दोघे मिळून मुरशिदाबादेस गेले. मुरशिदाबाद ही पूर्वीच्या नवाबाची राजधानी होती. तेथें त्या नवाबाचा खजिना होता. क्लैवसाहेब व मीरजाफर हे दोघे तो खजिना जप्त करण्याकरितां व तेथील लोकांचें प्रेम संपादण्याकरितां गेले होते. तेथें गेल्यावर क्लैवसाहेबानें मोठा समारंभ करून हजारों लोकांमध्यें मीरजाफरास आपल्या हातानें तक्तावर बसविलें.

पुढें लागलेंच, ह्या राजक्रांतींत ज्या मुख्य मुख्य लोकांचें अंग होतें, त्यांची एका श्रीमंत व वजनदार हिंदु गृहस्थाच्या घरीं सभा भरून त्या सभेंत इंग्लिशांचा व त्यांचा तहनामा ठरला होता तो त्यांनीं वाचला; आणि इंग्लिशांस काय बक्षीस द्यावें ह्याचाही विचार केला.

शेवटचे बंदोबस्त.

नवाबाच्या खजिन्यांत जितका पैसा सांपडेल असें इंग्लिशांस वाटत होतें, तितका सांपडला नाहीं; ह्मणून मीरजाफरानें, तुह्मांस जो पैसा द्यावयाचा त्यांतील निमे रुपये मी आतांच देतों व बाकीच्या रुपयांची फेड तीन वर्षांत करीन, असा त्यांच्याशीं करार केला, आणि त्यांच्या कामगार लोकांसही मोठमोठ्या देणग्या दिल्या. त्या उभयतांच्यामध्यें आणखी असा ठराव झाला कीं, जे पूर्वी इंग्लिशांचे हक्क होते ते त्यांजकडे असावे, कलकत्त्याचे दक्षिणेस काल्पीपर्यंत सर्व प्रदेशाची जमीदारी त्यांच्याकडे असावी, व नवाबाच्या राज्यांत इंग्लिशांच्या मालावर जकात घेऊं नये, व पुनः फ्रेंच लोकास तेथें राहूं देऊं नये.

उमीचंदाचा शेवट.

मीरजाफर ह्यास गादीवर बसविल्यानंतर मुख्य मुख्य लोकांची जी सभा भरली ह्मणून वर सांगितलें, त्या सभेस उमीचंदही आला होता. त्यास पक्कें वाटत होतें कीं, आपणास जें पुष्कळ द्रव्य देऊं केलें आहे तें आतां मिळेल. परंतु त्यानें तेथें करारनामा वाचतांना जेव्हां ऐकला, तेव्हां त्यास फार नवल वाटलें; कारण कीं, ज्या पूर्वीच्या करारनाम्याची त्यानें आपणापाशीं नक्कल ठेविली होती, तो करारनामा अगदीं निराळा होता. करारनामा वाचल्यानंतर उमीचंदास असें सांगितलें कीं, तांबड्या कागदावर जो तुला करार-

नामा लिहून दिला आहे तो लबाडीचा आहे, ह्मणून तुला कांहीं मिळणार नाहीं. असें ऐकतांच उमीचंद दुःखानें अत्यंत व्याकूळ होऊन त्यास हातपाय हालविण्याची देखील शक्ति राहिली नाहीं. जेव्हां तो शुद्धीवर आला, तेव्हां असें दिसून आलें कीं, त्याची निराशा झाल्यामुळें त्याच्या बुद्धीस भ्रंश झाला. पुढें तो मरे तोंपर्यंत तसाच भ्रांतिष्ट होता. उमीचंद पुढें थोड्या दिवसांनीं मरण पावला; त्याच्या मरणापासून लोकांस दुःख वाटलें नाहीं, व तो मेला ह्मणून कोणी त्याच्या नांवाकरितां कांहीं समारंभही केला नाहीं.

वर ज्या गोष्टींचें वर्णन केलें आहे त्या गोष्टींतल्या दुसऱ्या एका पुरुषाच्या मरणाविषयीं सांगावयाचें आहे. तो सुराजउद्दवला. त्यानें ह्मासी येथें आपल्या सैन्यास परत फिरण्याविषयीं हुकूम दिला, आणि लागलाच आपण तेथून पळून जाऊन मुरशिदाबाद येथील आपल्या वाड्यांत आला. परंतु जेव्हां त्यास असें कळलें कीं, मीरजाफर आणि क्लैवसाहेब हे मुरशिदाबादेंत शिरले आहेत, तेव्हां तो वेष पालटून फक्त दोन चाकरांसहवर्तमान रात्रीं आपल्या राजधानींतून बाहेर चालता झाला. परंतु तो पळून जात असतां कोणा एका मनुष्यानें त्यास ओळखिलें. त्या मनुष्यास सुराजउद्दवला ह्यानें फार त्रास दिला होता. त्यानें सुराजउद्दवला ह्यास धरून कैद करून मीरजाफराजवळ आणिलें. मीरजाफर ह्याचे मनांत त्याचा जीव घ्यावयाचा नव्हता. परंतु मीरन ह्मणून त्याचा एक क्रूर पुत्र होता त्याच्या आग्रहावरून सुराजउद्दवला ह्यास त्यानें त्याच्या स्वाधीन केलें.

सुराजउद्दवला ह्याचा पळ.

त्यास पकडतात.

नंतर मीरन ह्यानें दोन प्रहर रात्रीं सर्वत्र सामसूम झाल्यावर त्या वाड्याच्या एका दूरच्या कोपऱ्यांत त्यास नेऊन निर्दयपणानें त्याचा जीव घेतला.

मीरन त्यास ठार मारतो. स. १७५७.

मीरजाफर व क्लैवसाहेब ह्यांचे सर्व गोष्टींविषयीं ठराव झाल्यावर क्लैवसाहेब आपलें लहानसें सैन्य घेऊन कलकत्त्यास परत गेला. त्यानें जातांना शंभर जहाजें भरून खजिना नेला. तो गेला तेव्हां मोठा समारंभ केला होता. त्याच्या आरमारांतील होड्यांत निशाणें उडत आहेत व बाजा वाजत आहे, अशा थाटानें तो हुगळी नदींतून गेला. त्याच नदीवर एक वर्षापूर्वी जेव्हां माजी नवाब जयजयकार करीत कलकत्त्याहून गेला, तेव्हां फारच निराळ्या तऱ्हेचा समारंभ दृष्टीस पडला होता.

इंग्लिश जयजयकार करीत कलकत्त्यास परत जातात.

**चवथा भाग समाप्त.**

# भाग पांचवा.

## इंग्लिशांनीं करनाटक घेतलें ह्याविषयीं व बंगाला येथें मीरजाफर ह्यानें विश्वासघात केला ह्याविषयीं वर्णन.

इसवी सन १७५६ पासून सन १७६० पर्यंत.

करनाटक प्रांतीं कांहीं वेळपर्यंत शांतता—शत्रुत्वाचा पुनः उद्भव—तिणवल्ली व नेलूर येथें स्वार पाठवितात—त्रिचनापल्लीवर फ्रेंच लोक हल्ला करतात—कप्तान कालियद हा तिचें संरक्षण करितो—फ्रेंच लोकांचें सैन्य येऊन पोहोंचतें—लाली व त्याचा स्वभाव—फोर्तसेंत देविद ह्यावर हल्ला—बुसी ह्यास परत बोलावितात—लाली तंजावरावर स्वारी करितो—फोर्तसेंत जार्ज ह्यास वेढा—कर्नेल कूट साहेब कलकत्त्याहून येतो—तो वांदिवाश व कारंगोली हे किल्ले घेतो—वांदिवाश येथील लढाई—फ्रेंचांचा पराभव—त्यांस पोंदेशरी येथें वेढा पडतो—उत्तर सरकार येथें कर्नल फोर्द त्यांस जिंकितो—पोंदेशरी घेतो—लालीचा शेवट—शाहआलम बहार प्रांतीं स्वारी करितो—क्लैव साहेबापुढें तो मागें हटतो—मीरजाफराची कृतघ्नता—दच लोक त्यास साहाय्य करतात—दच लोकांचा पराभव—क्लैव बंगाला सोडतो.

करनाटक प्रांतीं शांतता.

क्लैवसाहेब आपली फौज घेऊन बंगाला येथें लढत असतां कारोमांडल किनाऱ्याकडे जे दुसरे इंग्लिश लोक होते ते उगीच बसले नव्हते. पूर्वी जो तह सांगितला त्या तहानंतर कांहीं दिवसपर्यंत तेथें शांतता होती. बंडें वगैरे झालीं नाहींत; परंतु जेव्हां इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांच्यामध्यें लढाई चालू झाली, तेव्हां पुनः हिंदुस्थानांत कज्जे व लढाया फार चालू झाल्या.

करनाटकांत महंमदअल्ली ह्मणून एक मुसलमान सरदार निर्वेधपणानें राज्य करीत होता. परंतु हल्लीं त्यावरही संकटें येऊं लागलीं. त्याच्या राज्यांत बंडें उत्पन्न होऊं लागलीं तीं त्याच्यानें मोडवतना. त्याचा भाऊ देखील त्याचें ऐकेनासा झाला. इंग्लिश नवाबाच्या पक्षाचे होते, त्यांस

महंमदअल्लीच्या साहाय्यास तिणवल्ली व नेलूर येथें स्वार पाठवितात.

असें वाटलें कीं, आपण ह्यास नवाब केलें आहे, त्या अर्थी त्यास साह्य करावें, हें आपणास योग्य आहे. जेव्हां फ्रेंच लोकांनीं त्रिचनापल्लीवर हल्ला केला होता, तेव्हां तें शहर सोडविण्याकरितां नवाबास ह्मैसूरच्या राजानें साहाय्य केलें होतें; त्याबद्दल तो राजा तें शहर बक्षीस मागत होता. असले जे कोणी त्या शहरावर अयोग्य रीतीनें वारसा सांगत होते, त्यांशीं लढून इंग्लिश लोकांनीं त्या शहराचें संरक्षण केलें,

आणि मधुरा व तिणवल्ली ह्या प्रांतांत नवाबाचा अंमल चालू करण्याकरितां कांहीं लोक रवाना केले. परंतु त्या प्रांतांत पाळेगार ह्मणून लोक होते त्यांनीं, व तेथें दुसरे कोणी रानटी लोक होते त्यांनीं, इंग्लिशांकडील लोकांचें कांहीं-एक चालूं दिलें नाहीं. नवाबाचा अंमल बसविण्याकरितां नेलूरासही कांहीं लोक रवाना केले. तेथें इंग्लिशांनीं हल्ला केला, परंतु त्यांस मागें हटावें लागलें.

त्रिचनापल्लीवर फ्रेंच लोक हल्ला करतात.

जेव्हां फ्रेंचांच्या दृष्टीस पडलें कीं, इंग्लिश लोक ह्याप्रमाणें अगदीं गुंतले आहेत, व त्यांची फौज इतकी दूर गेली आहे, तेव्हां त्यांनीं त्रिचनापल्लीवर पुनः हल्ला केला. कप्तान कालियद ह्मणून दुसरा इंग्लिशांच्या सेनेचा मुख्य अधिकारी होता, तो ही गोष्ट ऐकतांच तेथें आला; आणि ज्यांनीं शहरास वेढा घातला होता त्यांस कळूं न देतां आंत शिरला. त्या इंग्लिश सरदाराच्या हुशारीनें व चपलतेनें त्या लोकांचे सर्व बेत फसले, व त्यांस पोंदेशरीस परत जाणें भाग पडलें.

कप्तान कालियद तिचें संरक्षण करितो. ता० २६ मे स. १७५७.

ह्यानंतर कांहीं दिवसपर्यंत विशेष कांहीं झालें नाहीं. पुढें लवकरच कांहीं लढाऊ गलबतें फ्रान्स देशाहून पोंदेशरीजवळ आलीं, त्यांत जें सैन्य आलें होतें त्याचा मुख्य कौंत धी लाली ह्मणून होता. तो ऐर्लंदांत जन्मला असून फ्रेंच सरकारापाशीं चाकरीस राहिला होता. त्याचा स्वभाव रागीट व कुरठा असे. त्याच्या हाताखालचे जे अधिकारी होते त्यांचा तो फार हेवा करी; व एथील लोकांची त्यास अगदीं माहिती नव्हती. ह्या लोकांशीं आपण कसें वागावें ह्याचें त्यास शहाणपण नव्हतें. ह्यामुळें पुढें त्याचा फार तोटा झाला.

फ्रान्स देशाहून लाली ह्या सरदाराबरोबर सैन्य येऊन पोहोंचतें. ता. २८ एप्रिल स० १७५८.

त्याच्या आरंभिच्या कृत्यांवरून असा संभव दिसून आला कीं, त्यास यश प्राप्त होईल. ज्या दिवशीं संध्याकाळीं तो जहाजांतून उतरला, त्याच दिवशीं त्यानें आपलें सैन्य फोर्तसेंत देविद ह्या किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां रवाना केलें. त्या किल्ल्यावर चांगला बंदोबस्त नव्हता. कांहीं वेळ त्यांचें ह्यांचें युद्ध झाल्यावर फ्रेंच लोकांच्या हातीं तो किल्ला लागला. हा जो त्याला जय प्राप्त झाला तेणेंकरून तो मोठा आनंदी होऊन पोंदेशरीस परत आला. त्याचा असा पक्का निश्चय झाला होता कीं, हिंदुस्थानांतून इंग्लिशांस हांकून लाविल्यावांचून विश्रांति घ्यावयाची नाहीं.

फोर्तसेंत देविद ह्यावर हल्ला करून तो घेतात. ता० १ जून स. १७५८.

तो वरील गोष्टीविषयीं फारच हावरा झाल्यामुळें त्याच्या हातून मूर्ख-

त्याचीं कांहीं कृत्यें घडलीं. बुसी ह्मणून फ्रेंच सरदार होता त्याचा निजामाच्या राज्यांत फार भरभराट होत चालला होता. त्यास लाली ह्यानें बोलावून आगून त्याचा फारच अपमान केला. ह्या योगेंकरून त्या दोघांचा द्वेष पडला. त्याचप्रमाणें दुसऱ्या सर्व गोष्टींतही तो आपल्या हाताखालच्या लोकांस आवडेनासा झाला.

लालीचीं अयोग्य कृत्यें.

त्याजवळ लढाई चालविण्याकरितां पैसा अगदीं नाहींसा झाला, ह्मणून त्यानें तंजावरच्या राजापासून द्रव्य मिळवावें ह्मणून त्यावर स्वारी केली. त्या स्वारींत त्यास यश आलें नाहीं. त्यानें आपल्या लोकांस तेथील शेतकऱ्यांशीं हवें तसें वाईट रीतीनें वागूं दिलें. तेणेंकरून ते लोक त्यावर उठले. तेव्हां त्यास परत जावें लागलें. परत जातांना त्याच्या सैन्यांत अव्यवस्था झाली, व त्यास जो पैसा पाहिजे होता तो अगदीं मिळाला नाहीं.

तो लुटीकरितां तंजावरावर स्वारी करितो. तां. १८ जून –ता० १८ आगस्ट.स० १७५८.

नंतर त्यानें पोंदेशरी एथील कांहीं गृहस्थ लोकांपासून थोडासा पैसा मिळवून मद्रासेस वेढा घातला. दिसेंबर महिन्याच्या बाराव्या तारखेस २७०० फ्रेंच लोक व ४००० काळे लोक ह्यांसह तेथें येऊन त्यानें आपल्या लोकांस ब्लाक टौन येथें ठेविलें. फोर्त सेंत जार्ज किल्ल्यास दोन महिनें वेढा पडला होता. मेजर लारेन्स व गवरनर पिगट साहेब ह्या दोघांनीं मोठ्या शौर्यानें लढून दोन महिनेपर्यंत किल्ला राखिला. दिसेंबर महिन्याच्या १४ वे तारखेस इंग्लिश लोक, ब्लाक टौन येथें जें फ्रेंचांचें सैन्य होतें, त्यावर हल्ला करण्याकरितां मोठ्या सपाट्यानें गेले, परंतु त्यावर त्यांच्यानें एकाएकीं हल्ला करवला नाहीं. नंतर ते फोर्त सेंत जार्ज येथें परत आले. बुसी साहेब ते वेळेस अगदीं उदासीन राहिला, तो तसें न करिता तर इंग्लिशांस सुरक्षितपणें फोर्त सेंत जार्ज एथें परतही येतां आलें नसतें. फ्रेंच लोकांच्या लष्करांत वैमनस्यामुळें व बंडामुळें फार अव्यवस्था झाली. पुढें दुसऱ्या महिन्याच्या शेवटीं जेव्हां इंग्लिश लोकांचीं कांहीं लढाऊ जहाजें त्या शहराजवळ आलीं, तेव्हां फ्रेंच लोक वेढा उठवून पोंदेशरी येथें माघारे गेले.

फोर्त सेंत जार्ज ह्यास वेढा.ता.१२ दिसेंबर स० १७५८-ता. १७फेब्रुवारी स. १७५९.

फ्रेंच लोक माघारे येतात.

हा वेढा उठतांक्षणीं मेजर लारेन्स ह्यानें लढाईस प्रारंभ केला. त्याच्या व फ्रेंचांच्या पुष्कळ झटापटी झाल्या; इंग्लिशांकडील कांहीं किल्ले फ्रेंचांनीं

घेतले व त्यांचे ह्यांनीं घेतले; परंतु विशेष एखादी गोष्ट ध्यानांत ठेवण्या-जोगी घडली नाहीं.

पुढें अक्टोबर महिन्यांत क्लैव साहेब ह्यानें कर्नल कूट ह्यास सेनाधिपति करून बंगाल्यांतून पाठविलें. प्रथमतः त्यानें वांदिवाश किल्ला घेतला. तो किल्ला घेण्यास त्यास फारसे श्रम पडले नाहींत. किल्ल्यावरील लोकांनीं थोडा वेळ युद्ध केलें, नंतर ते तेथें कांहीं थोडे रखवालदार ठेवून कारंगोली ह्मणून एक दुसरा जवळ किल्ला होता तिकडे चालते झाले. ह्या प्रकारें कर्नल कूट हिकडे गुंतला असतां, लाली साहेब ह्यानें कांजिव्हेरम किल्ला हस्तगत केला आणि कारंगोली किल्ला इंग्लिशांपासून परत घ्यावा ह्मणून तो त्वरेनें तिकडे चालता झाला. परंतु त्यानें जातांक्षणींच हल्ला केला नाहीं. तो वेढा घालण्यास तयारी करीत आहे, इतक्यांत इंग्लिशांचें सैन्य ह्या किल्ल्याचा बचाव करण्याकरितां परत आलें.

कर्नल कूट कलकत्त्याहून येतो. ता. २७ अक्टोबर स. १७५९.

तो वांदिवाश किल्ला घेतो.

तेथें मोठी लढाई झाली, तींत फ्रेंच लोकांचा पराभव झाला. लढाईच्या आरंभीं लाली साहेबास असें वाटलें कीं, इंग्लिशांच्या पायदळांतील कांहीं लोक आपल्या तोफांच्या भडिमारानें लढण्याविषयीं मागें पुढें पाहतात; ही संधी पाहून तो आपल्या घोडेस्वारांचा आपण मुख्य झाला, आणि त्यांस त्यानें हल्ला करण्यास हुकूम दिला; परंतु त्यांनीं तो मानला नाहीं. त्यामुळें त्यानें तेथल्या तेथें त्यांतील अंमलदार बडतरफ करून शिपाई लोकांसच विनंती केली कीं, जरी तुमचे वरिष्ठ अंमलदार माझें ऐकत नाहींत, तरी तुह्मी माझा हुकूम मोडूं नका. त्यांनीं तें मान्य केलें. परंतु ते थोडेसे पुढें गेले तों इंग्लिशांकडून तोफा मारण्यास आरंभ झाला. तेणेंकरून त्यांच्यांत फार घोंटाळा झाला. तेव्हां ते आपला मुख्य तेथें एकटाच सोडून देऊन पळून गेले. ह्या प्रकारें त्या लोकांनीं सोडून दिल्यावर लाली साहेब आपल्या पायदळाकडे परत आला आणि त्यांस घेऊन शत्रूवर चालून गेला. जे इंग्लिश लोक त्याजबरोबर लढायास आले, ते थोडे होते ह्मणून अंमळ मागें हटले. परंतु जे लोक बाजूस होते त्यांनीं त्यांच्या सभोंवता वेढा घातला, तेव्हां जवळ जवळ येऊन एकमेक लढूं लागले. हें मोठें भयंकर युद्ध झालें, व त्यांत सगळे गोरे लोकच होते. परंतु कांहीं वेळानें फ्रेंच लोकांच्या सैन्यांत गोंधळ होऊन ते हटून पळूं लागले. त्यांस थांबविण्याकरितां त्यांच्या अंमलदारांनीं त्यांची विनवणी केली व भयही घालून पाहिलें, परंतु कांहीं झालें नाहीं. त्या प्रसंगीं बुसी साहेब घोड्यावरून उडी

वांदिवाश येथील लढाई. ता० २२ जानेवारी सन १७६०.

टाकून स्वतः लढूं लागला, आणि आपल्या फौजेनें परत लढण्यास यावें ह्मणून त्यानें पुष्कळ यत्न केले; तथापि कांहीं झालें नाहीं. सरशेवटीं तो बुसी साहेब इंग्लिशांच्या हातीं सांपडला. ह्याप्रमाणें इंग्लिशांचा जय झाला.

ह्या लढाईनंतर पुढें इंग्लिशांस हळू हळू चोहोंकडे यश येत चाललें. एका पाठीमागून एक असे शत्रूंचे किल्ले त्यांच्या हस्तगत होऊं लागले. शेवटीं मे महिन्यांत फ्रेंच लोकांस त्यांनीं पोंदेशरीच्या किल्ल्यांत हांकून लाविलें आणि आपण त्या किल्ल्यास वेढा घातला. लाली साहेबानें आपण तेथून सुटण्याकरितां जिवावर उदार होऊन एक लढाई करून पाहिली, परंतु तींत त्याचा पराभव झाला. पुढें जानेवारी महिन्यापर्यंत तो वेढा तसाच पडलेला होता. नंतर तो किल्ला इंग्लिशांनीं हस्तगत केला व तटबंदी वगैरे मोडून टाकून त्याचा त्यांनीं अगदीं विध्वंस करून टाकिला.

पोंदेशरीस वेढा घालून तो किल्ला घेतात. ता. १६ ज्यानेवारी स. १७६१.

इकडे करनाटकच्या उत्तरेस कृष्णा नदीपासून गंजमपर्यंत समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेश, ज्यास उत्तर सरकार असें ह्मणतात, तेथें क्लैव साहेबानें कर्नल फोर्द ह्यास रवाना केलें होतें. निजामास राज्य प्राप्त झालें, तेव्हां फ्रेंच लोकांनीं साहाय्य केल्यावरून त्यास तो देश बक्षीस दिला होता. बुसी गेल्यावर कानफलान्स ह्मणून एक अधिकारी फ्रेंचांच्या सैन्यावर मुख्य नेमिला होता, परंतु तो तितका हुशार नव्हता. कांडोर येथें इंग्लिश व फ्रेंच ह्यांची लढाई झाली, तींत फ्रेंचांचा अगदीं पराभव झाला. पुढें निजामाच्या दरबारांत जें फ्रेंचांचें वजन होतें तें नाहींसें झालें व इंग्लिशांस मछलीपट्टणाच्या सभोंवतीं मोठा प्रांत मिळाला.

उत्तरसरकार येथें कर्नल फोर्द ह्याचे जय. कांडोर येथील लढाई. ता. ७ एप्रिल सन १७५९.

हिंदुस्थानांत फ्रेंचांकडे दोन किल्ले मात्र राहिले. एक थीआगर व दुसरा जिंजी. परंतु तेही किल्ले त्यांजकडे टिकले नाहींत. पुढें इसवी सन १७६१ च्या एप्रिल महिन्यापर्यंत फ्रेंच लोकांकडे तेथें एकही लढाऊ जागा राहिली नाहीं. पोंदेशरी गेल्यानंतर लागलाच लाली साहेब युरोपास गेला. तेथें फ्रेंच सरकारानें त्याजवर खटला उभा करून चौकशी केली आणि असें ठरविलें कीं हा दोषी आहे. नंतर त्यास बास्तिली येथें कैदेंत ठेवून शेवटीं त्यास फांशी दिलें.

इंग्लिशांस फ्रेंचांबरोबरच्या लढाईंत जय मिळतो. लालीची अखेरी. ता. ६ मे स. १७६६.

आतां इकडे बंगाल प्रांतांत काय चाललें होतें, त्याविषयीं सांगितलें पाहिजे. मीरजाफर राज्य करूं लागल्यावर थोडक्याच दिवसांत असें स्पष्ट दिसून आलें कीं, इंग्लिशांचें साहाय्य असेल तरच ह्याचें राज्य चालेल, नाहीं तर

चालणार नाहीं. त्याच्या राज्यास चोहोंकडून धोका आला. दिल्लीच्या बादशाहाचा वडील मुलगा शाहाआलम ह्यानें त्याजवर हल्ला करण्याकरितां कांहीं सैन्य जमा केलें. त्यास जवळचे नवाबही साहाय्य झाले. त्यांच्यामध्यें अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला हा मोठा प्रबळ होता. ही तयारी पाहून मीरजाफर फार भयभीत झाला आणि इंग्लिशांपाशीं साहाय्य मागूं लागला. तेव्हां क्लैव साहेबानें असा विचार केला कीं, ज्यास आपण वाढविलें त्याचें संरक्षण करणें आपणास योग्य आहे. नंतर, त्याजवळ सैन्य मुळीं थोडें असून त्यांतील कर्नल फोर्ड ह्यास उत्तर सरकारकडे व कर्नल कूट ह्यास मद्रासेकडे पाठविल्यामुळें त्याचें सैन्य फारच कमी झालें होतें, तथापि तो लागलाच नवाबाच्या सैन्यास मिळण्याकरितां निघाला.

मीरजाफराची सभय स्थिति.

शाहाआलम ह्यानें पाटणा शहरास पूर्वींच वेढा घातला होता. रामनारायण ह्मणून एक शूर काळा सरदार तेथील फौजेवर मुख्य होता, त्यास क्लैवसाहेबानें लिहून पाठविलें कीं, तुह्मी ती जागा धरून बसा, कसाही प्रसंग पडला तरी देऊं नका, कारण कीं मी बराबर मोठे शूर लोक घेऊन तुह्मांस सोडविण्याकरितां येत आहें.

शाहाआलम पाटणा शहरास वेढा घालतो.

परंतु तेथें शौर्याची गरजच पडली नाहीं. कारण क्लैव साहेब येणार असें ऐकूनच शत्रूकडील लोक लागलेच घाबरले, आणि मीरजाफरास ज्याचें इतकें भय पडलें होतें तें सर्व सैन्य चोहोंकडे पसरलें, तें पुनः एके ठिकाणीं जमलें नाहीं. हे उपकार स्मरून नवाबानें कलकत्त्याच्या दक्षिणेकडील प्रांताचा जो वसूल कंपनीकडून आपणास येत होता तो सर्व क्लैव साहेबास दिला.

क्लैव ह्यापुढें तो मागें हटतो.

पण पुढें लवकरच तो हे उपकार विसरला. त्यास असें वाटलें कीं, ज्यांनीं आपणास राज्य दिलें ते पाहिजे तेव्हां तें घेतील; तर आपण निर्भय झालों नाहीं. ह्मणून तो बंगाल्यांतून इंग्लिशांस हांकून देण्याकरितां दुसऱ्या एकाद्या परराजाची मदत मिळण्याकरितां यत्न करूं लागला.

नवाबाची दगाबाजी.

त्यास असें ठाऊक होतें कीं, असा कोणी काळे लोकांत राजा उरला नाहीं कीं, ज्याचा आश्रय केला असतां तो इंग्लिशांस अगदीं हांकून देईल; व त्यास हेंही ठाऊक होतें कीं, फ्रेंच लोकांचा अंमल उत्तर हिंदुस्थानांत नाहींसा झाला असून त्यांपासून दक्षिण हिंदुस्थानांतही कुमक मिळणार नाहीं. तेव्हां चंद्रनगरापासून एक कोसावर चिनसुरा येथें डच लोकांची लहानशी

इंग्लिशांस बंगाल्यांतून हांकून लावण्याकरितां

तो दच लोकांचें साहाय्य गुप्त रीतीनें मागतो.

वसाहत होती, तींतील लोकांस त्यानें साहाय्य मागितलें. ते वेळेस इंग्लिश लोक व दच लोक ह्यांचें वैमनस्य नव्हतें, तथापि त्यांनीं साहाय्य करण्याचें कबूल केलें; आणि जावा बेटांतील त्यांच्या वसाहतींचें मुख्य शहर बेटेविआ येथें असें लिहून पाठविलें होतें कीं, कांहीं कुमक पाठवावी. पुढें लागलींच तेथून कांहीं लढाऊ गलबतें हुगळी नदींत येऊन पोहोंचलीं. त्यांवर दीड हजार लोक होते.

दच लोकांची स्वारी,

मीरजाफरास हें समजलें, तेव्हां तो असें वरून ह्मणूं लागला कीं हें ऐकून मला फार भय पडलें आहे. परंतु क्लैवसाहेबास त्याचा वास्तविक अभिप्राय समजला. त्यानें लागलाच असा ठराव केला कीं, दच लोकांचीं जीं गलबतें नदींत आलीं आहेत त्यांस पुढें येऊं देऊं नये. त्यानें ठाण्यास इंग्लिशांचा किल्ला होता तो नीट करून तेथें पक्का बंदोबस्त केला; आणि जेव्हां त्या किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां जहाजें वर येऊं लागलीं तेव्हां त्यानें त्यांस मागें हटवून त्यांस चिनसुरा येथें जावयाचें होतें तेथें जाऊं दिलें नाहीं.

त्यांचें भारमार क्लैव मागें हटवितो. ता. २४ नवंबर स० १७५९.

दच लोकांचें सैन्य मागें टल्यावर तें जमिनीवर उतरलें आणि तिकडे जाऊं लागलें. कर्नल फोर्द ह्यानें थोडक्याच दिवसांपूर्वी उत्तर सरकार येथील सैन्यावरील आपला अधिकार सोडून दिला होता. क्लैवसाहेबानें त्यास बरोबर थोडेंसें सैन्य देऊन त्या लोकांवर पाठविलें. वाटेनें जातांना एके दिवशीं संध्याकाळीं त्यांनीं एका जागीं छावणी दिली. तेव्हां कर्नल फोर्द ह्यास असें वाटलें कीं, येथून दच लोकांवर हल्ला करण्याची चांगली सोय आहे; परंतु त्यास माहीत होतें कीं, दच व इंग्लिश ह्यांचें सख्य आहे; ह्मणून त्यानें क्लैव साहेबास लिहून पाठविलें कीं, अशा स्थितींत मीं कसें करावें ह्याचा हुकूम व्हावा. ही कर्नल फोर्दची चिठी त्यास पावली तेव्हां तो गंजिफा खेळत होता, तेथून न उठतां व खेळास अगदीं हरकत न करितां त्यानें त्या चिठीच्या पाठीवर दोन ओळी खरडून तिचें उत्तर लिहिलें कीं, तुह्मी लागलीच लढाई करा; उद्यां तुह्मांस कौन्सिलाचा हुकूम पाठवीन.

कर्नल फोर्द त्याच्या सैन्याचा पराभव करतो.

क्लैवसाहेबास जसा उत्तर लिहिण्यास उशीर लागला नाहीं, तसा कर्नल फोर्द ह्यासही त्याप्रमाणें करण्यास विलंब लागला नाहीं. हा हुकूम पावतांच त्यानें लढाईस आरंभ केला आणि त्यांचा पराभव करून टाकिला. त्यांच्या लोकांची इतकी कत्तल उडाली कीं, चिनसुरा येथें ही गोष्ट सांगण्यास

देखील फारसे कोणी उरले नाहींत; कर्नल फोर्द तसाच नीट त्या किल्ल्यावर चालून गेला. परंतु तेथील रखवालदार लोक, हा जो त्यांच्या लोकांचा पराभव झाला, तो ऐकून फार भयभीत झाले, आणि त्यांस धाक पडला कीं, इंग्लिश लोक फार प्रबळ आहेत, त्यांच्याशीं आपला द्वेष पडला हें फार वाईट झालें. ह्मणून त्यांनीं असें कबूल केलें कीं आमच्याकडूनच चूक झाली, तर ह्या लढाईबद्दल जो तुह्मांस खर्च पडला असेल तो आह्मी देतों, आह्मांस क्षमा करावी, व तुमचें आमचें सख्य असावें. त्यांनीं जें ह्मटलें तें सर्व इंग्लिशांनीं कबूल केलें. वर लिहिलेल्या स्वारींत मीरजाफरास काय वाटत होतें, व त्याचा परिणाम काय झाला तो पहा. त्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले व त्याची फार दुष्कीर्ति झाली.

नवाबानें उपकार न स्मरून विश्वासघात केला, तो इंग्लिशांनीं अगदीं मनांत आणिला नाहीं.

ह्यानंतर तीन महिन्यांनीं क्लैवसाहेब विलायतेस परत गेला. त्यानें बंगाला येथें इंग्लिश लोकांची खूप बढती केली. ह्यामुळें तो तेथें गेल्यावर त्याची फार वाहवा झाली; व सर्व लोकांत तो फार विख्यात झाला.

क्लैवसाहेबाचें दुसऱ्यानें इंग्लंदास परत जाणें. फेब्रुवारी स० १७६०.

**पांचवा भाग समाप्त.**

# भाग सहावा.

## बंगाल्यांतील फेरफार, लढाया, आणि संकटें.

### इसवी सन १७६० पासून १७६७ पावेतों.

शाहआलम हा पुनः बहार प्रांतावर स्वारी करितो—रामनारायण—पाटणा शहरास वेढा—पाटणानजीक लढाई—शत्रूचा पाठलाग—मीरन ह्याचा मृत्यु—सैन्य परत येतें—मीरजाफर ह्यास पदच्युत करतात—मीरकासीम—बादशाहाचा पराभव—मीरकासीम ह्याची वर्त्तणूक—इंग्लिशांची अयोग्य वर्तणूक—रामनारायण ह्याचा खून—नवाबाबरोबर तंटे—इंग्लिश पाटणा शहर घेतात—मीरकासीम तें त्यांजपासून घेतो—मीरजाफरास पुनः नवाब करतात—जेरिया येथील लढाई—मोंगीर लुटतात—मीरकासीम ह्याचा राग—इंग्लिश चाल करतात—पाटणा शहर येथील कत्तल—नवाब अयोध्या येथें पळून जातो—बादशाह, सुजाउद्दवला, व मीरकासीम हे इंग्लिशांशीं विरुद्ध होतात—त्यांचा पराभव—शिपाई लोकांत बंडावा—बक्सार येथील लढाई—क्लैवसाहेबाचें परत येणें—इंग्लिशांस बंगालचें राज्य मिळतें—मुलकी व लष्करी खात्यांत फेरफार—बंडावा—क्लैवसाहेब तो मोडतो—तो हिंदुस्थान सोडून जातो—त्याचे गुण.

बंगाल्याहून क्लैवसाहेब निघाल्याबरोबर चोहोंकडे बंडें उत्पन्न होऊं लागलीं. शाहआलम ह्मणून ते वेळेस दिल्लीचा बादशाह होता, त्यानें बंगाल्यावर स्वारी केली. अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला, ज्यास दिल्लीच्या बादशहानें मुख्य वजीर केलें होतें, तोही त्या स्वारींत होता. हे दोघे मोठें सैन्य जमा करून पाटणा शहरावर गेले. तेथें रामनारायण ह्मणून एक हिंदु मुख्य अधिकारी होता, त्यास क्लैवसाहेब फार मान देत असे.

*रामनारायण ह्याचा पराभव.*

रामनारायण ह्यानें इंग्लिशांस साहाय्य मागितलें. परंतु तें साहाय्य येण्याच्या पूर्वीच बादशाहाच्या फौजेबरोबर तो लढूं लागला, त्यामुळें त्याचा पराभव झाला.

*कर्नल कालियद बादशाहास व त्याच्या साह्यकाऱ्यांस प्रतिबंध करितो. ता. २२ फेब्रुवारी स. १७६०*

कर्नल कालियद ह्मणून ते वेळेस इंग्लिशांच्या फौजेचा मुख्य होता, त्यानें हें ऐकतांच कलकत्त्याहून त्वरेनें निघून वाटेनें मीरजाफर ह्याची फौज घेऊन जाऊन पाटणा एथून शत्रूंस हांकून दिलें. बादशाह तशीच त्वरा करून मुरशिदाबादेस जात होता, तों कर्नल कालियद ह्यानें पाठलाग करून त्यास गांठलें आणि त्या शहरास वेढा घालूं न देतां

तेथेंच दुसऱ्या लढाईचा बेत आणला. परंतु त्यानें तें टाळून मागें उलटून पुनः पाटणा शहरास वेढा घातला. ह्या ठिकाणीं कर्नल कालियद ह्यानें पाठलाग करण्याच्या घाईंत पुष्कळ रक्षक ठेवावयाचे, ते थोडे ठेविले होते.

पाटणाचें मोठ्या शूरत्वानें संरक्षण.

फुलर्टन ह्मणून एक तेथें सर्जन होता, त्यानें मोठ्या शौर्यानें त्या किल्ल्याचें संरक्षण केलें. त्यानें, ज्या लोकांनीं वेढा घातला होता त्यांनीं केलेला हल्ला दोन वेळ मागें हटवून त्यांचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं. पुढें कप्तान नाक्स ह्यानें आपली काळे लोकांची फौज कडक उन्हाळा असतां मुरशिदाबादेहून पाटणास तेरा दिवसांत नेली आणि किल्ल्याचा वेढा उठविला.

पाटणानजीक लढाई. स. १७६०.

इकडे पूरणिया ह्मणून शेजारच्या गांवचा दुय्यम सुभेदार होता तो बरोबर बारा हजार लोक घेऊन बादशाहास साहाय्य करण्याकरितां येत होता. तेव्हां कप्तान नाक्स हा ह्या दोन फौजांची गांठ पडूं द्यावयाची नाहीं असें मनांत आणून, जेव्हां पूरणिया ह्याची फौज पाटणाजवळ आली, तेव्हां त्या शहरापाशीं नदी होती ती उतरून पलीकडे गेला, आणि दोनशें गोरे लोक व कांहीं काळे लोक घेऊन त्याच्याशीं पाटणाच्या जवळ लढाई करून त्यानें त्याचा पराभव केला. ही त्यांची लढाई चालली होती, तिचा परिणाम काय होतो, ह्याची किल्ल्यांतील लोक मोठ्या उत्कंठेनें वाट पाहत होते.

शत्रूचा पाठलाग. मीरन ह्याचा मृत्यु. ता० २ जुलै स. १७६०.

ते वेळेस कर्नल कालियद लागलाच तेथें आला, आणि शत्रूच्या फौजेच्या पाठीमागें लागला. परंतु वाटेनें जात असतां मोठें तुफान झालें, तेणेंकरून त्याच्या लोकांस मुकाम करावा लागला. त्या तुफानांत मीरन वीज पडून मरण पावला. ते वेळेस तो तंबूमध्यें गोष्टी ऐकत बसला होता.

नवाबाच्या सैन्यानें केलेलें बंड.

जेव्हां नवाबाच्या सैन्याचा हा मुख्य मरण पावला, तेव्हां त्यांत अव्यवस्था होऊं लागली. तेव्हां कर्नल कालियद ह्यास परत जाणें प्राप्त होऊन तो पाटणासच राहिला, व मीरन ह्याची फौज मुशारा मागावा ह्मणून मुरशिदाबादेस गेली. त्यांस फार दिवस मुशारा मिळाला नव्हता. त्या सर्व प्रांताचें राज्य दोन वर्षेंपर्यंत मीरन ह्याजकडेसच होतें. तो मेल्यानंतर पाठीमागें कोणी त्या लोकांचा पगार देण्यास अथवा इंग्लिशांस साहाय्य केल्याबद्दल बक्षीस देण्यास चांगला उरला नव्हता. एक मीरजाफर मात्र होता; त्याला ह्मातारचळ लागला होता.

शिपाई लोक तर बिथरले होते. त्यांनीं राजवाड्यावर हल्ला केला, ते वेळेस मीरकासीम ह्मणून नवाबाचा जांवई होता, त्यानें आपल्या पदरचे रुपये देऊन त्यांच्या मुशाऱ्याची कांहीं बाकी फेडली, ह्मणूनच नवाब वांचला; नाहीं तर त्यास त्यांनीं ठार मारलें असतें. इंग्लिशांसही पैशाची फार गरज होती.

बंगाल्यास नवा गवर्नर येतो. जुलै स. १७६०. मीरजाफर ह्यास पदच्युत करतो. ता० १६ अक्टोबर स० १७६०.

अशी स्थिति फार दिवस टिकणारी नव्हती. कलकत्ता येथें नवीन गवरनर आला. त्यास असें समजलें कीं, नवाबानें आपल्या फौजेचा पैसा चुकवून दिला नाहीं, व इंग्लिशांस त्यानें आपणास राज्यावर बसविण्याबद्दल जो पैसा कबूल केला होता, तोही त्यांस दिला नाहीं. हा जो नवीन गवरनर साहेब आला त्याचें नांव वान्सितार्त असें होतें. त्यानें असें मनांत आणिलें कीं, कौन्सिलदारांचें मत घेऊन मीरजाफर ह्यास पदच्युत करावें व त्याच्या जाग्यावर मीरकासिम ह्यास बसवावें.

बादशाहाचा पराभव. ता. १५ जानेवारी स० १७६१.

सन १७६० च्या अक्टोबर महिन्यांत वान्सितार्त साहेब ह्या कारणाकरितां मुरशिदाबादेस गेला; आणि इंग्लिशांच्या मनांत होतें त्याप्रमाणें मीरजाफर ह्यास पदच्युत करून त्याच्या गादीवर मीरकासीम ह्यास त्यानें बसविलें. मीरकासीम ह्यानें असा करार केला कीं, तुह्मी मला राज्य द्याल तर, त्याबद्दल मी तुह्मांस बरद्वान, चितागंग, आणि मिदनापूर हे प्रांत देईन. कर्नल कालियद साहेब पूर्वी फौजेच्या कामावर होता, त्याच्या कामावर मेबर कार्नाक साहेब आला. त्यानें मीरकासीम ह्यास नवाबाचें पद मिळाल्यानंतर लागलींच शाहआलम बादशाहावर स्वारी केली. तेथें दोन लढाया झाल्या. त्या दोहोंतही बादशाहाचा पराजय होऊन इंग्लिशांचें ह्मणणें त्यास कबूल करावें लागलें.

नवा नवाब मीरकासीम.

अद्यापि बंगाल्यांतील लढाई समाप्त झाली नव्हती. मीरकासीम हा कळसूत्री बाहुल्याप्रमाणें एक नवाब होऊन राहील असें इंग्लिशांस वाटलें होतें. पण तो असा निघाला कीं, त्याजप्रमाणें बुद्धिमान् व उद्योगी इकडील राजांमध्यें फारच विरळा. आपल्या प्रांतांत इंग्लिश लोक आहेत तोंपर्यंत आपणांस केवळ नामधारी नवाबच रहावें लागेल, हें त्याच्या ध्यानांत पक्कें आलें होतें. त्यामुळें राज्यांत बंदोबस्त होऊन खजिन्यांत शिल्लक पडावी ह्मणून तो झटत होता, व इंग्लिश दिवसानुदिवस जास्ती ओझें घालीत होते, तें

मुळींच काढून टाकावें ह्याविषयीं त्यांचा उद्योग गुप्तपणें चालला होता. आर्मिनिया प्रांतांतील एक सरदार त्याच्या पदरीं होता, त्यानें फौजेची तयारी फार चांगल्या रीतीची चालविली होती. मीरकासिमानें मुरशिदाबाद सोडून मोंगीर ह्मणून एक बळकट शहर नदीच्या वरच्या अंगास आहे ती राजधानी केली.

बंगाल्यांत इंग्लिश कामदार व्यवस्थेनें व नियमानें अंमल करीत नव्हते, त्यामुळें त्यांजवर मोठा प्रसंग गुजरला. बंगालची व्यवस्था फार खराब होती. कारण त्या वेळेस तेथील इंग्लिश कामदार अत्यंत द्रव्यलोभी असून ते विलायतेहून इकडे शुद्ध पैसा मिळविण्याकरितांच आले होते. तो पैसा चांगल्या मार्गानें मिळो अगर वाईट मार्गानें मिळो, त्याविषयीं ते तिळप्राय विचार करीत नसत. त्यांचाच कित्ता त्यांच्या हाताखालच्या काळ्या लोकांनीं उचलला होता. ह्या कृतीमुळें इंग्लिश व त्यांच्या हाताखालचे कारभारी ह्मटले ह्मणजे तेथल्या सर्व लोकांस शत्रूसमान वाटत असत.

बंगाल्याची स्थिति व इंग्लिशांची गैरवर्तणूक.

ह्या प्रकारच्या कृतीस आरंभ झाला, तो असा कीं, मीरकासिमास पैशाविषयीं इंग्लिशांनीं चोहोंकडून तगादा लावला. पण त्याजवळ पैसा नव्हता, सबब पाटणा शहरचा सुभेदार रामनारायण हा मोठा संपन्न व प्रामाणिक गृहस्थ होता, त्याजपासून पैसा काढण्याविषयीं त्यानें इंग्लिशांची परवानगी मागितली. त्यांनीं परवानगी देऊन पाटणांतून आपली फौज काढून आणली, आणि रामनारायणास मीरकासीमाच्या ताब्यांत दिलें. त्यानें रामनारायणास लुटून त्रास देऊन शेवटीं ठार मारिलें.

मीरकासीम याची रामनारायण ह्याजबरोबर वर्तणूक.

ही गोष्ट पाहून सर्व काळे लोकांस इंग्लिशांचा त्रास आला, व पुढें कांहीं दिवसपर्यंत त्यांजवरचा विश्वासच उडाला होता. काळे लोक इंग्लिशांस फार कंटाळले आहेत, हें मीरकासीम ह्यास समजल्यामुळें, तो जो बेत पुढें प्रसिद्ध करणार होता तो अगोदरच करून त्यानें इंग्लिशांशीं प्रसिद्धपणें लढाई सुरू केली, तेव्हां पुष्कळ लोक त्याजकडे मिळाले.

इंग्लिशांविषयीं त्रास.

उभय पक्षांचा मूळ तंटा बंगाल प्रांतांतील जकातीच्या बाबतींत झाला. इंग्लिश व्यापाऱ्यांपेक्षां येथील व्यापाऱ्यांस जकात जास्ती द्यावी लागत असे. हा पक्षपात न व्हावा ह्मणून इतःपर दोघांनीं जकात सारखीच द्यावी असा नवाबानें हुकूम केला. कलकत्त्यांतील कौन्सिलास हें फार वाईट वाटलें; तेव्हां आपणच मीरकासीमाबरोबर लढाई सुरू करावी असें ठरवून त्यांनीं पाटणा

नवाबाबरोबर तंटे.

शहरीं इलिस साहेब होता त्यास हुकूम पाठविला कीं, तें शहर तुम्हीं हस्तगत करून घ्यावें; त्याप्रमाणें त्यानें लागलेंच तें शहर घेतलें.

वैमनस्यांस आरंभ.

ही गोष्ट ऐकून मीरकासीमास फार संताप आला. त्यानें अमियात साहेबास ठार मारून नीट पाटणावर स्वारी करून तें शहर घेतलें आणि तेथील इंग्लिश लोकांस कैद करून मोंगीर येथें नेलें.

मीरजाफरास पुनः नवाब करितात. ता० ७ जुलै स.१७६३.

मीरकासिमावर इंग्लिशांनीं लागलीच फौज रवाना केली. त्याच्या जागयावर मीरजाफरास पुनः बसविल्यानें फार चांगलें होईल असें वाटून त्यांनीं तसें केलें. मीरजाफराचें वय ह्या वेळेस सुमारें ७० वर्षांचें होऊन तो अगदीं वाकला होता, व रोगानें जर्जर होऊन अगदीं अप्रयोजक झाला होता, तथापि त्यानें पुनः नवाबाचें नांव स्विकारिलें.

जेरिया येथील लढाई. आगष्ट ता.२ स.१७६३.

मीरकासीम व इंग्लिश ह्यांच्या दोन तीन लहान लहान लढाया होऊन मग जेरिया मुकामीं फार मोठी लढाई झाली, तींत इंग्लिशांस जय मिळाला. त्याचा प्रकार असा कीं, मीरकासिमाच्या फौजेवर सुमरू म्हणून आर्मिनिया प्रांतांतील एक मनुष्य होता, तो मोठ्या शौर्यानें लढला, त्यानें एक वेळ इंग्लिशांच्या फौजेवर आपली फौज अशा चातुर्यानें नेली कीं, इंग्लिशांच्या फौजेस पळून जावें लागून त्यांच्या दोन तोफा ह्याच्या फौजेनें नेल्या. इंग्लिशांच्या अगाडीपिछाडीवर घाला पडला, तरी ते धैर्याचे पुरे, ह्यामुळें अखेरीस जय त्यांचाच झाला. शत्रूचा सर्व प्रयत्न निष्फळ होऊन त्याची मोंगिराजवळ छावणी होती तेथपर्यंत त्यास पळ काढावा लागला. त्या छावणीवरही लागलाच मोठ्या शौर्यानें हल्ला करून पुढें मोंगीरही इंग्लिशांनीं काबीज केलें. आपलें आवडतें शहर इंग्लिशांनीं घेतलें, हें कानीं पडतांच रागाच्या आवेशानें मीरकासीम याचें देहभानच सुटलें. ह्या

पाटणा येथील कत्तल. ता. ३ अक्टोबर स० १७६३.

वेळेस तो पाटणा मुकामीं होता; त्यानें इंग्लिश फौजेवरील अंमलदारांस सांगून पाठविलें कीं, तुम्ही पुढें चाल करून याल तर मी ह्या ठिकाणच्या एकूनएक इंग्लिशांस कापून काढीन. इलिस व हे असे दोन साहेब तेथें होते, त्यांनीं त्याच अंमलदारास सांगून पाठविलें कीं, आमचें काय होणें असेल तें होईल, तुम्हीं आमची आशा न धरितां बेधडक चाल करून जलदीनें यावें; त्याप्रमाणें तो अंमलदार आला. मीरकासिमानेंही शहरांतील एकंदर इंग्लिश लोक मारून टाका असा हुकूम दिला. हुकूम बजावण्यास तेथें सुमरू व कांहीं थोडेसे शिपाई लोक मात्र होते, दुसरें कोणी नव्हतें.

इलिस साहेब व त्याचे मित्र ह्यांस सायंकाळीं खान्यास बोलाविलें. खान्याचा बेत ज्या दिवाणखान्यांत केला होता त्यांत ते गृहस्थ शिरतांच मारेकऱ्यांनीं त्यांजवर हल्ला केला. तेव्हां इलिस साहेब तर त्याच वेळेस ठार झाला. दुसऱ्यांच्या हातास तेथलीं ताटें, वाटया वगैरे जें लागलें तें घेऊन त्यांनीं तेथल्या लोकांपासून आपला बचाव केला. पण सुमरूच्या लोकांनीं घरांवर चढून तेथून आंत गोळ्या घातल्या आणि सगळे लोक मारले; एक पोरसोर देखील दुष्टांनीं ठेविलें नाहीं!

हो कत्तल उडाल्यानंतर मीरकासीम अयोध्येस पळून गेला. तेथें सुजाउद्दवला व दिल्लीचा बादशाह हे एक होऊन राहिले होते, त्यांनीं त्यास आश्रय दिला. मीरकासीम पळतो.

दुसऱ्या वर्षाच्या आरंभींच वरील तीन राजांची फौज इंग्लिशांबरोबर लढण्याकरितां चालून गेली. पाटणा शहर इंग्लिशांनीं पुनः घेतलें होतें. तेथें मेजर कार्नाक साहेब होता, त्यानें लढाईंत त्या तीन असामींचा सर्वथा पराभव केल्यामुळें त्यांस त्वरेनें अयोध्येस पळून जावें लागलें. इंग्लिशांविरुद्ध जमाव.

इतक्यांत इंग्लिश फौजेंत मोठा बंडावा झाला. शिंपाई लोकांस आपणास पगार अधिक मिळावासें वाटत होतें. ह्या फौजेवर मेजर हेक्टर मनरो साहेब होता, त्यानें बंडावा मोडण्यासाठीं मोठे कडक उपाय योजिले. त्यानें २८ असामी बंडाचे पुढारी लोक धरून एकदम तोफेच्या तोंडीं दिले, तेव्हां पूर्ववत् व्यवस्था झाली. ह्याप्रमाणें फौज आपल्या हातीं आलीशी झाल्यानंतर, मनरो साहेब शत्रूवर गेला आणि बक्सार मुकामीं तीन तास लढाई होऊन बादशाह, सुजाउद्दवला व मीरकासीम ह्या तिघांच्या फौजेचा पराजय झाला. तेव्हां, आपण उचललेला पक्ष आपणास झेंपत नाहींसें पाहून बादशाह इंग्लिशांस शरण आला. शिपाई लोकांत भयंकर बंडावा. स० १७६४. बक्सार येथील लढाईमध्यें बादशाह स्वाधीन होतो. ता० २३ अक्टोबर. स० १७६४.

सुजाउद्दवला अद्यापि फौज बाळगून होताच. त्यानें मराठयांशीं तह केला होता. इंग्लिश त्याच्या पाठीस लागले; त्यांनीं लखनौ व अलहाबाद हीं त्याचीं दोन शहरें घेतलीं. शेवटीं कोरा मुकामीं इंग्लिशांस जय मिळून तो जनरल कार्नाक साहेब पुनः फौजेच्या कामावर आला होता त्याच्या स्वाधीन झाला. ह्याप्रमाणें हिंदुस्थानांतले दोन्ही प्रबळ शत्रु एकदम हातीं लागून इंग्लिशांच्या छावणींत कैद होऊन राहिले. सुजाउद्दवलाचा पराभव. ता. ३ मे स. १७६५.

एप्रिलांत क्लैवसाहेब विलायतेहून कलकत्त्यास येऊन तेथून लढाईच्या

ठिकाणीं जात होता. तो विलायतेंत असतां तेथें बंगालच्या स्थितीची कच्ची हकीगत समजली होती. हिंदुस्थानांत नवीन संपादिलेल्या मुलखाची नासाडी दोन कारणांनीं होत चालली होती. तेथील इंग्लिश कामदारांची वर्तणूक वाईट, हें एक अंतस्थ कारण, आणि तेथील राजे, नवाब वगैरे इंग्लिशांशीं लढाया चालवीत, हें एक बाह्य कारण. ही नासाडी बंद करण्यासाठीं कांहीं तरी तजवीज केली पाहिजे असें कोर्ट आफ डैरेक्टर व विलायत सरकार ह्यांच्या मनांत आलें. बंदोबस्त न केल्यास आपण संपादिलेला आपल्या हातचा अंमल जाईल अशी त्यांस भीति पडली. हिंदुस्थान ज्यानें जिंकिलें, त्यासच त्याचें रक्षण करण्याचें काम सांगावें, आणि त्या कामास योग्य तोच आहे असें त्यांस वाटलें. क्लैवसाहेबानें पूर्वी केलेल्या कामांवरून त्याची वाहवा होऊन सरकारांतून त्याचें नांव बडे लोकांत घातलेंच होतें. आणि त्यांनीं ह्या वेळेस त्यास कंपनीच्या बंगाल इलाख्यांतील राज्याचा कुलअखत्यार देऊन विनंती केली कीं, तुह्मीं बंगाल्यांत जाऊन तेथील सर्व बखेडे मोडून स्वस्थता करावी.

क्लैवसाहेबाचें परत येणें. ता० ३ मे स. १७६५.

क्लैवसाहेब मद्रासेस येऊन पोहोंचला, तेव्हां तेथें त्यास वर्तमान कळलें कीं इंग्लिशांनीं मीरकासिमाचा पराजय केला, दिल्लीचा बादशाह त्यांच्या स्वाधीन झाला, फौजेंतील बंड मोडून शिपाई लोक पूर्ववत् हुकूम मानूं लागले, व मीरजाफर मृत्यु पावला. ह्यावरून त्याच्या ध्यानांत आलें कीं, हिंदुस्थानांतील सर्व राज्याचा अधिकार आपल्या हातीं घेतला पाहिजे, अशी वेळ आतां येऊन पोहोंचली खरी.

इंग्लिशांस बंगालचें राज्य मिळणें. ता० १२ आगष्ट स० १७६५.

क्लैवसाहेब बंगाल्यास येऊन तेथून लागलाच मुरशिदाबादेस गेला. तेथें तारीख १२ आगस्ट सन १७६५ रोजीं बंगाल, ओढिया, व बहार ह्या तीन प्रांतांचा वसूल कंपनीस मिळण्याविषयीं बादशाहानें त्यास सनद करून दिली, आणि हिंदुस्थानांत ह्याखेरीज ज्या ज्या ठिकाणचा मुलूख इंग्लिशांस मिळाला होता तो त्यांजकडे कायम केला. बंगाल वगैरे प्रांतांत नांवाला एक नवाब राहील, असें ह्या सनदेंत होतें; पण ह्यापुढें वास्तविक सत्ता इंग्लिशांच्या हातीं असावीसें होतें.

मुलकी खात्यांतील नौकरीविषयीं फेरफार.

अशा रीतीनें आपल्या अमलाचा नवा पाया घालून इंग्लिश कामगारांत कांहीं सुधारणा करावयाची होती तिकडे क्लैवसाहेबानें लक्ष दिलें. हें कृत्य आरंभीं मोठें कठीण वाटलें होतें. पण त्यानें तें तडीस नेलें. त्यानें मुलकी खात्यांत कामगारांस पगार आजपावेतों अगदीं कमी होते ते वाढवून त्यांनीं नेटि-

यांपासून बक्षीस घेऊं नये असें केलें; त्यांचा खासगत व्यापार बंद केला; कारण तो चालविल्यामुळें कंपनी सरकारच्या हितापेक्षां स्वहिताकडे त्यांचें लक्ष फार लागे. त्यानें सर्व इंग्लिश कामगारांस सांगितलें कीं, तुह्मीं इतःपर मोठमोठ्या गोष्टींकडे लक्ष द्यावें; कारण ह्यापुढें तुमचें व्यापारीपणाचें नातें जाऊन मोठमोठया प्रांतांचा अंमल तुमच्या हातीं येऊन सर्व व्यवस्था तुमच्या हातून होणार आहे.

लष्करी खात्यांत फेरफार.

ह्याप्रमाणें त्यानें मुलकी खात्यांत फेरफार करून मग लष्करी खात्यांत फेरफार केला. तो असा कीं, कामगार व शिपाई ह्यांस पगाराखेरीज भत्ता मिळणें तो फक्त लढाईवर असतां मिळावा, एरवीं मिळूं नये. ह्या गोष्टीमुळें फौजेंत मोठा बंडावा झाला. दोनशें कामदारांनीं एकदम राजीनामे दिले. परंतु क्लैवसाहेब तिळमात्र भ्याला नाहीं. त्यानें नवीन कामदार पाठविण्यासाठीं मद्रास इलाख्यांत लिहिलें, आणि मोठया छातीनें व गांभीर्यानें तें बंड अगदीं मोडून टाकिलें. दुसऱ्याच्या हातून तर ही गोष्ट कधीं झाली नसती. ह्याप्रमाणें जें काम करण्यासाठीं क्लैवसाहेब विलायतेहून आला तें काम त्यानें केलें, आणि लागलाच तो विलायतेस निघून गेला. पण तेथें असा चमत्कार झाला कीं, ज्यांच्या हितासाठीं त्यानें हिंदुस्थान काबीज केलें, त्यांनींच त्या पुरुषाचे आमरण हाल हाल केले.

कामगार लोकांत बंडावा. स० १७६७.

क्लैवसाहेबाचें विलायतेस शेवटचें परत जाणें. जानेवारी स. १७६७.

क्लैवसाहेब फार मोठा मनुष्य खरा; पण त्याचे सर्व गुण चांगलेच होते असें नाहीं. त्यानें मोठमोठीं कामें केलीं, इंग्लंदच्या राज्यास एक उत्कृष्ट देश सामील केला, आणि फ्रेंचांचा गवरनर दुप्ली हा ज्या गोष्टी करण्याचे बेत मनांत मात्र करीत असे, त्या गोष्टी ह्या पुरुषानें आपल्या हातानें शेवटास नेल्या. हिंदुस्थानचे संस्थानी, राजे व बादशाह हे विलायतेच्या अधिकाऱ्यास शरणागत होऊन त्याच्या हुकुमानें राज्य करूं लागले.

क्लैवसाहेबाचे गुण आणि त्याचीं कृत्यें.

**सहावा भाग समाप्त.**

# भाग सातवा.

## हैदरअल्लीबरोबर पहिली लढाई, हिंदुस्थानांतील अमलांत फेरफार व मराठ्यांशीं पहिली लढाई.

सन १७६७ पासून सन १७८० पावेतों.

म्हैसूर—हैदरअल्ली—त्याचा अंमल—निजामाबरोबर इंग्लिशांचा तह—म्हैसुरावर स्वारी—निजामाचें कपट—कर्नल स्मिथ पळ काढतो—चंगमची लढाई—त्रिनोमालीची लढाई—इंग्लिशांचा जय—निजामास पश्चात्ताप—मद्रासेजवळ टिपूची एकदम स्वारी—अंबूरच्या किल्ल्याचा बचाव—अंबुराजवळ हैदरअल्लीचा पराजय—हैदर पश्चिमेस जातो—म्हैसूर व भोंवतालचे प्रांत ह्यांजवर स्वारी—हैदर परत येतो—त्याचे जय—तो कर्नल स्मिथ ह्याजबरोबरचा प्रसंग टाळतो—सेंत जार्ज किल्ल्यापुढें येतो—तह—बंगालची स्थिति—वारन हेस्तिंग्स यानें केलेली सुधारणूक—कायदा—बंडें—कौन्सिलदार—कलकत्त्यांतील तंटे—नंदकुमार—त्याची चौकशी आणि शिक्षा—मुंबई—मराठे—पेशव्याच्या गादीबद्दल तंटे—इंग्लिश राघोबादादास मदत देतात—पुरंदरचा तह—मराठे हल्ला करतात—इंग्लिश पळतात—बंगाल्याहून सुरतेस फौज येते—कप्तान पोफम साहेब ग्वालेर घेतो—मराठ्यांशीं तह.

म्हैसूरचें राज्य.

दक्षिण हिंदुस्थानांत फ्रेंच लोक जिंकले गेल्यानंतर लौकरच इंग्लिशांस दुसरा नवीन शत्रु उत्पन्न झाला. दक्षिण हिंदुस्थानच्या पश्चिमेस म्हैसूर म्हणून मोठा सधन प्रांत आहे तेथलें राज्य शेंकडों वर्षें हिंदु राजांनीं केलें. परंतु करनाटक प्रांतांत व बंगाल इलाख्यांत ज्या लढाया झाल्याबद्दल मागें लिहिलें, त्या चालल्या असतां म्हैसूरच्या संस्थानांत मोठा फेरफार झाला.

हैदरअल्ली.

त्या प्रांतांचा ज्या वेळचा इतिहास आम्ही लिहीत आहों त्या वेळेस तो हैदरअल्ली ह्या नांवाच्या एका मुसलमानाच्या हातांत होता. हा मोठा शूर होता, व हिंदुस्थानांत इंग्लिशांस मोठा शत्रु होता. त्याचा बाप लुटारू व तोही लुटारूच; पण शूर म्हटला म्हणजे असा कीं, प्रसंगीं तुटून पडणारा, आणि ठकही तसाच. ह्या दोन गुणांमुळें तो मनस्वी वाढून त्याच्याजवळ फौजेचा मोठा जमाव झाला, तेव्हां आपल्या धन्यावर उठून बंड करून तो त्याच्या गादीवर बसला.

ह्यानंतर दुसऱ्या संस्थानांवर हल्ला करून त्यानें चोहोंकडे आपला अंमल वाढविला. आज हा प्रांत घेतला, उद्यां तो प्रांत घेतला, अशा रीतीनें तें एक मोठें मुसलमानी राज्य झालें.

इंग्लिश लोक हैदराविरुद्ध निजाम व मराठे ह्यांजबरोबर तह करितात. स० १७६५.

हैदरअल्लीस ह्यापुढें वाढूं देऊं नये ह्मणून स० १७६७ त इंग्लिश, निजाम व मराठे हे एक झाले. निजामअल्ली हा हैदराबादेस निजामाच्या गादीवर होता. फ्रेंच कमांदर बुसी ह्यानें सलाबतजंगास गादीवर बसविलें होतें, त्यास निजामअल्लीनें गादीवरून काढून टाकिलें होतें, पुढें इंग्लिशांनीं निजामअल्लीचा पक्ष घेतला. त्यानें इंग्लिशांस फौजेच्या मदतीबद्दल गंटूर खेरीजकरून मदापल्लीपासून जगन्नाथपुरीपर्यंत तीनशें कोस प्रांताचा अंमल दिला; आणि इंग्लिशांनीं त्यास सांगितलें कीं, तुह्मांस लागेल त्या वेळेस आह्मी मदत करूं.

महंमदअल्ली हा अद्यापि करनाटकचा नवाब होता. इंग्लिशांनीं त्यास गादीवर बसविलें होतें, तरी आपल्या मुलखावर अंमल तो जातीनें करीत असे. मद्रासेच्या भोंवतालचा कांहीं थोडासा मुलूख त्यानें इंग्लिशांस दिला होता, त्यावर मात्र अंमल तो करीत नसे.

मराठ्यांची दगाबाजी.

हैदरावरच्या स्वारींत वरील दोन राजे व मराठे इतके इंग्लिशांना साहाय्य होते. मराठ्यांनीं हैदराशीं लढाई सुरू केली. ती अशी, कीं प्रथम त्यांनींच ह्याच्या प्रांतावर स्वारी केली; परंतु हैदरानें त्यांस द्रव्य देऊन आपला प्रांत सोडून जाण्याविषयीं विनंती केली, त्यांनीं विचार न करितां इंग्लिशांशीं केलेला संकेत मोडला. त्यांचा उद्देश इतकाच होता कीं, लुटीनें अगर दुसऱ्या एखाद्या रीतीनें आपला नफा करून घ्यावा ह्मणजे झालें.

निजामाची दगाबाजी.

पुढें इंग्लिश व निजाम हे ह्मैसुरावर गेले. पण तेथें निजामही हैदराकडून द्रव्य घेऊन त्याजकडे गेला आणि इंग्लिशांशीं त्यानें लबाडी केली.

कर्नल स्मिथ साहेबाचें परत येणें.

इंग्लिश फौजेवर कर्नल स्मिथ साहेब होता, त्यास निजाम फितल्यामुळें माघारें जावें लागलें. तो मद्रासेकडे जात असतां हैदराच्या स्वारांपासून त्यास दिवसानुदिवस जास्ती त्रास होऊं लागला. त्या स्वारांनीं त्याला वेढून टाकलें, त्याचें सामानसुमान व धान्य हीं त्यास मिळूं दिलीं नाहींत; त्याचा कोणी एखादा मनुष्य छावणी सोडून आसपास गेला कीं, तो धरून कैद करावा; असे त्यावर अनेक बिकट प्रसंग गुदरले; व त्यांचे कितीएक लोक मेले. तथापि तो सरदार मोठ्या व्यवस्थेनें व आपल्या अब्रूस योग्य अशा रीतीनें देशाची माहिती अगदीं नसतां त्यांतून निघून गेला, ही गोष्ट मोठी होय.

चंगमचीलढाई. ता. ३ सप्तंबर स० १७६६.

चंगम मुक्कामीं हैदरानें स्मिथ साहेबावर हल्ला केला; परंतु हैदराचा पराजय झाला. त्रिनोमाली येथें आल्यानंतर येथें समानाची अगदीं तयारी नाहींशी पाहून स्मिथ साहेब अगदीं निराश झाला. कारण त्या वेळेस सामानाची फार जरूर होती. हैदरास हें समजलें होतें; त्यावरून इंग्लिश फौज अगदीं कमकुवत व दिलगीर असेल, असें त्यास वाटून तो फौज घेऊन जवळ आला. परंतु दैववशात् इंग्लिशांस तांदुळाचें मोठें पेंव सांपडलें, त्यामुळें त्यांचीं युद्धाची अशी तयारी झाली कीं, पूर्वीं तशी कधींच झाली नव्हती.

त्रिनोमाली येथील लढाई. ता० २६ सप्तंबर स० १७६६.

त्रिनोमालीच्या मैदानांत दोन्ही फौजा सज्ज होऊन लढाईस उभ्या राहिल्या. इंग्लिशांच्या डाव्या बाजूस मोठी दलदल होती. हैदरास वाटलें होतें, कीं इंग्लिश त्या दलदलीवरून जातील, आणि जाऊं लागले ह्मणजे त्यांजवर हल्ला करून त्यांस घोटाळ्यांत घालावें. दलदलीच्या एक्या बाजूस लहानशी टेंकडी होती, तिला प्रदक्षिणा करून शत्रूच्या पार्श्वभागावर पडावें, असा आपल्या फौजेस स्मिथ साहेबानें हुकूम केला. ती तसें करूं लागली, तेव्हां हैदरास वाटलें कीं; ती पळ काढीत आहे, तेव्हां तो त्याच टेंकडीच्या दुसऱ्या बाजूनें तीस आडवा आला. दोन्ही फौजांची अकस्मात् गांठ पडली. हैदराच्या तोफा येऊन पोहोंचल्या नव्हत्या; परंतु इंग्लिशांच्या तोफा जवळ होत्या, त्या त्यांनीं फार चांगल्या रीतीनें चालविल्यामुळें हैदराचे घोडेस्वार आघाडीस होते ते मागें हटून पायदळ व तोफखाना पुढें आणण्याची सोयच नाहींशी झाली. हैदराच्या फौजेची दाणादाण झाली, आणि इंग्लिशांच्या फौजेनें स्वस्थपणें तलवार चालवून जय मिळविला. हैदराच्या फौजेला दम निघेना, तेव्हां ती चोहोंकडे पळत सुटली

ह्या लढाईमध्यें हैदराचा जनानखानाही होता. निजामाच्या बायका हत्तीवर बसल्या होत्या, आणि इंग्लिशांचा पराजय होईल, तो त्यांच्या दृष्टीस पडण्याकरितां ते हत्ती फौजेच्या पिछाडीस उभे केले होते. पळ काढला तेव्हां हत्ती रणांगणांतून काढण्यास हुकूम केला, परंतु एका हौद्यांतील एक बाई असें बोलली कीं, "माझा हत्ती तरी निदान येथें राहिला पाहिजे; कारण त्याला आपल्या धन्याच्या निशाणाच्या अगोदर माघारें फिरण्याची संवय नाहीं." त्यावरून निशाण मागें जाईपर्यंत हत्ती तेथेंच उभे राहिले होते, आणि भोंवतालीं इंग्लिशांच्या गोळ्यांचा वर्षाव चालला होता.

ह्या वेळेस इंग्लिशांचा जय पाहून निजामानें त्यांशीं बोलणें लाविलें कीं मी तुह्मांकडे येतों, मला परवानगी असावी. इंग्लिशांनीं कांहीं दिवसांनीं हें त्याचें ह्मणणें मान्य केलें.

इंग्लिशांकडे जाण्याविषयीं निजामाचें पुनःबोलणें.

हैदरानें आपला पुत्र टिपू ह्यास फौज देऊन मद्रासच्या भोंवतालच्या प्रांतावर हल्ला करण्याकरितां पाठविलें होतें. मार्गांत जें हातीं लागेल तें लुटावें, जाळावें, नासावें, पाहिजे तें करावें, अशा रीतीनें सेंत जार्ज किल्ल्याच्या दरवाज्यापर्यंत त्यानें आपली कामगिरी उत्कृष्ट बजाविली. परंतु बापाच्या पराजयाची बातमी लागल्यामुळें माघारा येऊन तो थोरल्या फौजेस मिळाला.

टिपूची लुटीकरितां मद्रासेकडे स्वारी.

त्रिनोमाली येथें जय झाल्यानंतर स्मिथ साहेब कांहीं दिवस स्वस्थ राहिला. तितक्यांत हैदरानें इंग्लिशांच्या ताब्यांतील कांहीं लहानसहान किल्ले घेऊन वेरुळाजवळ अंबूर ह्मणून मोठा बळकट डोंगरी किल्ला आहे त्याजवर हल्ला केला. त्या ठिकाणीं कालवर्त साहेब, त्याच्या हाताखालचे कांहीं गोरे लोक व मद्रासच्या दाहाव्या काळ्या पायदळ पलटणीचे ५०० शिपाई होते, त्यांनीं तो बचावला.

अंबूर किल्ल्याचा मोठ्या शौर्यानें बचाव. ता. १० नव्हेंबर—ता. ७ डिसेंबर सन १७६७.

तो किल्ला हातीं येण्यासाठीं हैदरानें सर्व उपाय केले. छापा घालावयास जेव्हां जेव्हां जावें तेव्हां तेव्हां आपणास इंग्लिश मागें हटवितात, असें पाहून कप्तान कालवर्त ह्यानें आपणास शरण यावें ह्मणून हैदरानें प्रयत्न केला. तो असाः—त्यानें त्यास सांगून पाठविलें, कीं शूरानें रक्षण करण्यासाठीं जितका प्रयत्न करावा तितका तुह्मी करून चुकलां, आतां उपाय राहिला नाहीं, तर तुह्मी आमच्या स्वाधीन व्हावें. तो बोलला कीं, तुह्माला मी आपलें शौर्य दाखवावें असा प्रसंग तुह्मी अजून मला आणिला नाहीं. ह्यानंतर हैदरानें त्यास लांच देण्याचें संधान केलें. त्यास सांगून पाठविलें, कीं तुह्मांवर मोठी मेहरबानी होईल व तुह्मांस पुष्कळ द्रव्य देऊन मी आपली अर्धी फौज तुमच्या हुकमांत देईन. हा निरोप घेऊन जाणाऱ्या जासुदास कालवर्त साहेब धमकावून बोलला कीं, तुझ्या धन्यानें इतःपर आपल्या माणसांच्या जिवाला जपावें. कारण मी खास सांगतों, कीं ह्यानंतर असला निरोप आणणारास मी निखालस फांशीं देईन. २६ दिवसपावेतों ह्या सरदारानें दम धरिला. नंतर कर्नल स्मिथ साहेब तेथें आला. त्यास अंबूरच्या किल्ल्यावर इंग्लिशांचें निशाण फडकत आहे असें दुरून दिसतांच फार आनंद झाला. मद्रासच्या दाहाव्या काळ्या

पायदळ पलटणीनें मोठा पराक्रम केल्यामुळें तिच्या निशाणावर अंबूर हा शब्द लिहिला, तो अद्यापि चालू आहे.

हैदराचें पश्चिमकिनाऱ्याकडे परत येणें.

ह्यानंतर आणखी एक वेळ स्मिथ साहेबानें अंबुराजवळ हैदराचा पराजय केला. तेव्हां करनाटक इंग्लिशांच्या हातांत सोडून देऊन तो पश्चिमेच्या आंगास निघून गेला.

ह्यानंतर हैदराच्या मुलखांत लढाई चालवायाची असा मद्रास सरकारानें निश्चय केला. ही गोष्ट करण्याचे मार्ग दोन होते. म्हैसूरच्या उच्च प्रदेशाच्या खालच्या मुलखांत स्वारी करावी हा एक. हा मुलूख वानियंबाडी, दिंदिगल व पालघाट ह्या तिहींच्या मध्यें आहे; म्हणजे हा त्रिकोणाकृति आहे. दुसरा मार्ग खुद्द म्हैसूर प्रांतांत जाऊन बंगळूर शहरास वेढा घालावा. ह्यांतली कोणती तरी एक गोष्ट केली असती तर फायदा होता, परंतु तसें न करितां दोन्ही गोष्टी एकदांच कराव्यासें ठरलें. खालच्या मुलखांत स्वारी करण्याचें काम कर्नल वूद साहेबास सांगितलें. त्यानें तो मुलूख काबीज करून तेथले सर्व किल्ले हस्तगत करून घेतले; परंतु त्यांच्या संरक्षणार्थ ज्या फौजा ठेविल्या होत्या त्या पुरेशा नव्हत्या. कर्नल स्मिथ साहेबास फौजा देऊन सरकारानें म्हैसुरावर पाठविलें होतें. त्याजवर सरकारची गैरमर्जी झाल्यामुळें त्यास दूर करून कर्नल वूद साहेब खालच्या मुलखांत होता त्यास ह्याच्या जागेवर जाण्याचा हुकूम झाला.

हैदराच्या मुलखावर स्वारी.

इतक्यांत इंग्लिशांच्या फौजेची एक टोळी मुंबईकडून पश्चिमेच्या आंगास आली होती तिला हैदरानें मागें हटविलें. तिनें हैदरापासून पळ काढला तो अशा रीतीनें कीं तिच्या अबरूला आणि नांवाला डागच लागला. नंतर तो पूर्वेकडे वळला. इंग्लिशांनीं दोन ठिकाणीं हल्ला केला होता; त्या दोन्ही ठिकाणीं त्यांचाच पराजय झाला. बागळूर मुक्कामीं त्यानें वूद साहेबाचा पराजय केला; आणि इंग्लिशांस माहित नाहींत अशा रस्त्यांनीं खालच्या मुलखांत उतरून तो कोइमत्तुराजवळ आला, आणि त्यानें आपलीं सर्व ठाणीं इंग्लिशांच्या हातचीं घेऊन त्यांस मद्रासेकडे माघारें हांकून लावलें.

हैदराचें परत येणें व इंग्लिशांवर त्याचा जय.

हैदराशीं तह करावा अशी इच्छा इंग्लिशांस होती; पण तो जीं कलमें त्यांस सांगे, तीं सुयुक्तिक व बेताचीं असतांही ते कबूल करीतना, त्यामुळें तह होईना. तेव्हां स्मिथ साहेबास पुनः अधिकार मिळून तो हैदरावर हल्ला करण्यास सिद्ध झाला. पण त्याच्या फौजेशीं तोंड देण्यास

हैदर खुषी नव्हता. तो इंग्लिशांच्या फौजेस टाळा देऊन मोठ्या जलदीनें मद्रासेस गेला आणि सेंत जार्ज किल्ल्यापुढें फौजेचा तळ देऊन त्यानें इंग्लिशांस सांगितलें, कीं मी तह करण्यासाठीं आलों आहें. त्यानें म्हटलेलीं कलमें ह्या वेळेस इंग्लिशांनीं कबूल केलीं. तहनाम्यांत ठरलें कीं, लढाई सुरू झाल्यापासून ज्याचा जो मुलूख गेला असेल त्याचा तो त्यास परत मिळावा आणि परस्परांवर कांहीं प्रसंग गुजरल्यास परस्परांनीं मदत करावी. नंतर हैदरअल्ली आपल्या संस्थानावर मराठे आले होते त्यांजपासून आपला बचाव करण्यासाठीं निघून आला.

मद्रास येथें हैदराशीं तह होतो. ता. ४एप्रिल सन १७६९.

क्लैवसाहेब बंगाल्यांतून विलायतेस निघून गेल्यानंतर तेथें पुनः बंडाळी झाली. त्यानें निरनिराळ्या खात्यांत जी सुधारणा केली होती ती चांगल्या रीतीनें चालली नाहीं. साहेब लोक आपला खासगत व्यापार अद्यापि चालवीत होते. वसुलाचें काम नेटिवांच्या हातीं होतें, त्यामुळें वसूल व्हावा त्यापेक्षां फार कमी होत असे. हिंदुस्थानांतील राज्यकारभारांत ह्या चुक्या पडल्या, त्यामुळें इंग्लंदांतल्या लोकांचें नुकसान झालें; म्हणजे ईस्तइंदिया कंपनींतील भागीदारांस जितका नफा पडावा तितका पडेना. त्यावरून शेवटीं हिंदुस्थानांतील राज्यकारभार आजपावेतों फक्त कंपनीकडेसच होता, तो स्वतः पार्लमेंतास पाहणें प्राप्त झालें.

बंगाल्याची स्थिति.

बंगालचा गवर्नर वारन हेस्तिंग्स् साहेब ह्यानें कोर्त आफ दैरेक्तर्स ह्यांच्या हुकुमावरून इकडील राज्यकारभारांत मोठा फेरफार करण्याचा बेत केला. वसुलाचें काम इंग्लिशांच्या हातीं दिलें. बंगाल प्रांत इंग्लिशांच्या हातीं येऊन सात वर्षें झालीं होतीं; पण तेथील वसुलाचें काम नेटिवांच्या हातीं असल्यामुळें इंग्लिश ह्या प्रांताचे मालक आहेत हें लोकांच्या अनुभवास आलें नव्हतें. तें काम इंग्लिशांच्या हातीं येतांच अंमल व नांव दोन्ही त्यांचींच झालीं.

हेस्तिंग्स साहेबानें केलेला फेरफार. ता० ११ मे स० १७७२. वसूल.

बंगाल प्रांतीं फार दिवसांपासून स्वस्थता नव्हती ती वारन हेस्तिंग्स ह्याच्या कारकीर्दीत झाली, तीमुळें दुसऱ्यांच्या अमलांतले लोक कंपनीच्या अमलांतील प्रदेशांत राहण्याकरितां आले.

बंगाल्यांत स्वस्थता व उत्तमरीतीचें राज्य. स. १७७२.

पुढें पार्लमेंतानें हिंदुस्थानाबद्दल कायदा ठरविला. तो असा, कीं बंगालच्या गवर्नरास गवर्नर जनरल हा किताब मिळेल; त्यानें सर्व

रेग्युलेटिंग आक्त. ता. १ जुलै स. १७७३.

हिंदुस्थानचा राज्यकारभार पहावा; त्यास चार असामी कौन्सिलदारांनीं सर्व कामांत मदत करावी; कलकत्त्यांत कोर्त आफ् जस्तिस ह्मणजे न्यायसभा नवीन स्थापावी; आणि नेटिवांपासून कोणतेंही बक्षीस कौन्सिलदार व दुसरे कामदार ह्यांनीं घेऊं नये. (ह्या कायद्यास रेग्युलेतिंग आक्त असें ह्मणत असत.)

नवीन मुख्य कौन्सिल. ता० २१. अक्टोबर स.१७७४.

हा कायदा हेस्तिंग्स साहेबाच्या कारकीर्दींत झाला त्याप्रमाणें पहिला गवरनर जनरल तोच झाला. बारवेल, फ्रान्सिस, कर्नल क्लावरिंग व कर्नल मानसन हे चार साहेब कौन्सिलदार नेमिले. त्यांपैकीं बारवेल साहेब त्या वेळेस हिंदुस्थानांतच होता. बाकीचे तीन असामी विलायतेस होते ते हिंदुस्थानांत नवीनच यावयाचे होते. कौन्सिलाची सुरवात झाल्या दिवसापासून असें चाललें कीं, जो विषय पुढें येईल त्याविषयीं आपसांतच तंटे व्हावे.

हलकटपणाचे तंटे.

इंग्लंदांतून आलेल्या तीन कौन्सिलदारांचा व गवरनर जनरल साहेबाचा अत्यंत द्वेष होता, त्यामुळें ते तिघेजण त्यास नेहमीं विरुद्ध बोलत. बारवेल साहेब मात्र नेहमीं गवरनर जनरलाप्रमाणें बोले. ह्याप्रमाणें कौन्सिलांत दोन पक्ष होते. त्यांत गवरनर जनरलाच्या विरुद्ध पक्षाचे लोक फार होते. त्यामुळें त्याच्या हातीं कांहींच अंमल नव्हता ह्मटल्यास चिंता नाहीं.

रोहिले लोकांस बाहेर घालवितात. ता०२३एप्रिल स० १७७४.

अयोध्या प्रांताजवळ रोहिलखंड प्रांत आहे, त्यांत कांहीं अफगाण लोक संस्थानी होते, त्यांस घालवून देण्याविषयीं अयोध्येचा नवाब सुजाउद्दौला ह्यास हेस्तिंग्स साहेबानें मदत दिली; हें तंट्याचें मूळ कारण होय. त्या साहेबानें मदत दिली हा केवळ अन्याय होय. त्यानें कर्नल चांपियन साहेबाच्या हाताखालीं फौज देऊन त्यास त्या अफगाण लोकांवर पाठविलें. त्यांस एका लढाईत जिंकून त्यांचा मुलूख त्यानें सुजाउद्दौलास दिला. त्यानें तेथील रहिवासी लोकांवर जुलूम चालविला. मदत दिल्याबद्दल हेस्तिंग्स साहेबास कंपनीच्या नांवानें पुष्कळ द्रव्य मिळालें.

कोरा व अलाहाबाद ह्या प्रांतांची व्यवस्था.

दिल्लीच्या बादशाहाच्या हातून कोरा, व अलहाबाद ह्या दोन प्रांतांचें संरक्षण होईना सबब ते प्रांत हेस्तिंग्स साहेबानें सुजाउद्दौलास दिले; आणि सुजाउद्दौलानें इंग्रज सरकारास ५० लाख रुपये द्यावे व काशीचा दुर्बल राजा चेतसिंग ह्याचें संरक्षण करावें असें ठरलें. परंतु कौन्सिलांत ह्या गोष्टीस विरुद्ध बहुमत पडल्यामुळें ही झाली

नाहीं. तेव्हां कोरा व अलाहाबाद ह्या दोन प्रांतांशीं काशीच्या राजाचा मुलूख कांहीं दिवसपर्यंत मोबदला करावा असा ठराव केला. नंदकुमार ह्मणून ब्राह्मणजातीचा एक श्रीमान् गृहस्थ होता. तो मोठा दुर्व्यसनी होता. त्याला फांशीची शिक्षा झाली, ही ह्या वेळेस एक मोठी गोष्ट झाली. अनेक कौन्सिलदार गवर्नर जनरल ह्याच्या नाशावर आहेत, हें नंदकुमारास समजलें, आणि त्याचाही गवर्नर जनरल ह्याशीं द्वेष होता, सबब त्यानें अर्ज केला कीं मीरजाफराच्या मुलाच्या रक्षणासाठीं मीरजाफराच्या बायकोची नेमणूक केली, त्या कामांत गवर्नर जनरल ह्यानें तिजपासून लांच घेतला. फ्रान्सिस साहेब आदिकरून विरुद्ध मंडळीस ह्यापासून आनंद झाला. नंदकुमाराचा पक्ष उचलून ते त्याची मानमान्यता करूं लागले, आणि त्यांस अखत्यार नसतां ते आपणावरील अधिकाऱ्याची चौकशी करूं लागले.

नंदकुमार.

हा खटला चालला असतां, नंदकुमारानें बहुत वर्षांपूर्वीं खोट्या सहीचा कागद बनावला होता, त्या गुन्ह्याबद्दल त्यास नवीन स्थापलेल्या कोर्त आफ् जस्तिसामध्यें एकाएकीं आणून त्याची चौकशी केली. तेव्हां त्याजवर तो गुन्हा लागू होऊन त्यास फांशीची शिक्षा झाली.

त्याची चौकशी व शिक्षा. ता० ५ आगष्ट स० १७७६.

ह्या शिक्षेवरून हिंदुलोकांत मोठा गवगवा झाला. नंदकुमार जातीचा ब्राह्मण असून बडा लोक होता, ह्या दोन कारणांवरून सर्व लोक त्यास फार मानीत असत. तो फांशी दिला त्या वेळेस हजारों लोक जमले होते. सर्वांस फार वाईट वाटलें; परंतु त्यास सोडविण्याविषयीं कोणीं दंगा वगैरे केला नाहीं. तो मेल्यामुळें गवर्नर जनरलावरच्या फिर्यादीची चौकशी अर्धीतच राहिली; आणि ती करणें मोठा अन्यायही होता.

कौन्सिलदारांत तंटा अद्यापि चाललाच होता. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं क्लावरिंग व मानसन हे दोन असामी मेले, तेव्हां विरुद्ध पक्षाचा एकच असामी राहिला. पुढें गवर्नर जनरल ह्याच्या पक्षाचे लोक कौन्सिलांत पुष्कळ होऊन त्याचें वजन दिवसानुदिवस पडत चाललें.

कौन्सिलांत हेस्तिंग्स साहेबास आपल्या पक्षाचे लोक मिळतात.

मद्रास व बंगाला ह्या दोन इलाख्यांत मागें सांगितल्याप्रमाणें गडबड चालली होती; तेव्हां मुंबई इलाख्यांत जिकडे तिकडे स्वस्थता होती. पुढें त्या इलाख्यांत लढाईचा प्रसंग आला. मुंबईच्या जवळचीं लहान लहान ठाणीं व्यापारोपयोगी आहेत तीं आपल्या अमलांत आणावीं असा मुंबई सरकारचा हेतु फार

मुंबई इलाख्यांतील स्थिति.

होता. त्यांतही साष्टीच्या बेटावर त्यांची नजर विशेष होती. मराठयांमध्यें ह्या वेळेस पेशव्याच्या गादीबद्दल तंटे लागले होते. मुंबई सरकारच्या मनांत आलें, कीं आपण ह्या तंटयांत पडून आपणास ज्या गोष्टींची जरूर आहे तेवढ्या आपण ह्या अधिकाऱ्यांपासून मिळवाव्या. मराठे ह्या तंटयांत गुंतले असतां इंग्लिशांनीं साष्टी घेण्याकरितां फौज रवाना केली. राघोबादादा पेशव्याची गादी मिळविण्याचा यत्न करीत होता, तो मदत मागण्याकरितां इंग्लिशांकडे गेला, तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं साष्टी व मुंबई भोंवतालच्या दुसऱ्या जागा आम्हांस द्याल तर आम्ही तुम्हांस शत्रूबरोबर लढण्याविषयीं मदत देऊं. त्यानें ती गोष्ट पतकरिल्यावरून मुंबई सरकारानें त्यास फौजेची मदत दिली. परंतु बंगाल सरकारास मुंबई व मद्रास ह्या दोन इलाख्यांवर अंमल करण्याचा अधिकार मिळाल्यावरून पुण्यावर पाठविलेली फौज परत आणण्याविषयीं मुंबईस त्यानें खरमरीत हुकूम लिहिला, व राघोबादादाच्या शत्रूबरोबर तह करण्याकरितां कर्नल अपतन साहेबास बंगाल्याहून रवाना केलें. राघोबादादाच्या शत्रूंनीं कबूल केलें, कीं इंग्लिशांनीं राघोबादादाचा पक्ष सोडल्यास इंग्लिशांस साष्टी व मुंबईच्या भोंवतालच्या जागा आम्ही देतों.

मराठ्यांमध्यें तंटे.

मुंबई सरकारचा ठराव बंगाल सरकारकिरवितें. पुरंदरचा तह. ता. ३ जून स० १७७६.

पुढें कांहीं वेळपर्यंत मराठे उगीच राहिले. नंतर असें समजण्यांत आलें कीं, ते इंग्लिशांवर जाण्याची तयारी करीत आहेत. इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्या मध्यें लढाई लागण्याचा संभव होता, व कलकत्त्यास बातमी जाऊन पोहोंचली, कीं पुण्यास कोणी फ्रेंच सरदार आहे तो पेशव्यांची फौज तयार करीत असतो.

मराठे युद्धास तयार होतात.

हेस्तिंग्स साहेबानें बंगाल्याहून मुंबईस लागलीच थोडकीच फौज रवाना करून मुंबई सरकारास तिच्या मदतीस आणखी कांहीं फौज पाठविण्याचा हुकूम केला. मुंबई सरकारानें तो हुकूम मान्य करून कर्नल ईगर्तन साहेबाच्या हाताखालीं चार हजार फौज पाठविली, आणि तह अगर दुसरें एखादें बोलणें करण्यासाठीं दोन मुलकी कामगार पाठविले. ईगर्तन हा सेनापतीच्या कामास चांगला नव्हता. त्याचप्रमाणें फौजेवर हुकूम एकाचा व तह वगैरे करण्याविषयीं हुकूम दुसऱ्याचा ही व्यवस्था चांगली नव्हती.

पुण्यावर बंगाल्याहून व मुंबईहून सैन्य पाठवितात.

मुंबईची फौज पुण्याकडे रवाना झाली. राघोबादादाची पुनः इंग्लिशांशीं एकी झाल्यावरून तोही तिजबरोबर होता, परंतु मराठी फौज आणण्याचें त्यानें कबूल केलें होतें ती आणिली नाहीं. लढाई सुरू होऊन इंग्लिशांचा जय होतोसें झालें म्हणजे ती येईल असें त्यानें सांगितलें. परंतु ह्या बोलण्यापासून जी गोष्ट होईलसें राघोबादादास वाटलें होतें, ती झाली नाहीं. इंग्लिश फौजेचे कामगार भ्याले. शत्रु त्यांच्या दृष्टीपुढें येऊन उभा राहिला. परंतु त्यांचें धैर्य अगदीं सुटून शत्रूशीं तोंड न देतां तें माघारे निघाले.

मुंबईची फौज पुण्याकडे रवाना होते.

मराठी फौजेपुढें पळ काढणें म्हणजे गोष्ट कठीण होती. मराठ्यांपाशीं घोडेस्वारांचा भरणा फार, ते स्वार इंग्लिश फौजेभोंवतीं चोहोंकडून घिरट्या घालूं लागले. तिच्या अन्नपाणी वगैरे सामानाची व तिची त्यांनीं गांठ पडूं दिली नाहीं. कोणी थकलेला अगर आजारी मनुष्य हातीं लागल्यास ते तत्क्षणीं मारून टाकीत. इंग्लिश आपणावर हल्ला करितातसें दिसल्यास ते लागलेच दूर पळून जात. परंतु इंग्लिश पुढें निघाले, कीं पुनः ते पाठीवर चालून येत.

इंग्लिशांच्या मुख्यांची मूर्खपणाची वर्तणूक.

अशी इंग्लिशांची अगदीं अव्यवस्था होऊन ते मोठ्या अप्रतिष्ठेनें मागें निघाले. परंतु दोन दिवसांनीं मुक्काम करून त्यांनीं मराठ्यांशीं तहाचें बोलणें लावलें. तेव्हां साष्टी वगैरे जीं ठाणीं तुम्हीं मागितलीं होतीं तीं मागूं नयेत म्हणजे तुम्हांस मुंबईस जाऊं देऊं, असें त्यांनीं सांगितलें. तेव्हां इंग्लिशांनीं दोन आपले असामी मराठ्यांच्या छावणींत ओलीस पाठविले, आणि राघोबादादा आपल्या शत्रूच्या स्वाधीन झाला.

या स्वारीचा अपमानकारक शेवट. जानेवारी स. १७७८.

बंगालच्या फौजेनेंही कांहीं एक केलें नाहीं. त्या फौजेचा कमांदर कर्नल वेलस्ली येते वेळेस मार्गांत एके ठिकाणीं राहून तेथील संस्थानांच्या तंट्यांत पडला. वास्तविक पाहतां त्यास ह्या तंट्यांत पडण्याचें कारण नव्हतें.

बंगालचे सैन्याचा मुक्काम.

हेस्टिंग्स साहेबानें त्यास लागलेंच परत बोलावून त्याच्या जाग्यावर गोदर्द साहेब नेमिला. हा मनुष्य शूर व चलाख होता. त्यास काम मिळतांच तो मुंबईकडे चालता झाला. मुंबईच्या फौजेकडून त्यास निरोप गेले कीं, तुम्हीं पुढें येऊं नये व त्या फौजेबरोबर दोन मुलकी कामगार होते त्यांनीं त्यास न येण्याविषयीं हुकूम लिहिला. परंतु निरोप व पत्रें मान्य न करितां तो सुरतेस येऊन दाखल झाला.

कर्नल गोदर्द साहेबाची नेमणूक ता० २ डिसेंबर स० १७७८.

सुरतेस आल्यावर कांहीं दिवसपावेतों त्यानें आपण होऊन युद्ध केलें

त्याचा जय. स. १७८०.

नाहीं. परंतु स० १७८० च्या जानेवारींत लढाई करून त्यानें अमदाबाद घेतली. पुढच्या स्वारींत त्यानें मराठ्यांच्या फौजेचा पराजय केला.

ह्याप्रमाणें पश्चिमेच्या आंगास गोदर्द साहेब लढत होता, तेव्हां हेस्तिंग्स साहेबानें कप्तान पोफम साहेबास कांहीं फौजेनिशीं गोहदचा राणा इंग्लिशांच्या पक्षास नूतन मिळाला होता त्याला मदत करण्यासाठीं पाठविलें होतें. गोहद परगणा आग्रा प्रांतांत आहे, तेथें शिंदा त्या राण्याशीं लढत होता.

कप्तान पोफम.

कप्तान पोफम साहेब नेमला हें फार चांगलें झालें. कारण त्याप्रमाणें हुशार दुसरा मनुष्य नव्हता. त्यानें लाहोरच्या किल्ल्यास प्रथम वेढा घातला, तेव्हां मराठे जिवाकडे न पाहतां तो किल्ला बचावण्याकरितां लढले. ह्या लढाईचा परिणाम मोठा भयंकर झाला; ह्मणजे इंग्लिशांचे एकशें पंचवीस असामी मेले; परंतु शेवटीं जय होऊन किल्ला त्यांच्या हातीं आला.

तो लाहोर घेतो. ता० २१ एप्रिल स. १७८०.

ह्या नंतर पोफम साहेब ग्वालेरीवर गेला. हिंदुस्थानांत सर्वांचा ग्रह असा होता, कीं ग्वालेरचा किल्ला अतिशय बळकट आहे. तो इंग्लिशांच्यानें देखील घेववणार नाहीं. तो उंच डोंगरावर बांधला आहे. त्यांत फौज पुष्कळ व लढाऊ होती. तारीख ३ आगष्ट १७८० रोजीं गोऱ्या फौजेनें त्यास वेढा दिला. ते शिड्यांवरून चढून आंत गेले. त्यांनीं शत्रूस एकदम गांठलें आणि फारसे लोक न मरतां किल्ला त्यांच्या स्वाधीन झाला.

ग्वाल्हेरची स्वारी. आगस्त ता० ३ स. १७८०.

ती मोहीम पुढें थोडेच दिवस चालली. कारण हेस्तिंग्स साहेबाचें संपूर्ण लक्ष दुसऱ्या मोठ्या युद्धाकडे लागलें होतें; आणि त्याच्या हातीं जितका पैसा होता तितका सारा त्या युद्धास अवश्य होता.

मराठ्यांशीं तह. ता० १७ मे स० १७८२.

मराठ्यांबरोबर इंग्लिशांनीं तह केला, आणि कर्नल अप्तन साहेबानें पुरंदर मुक्कामीं तह केल्या दिवसापासून मराठ्यांचा जो मुलूख इंग्लिशांनीं घेतला होता तो त्यांनीं त्यांचा त्यास परत दिला.

**सातवा भाग समाप्त.**

# भाग आठवा.

## हैदरअल्लीची करनाटकांत स्वारी.

### सन १७८० पासून १७८४ पावेतों.

हैदराची स्वारी—मद्रासेंतील कामगारांची सुस्ती—बेली साहेबाचा पराजय—सर हेक्तर मनरो माघारा जातो—मद्रासेंत भय—हेस्तिंग्स साहेब फौज पाठवितो—कलकत्त्याहून सर ऐर कूत साहेब येतो—वांदिवाश शत्रूकडून परत घेतात—चिलंब्रम येथें पराजय—पोर्तोनोवो येथील लढाई—हैदराचा पराजय—बंगाल्याहून कप्तान पीयर्स साहेब कूच करितो—दुसरी लढाई—सोलनगडचा जय—शत्रूकडून वेलूळ घेतात—दच लोकांशीं लढाई—त्यांचीं ठाणीं घेतात—हैदर मद्रासेस पुनः येऊन पोहोंचतो—कूत साहेब चाकरी सोडतो—ब्राथवेत साहेबाचा पराजय—तेलिचरीस म्हैसुरकरांस मागें हटवितात—पश्चिमेच्या किनाऱ्यावर टिपूची रवानगी—पनियूनी येथें त्याचा पराजय—हैदर मरण पावतो—टिपू परत येतो—माथ्यू साहेब म्हैसुरावर स्वारी करितो—बेदनूर घेतो—आपण निर्भय आहों असें वेडेपणानें मानितो—टिपू पुन्हा येतो—बेदनूर माघारें घेतो—त्यानें केलेली लबाडी—मंगळूरचा वेढा—कर्नल फुलर्तन साहेब कूच करितो—टिपू सुलतान ह्याजबरोबर तह.

हैदराची करनाटकांत स्वारी. जुलै स. १७८०.

मद्रास इलाख्यावर ह्या वेळेस मोठें संकट आलें होतें. हैदर आपल्या अवाढव्य फौजेनिशीं करनाटकांत उतरत होता. ह्या कामाकरितां बहुत दिवसांपासून मोठी फौज जमवून तो तयारी करीत होता. निजामअल्ली व दुसरे मुसलमान राजे ह्यांस मदतीकरितां त्यानें बोलाविलें होतें. चोहोंकडून लोक त्याजपाशीं जमले होते. ते सर्व इंग्लिशांबरोबर लढण्यास उद्युक्त होते. कारण इंग्लिशांचा द्वेष सर्व करीत असत. ह्या सर्व गोष्टी हिंदुस्थानांत चोहोंकडे प्रसिद्ध असतांही मद्रास सरकारास कळल्या नाहींत. तें गाढ झोंपेंत होतें. त्या संकटाच्या परिहारार्थ त्याची कांहींच

मद्रासेंतील कामगारांची सुस्ती.

तयारी नव्हती. त्या संकटाबद्दल कोणी सूचनाही केली नाहीं. शत्रूच्या आंगावर जाण्याविषयीं शिकलेली फौज तयार करून ठेविली नव्हती. सर्वांतही विशेष गोष्ट अशी कीं तेथील कौन्सिलदारांत बंगाल्यांतल्याप्रमाणेंच मूर्खपणाचे तंटे होऊन दुफळी झाली होती.

मद्रासेच्या भोंवतालचीं खेडीं हैदरानें जाळलीं, त्यांचा धूर सेंत थामस मौंत येथून प्रत्यक्ष दृष्टीस पडला; हैदराच्या लोकांनीं पोर्तोनोवो लुटलें, व कांजीवरम त्याच्या हातीं गेलें, ही बातमी येऊन पोहोंचली. इतक्या गोष्टी झाल्या, तेव्हां त्यांस हैदर येतो हें खरें वाटलें.

हैदर मुलूख उजाड करितो.

नंतर सरकार जागृत झालें. त्यानें पैशाकरितां कलकत्त्यास लिहिलें, कांजीवरम शत्रूनें सोडून दिलें होतें तेथें सर हेक्टर मनरो ह्यास फौजेनिशीं पाठविलें, व कर्नल बेली फौज घेऊन गंठुरास जात होता त्यास परत बोलाविलें. ह्या गंठुराविषयीं निजामअल्लीबरोबर पुष्कळ वादविवाद झाले होते.

मद्रास सरकारचे वेडेपणाचे उपाय.

बेली साहेब कांजीवरम येथें मनरो साहेबास येऊन मिळण्याकरितां परत निघाला. पण ह्या उभयतांची गांठ पडण्यापूर्वीं बेली साहेबावर हल्ला करून त्याची मसलत फसविण्याचा हैदरानें बेत केला.

मनरो साहेबानें कर्नल फ्लेचर ह्यास १००० निवडक स्वारांनिशीं बेली साहेबाच्या मदतीस पाठविलें. मार्गांतील वाटाड्यांस हैदराकडून पगार मिळत होता, सबब त्यांनीं फ्लेचरच्या फौजेस भलत्या मार्गानें नेण्याचा उद्योग केला, पण ती न फसतां नेमलेल्या ठिकाणीं पोहोंचली.

मनरो साहेबाच्या छावणीपासून सुमारें ९ मैलांवर बेली साहेब होता. प्रातःकाळीं तो कूच करणार तों त्याच्या छावणीस टिपूच्या फौजेनें वेढा घातला. त्या फौजेनें त्यास पूर्वीं बहुत दिवसपर्यंत त्रास दिला होता. बेलीच्या फौजेवर तोफा सुरू झाल्या. त्या तोफा हिसकावून घेण्यासाठीं पुढें सरा, असा त्यानें एका टोळीस हुकूम केला. ती हुकुमाप्रमाणें पुढें गेली आणि मोठ्या शौर्यानें तिनें त्या तोफा घेतल्या. तेव्हां हजारों स्वार एकदम त्या टोळीभोंवतीं जमून त्यांनीं ती माघारी लावली; ती जाऊन आपल्या फौजेस मिळाली. ते स्वार हैदराच्या फौजेच्या आघाडीपैकीं होते. त्यांचें पायदळ व तोफखाना मागें होता. ते स्वार निघून गेल्यानंतर बेली साहेबाच्या फौजेवर ५० तोफा एकदम चालू झाल्या. त्याच्या फौजेनेंही तोफांचा मार चालविला होता; पण तोफा थोड्या व दारू गोळा अगदीं संपला. दारूच्या दोन पेट्यांस आग लागली. शिपाई लोकांचा गोंधळ होऊन गेला. ते मागें अगदीं पिछाडीवर जाऊन पडले. उगीच बंदूक भरावी व सोडावी; पण कोणावर सोडावी वगैरे त्यांस कांहीं सुचेनासें झालें. गोरी पलटण पुढें सरण्याविषयीं उद्युक्त होऊन आम्हांस पुढें न्या, आम्हांस पुढें न्या, असें म्हणत होती पण बेली साहेब नेईना. तो

कर्नल बेली साहेबाचा पराजय. ता० १० सप्तंबर स० १७८०.

अशा प्रसंगांत सांपडल्यामुळें फार श्रम होऊन अगदीं थकला. त्या योगानें त्याला कांहीं सुचेनासें झालें. तेव्हां तहाच्या निशाणासुद्धां आपल्या फौजेपुढें येऊन तुह्मीं शत्रूच्या स्वाधीन व्हावें, असा तीस त्यानें हुकूम केला.

जय मिळाल्याच्या योगानें अगदीं वेडे होऊन हैदराचे लोक इंग्लिशांची एवढीशी टोळी होती तींत घुसले, आणि पुढें येईल त्याचे तुकडे करावे, मग तो जखमी असो अथवा धट्टाखट्टा असो, हें पहायाचें नाहीं, असें त्यांनीं चालविलें.

हैदराच्या स्वारांचा क्रूरपणा.

शेवटीं ही कत्तल सरली, आणि थोडेसे लोक जिवंत राहिले होते त्यांस हैदराच्या छावणींत नेलें. तेथें तोही झालेल्या गोष्टीवरून मोठा आनंदीत होऊन कत्तल केली हा मोठा पराक्रम आपण केला, असा गर्व करीत होता.

ह्या गोष्टी ऐकून सर हेक्टर मनरो मद्रासेकडे निघून गेला. आपणास जलद जातां यावें ह्मणून त्यानें आपल्या तोफाही टाकून दिल्या. नंतर हैदरास प्रांत मोकळा सांपडला. त्यानें अर्काट व दुसरे कितीएक किल्ले घेऊन वेरुळास वेढा दिला.

मनरोसाहेब परततो.

बेली साहेबाच्या पराजयाची खबर मद्रासेंत लागतांच सर्व इंग्लिश लोक अत्यंत दुःखित झाले. सर्वांच्या मुद्रा भयभीत दिसूं लागल्या. पुढें होणाऱ्या दुःखाच्या सूचक चिन्हांवरून सर्वांचीं अंतःकरणें शोकाक्रांत झालीं. परंतु हेस्तिंग्स साहेबास हें वर्तमान कळतांच त्यानें जलदीनें सर्व गोष्टींची तयारी केली. ह्मणजे बावन दिवसांच्या आंत बंगाल्यांतील कमांदर इन् चीफ सर ऐर कूत साहेब ह्यास त्यानें जास्ती फौज देऊन मद्रासेस पाठविलें; खुष्कीच्या वाटेनें तेथें कांहीं फौज धाडण्याविषयीं हुकूम केला; जिकडून मिळेल तिकडून द्रव्य मिळविलें; मद्रासेंतील गवर्नरास सुस्तीबद्दल बरतर्फ केलें; आणि मराठ्यांशीं ऐक्य केलें. सारांश, ह्या प्रसंगीं तयारी करण्याकरितां जें त्याच्या हातून होण्यासारखें होतें तें सर्व त्यानें केलें.

मद्रासेंतील स्थिति.

हेस्तिंग्ससाहेबाची त्वरेची आणि धैर्याची वर्तणूक.

कूत साहेबानें मद्रासेस पोहोंचतांच लढाई सुरू केली नाहीं. तेथील फौजेची अगदीं दुर्दशा झाली होती, ह्मणून तिची संग्रामाविषयीं तयारी करण्याच्या कामांत प्रथमतः त्यानें कांहीं दिवस घातले. जानेवारीच्या १८ व्या तारखेस त्यानें शत्रूवर हत्यार धरिलें. हैदरापुढें टिकाव धरून जे किल्ले राहिले होते, त्यांजवर जास्ती कुमक पाठवून तेथला बंदोबस्त त्यानें प्रथम केला, आणि चिंगलपट येथें कुमक पाठविली. वांदिवाश येथें कूत साहेबाचा प्रथम संग्राम झाला. तो प्रकार असा कीं, वांदिवाश मुक्कामीं महंमद-

लढाईकारितां कूत साहेब लष्कराची तयारी करितो.

किल्ल्याचा बंदोबस्त.

अलीचा गवरनर होता त्यावर इदबार ठेवणें गैर असें वाटलें, तेव्हां लेफ्टनेंत फ्लिंत साहेबास तेथें पाठविलें. त्यानें मोठ्या पराक्रमानें ह्या शहराचा बचाव केला. नंतर पोंदेशरी परत घेण्याचा यत्न फ्रेंचांनीं केला होता, सबब कूत साहेब त्या शहरावर गेला. आणि तेथून कडलुरास जाऊन लढाई वगैरे कांहीं न करितां कांहीं दिवस स्वस्थ राहिला. कडलुरापासून १५ कोसांवर चिलंब्रम ह्मणून लहानसा किल्ला आहे, तो घेण्याकरितां त्यानें एक टोळी पाठविली होती, तिचा फार खराबा होऊन ती परत आली.

चिलंब्रम येथें पराजय. ता० १८ जून स० १७८१.

हैदराच्या स्वाऱ्या.

हैदरअली इंग्लिशांच्या फौजेच्या जवळ आला, असें फार दिवस झालें नव्हतें. तो दुसऱ्या ठिकाणीं जय मिळवीत होता. अंबूर, थियागड वगैरे बहुत किल्ले त्यानें घेतले होते. तंजावर हें शहर सोडून त्याजखालचा सर्व मुलूख त्यानें काबीज केला होता. चिलंब्रम ह्या ठिकाणीं इंग्लिशांचा पराजय झाल्यावरून आपण मागें फिरून पुन्हा इंग्लिशांस गांठावें असें त्यास वाटलें. तेव्हां तो कडलुराजवळ येऊन चांगल्या बंदोबस्ताच्या ठिकाणीं छावणी देऊन राहिला. हैदरास एकदां समोर गांठावें असें कूत साहेबाच्या मनांत होतेंच. तसा प्रसंग हा आपोआप आला. हैदरही आजपावेतों इंग्लिशांशीं लढण्याचा प्रसंग आला असतां निखालस टाळाटाळ करीत असे. परंतु ह्या वेळेस त्याच्याही मनांत त्यांच्याशीं तोंड देऊन लढण्याचें होतें.

तो इंग्लिशांजवळ येतो.

कूत साहेबाची तयारी.

आपणास जय मिळेल अशी कूत साहेबाची खातरी होती; तथापि पराजय झाला असतां निघून जाण्याची तजवीज असावी, ह्मणून आरमार अगदीं किनाऱ्याजवळ आणून ठेविलें होतें.

तारीख १ जुलई १७८१ रोजीं सकाळीं सात वाजतां कूत साहेबाची फौज लढाई करण्याकरितां छावणींतून बाहेर पडली, ती हैदराची फौज नजरेस पडेपर्यंत पुढें आली. हैदरानें फौज कडलुराच्या रस्त्यावर उभी केली होती. तिच्या डाव्या आंगास कांहीं अंतरावर समुद्र होता व उजव्या आंगास लहान लहान टेंकड्या होत्या. हैदरानें शिपाई लोकांच्या रांगेबरोबर तोफांची रांग लावली होती. आणि इंग्लिश ज्या ठिकाणाहून हल्ला करतील असें त्यास वाटलें होतें, त्या ठिकाणीं चोहोंकडून गोळे येऊन पडावे अशी तजवीज करून ठेविली होती. शत्रूंनीं आपल्या सैन्यांतील लोक कसकसे उभे केले होते, ह्याचा इंग्लिश जनरल सुमारें

पोर्टोनोवो येथील लढाई. तारीख १ जुलई सन १७८१.

एक तासपर्यंत पुरता शोध काढीत होता. तो हें करीत असतां त्याच्या सैन्यावर शत्रूकडचे लोक दुरून गोळ्यांचा भडिमार करीत होते; परंतु हा भडिमार फारसा झपाट्याचा नव्हता. त्यानें आपल्या लोकांस अशी आज्ञा केली होती कीं, शत्रूंनीं कितीही वर्षाव केला, तरी तुह्मीं त्यांवर एक सुद्धां गोळी टाकूं नये. शेवटीं कांहीं वेळानंतर पुढें काय करावयाचें ह्याविषयीं त्यानें आपला संकेत ठरविला. शत्रूकडचे लोकांस वाटत होतें कीं पुढें जें मैदान होतें त्यामध्यें इंग्लिश आले असतां ते आपल्याकडच्या सर्व तोफांच्या कचाट्यांत सांपडतील, आणि तेथें त्यांच्या सैन्याचा मोड झाला असतां त्यांच्यावर आपल्या स्वारांनीं चाल केली ह्मणजे त्यांत पुष्कळ नफा होईल. असा त्यांचा उद्देश आहे हें जाणून इंग्लिश जनरल ह्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले, आणि उजवेकडे फिरून तेथें जीं वाळूचीं टेंकाडें होतीं, त्यांच्या व समुद्राच्या मध्यें जी मोकळी जागा होती तींतून तो पुढें चालता झाला.

हैदरानेंही आपल्या सैन्याच्या आघाडीचा रोख सत्वर बदलला. त्याचा व इंग्लिश सैन्याच्या पहिल्या टोळीचा सामना त्या वाळूच्या टेंकड्यांमध्यें एक खिंड होती तेथें झाला. इंग्लिशांवर शत्रूंकडून गोळ्यांचा मार मोठ्या झपाट्यानें चालला असतां पलीकडे जें मैदान होतें त्यांत त्यांच्या पहिल्या टोळींतील लोक नीट व्यवस्थेनें उभे राहिले, आणि जें वाळवंट ते वलांडून गेले होते, त्यांत दुसरी टोळी येईपर्यंत ते त्या मैदानांत तसेच कांहीं न करतां धीर धरून उभे राहिले. त्यांचा जनरल सैन्यामधून घोड्यावर बसून फिरत होता; त्यानें त्यांस सांगितलें कीं, कांहीं वेळपर्यंत तुह्मी असाच धीर धरा, व एक सुद्धां गोळी सोडूं नका. इतक्यांत एक अदिकांप मोठ्या त्वरेनें घोडा उडवीत त्याजकडेस आला आणि त्यानें त्यास सांगितलें, कीं शत्रूंनीं सर्व वाळवंट आपल्या हस्तगत करून घेतलें. हें ऐकून इंग्लिश जनरल ह्यानें तोफा चालू कराव्या ह्मणून ताबडतोब हुकूम केला. त्याच्या लोकांनीं गोळ्यांचा असा सपाटा चालविला, कीं त्या भागांत जे शत्रूंकडचे लोक होते त्यांनीं लागलाच पळ काढला.

इकडे वाळवंटावर दुसरी टोळी मोठ्या निकरानें लढत होती. त्या टोळींतल्या लोकांनीं शत्रूंस अगदीं मागें हटविलें, आणि ज्या स्थानीं जाण्याचें त्यांच्या मनांत होतें तीं स्थानें आपल्या हस्तगत करून घेतलीं.

हैदरानें मग आपल्या घोडेस्वारांस चाल करावी ह्मणून हुकूम केला; परंतु इंग्लिशांच्या गोळ्यांच्या झपाट्यामुळें त्यांनीं चाल करण्यास जितके वेळां यत्न केला तितके वेळां तो सर्व निष्फळ झाला. थोडक्याच वेळांत हैदराच्या सैन्यांतील सर्व लोक संग्राम सोडून पळूं लागले. तेव्हां हैदर

एका टेंकडीवर बसून खालीं युद्ध चाललें होतें तें पाहत होता. आपल्या लोकांनीं पळ काढला ह्मणून त्यास जेव्हां कोणीं सांगितलें, तेव्हां त्यास तें खरें वाटेना; आणि ज्यानें हें सांगितलें त्याची तो निर्भर्त्सना करूं लागला; तो त्या जाग्यावरून कांहीं केल्यानें हालेना. शेवटीं त्याच्या प्रीतींतला एक चाकर होता तो त्याजवळ आला, आणि त्यानें त्याचे पाय घट्ट धरून त्याच्या पायांत बळेंच जोडा घातला आणि त्यास एका घोडयावर नेऊन बसविलें. त्या घोडयावर बसून हैदर समरांगणांतून त्वरेनें पळून गेला.

जयाचा परिणाम.

ह्या युद्धांत इंग्लिशांचा जय झाला, हा त्यांस फार उपयोगीं पडला; ह्यामुळें लोकांस त्यांची दहशत पूर्ववत् वाटूं लागली. करनल बेली ह्याचा पराजय झाल्यामुळें लोकांत इंग्लिशांविषयीं वाईट मत झालें होतें, तें अगदीं बदललें; आणि हैदरास आपला जय होईल ह्मणून जी आशा होती ती समूळ नाहींशी झाली.

बंगालच्या सैन्याचा मिलाफ. आगस्त स. १७८१.

टिपू वांदिवाश किल्ला घेण्याकरितां झटत होता; इतक्यांत त्यास ही बातमी कळली ह्मणून तो आपल्या बापास जाऊन मिळाला. इकडे हैदर, सर ऐरकूत ह्याचा आणि बंगाल्याहून नवी पलटण येणार होती तिचा संयोग होऊं नये ह्मणून यत्न करीत होता. परंतु सर ऐरकूत ह्यानें ज्या रस्त्यानें सैन्य कधींच गेलें नाहीं, असा जो पलीकत तळ्याच्या पूर्वेकडचा रस्ता, त्यानें कूच केलें, आणि ज्या ठिकाणीं हैदराचें सैन्य होतें तेथें न येतां आपला उद्देश सिद्धीस नेला.

कपतान पियर्स बंगाल्याहून येतो.

ह्या नव्या पलटणीचा मुख्य अंमलदार कपतान पियर्स हा कलकत्त्याहून येतांना ज्या मुलखांतून आला, त्याविषयीं माहिती त्यास फारच थोडी होती, व तेथील लोकांच्या मनांत इंग्लिशांबरोबर वैरभाव आरंभण्याचा बराच कल होता. असें असतांही तो तेथून मोठया चतुराईनें आला.

पालीलोर येथें दुसरी लढाई.

ही पलटण येऊन पोहोंचल्यावर सर ऐरकूत हा वाटेंत त्रिपासोर शहर घेऊन, अरकाट व वेलूर ह्या शहरांकडे परत गेला. त्यास अडवावें ह्मणून हैदरानें आपलें सैन्य त्याच्या सन्निध नेलें, आणि ज्या ठिकाणीं एक वर्षापूर्वी त्यानें करनल बेली ह्याचा पराजय करून त्याच्या सैन्याचा भयंकर रीतीनें विध्वंस केला होता, त्याच ठिकाणीं त्यानें पुनः इंग्लिशांस लढाई दिली. मागच्या लढाईंत जे रणांत मरून पडले होते त्यांपैकीं पुष्कळांच्या आस्थि अद्याप तशाच जमिनीवर पडल्या होत्या. ज्यांनीं हा अघोर व निष्कारण अनर्थ केला होता त्यांच्या बरोबर लढण्यास जात असतां त्यांच्या देशबं-

धूंस त्यां अस्थि तुडवीत जावें लागलें, यामुळें त्यांस मनस्वीच दुःख झालें.

ह्या लढाईत माझाच जय झाला असें हैदर बोलूं लागला; परंतु वास्तविक पाहतां जरी पूर्ण जय कोणत्याही पक्षास मिळाला नव्हता, तरी इंग्लिशांनीं शत्रूंस रणांतून मागें हटविलें आणि तेथेंच डेरे देऊन आपली छावणी केली.

शोलिंगगडची लढाई. ता० २७ सप्टेंबर स. १७८१.

पुढें लागलीच सप्तेंबरच्या २७ व्या तारिखेस वेलूरनजीक शोलिंगगड ह्मणून एक टेंकडी आहे तेथें दुसरी लढाई झाली. ह्या प्रसंगीं हैदरास इंग्लिशांनीं एकाएकींच जाऊन गांठलें. त्यानें कांहीं वेळपर्यंत चांगला टिकाव धरिला; परंतु उत्तरोत्तर आपण दुर्बळ होत चाललों असें पाहून त्यानें आपल्या निवडक स्वारांस चाल करावी ह्मणून हुकूम केला. जरी हे स्वार, जेव्हां जेव्हां चाल करीत तेव्हां तेव्हां त्यांचा पराभव होई, तरी हैदर त्यांस पुनः पुनः चाल करावी ह्मणून हुकूम करी; ह्यांत त्याचा इतकाच उद्देश होता कीं, इकडे शत्रूस आपल्या स्वारांबरोबर लढण्यांत गुंतविलें असतां आपल्या तोफखान्याकडील लोकांस रणांतून परत जाण्यास चांगली सवड सांपडेल. ह्या लढाईत हैदराकडचे लोक पांच हजारांवर पडले व इंग्लिशांकडचे सुमारें १०० पडले.

ह्या प्रसंगीं मद्रासेंतील २० व्या काळ्या पलटणीच्या लोकांनीं चांगला पराक्रम केला. त्यांच्या पराक्रमाची आठवण रहावी ह्मणून अद्यापि त्यांच्या निशाणावर "शोलिंगगड" अशीं अक्षरें असतात.

वेलूर मोकळें करतो.

हैदरानें वेलूर शहरास वेढा घातला होता व त्या शहरांत दुष्काळ पाडून तेथील लोकांस अगदीं जर्जर केलें होतें. हा वेढा, सर ऐरकूत ह्याचा जय झाल्यामुळें, त्यास सहज उठवितां आला. पुढें लागलाच कांहीं दिवसपर्यंत सर ऐरकूत मद्रासेंत जाऊन राहिला.

डच लोकांबरोबर लढाई.

ह्याच मोहिमेंत इंग्लिशांची व डच लोकांची लढाई चालू झाली; हिंदुस्थानांत जीं डच लोकांचीं संस्थानें होतीं तीं इंग्लिशांनीं घेतलीं; सद्रस आणि पलीकत हीं ठाणीं लागलींच त्यांच्या हस्तगत झालीं; आणि समुद्रांत जें त्यांचें आरमार होतें त्यांतील लोकांनीं, व जमिनीवर जें त्यांचें सैन्य सर हेक्टर मनरो ह्याच्या हाताखालीं होतें त्यानें जेव्हां निगापट्टणावर बराच गोळ्यांचा वर्षाव केला, तेव्हां तेंही त्यांच्या हस्तगत झालें.

पुढल्या वर्षी लागलेंच इंग्लिशांनीं हैदराबरोबर पुनः युद्ध चालू केलें. सर ऐरकूत जरी आतां उतारवयामुळें व आजारामुळें अगदीं श-

हैदराबरोबर पुनः लढाई. जानेवारी स.१७८२.

फ्रेंच लोक हैदरास मिळतात.

क्तिहीन झाला होता, तरी इंग्लिश सैन्याचें आधिपत्य तोच करीत होता. इंग्लिशांचा व फ्रेंचांचा फार दिवसांपासून कलह चालला होता; ह्यामुळें फ्रान्स देशाहून हैदरास कुमक करण्यास्तव कांहीं सैन्य आलें होतें. ह्या सैन्याचा मुख्य अम्मलदार बुशी नामें सरदार होता. हा तीस वर्षांपूर्वी ह्या देशांत आला होता, त्या काळीं त्यानें येथें मोठालें पराक्रम केले होते, परंतु आतां त्याच्या आंगांत तादृश कुवत राहिली नव्हती.

ह्या मोहिमेंत हैदरानें प्रारंभींच कडलूर शहर घेतलें. पुढें तो वांदिवाश किल्ल्यास वेढा घालूं लागला; परंतु पूर्वी सर ऐरकूत ह्यानें तीन वेळां वेढे उठविले होते, त्याप्रमाणें त्यानें हाही वेढा उठविला. मग टिपू अरणी शहर लुटावें ह्या हेतूनें त्या शहराकडे गेला; परंतु तेथें जी लढाई झाली तींत त्याचा पराभव झाला. पुढें थोडक्याच दिवसांनीं सर ऐर कूत मद्रासेस परत गेला. त्याचे सैन्यांतील पुष्कळ लोक आजारी पडून मेले, ह्यास्तव त्याचें सैन्य अगदीं कमी झालें होतें व तो स्वतांही फारच हलक झाला होता. मद्रासेंत येऊन पोहोंचल्यावर थोडेच दिवसांनीं तो मरण पावला.

सर ऐर कूत विश्रांति घेतो.

हा सरदार निवर्तल्यावर त्याच्या हाताखालीं जे शिपाई होते ते कैक वर्षेपर्यंत त्याचे गुण आठवून त्यास अत्यंत पूज्य मानीत असत; हें सर ऐर कूत ह्याच्या कीर्तीस एक मोठें भूषणच आहे, व ह्यावरून त्यानें मोठालें पराक्रम करून किती कीर्ति मिळविली हें ध्यानांत येईल.

डच लोकांपासून इंग्लिशांनीं निगापट्टण शहर घेतल्यावर त्या शहरावर जें सैन्य पाठविलें होतें त्यापैकीं त्यांनीं कित्येक लोकांस करनल ब्राथवेत ह्याच्या हाताखालीं देऊन तंजावर येथें पाठविलें. कांहीं दिवसपर्यंत ह्या लोकांनीं शत्रूबरोबर चांगलें युद्ध केलें व त्यामुळें इंग्लिशांस बराच नफा झाला; परंतु ह्या स्वारीचा शेवट वाईट झाला. एके दिवशीं करनल ब्राथवेत ह्यानें एके मैदानांत छावणी केली होती; त्या वेळीं त्याजवळ नुसते २००० लोक होते, ह्यामुळें त्यास चिंता पडली; कारण कीं टिपू आपल्याबरोबर पुष्कळ सैन्य घेऊन त्याचा शोध करीत फिरत आहे असें त्यास माहीत होतें. परंतु येथें राहिलें असतां कांहीं एक धोका नाहीं, असें त्याच्या वाटाड्यांनीं सांगितल्यावरून तो तेथें निःशंकपणें राहिला. पुढें संकट येणार आहे असें जरी त्यास कोणीं सुचविलें, तरी जी जागा त्याच्या पसंतीस येऊन जेथें छावणी केली

करनल ब्राथवेतची स्वारी. ता० १६ फेब्रुवारी. स० १७८२.

होती त्या जाग्यावरून तो हालेना; आणि शत्रूकडील हजारों लोक येऊन त्याच्या सैन्याभोंवताले प्रत्यक्ष उभे राहत तोंपर्यंत तो तेथें तसाच निर्धास्त राहिला. त्याच्याजवळ जे थोडेसे लोक होते त्यांनीं मोठ्या शूरपणानें युद्ध करून दोन दिवसपर्यंत शत्रूचें कांहींच चालूं दिलें नाहीं. ते चौकोनी बुरूज बांधून उभे राहिले, आणि त्यांच्यामध्यें फाटाफूट करावी ह्मणून जेव्हां जेव्हां शत्रु त्यांच्यावर चाल करून येत, तेव्हां तेव्हां ते त्यांचा पराभव करून त्यांस मागें हटवीत. परंतु शत्रूचा समुदाय मोठा असल्यामुळें त्यांचें कांहीं चालेनासें झालें, आणि शेवटीं फ्रेंच लोकांनीं पुढारी होऊन जो त्यांच्यावर हल्ला केला त्यांत त्यांचा मोड झाला. त्यांच्यावर आतां मोठा कठीण प्रसंग येऊन गुजरला; कारण कीं, पूर्वीं करनल बेली ह्याच्या सैन्याचा परांबाकम एथें पराभव झाला, तेव्हां त्याच्या सैन्याची कत्तल उडवून जसे शत्रूंनीं अघोर अनर्थ केले होते, त्याप्रमाणेंच आतां येथें होऊं लागले. करनल ब्राथवेत ह्याच्या टोळीचा मोड होतांच शत्रूंनीं त्याच्या सैन्यांत शिरून कत्तल करण्यास प्रारंभ केला; परंतु शत्रूंकडेस जे फ्रेंच सरदार होते त्यांनीं मध्यस्थी करून कत्तल बंद केली. ह्या फ्रेंच सरदारांच्या आचरणांत, व ज्या क्रूर, निष्ठुर व अविचारी लोकांस ते साह्य करण्यास आले होते, त्या लोकांच्या आचरणांत फारच भेद दिसून आला.

त्याचा पराजय.

पश्चिम भागीं तेलिचरी येथें इंग्लिशांचें कांहीं सैन्य होतें. त्याच्यावर हैदर दोन वर्षे एकसारखे हल्ले करीत होता; परंतु त्या लोकांनीं मोठ्या शूरपणानें शत्रूंचें कांहीं चालूं न देतां आपला बचाव केला होता. त्या लोकांस कुमक करावी ह्यास्तव मेजर आबिंगतन ह्याच्या हाताखालीं कांहीं सैन्य देऊन त्यास तेलिचरी एथें पाठविलें होतें. ज्या दिवशीं इकडे करनल ब्राथवेत ह्याच्या सैन्याची शत्रूंनीं कत्तल केली त्याच दिवशीं त्यानें पश्चिम भागांत जें शत्रूंचें सैन्य होतें त्याचा पराभव केला.

पश्चिम किनाऱ्यावरील प्रकार.

ही बातमी हैदरास कळतांच त्यानें आपल्या सैन्यास कुमक करण्याकरितां टिपूस तिकडे रवाना केलें. ज्या वेळीं टिपू तेथें जाऊन पोहोंचला, त्या वेळीं करनल हम्बरस्तोन हा आपल्याबरोबर कुमक घेऊन मेजर आबिंगतन ह्यास जाऊन मिळाला होता, व तेथें जें सैन्य होतें त्याचें आधिपत्य घेऊन पालघाट ह्यास वेढा घालण्यास जात होता. त्याची व टिपूची पानियानी येथें गांठ पडली; तेव्हां टिपूनें इंग्लिश सैन्याच्या ज्या तोंडावर बंदोबस्त कमी आहे असें त्यास वाटत होतें, त्या तोंडावर रात्री-

पानियानी एथील लढाई. ता०२९ नव्हेंबर स० १७८२.

त्या प्रहरीं हल्ला केला, तेव्हां त्याच्या सैन्यांतील पुष्कळ लोक मरून त्याचा पराजय झाला.

टिपू इकडे असतां हैदरअली मरण पावला. त्याचे जे मुख्य सरदार होते त्यांनीं टिपू परत येईपर्यंत हैदर मेला ही बातमी होईल तितका यत्न करून गुप्त ठेवावी असा निश्चय केला. त्यांनीं ह्या मजकुराविषयीं बातमी टिपूस पाठविली आणि हैदर जिवंत असतां जसा कारभार चालत असे त्याप्रमाणें ते चालवूं लागले. हैदराचें प्रेत कुजूं नये ह्मणून त्यांनीं त्यांत मसाला घातला; आणि जेव्हां त्याचें सैन्य कूच करीत असे, तेव्हां ते त्या प्रेतास एके पालखींत बसवीत व त्या पालखीचे पडदे सोडून ती पालखी सैन्याच्या अग्रभागीं चालवीत; जसा काय हैदर अद्यापि जिवंत आहे, परंतु फार आजारी मात्र आहे. ही गोष्ट गुप्त न राहिल्यामुळें एकदां लोकांनीं बंड करण्याविषयीं यत्न केला, परंतु त्यांनीं तें बंड लागलेंच दाबून टाकलें.

*हैदराचा मृत्यु, ता० ७ डिसेंबर स. १७८२.*

कांहीं रीतीनें हैदर मेला ही बातमी इंग्लिशांस कळल्यावरून त्यांनीं आपल्या सैन्याचा अधिपति जनरल स्तुअर्त, ह्यास ही सवड सांपडली होती ती साधण्याविषयीं निकड लाविली; परंतु त्यानें आळसानें स्वस्थ बसून जी संधी आली होती ती घालविली; तथापि पुढें त्यानें कडलूरास वेढा घातला. हें शहर त्या वेळीं फ्रेंच लोकांच्या ताब्यांत होतें. जनरल स्तुअर्त ह्यास ह्या कामांत यश प्राप्त होईल असें वाटत होतें; कारण कीं त्यानें त्या वेढयाचें काम चांगल्या रीतीनें चालविलें होतें. परंतु पुढें इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्या मध्यें तह झाल्याची बातमी विलायतेहून आल्यावरून त्यानें जें हें अवेळीं काम आरंभिलें होतें तें त्यास सोडून द्यावें लागलें.

*इंग्लिशांची सुस्ती.*

इकडे हैदर मरण पावला, ही बातमी टिपूस कळतांच तो पश्चिम भागांतून सत्वर निघून चितूर येथें येऊन दाखल झाला. तेव्हां त्यास राज्याभिषेक झाला व हैदराच्या सर्व सैन्याचा अधिकार मिळाला.

*टिपू आपल्या बापाच्या गादीवर बसतो. डिसेंबर सन १७८२.*

टिपू राज्यावर बसतांच इंग्लिशांनीं मलबार येथें युद्ध चालविलें होतें तें पुनः चालू केलें. त्यांचें पानियानी येथें सैन्य होतें, तें त्यांनीं मरजी नामें एक किल्ला आहे, तेथें नेऊन ठेविलें आणि त्यास कुमक करण्यास्तव मुंबईहून नव्या पलटणी आणविल्या. ह्या सर्व सैन्याचा मुख्य अधिकार जनरल माथ्यू ह्यास देऊन, एकदम पुढें चालतें व्हावें, असा त्यांनीं त्यास हुकूम केला.

*पश्चिम किनाऱ्यावर पुन्हा लढाईची सुरवात.*

पश्चिमेकडून म्हैसूरच्या राज्यावर हल्ला करण्यास दोन वाटा आहेत. एक पालघाटानजीकच्या टेंकडयांमध्यें जी खिंड आहे तींतून आहे; ही वाट कोईमतूर येथें जाते. हें शहर त्या वेळीं टिपूकडेस होतें. दुसरी वाट म्हैसूराच्या व समुद्राच्या मध्यें जे पर्वत आहेत त्या पर्वतांतील एके खिंडींतून आहे. ह्या वाटेनें इंग्लिशांनीं टिपूच्या राज्यांत प्रवेश केला; आणि त्याचें सैन्य हसेंघेरीच्या घाटापर्यंत येऊन पोहोंचलें. तेथें आल्यावर त्यांनीं होनोरचा किल्ला घेतला. घाटांतून येतांना त्यांस पुष्कळ ठिकाणीं शत्रूंनीं प्रतिबंध केला व त्यांस दुसऱ्या अनेक प्रकारच्या अडचणी आल्या; परंतु त्यांच्या सैन्यांतील लोक, मोठया धैर्यानें त्या सर्व दूर करून, घाटपार निघून आले; आणि शेवटीं त्यांनीं म्हैसूरचें त्या प्रांतांतील मुख्य शहर बेदनूर घेतलें. इंग्लिशांनीं हें शहर घेतलें ह्यामुळें त्यांचें सर्व कार्य झालें असें नाहीं; कारण कीं, टिपू त्या भागांत आपलें सर्व सैन्य घेऊन फिरत होता.

म्हैसूरच्या राज्यावर पश्चिमेकडून हल्ला. जानेवारी सन १७८३.

परंतु जनरल माथ्यू ह्याच्या हें लक्षांत आलें नाहीं. पुढें तो तसाच कांहीं न करितां बेदनूर शहरांत स्वस्थ राहिला, आणि ज्या चांगल्या पलटणी होत्या त्या त्यानें परत पाठवून दिल्या. टिपू कोणते ठिकाणीं होता व काय करीत होता ह्याविषयीं त्यानें बराबर शोध ठेविला नाहीं, हा त्याजकडे मोठा दोष आहे.

बेदनूर येथें जनरल माथ्यू साहेबाची सुस्ती.

टिपूनें कांहीं दिवस असेच जाऊं दिले, आणि मग जनरल माथ्यू साहेब निःशंकपणें बेदनूर येथें स्वस्थ राहिला असतां एके दिवशीं प्रातःकाळीं टिपूनें एकाएकींच येऊन त्या शहरास वेढा घातला; आणि नदीचें तोंड होतें तेथें आपले सर्व लोक सत्वर नेऊन उभे केले. ह्यामुळें आंत जे इंग्लिश लोक होते ते सर्व मोठया संकटांत पडले. टिपूनें त्या शहरांतून पलीकडे जाण्यास जे मार्ग होते ते बंद करून टाकले, आणि रखवालीस जे शिबंदीचे लोक होते त्यांस हस्तगत करून घेतलें. नंतर त्यानें तहाविषयीं बोलणें आरंभिलें. त्यानें ठरविलेलीं कलमें इंग्लिशांस अनुकूल होतीं, म्हणून आंत लोक होते त्यांनीं टिपूचें बोलणें मान्य केलें; परंतु टिपू पुढें आपल्या वचनाप्रमाणें वर्तला नाहीं. जे इंग्लिश लोक त्याच्या हातीं लागले त्यांस त्यानें पुष्कळ दिवसपर्यंत एका भयानक व आंधारे बंदिशाळेंत नेऊन ठेविलें. ह्या बिचाऱ्यांपैकीं कित्येकांनीं विष पिऊन व कित्येकांनीं तरवारीनें माना तोडून आपला अंत करून घेतला.

टिपू पुन्हा बेदनूर घेतो. ता० २० जानुआरी स. १७८४.

मंगळुराचें मोठ्या पराक्रमानें रक्षण. ता० २३ मे सन १७८३—ता. २३ जानेवारी सन १७८४.

टिपूनें बेदनूर घेतल्यावर तो पुढें मंगळूराकडे चालता झाला. ह्या ठिकाणीं जनरल माथ्यू ह्याचें बाकीचें सैन्य होतें. ह्या किल्ल्याच्या भिंती अगदीं मोडकळीस आल्या होत्या. तथापि आंत जे थोडेसे लोक करनल क्यांपबेल ह्याच्या हाताखालीं होते, त्यांनीं मोठा पराक्रम करून त्या किल्ल्याचा बचाव केला. हा किल्ला घेण्याविषयीं टिपूनें पुष्कळ यत्न केला, परंतु तो सर्व निष्फळ झाला.

टिपूबरोबर थोडे दिवस तह होतो.

टिपू मंगळुरसंबंधीं आपलें वचन मोडतो.

इंग्लंद व फ्रान्स ह्या देशांच्यामध्यें तह झाल्याची बातमी टिपूस कळलीच होती. हा तह झाल्यामुळें त्यास जें फ्रेंच लोकांचें साह्य होतें तें नाहींसें झालें; ह्यास्तव कांहीं दिवसपर्यंत तह करण्याविषयींचें इंग्लिशांचें बोलणें टिपूस कबूल करावें लागलें. ह्या तहांत कलमें ठरलीं त्यांत हें एक होतें कीं, मंगळूरच्या किल्ल्यांत जे इंग्लिशांचे लोक होते त्यांस जितकें अन्न लागेल तितकें टिपूनें पुरवावें. ह्या कलमाच्या वास्तविक अर्थाप्रमाणें टिपू वागला नाहीं. त्यानें अन्न पाठविलें, तें अगदीं वाईट होतें, व उभय पक्षांमध्यें तह झाला होता तरी त्यानें किल्ल्यास वेढा घालण्याचें काम चालविलेंच होतें. किल्ल्यांत दुष्काळ पडल्यामुळें आंत ज्या इंग्लिश लोकांनीं कित्येक महिनेपर्यंत पराक्रम करून टिपूचें कांहींच चालूं दिलें नव्हतें त्यांस किल्ला सोडून देणें प्राप्त झालें.

करनल फुलरतन साहेबाचा कूच.

इंग्लिशांमध्यें व टिपूमध्यें पुनः तहाविषयीं बोलणें होऊं लागलें; परंतु टिपू गर्वानें फारच चढला होता, ह्मणून तो भलभलत्याच अटी धरूं लागला; ह्यामुळें कोणतेंही एक कलम ठरेना. टिपूबरोबर युद्ध चालविण्यास इंग्लिशांचें कांहीं सैन्य तयार होतेंच. ह्या सैन्याचा मुख्य अम्मलदार करनल फुलरतन ह्यास मद्रासेहून भिन्न भिन्न प्रकारचे एकमेकांस विरुद्ध असे अनेक हुकूम आल्यावरून काय करावें ह्याविषयीं त्याचा अगदीं घोटाळा झाला होता; परंतु शेवटीं त्यास योग्य दिसेल त्याप्रमाणें करण्याची परवानगी मिळाली. असा हुकूम येतांच तो बेधडक त्या भागांत जो डोंगराळ मुलूख आहे त्यांतून मोठमोठाल्या मजला करीत पुढें चालता झाला. त्याचा उद्देश होता कीं, मंगळुराजवळ जनरल माकलीआद ह्याचें सैन्य होतें त्यास जाऊन मिळावें. इकडे जात असतां वाटेंत त्यास तह झाल्याची बातमी कळली. ह्यामुळें त्यानें आपला बेत

फिरविला. पालघाट व कोईमतूर ह्यांजकडे परत येऊन त्यानें दोन्हीं स्थानें घेतलीं. टिपूनें मंगळूर किल्ल्याविषयीं जो विश्वासघात केला होता, त्याबद्दल त्याचा सूड उगविण्यास तो श्रीरंगपट्टणावर जाण्याची तयारी करीत होता; तों त्यास हुकूम आला कीं, टिपूबरोबर तह झाला आहे, यास्तव तुम्हीं युद्ध बंद करावें. ह्या तहांत जे ठराव झाले होते, त्यांपैकीं एक असा होता कीं, लढाई चालू असतां एकमेकांस एकमेकांचें जें काय मिळेल तें ज्याचें त्यास परत करावें. हा तह दोन्ही पक्षांचे साह्यकारी लोकांसही लागू होता.

टिपूबरोबर मंगळूर येथें तह. ता० ११ मार्च स. १७८४.

**आठवा भाग समाप्त.**

# भाग नववा.

## बंगाल्यांत हेस्टिंग्स साहेबाच्या कारकीर्दीची अखेरी, आणि टिपू सुलतान ह्याजबरोबर लढाई.

सन १७८१ पासून सन १७९२ पर्यंत झालेलीं वर्तमानें.

लढाईच्या सामग्रीची तयारी करण्यास पैसा कोठून मिळवावा ह्याविषयीं इंग्लिशांस चिंता पडते—ते काशीच्या राजावर पैशाची मागणी करतात—वारन हेस्टिंग्स राजास भेटण्यास स्वतः काशीस जातो—तो चेतसिंग ह्यास कैद करतो—त्यावर काशीचे लोक बंड करतात—राजा कैदेंतून सुटून पळून जातो—वारन हेस्टिंग्स ह्याजवर अतिशय संकट येतें—चेतसिंग बंड करितो व त्याचा पराभव होतो—काशीचे गादीवर नवा राजा बसतो—इंग्लिश अयोध्येच्या नवाबावर पैशाची मागणी करितात—नवाबाजवळ पैसा नसल्यामुळें ते बेगमांपासून पैसा घेतात—हेस्टिंग्सच्या कारकीर्दीची अखेरी—तो विलायतेस जातो व तेथें त्याची चौकशी होते—त्यानें हिंदुस्थानांत कोणत्या प्रकारें कारभार केला तो—हिंदुस्थानाच्या राज्यांत फेरफार होतो—ह्या प्रकरणीं फाक्स व पिट् ह्यांचीं मतें—लार्ड कार्नवालीस गवर्नर जनरल होऊन हिंदुस्थानांत येतो—टिपू युद्धाची तयारी करितो—तो मलबार येथें जे नायर लोक होते त्यांस गांजतो—त्रावणकोरच्या राज्यामध्यें व म्हैसूरच्या राज्यामध्यें जी भिंत होती तीवर तो हल्ला करितो—त्याचा पराभव होतो—तो तेथून मोठ्या संकटानें पार पडतो—इंग्लिश लोक लढाईची तयारी करितात—टिपू त्रावणकोरच्या राज्यांत स्वारी करितो व श्रीरंगपट्टणास परत येतो—इंग्लिश लोक लढाई चालू करितात—ते टिपूचा पाठलाग करीत फिरतात—लार्ड कार्नवालीस मद्रासेस येतो—तो श्रीरंगपट्टणावर हल्ला करितो—इंग्लिश लोकांचें सैन्य रणांतून मागें हटतें—पश्चिम भागांत लढाई चालू होती तीविषयीं—लार्ड कार्नवालीस नंदीदुर्ग व दुसरे डोंगरी किल्ले घेतो—तो पुनः श्रीरंगपट्टणावर हल्ला करितो—तो त्या शहरास वेढा घालितो—तो टिपूबरोबर तह करण्याचीं कलमें ठरवितो—टिपू हीं कलमें मान्य करितो.

मागच्या प्रकरणांत ज्या लढाईविषयीं सांगितलें आहे तींत इंग्लिशांस खर्च पुष्कळ झाला, ह्यामुळें गवर्नर जनरल ह्यास चिंता उत्पन्न झाली कीं, आतां आपणास पुढें लढाई चालविणें आहे, तर ती आपणास यशस्कर व फलदायक होण्यास सामग्रीची तयारी चांगली पाहिजे; ती करण्यास पैसा कोणत्या द्वारें मिळवावा? त्याच्या ताब्यांत जीं संस्थानें होतीं, तेथील

राजांनीं द्रव्याचा पुरवठा करावा ह्मणून त्यानें त्या सर्व राजांस विनंती केली. तसेंच काशीचा राजा चेतसिंग ह्यासही त्यानें ह्याबद्दल विनंती केली. मागें जेव्हां सर्व देशांत फळ्या होऊन दंगा झाला होता, त्या वेळीं बंगाला येथील कौन्सिलांत बहुमतानें ठरल्यावरून ह्या राजाचीं संस्थानें कंपनी सरकारानें आपल्या ताब्यांत घेतलीं होतीं; परंतु मी कंपनी सरकारास दरवर्षास अमुक रकम पोहोंचवीत जाईन असें त्यानें कबूल केल्यावरून त्याचीं संस्थानें पुन्हा त्यास परत दिलीं होतीं. पुढें जेव्हां लढाई चालू झाली, तेव्हां त्या राजाजवळ जास्ती पैसा मागण्याची जरूर कंपनी सरकारास पडल्यावरून वारन हेस्तिंग्स ह्यानें त्यावर पैशाची मागणी केली; व तेव्हांपासून वारन हेस्तिंग्स, त्या राजाजवळ हा पैसा दरवर्षास मागत होता; परंतु त्या राजानें त्याच्या मागण्याप्रमाणें पैसा दिला नाहीं. इंग्लिश सरकारास पैशाची तर फारच जरूर पडली होती, आणि ह्या राजाजवळ पैसा पुष्कळ आहे असें त्यांस वाटत होतें. कांहीं दिवसांपूर्वीं ह्या राजानें एके प्रकरणांत कौन्सिलाकडचा पक्ष धरून वारन हेस्तिंग्स ह्याचें मन दुखविलें होतें, ह्यामुळें तो त्या राजाची अप्रतिष्ठा करण्याची संधी पाहतच होता. त्यानें त्या राजाजवळ कांहीं घोडेस्वार मागितले, ते देण्याची त्यानें पुष्कळ टाळाटाळ केल्यावर शेवटीं कबूल केलें. नंतर तो त्या राजाजवळ आणखी जास्ती पैसा मागूं लागला, तो मी देत नाहीं असें राजानें सांगितल्यावरून गवर्नर जनरल ह्यानें त्याच्यावर तो दोष ठेवून असें ठरविलें कीं, राजानें दंड द्यावा, हा दंड न देण्याविषयीं राजानें पुष्कळ यत्न केला, परंतु वारन हेस्तिंग्स ह्यानें निश्चय केला होता कीं, ठराव झाला आहे तो मी शेवटास नेईन.

वारन हेस्तिंग्स साहेब चेतसिंगास भेटण्याकरितां काशीस जातो. ता० १४ आगस्ट सन १७८२.

तो राजास स्वतः भेटून आपलें ह्मणणें त्याजकडून कबूल करवावें, ह्या हेतूनें काशीस गेला. चेतसिंग त्यास गांवाबाहेर सामोरा आला आणि त्याची अतिलीनतेनें प्रार्थना करून ह्मणाला कीं, सर्वापराधांची क्षमा असावी व मजबरोबर पुन्हा पूर्ववत् स्नेहभाव ठेवावा. परतु वारन हेस्तिंग्स काशीस जाऊन पोहोंचल्यावर लागलीच दुसऱ्या दिवशीं राजाची वृत्ति बदलली. हें पाहून त्यास मनस्वी क्रोध आला, आणि राजास वाड्यांत जाऊन कैद करावें असा त्यानें आपले लोकांस हुकूम केला. त्याच्या हुकुमाप्रमाणें त्यांनीं राजास कैद केलें. त्या वेळीं कोणींही प्रतिबंध किंवा दंगा केला नाहीं. गवर्नर जनरल साहेबाबरोबर जे शिपाई लोक आले होते ते अगदीं थोडे होते. त्यानें ज्या दोन टोळ्या राजास

चेतसिंगास कैद करितो. ता० १६ आगस्ट सन १७८२.

कैद करण्याकरितां पाठविल्या होत्या त्यांतील लोकांनीं विसरून आपल्याबरोबर दारूगोळा नेला नव्हता.

राजास कैद केलें, ही बातमी लागलीच सर्व शहरभर पसरली. त्या वेळीं ह्या क्षेत्रांत हिंदुस्थानांतील सर्व देशांतून संन्यासी, ब्राह्मण इत्यादि अनेक प्रकारचे यात्रेकरू असले होते, त्यांस हें कळतांच त्यांचीं मनें क्रोधानें अगदीं खवळून गेलीं. त्या सर्वांनीं एकत्र होऊन बंड केलें, आणि राजवाडयावर हल्ला करून तो घेतला, व आंत शिरून तेथें जे शिपाई लोक होते त्यांची कत्तल उडविली. राजवाडयांत जे इंग्लिश सरदार होते, ते जोंपर्यंत त्यांच्या आंगांत तरवार धरण्याची शक्ति होती तोंपर्यंत लढत होते.

*काशीस बंड होतें. आगस्ट स. १७८२.*

परंतु त्यांसही ह्या लोकांनीं बलहीन करून आपल्या हस्तगत करून घेतलें आणि राजास बंदापासून मुक्त केलें. राजानें कडयांत दंगा चालला असतांच आपली सुटका करून घेतली आणि तो काशींतून पळून भागीरथी उतरून पार गेला. जेव्हां तो जाऊं लागला तेव्हां त्यास सुखरूप पोहोंचवावें म्हणून त्याचे संगतीं जे त्याचे लोक आले होते, त्यांनीं त्या काठची दरड फार उंच होती, ह्यास्तव आपल्या पागोटयांचा दोर करून बांधला आणि त्या दोरावरून राजास खालीं उतरविलें.

*राजाची सुटका व तो पळून जातो.*

इकडे वारन हेस्टिंग्स ह्याजवर मोठा आणीबाणीचा प्रसंग येऊन गुजरला. तो ज्या शहरांत होता तेथील सर्व लोक अगदीं खवळून गेले होते. त्यास सैन्यबळ तर अगदींच नव्हतें. त्याजवळ थोडेसे इंग्लिश लोक व कांहीं पहारेकरी शिपाई इतकेच मात्र होते. ह्यामुळें तो तेथून जिवंत परत जाईल असा संभव सुद्धां नव्हता. असें असतांही वारन हेस्टिंग्स ह्यानें धीर न सोडतां व आपल्या मनाची शांतता जाऊं न देतां कुमक आणविण्याकरितां एकावर एक जासूद पाठविले. त्यानें लहान लहान कागदाच्या तुकडयांवर चिठया लिहिल्या आणि त्यांच्या सुरळ्या करून जासुदांनीं आपल्या कानांच्या पाळ्यांस जीं भोंकें होतीं त्यांत त्या घातल्या. अशा प्रकारें ते आपणाजवळ काय आहे हें कोणासही उमगूं न देतां, शहरांतून निघून गेले. हेस्टिंग्स साहेबावर इतका प्रसंग येऊन गुजरला होता, तरी त्याचें चित्त इतकें स्वस्थ होतें कीं, त्यास मराठयांबरोबर तह करण्याचे बाबतींत एक पत्र लिहावयाचें होतें तें, इकडे शहरांत दंगा चालला असतां व लोक त्याचा जीव घेण्याचा बेत करीत असतां, त्यानें स्वस्थपणें बसून लिहिलें, आणि ज्या प्रकारें दुसरीं पत्रें रवाना केलीं होतीं त्याच प्रकारें हेंही रवाना केलें.

*वारन हेस्टिंग्स साहेबावर महत् संकट.*

थोडक्याच वेळांत थोडेसे शिपाई लोक येऊन दाखल झाले; परंतु वारन हेस्तिंग्स ह्यास पुढें काशींत राहणें सोईचें न वाटल्यावरून तो तेथून रात्रीच्या प्रहरीं युक्तीनें पळून गेला, आणि काशीजवळच जो मोठा चुनारगड नामें किल्ला आहे तेथें जाऊन राहिला.

इकडे चेतसिंग, सर्व युद्धांचें साहित्य तयार करून, इंग्लिशांबरोबर लढाई करण्यास सिद्ध झाला. त्याचें सैन्य अगदीं अव्यवस्थित होतें; कारण कीं, त्यानें जे लोक जमा केले होते ते केवळ दंगेखोर, अडाणी, आयत्या वेळेस गोळा केलेले, व युद्धकर्मामध्यें अगदीं अशिक्षित होते. अशा लोकांनिशीं हेस्तिंग्स साहेबावर जाऊन हल्ला करावा व त्याचा अगदीं मोड करून टाकावा असा त्यानें निश्चय केला. परंतु इंग्लिशांचे जे सरदार होते ते आपआपल्या हाताखालचें सैन्य घेऊन लागलेच जमा झाले. त्यांनीं चेतसिंगानें जें सैन्य जमविलें होतें, त्याची दाणादाण करून टाकिली; ह्यास्तव चेतसिंग काशीपासून २५ कोसांवर जो विजयगड ह्मणून किल्ला आहे तेथें पळून गेला. वारन हेस्तिंग्स ह्यानें ह्या किल्ल्यावर हल्ला करण्यास कांहीं सैन्य रवाना केलें. मग चेतसिंग तेथून निघून बुंदेलखंडांत गेला. तो तेथें असतांच मरण पावला.

चेतसिंगाचें बंड व त्याचा पराजय.

नंतर इंग्लिशांनीं चेतसिंगाच्या भाच्यास त्याच्या गादीवर बसविलें. त्यांस काशीच्या राज्यांतून जी सालीना खंडणी मिळत असे, ती त्यांनीं वाढविली आणि सर्व राज्याचा कारभार चालविण्यास त्याच्या बापास नेमिलें.

काशीचा नवा राजा.

वारन हेस्तिंग्स चुनारगड येथें असतां, तो अयोध्येचे नवाबाबरोबर कांहीं मोठाल्या प्रकरणीं ठराव करीत होता. ह्या नवाबानें इंग्लिशांस जो पैसा देण्याचें कबूल केलें होतें तो त्याजकडून आला नव्हता, ह्मणून वारन हेस्तिंग्स ह्यानें त्याजवर पैशाची मागणी केली. नवाबानें मजजवळ देण्यास सध्यां पैसा नाहीं असें सांगितल्यावरून वारन हेस्तिंग्स ह्यानें असा ठराव केला कीं, नवाबास जो पैसा देणें आहे, तो त्यानें आपल्या आईपासून व आजीपासून घेऊन द्यावा. ह्या दोन्हीही बेगमांजवळ पैसा पुष्कळ आहे, असें इंग्लिशांच्या समजण्यांत आलें होतें. त्या दोघीही पैसा देण्यास खुषी नव्हत्या; परंतु त्यांच्याजवळून तो पैसा बलात्कारानें घेतला. पुढें जेव्हां वारन हेस्तिंग्स विलायतेस परत गेला, तेव्हां त्याची चौकशी होत असतां त्यानें बेगमांपासून पैसा घेण्यास कसा हुकूम दिला हा त्याजवर मोठा दोष ठेविला.

अयोध्येच्या नवाबाबरोबर तह. ता. १९ सप्तंबर स. १७८१.

ह्यानंतर वारन हेस्तिंग्स हिंदुस्थानांत फार दिवस राहिला नाहीं. पुढें त्यानें आपलें सर्व लक्ष, जो विस्तीर्ण देश त्याच्या ताब्यांत आला होता त्याची व्यवस्था करण्याकडे, व जे हिंदुस्थानांतील संस्थानिक राजे होते त्यांच्याबरोबर स्नेह जोडण्याकडे, व त्याच्या हाताखालीं जे लोक होते त्यांचें कल्याण करण्याकडे लाविलें. तो हिंदुस्थानांत असतांच करनाटकांत जिकडे तिकडे दंगे बंद होऊन पुन्हा सर्वत्र शांतता झाली, व सर्व लोक इंग्लिशांस पूर्वीपेक्षांही जास्ती मान देऊं लागले. तो जेव्हां विलायतेस गेला, तेव्हां ज्या लोकांचें त्यानें श्रम करून कल्याण केलें होतें, त्यांस मनस्वीच वाईट वाटलें.

हेस्तिंग्ससाहेबाच्या कारकीर्दीचा शेवट. ता. ८ फेब्रुवारी स. १७८५.

वारन हेस्तिंग्स विलायतेस जाऊन पोहोंचल्यावर त्याजवर असा ठपका आला, कीं त्यानें हिंदुस्थानांत असतां राज्यकारभार फार अनीतीनें चालविला व तेथील जे राजे होते, त्यांच्याबरोबर अप्रामाणिकपणानें वर्तणूक केली. ह्या बाबदींत त्याजवर पुष्कळ गुन्हे आल्यावरून त्याच्या वर्तणुकीची चौकशी होऊं लागली. ही चौकशी पुष्कळ दिवसपर्यंत चालली होती. परंतु शेवटीं वारन हेस्तिंग्स ह्याजवर कांहीं गुन्हा लागू नाहीं असा निवाडा झाला.

वारन हेस्तिंग्स साहेबाची चौकशी.

वारन हेस्तिंग्स ह्याच्या वागणुकीविषयीं लोकांत अनेक प्रकारचीं मतें आहेत. कित्येक सर्वोपरी त्याला वाखाणतात, व कित्येक त्यास सर्वोपरी दोष लावतात. वास्तविक पाहतां हीं दोन्हीं मतें सत्य नाहींत. वारन हेस्तिंग्स निरंतर योग्य मार्गानें चालत होता, असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. जशीं त्याचीं कित्येक कृत्यें खरोखर स्तुत्य आहेत, तशीं कित्येक केवळ अन्यायाचींही आहेत. तथापि ज्या पुरुषानें पुष्कळ दिवस हिंदुस्थानांत राहून या देशास उत्तम दशेस आणण्याकरितां पुष्कळ यत्न केला, ज्याच्या पराक्रमाच्या कृत्यांनीं या देशास पुष्कळ लाभ झाला, जो विलायतेंतील सर्व लोकांच्या मतानें निर्दोषी ठरला, व ज्याची आठवण बंगाल्यांतील लोक, तो हिंदुस्थानांतून गेल्यावर, कैक वर्षेपर्यंत मोठ्या भक्तीनें काढीत असत, त्या पुरुषास सर्वांशीं दूषण लावणें हें आह्मांस योग्य दिसत नाहीं.

त्याचे गुणदोष.

वारन हेस्तिंग्स हिंदुस्थानांतून जाण्याच्या पूर्वीच ह्या देशांतील राज्यप्रकरणांत पुष्कळ फेरफार झाले. इंग्लंदांत पार्लमेंत सभेंत ह्या देशाच्या राज्यकारभाराविषयीं व आशिया खंडांत ग्रेतब्रितन देशाचें राज्य कोणत्या प्रकारें वाढवावें ह्याविषयीं पुष्कळ विचार होऊं लागला.

हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेंत फेरफार.

ह्या वेळीं विलायतेंत मुख्य प्रधान फाक्स होता. हा मोठा विख्यात वक्ता व मुत्सद्दी होता. ह्याचे ह्या प्रकरणीं जे विचार होते ते त्यानें सन १७८४ मध्यें पार्लमेंत सभेपुढें प्रगट केले. त्याचें ह्मणणें मान्य झालें असतें तर, हिंदुस्थानचें राज्य कंपनीच्या ताब्यांतून निघालें असतें. परंतु त्याचें ह्मणणें मान्य झालें नाहीं. पुढें लागलाच त्यानें आपला अधिकार सोडिला.

फाक्स साहेबाचें बील. स. १७८४.

फाक्साच्या मागून मुख्य प्रधानाची जागा पित् ह्यास मिळाली. त्यानेंही आपलें लक्ष ह्या विषयाकडे लाविलें; व सन १७८४ मध्यें त्यानें आपले विचार पार्लमेंत सभेपुढें प्रगट केले. त्याचें ह्मणणें मान्य होऊन असा ठराव झाला कीं, कंपनी सरकारचा अम्मल कायम ठेवावा; त्यांच्यावर एक वरिष्ठ सभा नेमावी; ह्या सभेचें नांव बोर्ड आफ कंत्रोल असें ठेवावें; ह्या सभेंतील सभासद नेमण्याचा अधिकार राजाकडे असावा व त्या सभासदांचा अधिकार कोर्त आफ दैरेक्तर्स ह्यांच्यावर असावा, असा ठराव झाला. ह्या व्यवस्थेच्या योगानें हिंदुस्थानचें राज्य कंपनीच्या व राजाच्या असें दोघांच्याही हाताखालीं आलें.

पित्साहेबाचें बील. ता० १३ आगस्ट स. १७८४.

सन १७८६ मध्यें लार्द कार्नवालिस ह्यास हिंदुस्थानचा गवर्नर जनरल नेमिलें. तो विलायतेहून इकडे येण्यास निघाला, तेव्हां त्यास असा हुकूम झाला कीं, हिंदुस्थानांत निरंतर शांतता ठेवावी व दंगे धोपे अगदीं होऊं नयेत ह्याविषयीं होईल तितकी तजवीज ठेवावी, व तेथील राजेरजवाड्यांच्या बरोबर युद्धप्रसंग कदापि आणूं नये. तो कलकत्त्यास येऊन दाखल झाला, तेव्हां त्या हुकुमाप्रमाणें वागावें, अशी त्याची वास्तविक इच्छा होती; परंतु पुढें लागलेंच त्याच्या ध्यानांत आलें कीं, हिंदुस्थानांत शांतता राहणें हें अगदीं अशक्य आहे. तो येथें येऊन चार दिवस राहिला नाहीं, तों इंग्लिशांचा फार दिवसांचा वैरी ह्मैसूरचा राजा ह्यानें असा प्रसंग आणला कीं, इंग्लिशांस युद्ध आरंभणें प्राप्त झालें.

लार्द कार्नवालिस ह्यास गवर्नर जनरलच्या कामावर नेमितात.

सन १७८४ ह्या वर्षीं इंग्लिश व टिपू ह्यांच्यामध्यें तह झाला होता, तेव्हांपासून टिपू गुप्तपणें युद्ध पुनः चालू करण्याचे तजविजींतच होता. तो आपल्या पलटणींत नवीन लोक ठेवीत असे, आपल्या शिपायांस कवाईत शिकवून तयार करीत असे व निजामास आपल्या पक्षांत आणण्याकरितां पुष्कळ झटत असे. सन १७८० पासून तो स्वस्थ बसला नव्हता. त्यानें मलबार येथील

लढाईविषयीं टिपूची तयारी.

लोकांबरोबर लढाई चालविली होती; तींत तो फारच निर्दयपणानें व क्रूरपणानें वागला. त्यानें त्यांचा नाश करून त्यांच्या धर्मास विरुद्ध अशाही पुष्कळ गोष्टी केल्या. तेथें नायर ह्मणून कोणी कुलवान् हिंदु-लोक होते, त्यांस टिपूनें फारच गांजलें होतें, ह्यामुळें त्या लोकांस मनस्वीच संताप येऊन ते टिपूचा सूड घेण्याविषयीं जपत होते. त्यांपैकीं कित्येक लोक त्रावणकोरच्या राज्यांत पळून गेले. तेथील राजानें त्यांस आश्रय दिल्यामुळें टिपूस राग आला आणि त्यानें त्या राजावर हल्ला करण्याचा निश्चय केला. हें युद्ध चालू होण्यास मुख्य कारण वर सांगितलें हेंच होतें. तसेंच त्रावणकोरच्या सरहद्दीवरील दोन किल्ले त्या राजानें नुकतेच दच लोकांपासून विकत घेतले होते, त्यांविषयीं व जी भिंत ह्या राजानें आपल्या व म्हैसूरच्या राज्यांच्या मध्यें बांधली होती, त्या भिंतीविषयीं टिपूमध्यें व ह्या राजामध्यें तंटा पडला होता.

मलबार प्रांतांत त्याचें क्रूरपणाचें युद्ध.

त्रावणकोरच्या राजाशीं कलह.

सन १७८९ ह्या वर्षाचे अखेरीस टिपू ह्या भिंतीनजीक आला. त्रावणकोरच्या राजानें ह्या भिंतीवर चांगला बंदोबस्त करून ठेविला होता. टिपूचा बेत होता कीं, एकाएकीं ह्या भिंतीवर हल्ला करून ती आपल्या हस्तगत करून घ्यावी; परंतु हा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. नंतर त्यानें ज्या ठिकाणीं छावणी केली होती, तेथें जवळच एक आंत जाण्यास गुप्त मार्ग होता, त्या मार्गानें आंत शिरण्याचा तो यत्न करूं लागला. तेव्हां शत्रूंकडच्या कांहीं लोकांनीं त्यास प्रतिबंध केला, परंतु त्यानें लागलाच त्यांचा पराभव केला. नंतर आपल्या सैन्यास आंत अनायासें शिरतां यावें ह्यास्तव त्यानें कांहीं भिंत पाडून टाकावी असा हुकूम केला, आणि त्याच्या सैन्याचा मुख्य भाग ज्या ठिकाणीं होता, तिकडे तो त्या भिंतीच्या माथ्यावरून जाऊं लागला. तो फारसा पुढें गेला नाहीं, तों त्या भिंतीवरच्या एके लहान बंगल्यांत कांहीं हिंदु लोक बसले होते ते त्यास आडवे आले, आणि त्यांनीं टिपूबरोबर जे लोक येत होते त्यांच्यावर कांहीं गोळ्या सोडल्या. ह्यामुळें त्याचे सर्व लोक घाबरून गेले आणि ते धैर्य सोडून मोठ्या धांदलीनें मागें पळूं लागले. टिपूही आपल्या सर्व इतमामासह त्यांच्या बरोबर पळूं लागला.

त्रावणकोरच्या हद्दीवर हल्ला. ता० २९ डिसेंबर स. १७८९.

टिपूस मागें हटविलें.

टिपूच्या हुकुमावरून ती भिंत एके ठिकाणीं पाडली होती व तेथें एक मोठी खिंड केली होती. ह्या खिंडींत जे लोक धांवत आले, त्यांपैकीं हजारों पडले. जे लोक पुढें होते ते त्या खिंडीजवळ आले ह्मणजे उभे राहात व त्यांच्या मागें जे लोक होते त्यांसही उभें करण्यास ते यत्न

करीत, परंतु मागच्या लोकांस खिंड झाली आहे हें माहीत नसल्यामुळें ते त्या लोकांस पुढें ढकलून देत.

टिपूही ह्या प्रसंगीं मरावयाचा; तो अगदीं मरतां मरतां वांचला. जी खिंड झाली होती, तींत पुष्कळ शिपाई लोक पडल्यामुळें ती बरीच भरत आली होती. हे शिपाई लोक अद्यापि जिवंत होते, व ते एकमेकांवर पडल्यामुळें मनस्वीच व्याकूळ होऊन दुःखानें आलेपिले देत होते. टिपू ह्या खिंडीजवळ आला; तेव्हां त्याच्या तैनातीस जे चाकर होते त्यांनीं त्या खिंडींत शिपाई लोकांची भर पडून जो रस्ता झाला होता त्यावरून त्यास उचलून नेलें.

टिपू मोठ्या संकटानें सुटतो.

ह्या प्रकारें टिपूचा पराभव झाल्यामुळें त्यास फारच राग येऊन त्यानें असा निश्चय केला कीं, श्रीरंगपट्टणाहून तोफांची वगैरे कुमक येई तोंपर्यंत तेथें तसेंच त्या भिंतीपुढें तळ देऊन राहावें.

त्रावणकोरचा राजा इंग्लिशांचा स्नेही होता. त्याच्या राज्यावर टिपूनें हल्ला केला, ह्यामुळें इंग्लिशांनीं पुन्हा टिपूबरोबर युद्ध आरंभिलें. त्यांनीं आपलें एक पलटण तयार केलें व त्यावर मद्रासचा गवर्नर, जनरल मेदोस ह्यास मुख्य अधिकारी नेमिलें. त्यांनीं निजामाबरोबर व पेशव्यांबरोबर स्नेह करून त्यांस आपल्या पक्षांत आणिलें. लार्ड कार्नवालिस ह्यानें पुन्हा युद्धप्रसंग आणूं नये म्हणून पुष्कळ यत्न केला; पण टिपूस असें वाटत होतें कीं, इंग्लिश लोक आपणास भितात ह्यामुळें ते युद्धप्रसंग आणीत नाहींत. ह्यामुळें, गवरनर जनरल युद्ध करण्यास अगदीं नाखुश होता तरी, शेवटीं त्यास तरवार धरणें प्राप्त झालें.

इंग्लिश लोक युद्धाची तयारी करितात.

इकडे टिपूनें त्रावणकोरच्या राज्याची भिंत अगदीं जमीनदोस्त करून टाकून त्या राज्यांत प्रवेश केला. ह्या राज्यांत जाऊन त्यानें जीं अघोर कर्मे केलीं, तीं ऐकिलीं असतां आंगावर कांटा उभा राहतो. जे लोक अगदीं अविचारी, निर्दय व पशुतुल्य आहेत त्यांच्याच हातून अशीं कृत्यें घडतील. इंग्लिश लोक आपल्या बरोबर युद्ध करण्याची तयारी करीत आहेत, असें जेव्हां त्यास कळलें, तेव्हां तो लागलाच श्रीरंगपट्टणास परत गेला, आणि हा जो प्रबळ शत्रु त्याच्याशीं पुढें संग्राम करणार होता, त्याच्याबरोबर मोठ्या झपाट्याची लढाई करण्याची सिद्धता करूं लागला.

त्रावणकोरावर हल्ला केल्यावर टिपू श्रीरंगपट्टणास परत येतो. ता० ७ मे, सन १७९०.

इंग्लिशांनीं युद्धास आरंभ केला. त्यांनीं टिपूचे कोईमतुरानजीक किल्ले होते ते घेतले. नंतर टिपू श्रीरंगपट्टणांतून निघाला आणि गजलघट्टीच्या

इंग्लिश युद्धास आरंभ करितात.

घाटानें येऊन त्यानें इंग्लिश सैन्याच्या आघाडीवर हल्ला केला, परंतु त्याचा पराभव झाला आणि त्याच्याकडचे लोकही पुष्कळ पडले. असा त्याचा एकदां पराभव झाल्यावर तो इंग्लिश सैन्याच्या जवळ न येतां दूर दूर पळूं लागला. इंग्लिश सैन्यावरच्या जनरलच्या मनांत फार होतें कीं, एकदां त्याला गांठून लढाई द्यावी, परंतु टिपू कांहीं केल्यानें तसा प्रसंग येऊं देईना. ह्या मोहिमेंत पुढें इंग्लिश लोक कांहीं न करितां इकडून तिकडे टिपूचा पाठलाग करीत फिरत होते.

लार्ड कार्नवालिस मद्रासेस येऊन पोहोंचतो. ता. १२ डिसेंबर स.१७९०. श्रीरंगपट्टणावर स्वारी. स.१७९१.

इतक्यांत लार्ड कार्नवालिस कलकत्त्याहून मद्रासेस सैन्याचें आधिपत्य आपण स्वतःच करावें ह्या हेतूनें आला; आणि टिपूवर हल्ला करण्याचे जे बेत केले होते ते सर्व फिरवून त्यानें पहिल्यानें बंगलूर शहर घ्यावें असा बेत केला. हें शहर त्या वेळीं फार मोठें व भरभराटीचें होतें. इंग्लिशांनीं हें मोठ्या शौर्यानें एकदम हल्ला करून घेतलें आणि तेथून निघून ते तसेच थेट श्रीरंगपट्टणाकडे चालते झाले.

हें वर्तमान ऐकून टिपू मनस्वीच चिंताक्रांत झाला. त्यास खचित वाटलें कीं, आतां इंग्लिश लोक श्रीरंगपट्टण घेतात. तो इंग्लिशांचा फार द्वेष करीत होता, ह्यामुळें त्यानें आपल्या राज्यांत त्यांची थट्टा व विटंबना करण्याकरितां जीं चिन्हें केलीं तीं सर्व काढविलीं; जीं वेडींवांकडीं चित्रें इंग्लिशांचा उपहास करण्याकरितां काढिलीं होतीं तीं खरडून टाकिलीं; आणि भिंतींवर जीं बीभत्स अक्षरें लिहिलीं होतीं तीं पुसून टाकविलीं. जे इंग्लिश लोक त्याच्या बंदिशाळेंत होते, त्यांची त्यानें मनस्वीच हेलना करून त्यांस फार गांजलें होतें. ह्या लोकांस जर राहूं दिलें तर ते सर्व वर्तमान इंग्लिशांस सांगतील असें त्यास भय पडून त्यानें त्या लोकांचे फार हाल करून त्यांस ठार मारून टाकिलें.

इंग्लिशांचें सैन्य मागें फिरतें. ता. २६ मे सन १७९१.

इंग्लिश लोकांस श्रीरंगपट्टणास जाण्यास फार दिवस लागले. कारण कीं, जे बैल त्यांनीं तोफा ओढण्यास आणिले होते, ते थोडे असून अगदीं अशक्त होते, तथापि ते लहान मजला करीत, शेवटीं त्या शहरापुढें येऊन दाखल झाले. टिपूनें आपलें सैन्य शहराबाहेर उभें केलें होतें, त्याचा इंग्लिशांनीं पराभव केला. लॉर्ड कॉर्नवालिस ह्याचा जय होण्याची संधी अगदीं जवळ आली होती, परंतु त्याच्या सैन्यांत दुष्काळ पड-

त्यामुळें व त्याचे लोक आजारी पडल्यामुळें त्यास मागें हटावें लागलें; आणि जो किल्ला आपल्या हातांत खचीत येतो असें त्यास वाटत होतें, त्या किल्ल्यापासून त्यास परत जावें लागलें.

इकडे पश्चिम भागांतही लढाई चालली होती. एथें कर्नल हार्तली व जनरल आबरक्रांबी हे दोघे सरदार लढत होते, आणि कूर्ग नामें जो डोंगरी देश आहे, तेथील शूर राजाही त्यांस येऊन मिळाला होता. टिपूच्या गांजणुकीमुळें जे लोक पळून गेले होते ते ह्या राजाच्या देशांत राहिले होते. ह्या सर्व लोकांस त्या राजानें जमा करून युद्ध करण्याकरितां समरांगणांत आणलें होतें. हे लोक टिपूचा सूड घेण्याकरितां अत्युत्कंठित झाले होते. लार्ड कार्नवालिस श्रीरंगपट्टणाहून परत आल्यावर बंगलूर येथें राहिला आणि टिपूच्या राजधानीवर पुनः हल्ला करण्याची तयारी करूं लागला. तो तेथें असतां त्यानें आपल्या सैन्यास जे बंगलूरानजीक टिपूचे डोंगरी किल्ले होते ते घेण्यास पाठविलें. म्हैसूरच्या लोकांस असें वाटत होतें कीं, हे किल्ले घेणें अगदीं अशक्य आहे. ह्या सर्व किल्ल्यांत नंदीदुर्ग म्हणून जो किल्ला होता तो फारच मोठा होता. हा किल्ला एका उंच व सरळ काळ्या खडकावर बांधला होता. इंग्लिश लोक ह्या किल्ल्यावर एकसारखे तीन आठवडे गोळे टाकीत होते, आणि शेवटीं त्यांनीं त्या किल्ल्याच्या तटास दोन भोंकें पाडलीं. त्या भोंकांतून त्यांचे शिपाई लोक आंत शिरले. शत्रूंनीं त्यांच्या आंगावर मोठाले धोंडे लोटून दिले आणि इंग्लिशांस आंत न येऊं देण्याविषयीं त्यांनीं पुष्कळ यत्न केला; परंतु इंग्लिशांकडच्या शिपायांनीं आपल्या जिवावर उदार होऊन सर्व संकटें तुच्छ मानिलीं, आणि आपलें निशाण त्या किल्ल्याच्या भिंतीवर नेऊन लाविलें. म्हैसूरचा दुष्ट व निर्दय राजा टिपूसुलतान ह्यानें पूर्वी ज्या भिंतीवरून हजारों इंग्लिश लोकांस लोटून दिलें होतें, त्या भिंतीवर आपलें निशाण लागलेलें पाहून इंग्लिश शिपायांस मनस्वीच आनंद झाला.

पश्चिम किनाऱ्यावरील कृत्यें.

नंदीदुर्ग व दुसरे डोंगरी किल्ले घेतात. ता. २० अक्टोबर सन १७९१.

लार्ड कार्नवालिस ह्यास नवीन कुमक व धान्यादिक सामग्रीचा पुरवठा येऊन पोहोंचतांच तो बंगलुराहून पुनः श्रीरंगपट्टणावर हल्ला करण्यास चालता झाला. ह्या वेळीं त्यास निजामाकडचें सैन्य येऊन मिळालें होतें, आणि जनरल आबरक्रांबी पश्चिम भागांत होता त्यानेंही त्यास येऊन मिळावें असा ठराव झाला होता.

श्रीरंगपट्टणावर दुसरी स्वारी. जानेवारी स. १७९२.

सन १७९२ यांत फेब्रुवारी महिन्याचे ५ वे तारखेस लार्ड कार्नवालिस पुनः श्रीरंगपट्टणापुढें आला. टिपू त्यास आडवा झाला, आणि दोघांचें बरेंच युद्ध झाल्यावर टिपूचा पराभव होऊन तो तेथून पळाला व कावेरी नदी उतरून शहरांत जाऊन लपून राहिला. हें शहर, कावेरी नदीच्या दोन शाखा दोहों बाजूंनीं जाऊन जें एक बेट झालेलें आहे, त्या बेटांत बांधलें आहे. शहरांत गेल्यावर टिपूनें एकदोन वेळां पुनः बाहेर पडण्याविषयीं यत्न केला, परंतु तो सर्व निष्फळ झाला.

वेढा. ता० १६—२४ फेब्रुआरी सन १७९२.

इंग्लिशांनीं त्या शहराभोंवतालीं कोट होता त्यावर गोळ्यांचा एकसारखा वर्षाव चालविला होता. ह्यामुळें त्या कोटाच्या भिंतीचे हळू हळू तुकडे पडूं लागले होते. शेवटीं त्या भिंतीस मोठालीं भोंकें पडलीं, आणि इंग्लिश शिपाई त्या भोंकांतून शहरांत प्रवेश करण्याविषयीं अगदीं उतावळे झाले. परंतु इतक्यांत तोफा बंद कराव्या असा हुकूम झाला; कारण कीं टिपू अगदीं भयभीत झाला होता, ह्यास्तव त्यानें इंग्लिशांबरोबर तहाविषयींचें बोलणें आरंभिलें.

लॉर्ड कॉर्नवालिस ह्यानें टिपूस असें सांगून पाठविलें कीं, जर तुह्मी खालीं लिहिलेलीं कलमें मान्य कराल तर आह्मी तुमच्याबरोबर तह करूं. तीं कलमें येणेंप्रमाणें होतीं:—टिपूनें आपलें अर्धें राज्य इंग्लिशांस द्यावें; इंग्लिशांस जो लढाईत खर्च झाला होता तो त्यानें द्यावा; जे इंग्लिशांकडचे लोक त्यानें बंदिशाळेंत ठेविले होते ते सोडून द्यावे; आणि ह्या सर्व गोष्टी त्याच्या हातून होत तोंपर्यंत त्यानें आपले दोन पुत्र इंग्लिशांच्या स्वाधीन करावे. तेव्हां टिपूस ह्या मजकुराचें पत्र येऊन पोहोंचलें, तेव्हां त्यानें आपल्या सर्व सरदारांस एके मोठे मशिदींत जमा केलें आणि त्यांस इंग्लिशांकडून आलेलें पत्र वाचून दाखवून विचारिलें कीं, आतां तुमचे सल्ल्यास काय येतें, पुढें लढाई चालवावी किंवा तह करावा? हे सर्व सरदार आपल्या धन्याचे एकनिष्ठ चाकर होते, व ते त्याच्या करितां जीव सुद्धां देण्यास तयार होते. तहाचीं कलमें कबूल करणें हें आपल्या धन्यास व आपणांस मोठें लांछन आहे, असें जरी त्यांस वाटत होतें, तरी ह्या वेळीं तह करणें हेंच फार चांगलें आहे असा सल्ला देणें त्यांस प्राप्त झालें. त्यांनीं असा सल्ला दिला, तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून पाणी आलें. टिपूकडचे लोक हळू हळू त्यास सोडून देऊन इंग्लिशांकडे जाऊं लागले होते. इंग्लिशांनीं जो गोळ्यांचा भडिमार चालविला होता, तेणेंकरून सर्वांचीं अंतःकरणें अगदीं भयभीत होऊन ते सर्व आपला धीर सोडून देऊं लागले होते आणि अगदीं नम्र

तहाचीं कलमें.

व दीन झाले होते. अशी स्थिति झालेली पाहून टिपूनें तहाचीं कलमें मान्य केलीं. त्यानें आपले दोन्ही पुत्र इंग्लिशांच्या लष्करांत पाठवून दिले आणि जीं कलमें ठरविलीं होतीं, त्यांप्रमाणें वागणूक करून त्यानें इंग्लिशांबरोबर तह केला.

टिपू तहास मान्य होतो. ता. १९ मार्च स. १७९२.

सर्व गोष्टींची व्यवस्था केल्यावर लॉर्ड कॉर्नवालिस विजयी होऊन मद्रासेस परत आला. ह्याप्रमाणें जो म्हैसूरचा जुलमी व गर्विष्ठ राजा टिपू तो इंग्लिशांनीं अगदीं दीन केला.

## नववा भाग समाप्त.

# भाग दाहावा.

## इंग्लिश लोकांनीं श्रीरंगपट्टण घेतलें ह्याविषयीं.

सन १७९२ पासून सन १७९९ पर्यंत झालेलीं वर्तमानें.

इंग्लिश लोक कांहीं दिवसपर्यंत करनाटक आपल्या ताब्यांत घेतात—ते हिंदुस्थानांत जीं फ्रेंच लोकांचीं संस्थानें होतीं तीं घेतात—फ्रेंच लोक आपलीं संस्थानें परत घेण्यास पुन्हा यत्न करितात—हिंदुस्थानांत जमाबंदीच्या नव्या रीति चालू होतात—लॉर्ड कॉर्नवालिस ह्यानें बंगाल्यांत ज्या नवीन व्यवस्था केल्या त्या—मद्रासेंत रयतवारी चालू होते—सर जान शोअर गवर्नर जनरल होऊन येतो—त्याचा राज्यकारभार चालविण्याचा प्रकार—निजामाचें व गवर्नर जनरल ह्यांचें वितुष्ट पडतें—अयोध्येच्या राज्याविषयीं तंटा पडतो—लॉर्ड मॉर्निग्टन हिंदुस्थानांत येतो—त्याचे राज्यनीतिविषयीं विचार—टिपूसुलतान लढाईची तयारी करितो—इंग्लिश लोक आपलें सैन्य सिद्ध करितात—टिपूचा दोन वेळ पराभव होतो—इंग्लिश लोक श्रीरंगपट्टणावर चाल करितात—ते श्रीरंगपट्टणास वेढा घालितात—ते त्या शहरावर हल्ला करितात—त्यांचा जय होतो—टिपूचे मृत्युविषयीं—श्रीरंगपट्टणांत पुन्हा सर्वत्र शांतता होऊन इंग्लिश लोक टिपूचें प्रेत पुरितात—टिपूचे राज्याचे विभाग होतात—श्रीरंगपट्टणांत व्यवस्था करण्याकरितां कर्नल वेल्सली ह्याची नेमणूक होते—सांप्रतची श्रीरंगपट्टणाची स्थिति.

करनाटक इंग्लिश लोक कांहीं दिवस आपल्या ताब्यांत घेतात.

टिपूबरोबर जें युद्ध चाललें होतें, त्यांत लॉर्ड कॉर्नवालिस विजयी झाल्यावर तो हिंदुस्थानांत फार दिवस राहिला नाहीं. टिपूबरोबर युद्ध चाललें असतां लॉर्ड कॉर्नवालिस ह्यास योग्य वाटल्यावरून त्यानें करनाटकचा नवाब महंमदअली ह्याजकडे जो देश होता तो आपल्या ताब्यांत घेतला होता; कारण कीं, महंमदअली ह्याची वागणूक नेहमीं चंचलपणाची असे ह्यामुळें त्याच्या विषयीं इंग्लिशांचे मनांत संशय आला होता. तथापि इंग्लिशांनीं त्याचें राज्य आपणाकडे फार दिवस ठेविलें नाहीं. लढाई समाप्त होतांच त्याच्या बरोबर जो पूर्वी तह झाला होता त्या तहाच्या कलमांत कांहीं फेरफार करून त्यांनीं त्याचें राज्य पुन्हा त्यास परत दिलें.

ज्या वेळीं फ्रेंच व इंग्लिश ह्यांच्यामध्यें मागें लढाई चालली होती, त्या वेळीं फ्रेंच लोकांचीं जीं हिंदुस्थानांत संस्थानें होतीं तीं इंग्लिशांनीं घेतलीं होतीं. परंतु जेव्हां ह्या दोघांमध्यें तह झाला, तेव्हां फ्रेंचांचीं संस्थानें इंग्लिशांनीं परत दिलीं. पुढें इंग्लिशांनीं हीं संस्थानें पुन्हा आपणा-

[stamp]

कडेस घेतलीं; परंतु फ्रेंच लोकांची शक्ति हिंदुस्थानांत उत्तरोत्तर कमी होत चालली होती; ह्यामुळें व ते लोक युरोपामध्यें लढाई करण्यांत गुंतले होते, ह्यामुळें त्यांनीं आपलीं संस्थानें परत घेण्यास अगदीं यत्न केला नाहीं. तथापि एथील कित्येक राजे लोकांनीं आपलीं सैन्यें तयार करण्याकरितां जे फ्रेंच सरदार आपल्या पदरीं बाळगले होते, त्या सरदारांस आपली सत्ता पुन्हा हिंदुस्थानांत यत्न केला असतां स्थापितां येईल असें वाटल्यावरून ते पुष्कळ खटपट करूं लागले, व तेणेंकरून त्यांनीं इंग्लिशांस मनस्वीच उपद्रव केला. तशांत ह्या फ्रेंच सरदारांचें युद्धकौशल्यही चांगलें होतें.

फ्रेंचांचें कारस्थान. आगस्ट सन १७९३.

लॉर्ड कॉर्नवालिस ह्यानें बंगाल्यांत राज्यकारभार फार चांगल्या रीतीनें चालविला; ह्यामुळें त्याचें नांव लोकांत नेहमीं निघेल. जमीनदारी ह्मणून जो जमाबंदीचा प्रकार आहे, तो ह्यानेंच पहिल्यानें बंगाल्यांत चालू केला. देशांतील वसूल जमा करण्याचे प्रकार तीन आहेत. एक जमीनदारी, ह्मणजे कांहीं जमिनी एका मिरासदाराकडे किंवा जमीनदाराकडे लावून दिल्या असतात, त्या जमिनींत पाहिजे असल्यास त्या जमीनदारानें आपल्या तर्फे कुळें ठेवावीं. परंतु त्या सर्व जमिनींच्या साऱ्याबद्दल जोखीम केवळ त्याच्याच माथ्यावर असतें. सरकारचा व कुळांचा संबंध अगदीं नसतो. दुसरी जमाबंदीची रीत अशी आहे कीं, एके खेडेयाखालीं ज्या सर्व जमिनी मोडत असतील त्या सर्व जमिनींच्या साऱ्याबद्दल जोखीम त्या खेड्यांतील जे सर्व राहणारे लोक असतील त्यांच्या माथ्यावर असतें. तिसरा जमाबंदीचा प्रकार असा आहे कीं, प्रत्येक जमिनीचा जो लागवड करणारा असतो त्याच्याच शिरावर त्या जमिनीच्या साऱ्याचें जोखीम असतें; ह्या रीतीस रयतवारी असें ह्मणतात. सध्यां हिंदुस्थानांत ह्या तिन्ही रीति चालू आहेत. लॉर्ड कॉर्नवालिस ह्यानें बंगाल्यांत जमीनदारी चालू केली. त्यानें बंगाल्यांत न्याय करण्याचा प्रकारही चांगल्या रीतीनें स्थापित केला; आणि त्या इलाख्यांत जे सध्यां दिवाणी कायदे चालू आहेत त्यांपैकीं मोठमोठाले कायदे सर्व ह्याच्याच अमलांत चालू झाले.

वसुलाच्या पद्धति.

लॉर्ड कॉर्नवालिस ह्याची बंगाल्यांतील व्यवस्था.

रयतवारी पहिल्यानेंच मद्रास इलाख्यांत चालू झाली. ह्या इलाख्यांतील जो मुलूख मागच्या लढाईंत इंग्लिशांनीं टिपूसुलतानाकडून घेतला होता, त्या मुलखाची वहिवाट कर्नल रीड ह्याजकडे सांगितली होती; त्यानें ह्या मुलखांत रयतवारी चालू

कुळवारीचा प्रकार.

केली. पुढें ह्या मुलखाची वहिवाट कर्नेल मनरो ह्याजकडेस आली. तेव्हां त्यानें हीच जमाबंदीची रीत चालवून तीपासून लोकांस किती नफे होतात तें दाखविलें. सांप्रतकाळीं दक्षिण हिंदुस्थानांत सर्वत्र रयतवारी चालू आहे.

सर जॉन शोअर हा गव्हर्नर जनरल होतो. आगस्ट सन १७९३.

लॉर्ड कॉर्नवालिसच्या मागून सर जॉन शोअर नामें जो विख्यात मुत्सद्दी होऊन गेला, व ज्यास पुढें लॉर्ड टेनमाउथ असा किताब मिळाला, त्यास हिंदुस्थानचा गवर्नर जनरल नेमिलें. सर जॉन शोअर ह्याचें मत असें होतें कीं, देशांत सर्वत्र शांतता ठेवावी व आपण होऊन कोणाहीबरोबर युद्ध आरंभूं नये. हा आपला उद्देश साधण्याकरितां त्यानें जे उपाय योजिले, त्यांहींकरून ह्या देशांतील लोकांचें कल्याणही झालें नाहीं व इंग्लिश लोकांची प्रतिष्ठाही झाली नाहीं. मराठे निजामाच्या राज्यावर स्वारी करण्याची तयारी करीत होते. निजामाचा व इंग्लिशांचा स्नेह होता, ह्यास्तव जेव्हां निजामाच्या राज्यावर परचक्र येऊं लागलें, तेव्हां गवर्नर जनरलानें निजामास साह्य करावें तें केलें नाहीं; ह्यामुळें सर्व लोक इंग्लिशांस अगदीं हलके मानूं लागले. त्यांचा मित्र जो त्रावणकोरचा राजा त्याच्या राज्यावर जेव्हां टिपूनें मागें हल्ला केला, तेव्हां इंग्लिशांनीं त्याचा कैवार घेऊन टिपूबरोबर युद्ध आरंभिलें होतें. ह्यामुळें सर्व राजे लोकांमध्यें इंग्लिशांची प्रतिष्ठा झाली; परंतु ह्या वेळीं त्यांनीं निजामास साह्य दिलें नाहीं, ह्यामुळें सर्व लोक त्यांस हलके मोजूं लागले, आणि असें ह्मणूं लागले कीं, इंग्लिशांच्या वचनावर कदापि भरंवसा ठेवूं नये. मराठ्यांनीं आपल्या संकेताप्रमाणें निजामावर स्वारी केली व त्याचा पराभव करून त्यांनीं त्याजकडून पाहिजे तशा अटी कबूल करून घेतल्या; परंतु पुढें जे मराठ्यांचे मुख्य सरदार होते ते आपआपणांतच पेशवाईच्या अधिकाराकरितां भांडूं लागले, ह्यामुळें निजामाचा जितका नाश होईल असें पहिल्यानें त्यास वाटलें होतें तितका झाला नाहीं.

स्वस्थतेविषयींची त्याची पद्धति.

अयोध्येचे गादीवर कोणी बसावें ह्याविषयीं तकरार. स. १७९७.

उत्तरेकडेही दंगे चालले होते. अयोध्येचा नवाब असोफउद्दवला इ० स० १७९७ त मरण पावला; तेव्हां त्याचा कीर्तिमान् मुलगा मिरझा अल्ली हा त्याच्या गादीवर बसला. गवर्नर जनरल ह्यानें कांहीं काळपावेतों हा नवाब कबूल केला; परंतु तो लोकांस आवडत नाहीं ह्याविषयीं व गादीवरील त्याचे हक्काविषयीं इतक्या गाऱ्हाणीं झालीं कीं, त्याची चौकशी करण्याकरितां सर जॉन शोअर स्वतां अयोध्येस गेला, आणि त्याणें मिरझा ज्यास बहुतकरून वजीर अल्ली ह्मणतात, त्यास शेवटीं गादीवरून काढून

पूर्वीच्या नवाबाचा भाऊ सादतअल्ली ह्यास गादीवर बसविलें. ह्याप्रमाणें झाल्यावर पदच्युत केलेला नवाब काशीस राहिला.

इ० स० १७९८ वांत लॉर्ड मॉर्निग्तन, ज्यास पुढें वेलस्ली येथील मार्किसची पदवी मिळाली, तो गवर्नर जनरलच्या कामावर आला. त्याचा स्वभाव अगदीं निराळा होता. त्याला लागलेंच दिसून आलें कीं, चोहींकडे स्वस्थता झाली आहे ती वरवर असून असावी तशी नाहीं व येथच्या दरबारांत इंग्लिशांचें वजन कमी होत चाललें आहे. लॉर्ड मॉर्निग्तन गवरनरजनरलचे कामावर येतो.ता.१७ मे १७९८.

तो लागलाच ह्या गोष्टींच्या तजविजीस लागला. त्याला निजामाशीं सर्वांपेक्षा फार बोलणें करावें लागलें. शेवटीं त्यानें त्याचें मन वळवून, त्यानें आपल्या फ्रेंच सरदारांस घालवून केवळ इंग्लिशांकडेच लक्ष ठेवून अंतःकरणपूर्वक त्यांशीं मिळून असावें, असें केलें. पहिल्या राजकीय व्यवस्थेंत फेरफार.

परंतु ह्या तहापेक्षांही एक कठीण काम त्याला करावयाचें होतें. त्याघरूपी जो ह्मैसूरचा उद्धट व निर्दय राजा टिपू त्याची अद्यापि खुमखुम मोडली नव्हती; ह्मणून तो इंग्लिशांवर चाल करून येण्याच्या बेतांत होता. त्याजवळ फ्रेंच लोक पुष्कळ होते. त्यांनीं त्यास युद्धकौशल्यांत साह्य केलें. त्यांचा मुख्य जो नेपोलियन त्याजबरोबर त्याचा पत्रव्यवहार चालला होता. तो फौजेंत सुधारणा करीत होता, श्रीरंगपट्टणास जास्ती फौज ठेवून किल्ल्यास बळकटी आणीत होता, व त्याचे शत्रु जे इंग्लिश त्यांच्याशीं युद्धांत जय कोणत्या उपायांनीं मिळेल, ते उपाय साधण्याकरितां तो हरएक रीतीनें झटत होता. टिपूसुलतान लढाईची तयारी करितो.

हें सर्व लॉर्ड मॉर्निग्तन यास माहित होतें. त्यानें त्याशीं सामना करण्याची तयारी केली. ह्या मोहिमेच्या तयारीची देखरेख करण्याकरितां तो मद्रासेस गेला, व ह्मैसुरावर स्वारी करण्याकरितां जी फौज जमत होती तिची चांगली तयारी करण्यास मनापासून झटला. वेलूर येथें २१००० रांवर लोक होते, व त्यांचें कूच झाल्यावर त्यांस आणखी २०००० लोक निजामाच्या राज्यांतून येऊन मिळाले. त्या आलेल्या फौजेवर आरथर वेलस्ली, ज्यानें पुढें पोर्तुगाल व स्पेन ह्यांत शिपाईगिरीच्या कामांत पहिले मतीची योग्यता मिळाविली, तो मुख्य होता. मग पश्चिम किनाऱ्यावरही इंग्लिशांनीं एक लहानशी टोळी पाठविली, आणि सर्व फौजेवर मुख्य जनरल हारिस ह्यास नेमिलें. इंग्लिशांची फौज एकत्र जमते. फेब्रुवारी. सन १७९९.

ही मोहिम लवकरच आटोपली. दोन्हीं लष्करें हळू हळू पण निश्चयानें श्रीरंगपट्टणावर जाण्यास निघालीं. टिपू प्रथम पश्चिमेकडे गेला. परंतु सिडासूर येथें जनरल स्तुअर्त ह्यानें त्याच्या फौजेचा मोड केला. त्या भागांत मोड झाल्यावर आपल्या शत्रूशीं समोर लढण्याकरितां पूर्वेकडे येण्यास तो निघाला. जनरल हारिस साहिबास पुढें येऊं न० देण्याकरितां त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्यानें आपल्या परीक्षेनें मालवेली शहरीं जी लढाईस चांगली जागा पाहिली होती, तेथें लढाई होऊन तेथेंच त्याचा अगदीं मोड झाला.

टिपूचा दोनदां पराभव. ता. ६ व २७ मार्च स. १७९९.

इंग्लिशांस अडथळा करण्याविषयीं टिपूनें बहुत यत्न केला, व त्या प्रसंगीं त्यानें दुसरी लढाईही दिली असती; परंतु लॉर्ड कॉर्नवालिस ज्या रस्त्यानें येत होता त्या रस्त्यावर तो टपून बसला होता. इतक्यांत इंग्लिशांनीं कांहीं अंतरावर कावेरी नदी उतरून श्रीरंगपट्टणावर चाल केली, असें ऐकतांच तो लागला०च आपल्या आवडत्या किल्ल्याचें संरक्षण करण्याकरितां मागें परतला. पुढें एक मोठें युद्ध झालें. त्या युद्धांत एके दिवशीं संध्याकाळीं इंग्लिशांचा अगदीं मोड झाला असतांही टिपूसुलतानास किल्ल्यांतच राहणें भाग पडलें.

इंग्लिश लोक राजधानीवर स्वारी करितात. स. १७९२.

कांहीं वेळानंतर० त्या शहराभोंवतीं अगदीं वेढा पडला. व जनरल स्तुअर्त साहिबाच्या हाताखालची टोळी मुख्य सैन्यास मिळाल्याबरोबर शहरावर लाविलेल्या तोफांचे व बंदुकींचे कठोर आवाज ऐकूं येऊं लागले. त्या शहराभोंवतीं सुमारें एक महिनाभर वेढा पडला होता. सरतेशेवटीं वागण्याजोगा तट पाडून रस्ता० केल्यावर हल्ला करण्यास हुकूम झाला. शिपाई लोकांस अशी ताकीद होती कीं, त्यांनीं पुनः सूचना होई तोंपर्यंत खंदकांत पडून राहावें. त्या लोकांस भीति ह्मणून तिळमात्र नव्हती. परंतु ज्या पुरुषानें इंग्लिश लोकांचा हरएक प्रकारें अपमान केला होता, तो आतां आपल्या आटोक्यांत सांपडला आहे, असें समजून मोठ्या आनंदानें त्यास मारावें ह्मणून ते टपून बसले होते.

श्रीरंगपट्टणाचा वेढा. ता. ५ एप्रिल— ता० ४ मे. सन १७९९.

दुपारची वेळा होती, शहरांत जिकडे तिकडे सामसूम झाली होती, व हालचाल अगदीं नव्हती. इंग्लिश लोकांची शहरांत येण्याची छाती होणार नाहीं असें समजून पदरच्या सरदारांच्या ह्मणण्याकडे अगदीं लक्ष न देतां टिपू स्वस्थपणें आपल्या वाड्यांत राहिला होता; व सर्व मुसलमान लोक धुंद होऊन

हल्ला. तारीख ४ मे सन १७९९.

दोन प्रहरच्या वेळीं झोंप घेत पडले होते. टिपूसाहेबाचा हिरवा झेंडा किल्ल्यावर फडकत होता. इतक्यामध्यें जनरल बेयर्ड साहेब ह्याजकडे तट पाडून किल्ला घ्यावयाचें काम सोंपविलें होतें, तो खंदक उतरून आंत गेला आणि आपली तलवार पडताळून ह्मणाला, हे शिपाई लोकांनो, माझे पाठीमागून या आणि ब्रिटिश शिपायांचें नांव राखा. असें ह्मणतांच शिपाई लोकांनीं त्या शहरावर एकदम हल्ला केला. असें होतांच जिकडे तिकडे हाहाकार झाला, आणि रखवालदार लोक शहराच्या बचावाकरितां पुष्कळ लढले. टिपूसुलतानही धांवून आला, आणि त्यानें ब्रिटिश लोकांवर तोफखाना सुरू केला. तथापि इंग्लिशांनीं सुमारें सहा मिन्युटांचे आंत नदीचें वाळवंट चालून जाऊन निकरानें चढून किल्ल्याचे तटावर आपलें मोठें तांबडें निशाण लाविलें.

ह्याप्रमाणें पहिला तट इंग्लिशांनीं सर केला. त्यांनीं आपल्या सैन्याचे दोन विभाग केले होते, त्यांपैकीं एक उजवे बाजूनें व दुसरा डावे बाजूनें जाऊन किल्ल्याचे पूर्वेकडील बाजूस एक ठिकाणीं मिळाले. असें करण्याचा बेत हल्ल्याचे अगोदरच झाला होता. जी टोळी उजवे ह्मणजे दक्षिणेचे बाजूनें गेली होती, त्या टोळीस सहज जय मिळाला, परंतु जी टोळी उत्तरेचे बाजूनें गेली होती तीस फार संकटें भोगावीं लागलीं. ते अर्ध्या वाटेवर गेले तों वाटेंत टिपूसुलतान व मुसलमान लोक मोठ्या आवेशानें घायाळ झालेल्या वाघाप्रमाणें त्यांच्या अंगावर चालून आले. त्या प्रसंगीं मुसलमान लोक व इंग्लिश लोक अगदीं हातघाईस आले; परंतु इंग्लिशांनीं बंदुकींचे दस्ते मारून त्यांस मागें पळवून लाविलें.

जय.

जेव्हां सुलतानाची अगदीं निराशा झाली आणि तो आपल्या वाड्यांत जाण्याकरितां निघाला, तेव्हां त्यानें दरवाज्यापुढें उभय पक्षांच्या लोकांचें मोठें दारुण युद्ध चाललें आहे असें पाहिलें. त्याला जखम लागून त्याचे शरीरांतील बहुत रक्त गेलें त्यामुळें तो फार ग्लान झाला होता. त्या वेळेस त्याच्या पदरच्या लोकांनीं आपल्या धन्याचा बचाव व्हावा ह्मणून टिपूस आपलें नांव प्रसिद्ध करण्याविषयीं विनंती केली, परंतु ती त्यानें मान्य केली नाहीं. ह्याचें कारण त्यास भय प्राप्त झालें असावें, किंवा असें करणें हें नीचपणाचें कृत्य आहे, असें वाटलें असावें. जरी तो जखमेनें व्याकूळ झाला होता, तरी आंत जाण्याविषयीं झटत होता. इतक्यांत एका शिपायानें त्यास वार केला, त्यामुळें तो मेलेल्या व मरणाऱ्या इतर शिपायांच्या गर्दींत मरण पावला.

टिपूचा मृत्यु. तां० ४ मे सन १७९९.

मराठी ग्रंथ संग्रहालय

मग जनरल बेयर्द साहेब ह्यानें मोठ्या शर्तीनें तें शहर इंग्लिशांच्या स्वाधीन करून घेतलें, ह्यामुळें तो अगदीं थकून गेला. त्याला विश्रांति व्हावी ह्मणून कर्नल वेलस्ली साहेब हा त्याचे कामावर आला. त्यानें शहरांतला दंगा मोडून नीट व्यवस्था केली आणि टिपूचा शोध केला; तों टिपू ज्या ठिकाणीं पडला त्या ठिकाणींच त्याचें शव सांपडलें. परंतु तें पुष्कळ वेळपर्यंत कोणास ओळखतां आलें नाहीं. मग इंग्लिशांनीं, त्यानें आपल्या बापाकरितां जें थडगें बांधलें होतें, त्यांत टिपूचें शव पुरविलें.

पुन्हा बंदोबस्त.

टिपूस मूठमाती.

टिपू मेल्यानंतर त्याचे मागें त्याच्या सरदारांपैकीं कोणीही इंग्लिशांशीं लढाई केली नाहीं. ह्या युद्धाचा शेवट झाल्यावर टिपूचें राज्य इंग्लिश, निजाम व आतां इंग्लिशांनीं ज्यास त्या राज्यावर बसविलें तो राजा ह्यांनीं आपसांत वांटून घेतलें. तो राजा लहान होता; परंतु प्राचीन ह्मैसूरच्या राजाच्या वंशांतला होता, ह्यास्तव त्यास ह्मैसूरच्या गादीवर बसविलें. कर्नल वेलस्ली साहेब हा त्या दिलेल्या राज्याची नीटपणें व्यवस्था करण्यास नेमिला होता. त्यानें त्या राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविल्यामुळें रयतेस फार सुख झालें. त्यानें पूल, रस्ते, तळीं, वगैरे बहुत बांधिलीं; आणि हिंदुस्थानांतील कितीएक प्रांतींचे लोक ह्मैसूर येथें येऊन राहिले; ह्यावरूनच ह्मैसूरच्या राज्याचा बंदोबस्त चांगला होता असें दिसतें.

जिंकून घेतलेल्या मुलखाची वांटणी.

करनल वेलस्ली ह्याचा ह्मैसूर प्रांतीं राज्यकारभार.

वेलस्ली साहेबानें श्रीरंगपट्टणानजीक एक पूल बांधिला आहे त्यास अद्यापि वसली पूल असें ह्मणतात. कोणीही पांथस्थ त्या शहरांत गेला असतां त्यास त्या काळचें स्मरण होतें. तेथें जवळच जुलमी राजाच्या कारकीर्दीतील इमारती आहेत; परंतु त्या अगदीं मोडकळीस आल्या आहेत; तेथें टिपूची कबर आहे, त्या कबरीचे खांब डौलदार असून त्यांवर नकशीचीं कामें फार सुंदर केलीं आहेत. त्याचा वाडा चंदनी लांकडांचा बाजार झाला आहे, व त्याच्या बागेंतील बंगला अगदीं मोडकळीस आला आहे. शहराभोंवतीं मोडून निरुपयोगी झालेल्या अनेक तोफा पडल्या आहेत. मोठमोठाल्या तोफांच्या गोळ्यांच्या राशी पडल्या आहेत. त्यांवर उगवलेल्या वेलांचीं हिरवींचार पानें व त्या गोळ्यांचा तांबडा लाल जंग हीं दोन्हीं एकत्र पाहिलीं असतां मोठी मौज दिसते. पुढें कधीं तोफेचा आवाज ऐकूं येणार नाहीं अशा वेळाचें हें एक मंगलदायक चिन्ह आहे.

सांप्रतची श्रीरंगपट्टणची स्थिति.

**दाहावा भाग समाप्त.**

# भाग अकरावा.

## मराठ्यांशीं युद्ध.

### इ० स० १७९९ पासून १८०३ पावेतों.

निजामाशीं तह—इंग्लिश करनाटक घेतात—जेमानशाहाची स्वारी—दिल्ली—वजीरअल्ली—चेरी साहेबाचा मृत्यु—देविस साहेबाचें शौर्य—मराठ्यांची आपसांत लढाई—शिंदे व होळकर—वसईचा तह—शिंदे ह्यांशीं लढाई—वऱ्हाडचा राजा—जनरल वेलस्ली साहेबाचा पुण्यावर हल्ला—शत्रूचा पाठलाग—आसईची लढाई—जनरल लेक साहेब—अलीगडावर हल्ला—दिल्लीची लढाई—लासवाडीची लढाई—अरगांवची लढाई—गाईलगडची लूट—तह.

म्हैसूरचे लढाईमध्यें इंग्लिशांचे हातीं बराच मुलुख लागला व त्यानंतर त्यांस दुसराही एक मिळाला. इंग्लिशांची फौज निजामाचे संरक्षणाकरितां हैदराबादेस बहुत वर्षे होती, तिचे पोषणाकरितां निजामानें कांहीं पैसा देण्याचें कबूल केलें, परंतु तो पैसा पुढें पुढें बराबर पोंचेनासा झाला. ह्याकरितां निजामास साह्य केलें त्याबद्दल सैन्याचा पैसा बराबर वेळेस यावा, ह्या हेतूनें निजामानें त्या पैशापुरता मुलूख तोडून द्यावा, असा गवर्नर जनरलानें निजामाशीं तह केला. निजामानें तो तह कबूल करून टिपूचें राज्य मोडल्यानंतर त्यास जो मुलूख मिळाला होता त्यापैकीं सैन्याच्या पोषणापुरता मुलूख त्यानें इंग्लिशांस तोडून दिला. त्यास अद्यापि 'दिलेला मुलूख' असें ह्मणतात.

*निजामाबरोबर तह. ता. १२ अक्टोबर सन १८०१.*

करनाटकचे नवाबाचेंही राज्य इंग्लिशांस मिळालें होतें. म्हैसूरच्या लढाईमध्यें इंग्लिशांच्याच केवळ मदतीनें ज्या नवाबास तेथील गादी मिळाली होती, त्यानें म्हैसूरच्या लढाईच्या वेळेस इंग्लिशांस न कळतां टिपूशीं कपटानें दळणवळण चालविलें होतें. आणि ह्याखेरीज त्याच्या मुलखांत फारच अंधाधुंदी होती, असें कळल्यावरून ज्या मुलखाचा त्याच्यानें बंदोबस्त करवत नाहीं तो मुलूख त्याजपासून इंग्रज सरकारानें घ्यावा, अशा प्रकारच्या गवर्नर जनरल व मद्रासचा गवर्नर ह्यांच्या ह्मणण्यास कोर्त आफ दैरेक्तर्स ह्यांचें व कंपनीचें संमत पडलें. परंतु ही व्यवस्था होण्याचे पूर्वी नवाब अगदीं मरणोन्मुख झाला होता, ह्यामुळें हें वर्तमान त्यास कळवावें हें इंग्रज सरकारास ठीक दिसलें नाहीं. परंतु

*इंग्लिशलोक करनाटक आपल्या ताब्यात घेतात.*

त्याचे मरणानंतर इंग्लिशांनीं त्याचे पुत्रास सांगितलें कीं, तूं जर ह्या मुलखाची सत्ता आमचे स्वाधीन करशील, तर तुला ह्या राज्यावर बसवूं. हा ठराव त्यानें मान्य केला नाहीं. ह्यावरून अजीमउद्दवला ह्मणून महंमदअल्लीचा दुसरा नातू होता त्यास त्या गादीवर बसविलें, आणि त्यास बराच मोठा मुलूख तोडून दिला. अंगोलीपासून केप कन्याकुमारीपर्यंत सर्व मुलूख ईस्त इंदिया कंपनीचे स्वाधीन झाला. ह्याप्रमाणेंच तंजावरचे राज्याविषयीं आपसांत तंटा लागला होता तें व मुंबईनजीक सुरत, हीं दोन्हीं ठिकाणें इंग्लिशांस मिळालीं.

जेमानशाहाचा भयप्रद हल्ला.

आतां आपण उत्तर हिंदुस्थानाकडे लक्ष्य दिलें पाहिजे. कारण कीं ह्या वेळीं तिकडे मोठी गर्दी चालली होती. कांहीं दिवसांपूर्वी अफगाणिस्थानचा राजा जेमानशाह हा हिंदुस्थानावर स्वारी करण्याकरितां मोठी तयारी करीत होता. परंतु अफगाणिस्थानांत कांहीं गडबड झाल्यामुळें त्यास कांहीं वेळपर्यंत तो बेत रहित करणें भाग पडलें. पण पुढें हा त्याचा बेत गवरनर जनरलास स्पष्ट दिसून आल्यावरून तो निष्फळ व्हावा ह्या हेतूनें त्यानें पर्शियाचे शाहास अफगाणिस्थानावर हल्ला करण्यास सांगितलें. पर्शियाचे शाहानें लॉर्ड मॉर्निंग्तनाचें ह्मणणें कबूल केलें. मग अर्थातच जेमानशाहाचा बेत निष्फळ झाला.

काशीचें बंड. ता. १४ जानेवारी स.१७९९.

अफगाण लोकांच्या हल्ल्याचें वर्तमान आल्यामुळें हिंदुस्थानांत मोठा दंगा झाला. सर जान शोअर ह्यानें अयोध्येबाबद जी व्यवस्था केली, तिचें मागचे प्रकरणांत वर्णन केलेंच आहे. तें असें कीं, वजीरअल्ली जो अयोध्येच्या गादीवर बसला होता त्यास सर जान शोअर ह्यानें पदच्युत केलें होतें. त्यानें त्या हल्ल्याचें वर्तमान ऐकतांच मोठा आनंद मानिला व त्याच्यानें होईल तितका उद्योग करून त्यानें दुसरे लोकांस भर दिली. जेमानशाहास मदत करण्यास त्यानें तयारी चालविली. हें वर्तमान गवर्नर जनरलास कळलें, तेव्हां वजीरअल्लीला तेथून काढून कलकत्त्याजवळ नेऊन ठेवावें असा त्यानें निश्चय केला. अशा अपमानाची बातमी वजीरअल्लीस कळतांच तो इतका क्रोधायमान झाला कीं, त्यानें मिस्तर चेरी काशीचा रेसिडेंत व दुसरे दोन साहेब हे सावध नसतां ठार मारले. ही त्यानें समजून उमजून गोष्ट केली.

चेरीसाहेबाचा खून.

देविस साहेबाचें शौर्य.

त्याच्या पक्षाचे, मदानें वेडे झालेले लोक, न्यायाधीश मिस्तर देविस ह्यास मारण्याकरितां गेले नसते, तर काशींतील सर्व साहेब लोक मेले गेले असते. मिस्तर देविस

साहेब, हे मदानें अगदीं वेडे झालेले लोक आपणाकडे येत आहेत असें पाहून आपलीं बायकोमुलें बरोबर घेऊन माळ्यावर गेला; आणि त्या माळ्याचा जिना अगदीं अरुंद होता त्याच्या तोंडीं उभा राहून शिकारीच्या लहानशा भाल्यानें तो त्या लोकांबरोबर लढून आपला बचाव करूं लागला. इतक्यांत इंग्लिशांच्या छावणींतील लोक त्याच्या मदतीस आले. पुढें कांहीं वेळ युद्धप्रसंग झाल्यानंतर वजीरअल्ली पळाला. नंतर लौकरच इंग्लिशांनीं त्यास धरिलें आणि मरे तोंपर्यंत कैदेंत ठेविलें.

अयोध्येच्या राज्यासंबंधी नवीन व्यवस्था. ता. १० नवंबर सन १८०१.

जो नवाब गादीवर होता त्याजपासून इंग्लिशांनीं कांहीं थोडासा मुलूख मागून घेतला. तो मुलूख अयोध्येच्या पश्चिमेस होता, ह्यामुळें परराज्यापासून ह्याचा मुलूख सुरक्षित झाला. इंग्लिशांचा आणि नवाबाचा तह झाला त्या तहामध्यें इंग्लिशांनीं नवाबास परशत्रूपासून रक्षिण्याविषयीं शपथ वाहिली.

शिंदे व होळकर ह्या दोघांमध्यें लढाई. ता० २५ अक्टोबर सन १८०२.

आतां सर्व हिंदुस्थानभर शांतता झाली; परंतु ती फार वेळ राहिली नाहीं. कारण इंग्लिशांस मराठे हे शत्रु उत्पन्न झाले. त्यांच्यामध्यें दोन मुख्य सरदार प्रबल होते. ज्याप्रमाणें पूर्वी पेशव्यांनीं आपले यजमान सातारचे राजे ह्यांपासून राजसत्ता हिसकावून घेतली होती, त्याप्रमाणें ह्या दोन सरदारांनींही पेशव्यांपासून ती हिसकावून घेतली. त्या सरदारांचीं नांवें शिंदे आणि होळकर; ह्या दोघां सरदारांत कलह उत्पन्न झाला. होळकरानें शिंदे व पेशवे ह्या दोघांशीं युद्ध आरंभिलें. त्या युद्धांत होळकरास जय मिळाला. मग गरीब बिचारा पेशवा आपली राजधानी शहर पुणें सोडून संरक्षणार्थ इंग्लिशांकडे पळून गेला. त्यानें आपले राज्यांत इंग्लिशांची फौज ठेवण्याचें व दुसरे सर्व युरोपियन लोक आपले राज्यांतून हांकून देण्याचें आणि आपण स्वतः सुरत व मुंबई नजीकचीं इतर ठिकाणें ह्यांवरचे हक्क सोडण्याचेंही कबूल केलें. सन १८०२ मध्यें दिसेंबर महिन्याच्या ३१ साव्या तारखेस वसई मुक्कामीं वर सांगितलेलीं कलमें कबूल होऊन तह झाला. ह्या तहामुळें शिंद्याशीं लढाई उत्पन्न झाली. शिंद्याचे पदरीं फ्रेंच लोक होते, ह्यामुळें त्याचे पदरीं जशी शिकलेली फौज होती तशी हिंदुस्थानांत कोणाचेही पदरीं नव्हती. इंग्लिशांची सेना चोहोंकडून मराठ्यांवर चालून आली. अयोध्येच्या राजापासून जे प्रांत नवीन घेतले त्या प्रांतांत जनरल लेक साहेबाची टोळी होती ती उत्तरेकडून मराठ्यांवर हल्ला करण्यास सिद्ध

वसईचा तह. ता० ३१ डिसेंबर स. १८०२.

इंग्लिशांचे स्वार शिंद्याचा मुलूख वेढतात.

होती. दुसरी एक फौज मैसूर आणि हैदराबाद ह्या दोन शहरांतून येत होती, तिचा मुख्य जनरल वेलस्ली होता. होळकर आपले आंगीं इंग्लिशांस अडविण्याची शक्ति नाहीं असें समजून पळून गेला. होळकराचे कोणी सरदार पुणें लुटणार असें ऐकिल्यावरून जनरल वेलस्ली साहेब पुण्याचा बचाव करण्याकरितां मोठ्या जलदीनें पुण्यास येऊन पोहोंचला, आणि

जनरल वेलस्ली साहेब पुण्याचें रक्षण करितो.

त्यानें पेशव्यास पुनः पुण्याचे गादीवर बसविलें. शिंद्यास ह्या वेळीं येऊन आपल्या पक्षास मिळण्याविषयीं इंग्लिशांनीं लिहिलें, परंतु तो तिऱ्हाइतपणें वागला व त्याची फौज निजामाचे मुलखाच्या सरहद्दीवर होती. वऱ्हाडचा राजा मराठाच होता, त्याला वसईचा तह आवडला नसून सर्वांच्या आधीं त्यानें इंग्लिशांशीं लढाई आरंभिली होती; त्या राजाला जाऊन मिळावें असें शिंद्याच्या मनांत होतें असें दिसलें. ह्यामुळेंच त्यानें साफ उत्तर देण्याचें लांबणीवर घातलें असावें; परंतु

शिंदे व भोंसले ह्यांजबरोबर लढाई. सन १८०३.

सरतेशेवटीं वसईचा तह आम्हांस मान्य नाहीं, व मागें लिहिल्याप्रमाणें आम्ही तुमचा पक्ष स्वीकारीत नाहीं, असें इंग्लिशांनीं त्याचे तोंडून ह्मणविलें. शिंदा व वऱ्हाडचा राजा हे दोघे लढाई करण्यास सिद्ध होते. ते निजामाची राजधानी हैदराबाद इकडे चालले; तों जनरल वेलस्ली साहेबानें पुणें सोडून शिंद्याचा नगरचा किल्ला घेतला, आणि मोठ्या जलदीनें त्यांचा पाठलाग करून अहमदनगर व त्यांची फौज ह्यांच्यामध्यें तो जाऊन पडला. मग त्या दोघांस मागें परतावें लागलें. सप्तेंबर महिन्याच्या पंधरावे तारखेच्या सुमारास दोन्ही फौजा बऱ्याच जवळ जवळ आल्या.

हल्ल्याचा बेत.

इंग्लिशांचा मुख्य सरदार व निजामाच्या फौजेचा मुख्य कर्नल स्टीविन्सन ह्या दोघांनीं मिळून हल्ला करण्याचा बेत केला. तो असा कीं, कर्नल स्टीविन्सनानें पश्चिमेकडील डोंगरास प्रदक्षिणा घालून व वेलस्ली साहेबानें पूर्वेकडे जाऊन तीन दिवसपर्यंत लढाई द्यावी. ह्याप्रमाणें दोघांची फुटाफूट झाल्यानंतर

बेत बदलतो.

जनरल ह्यानें शिंद्याचें पायदळ कटकी नदीवर आपले अगदीं पाठीमागें आलें असें ऐकिलें. तेव्हां त्यानें लागलाच हल्ला करण्याचा निश्चय केला, आणि कर्नल स्टीविन्सन ह्याजकडे जासूद पाठवून जितकें लवकर येववेल तितकें लवकर येण्याविषयीं त्याला हुकूम केला. मग तो आपले घोडेस्वारांनिशीं हल्ला करण्यास निघाला. तो बऱ्याच अंतरावर गेला तों त्यास एक टेंकडी आढळली. त्या

टेंकडीवरून पाहतो तों शत्रूबरोबर घोडेस्वार, तोफखाना व पायदळ मिळून बरीच फौज आहे असें त्याचे दृष्टीस पडलें. ती कटकी नदीचे कांठीं उतरली होती, व तो उभा होता त्याच्या खालच्या बाजूस मराठ्यांची फौज पसरली होती. त्या अरुंद नदीचे संरक्षणार्थ ऐंशी तोफा लाविल्या होत्या. त्याच्या पाठीमागें ५०००० हत्यारबंद शिपाई होते, व कितीएक कोस लांबपर्यंत तंबू दिलेले होते. त्यापासून लोकांचे शब्द त्या टेंकडीवर ऐकूं येत होते. आणि सर्व प्रकारचे कारागीर आपआपलीं कामें जणूं कांहीं ते आपले शहरांतच आहेत अशीं करीत होते. त्यांचे पाठीमागचे बाजूस एक लहानसा ओढा वाहात होता, त्या ओढ्याचें नांव जुआ; तो आसई गांवानजीक कटकी नदीस मिळतो. त्यांच्यामध्यें लघु कोन झाला आहे.

मराठ्यांचें मोठें भयंकर लष्कर.

इंग्लिश लोकांचें पायदळ येऊन पोहोंचलें. वेलस्ली साहेबानें आपली सर्व व्यवस्था केली. मराठ्यांची फौज पुष्कळ होती तरी तिच्याबरोबर युद्ध करणें प्राप्त होतें ह्मणून त्यानें जणूं काय शत्रूच्या तोंडावरच हल्ला करावयाचा आहे अशा हेतूनें आपलें सैन्य पुढें नेलें; परंतु तें फार लांब गेलें नाहीं, तोंच उजवे बाजूस वळून जुवा व कटकी ह्यांचे संगमाजवळ ती नदी उतरून जाण्याचा हुकूम त्यानें सैन्यास केला. ती नदी उतरून पलीकडला खडक चढत असतां शत्रूंनीं तोफांचा भडिमार केला, तरी तो खडक चढून जाऊन वरच्या सपाटीवर इंग्लिशांनीं बुरूज बांधला; तो असा कीं, पायदळ पुढें आणि घोडेस्वार पाठीमागें झाले. ही कवाईत होते न होते इतक्यांत शत्रूनें त्यांचा पाठलाग केला आणि जलदीनें आपला मोहरा फिरविला. ह्मणजे शत्रूच्या उजवेकडे कटकी नदी आणि डावेकडे आसई झाली. त्यानें तोफांचा भडिमार करून संगमावर जी इंग्लिशांची लहानशी टोळी होती तिचा अगदीं फडशा उडवून दिला. इंग्लिशांच्या एका तोफेस शत्रूच्या दहा तोफा होत्या. मग जितकी जलदी करवली तितकी करून शत्रूच्या तोफा पाडाव करून घेण्याविषयीं इंग्लिशांनीं आपले फौजेस हुकूम दिला. इंग्लिशांची कांहीं फळी फुटली, त्या फळींतून मराठ्यांनीं हल्ला केला, परंतु त्यांस इंग्लिशांच्या घोडेस्वारांनीं मागें पिटाळून लाविलें. इंग्लिश शिपायांनीं हुकूम बराबर न समजतां आसईवर हल्ला केला. तेथें फार भयंकर युद्ध झालें. शत्रूचा अगदीं पराजय झाला. शत्रूच्या घोडेस्वारांनीं हातपाय हालविले; परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं; कारण अव्यवस्थित मराठे ह्यांच्यानें दमदार इंग्लिशांच्या शिपाई लोकांपुढें उभें राहण्याचा दम होईना. मराठ्यांनीं पुन्हा एकदा

आसईची लढाई. २३ सप्टेंबर सन १८०३.

हल्ला केला, त्यांत जे मेले असें ढोंग करून पडले होते ते उठून युद्ध करूं लागले. परंतु एकदम इंग्लिशांनीं बरीच चाल केली, तेव्हां मराठ्यांचें सर्व सैन्य रणांतून पळून गेलें. ह्या प्रसंगीं जो इंग्लिशांस जय मिळाला तो आजपर्यंत जे मोठमोठाले जय मिळाले त्यांतलाच एक मानिल्यास चिंता नाहीं.

अलीगड घेतला. ता. ४ सप्तंबर सन १८०३.

इकडे उत्तरेकडे जनरल लेक साहेब दिल्लीस गेला. त्यानें मार्गांत अलीगड नामें जो सुदृढ किल्ला आहे तो घेतला. हा जो त्यास जय मिळाला त्याचा परिणाम असा झाला कीं, शिंद्याच्या पदरीं जो पेरेन नामें मोठा विख्यात फ्रेंच सरदार होता, त्यानें शिंद्याचा पक्ष फार दिवस धरिला होता तो सोडिला. मराठे लोकांनीं दिल्लीजवळ सुरक्षितशी जागा पाहून तेथें तळ दिला होता. सभोंवतीं पाणथळ जमीन असून, ते ज्या उच्चस्थळीं उतरले होते, त्यावर संरक्षणार्थ सुमारें शंभर तोफा होत्या.

दिल्लीची लढाई. ता० ११ सप्टेंबर सन १८०३.

हें मराठ्यांचें मोठें सैन्य ज्या जागीं उतरलें होतें, तेथपासून दृष्टीचे टप्याइतक्या अंतरावर इंग्लिशांचें सैन्य येऊन पोंचलें. तेव्हां, त्यानें नऊ कोस मजल केली होती तरी, तें येतांच त्याच्या मुख्यानें एकदम हल्ला करण्याचा निश्चय केला. त्यानें पहिल्यानें आपण पळालोंसें दाखवून मराठ्यांस त्यांचे सुरक्षित जागेपासून पुढें मैदानांत येऊं दिलें. त्याचा प्रकार असा झाला कीं, मराठ्यांनीं जे इंग्लिशांचे घोडेस्वार आघाडीस होते ते पळतात असें जेव्हां पाहिलें, तेव्हां ते आपणास आतां सहज जय प्राप्त होईल असें मानून आपला तळ सोडून मोठ्या निकरानें त्यांचे पाठीस लागले; परंतु इंग्लिशांचे स्वार पायदळाजवळ येऊन पोंचतांच कांहींनीं उजवेकडे व कांहींनीं डावेकडे होऊन पायदळास वाट दिली; मग पायदळ फौजेनें तसेंच पुढें जाऊन शत्रूंस मागें सारिलें व अगदीं तोफांशीं तोफा भिडतां तोंपर्यंत भडिमार केला; नंतर घोडेस्वारांस मधून वाट देऊन त्यांस अगदीं जेर करून टाकिलेल्या अशा आपल्या शत्रूचे पाठीस लावलें.

फ्रेंच स्वाधीन होतात.

ह्या लढाईनंतर दुसरे सर्व फ्रेंच लोक इंग्लिशांच्या स्वाधीन झाले, येणेंकरून शत्रूचे सैन्यांत एक देखील कोणी मोठा फ्रेंच मनुष्य राहिला नाहीं. असें झाल्यामुळें लढाई करण्याचें सर्व काम एकट्या मराठ्यांवरच पडलें. दिल्ली शहर त्यांच्या स्वाधीन होतें तें इंग्लिशांनीं घेतलें, व अगदीं गरिबीस आलेला व वृद्ध असा जो शाहआलम् नामें दिल्लीचा बादशाह, ज्याचा बंगाल प्रांतीं पुष्कळ वर्षेंपर्यंत मोठा वचक होता, त्यास प्रतिबंधांतून सोडविलें.

हा बादशाह कैदेंत असतां ज्याच्या ज्याच्या हातीं सांपडला त्यानें त्यानें त्याची फार अमर्यादा केली. त्यास पोटास देखील पुरतें मिळत नसे. शेवटीं एकानें त्याचे डोळेही काढिले. शाहआलम.

नंतर जनरल लेक साहेबानें आग्र्यास जाऊन तें शहर घेतलें; परंतु ह्या समयीं शिंद्यानें जी दक्षिणेंतून फौज पाठविली होती व जिला दक्षिण देशांतील अजिंक्य फौज अशी संज्ञा प्राप्त झाली होती, ती दिल्लीकडे येतच होती; तिला गांठण्यास लेक साहेब पुनः माघारा परतला. तो येत असतां शत्रूच्या सन्निध येण्याची त्यास इतकी घाई झाली कीं, तो पायदळास मागून येण्यास सांगून घोडेस्वार मात्र बरोबर घेऊन पुढें गेला. त्याची व मराठ्यांची लासवाडी म्हणून जें लहानसें गांव आहे तेथें गांठ पडून घोडेस्वारांची मोठ्या निकराची लढाई झाली. इंग्लिश लोक येतांच मराठे पळण्याच्या बेतांत दिसले, म्हणून लेक साहेबानें आपणाजवळ जे थोडेसे लोक होते त्यांस हल्ला करण्यास हुकूम दिला. मराठे लोकांवर चालून जाणें हें केवळ मृत्यूच्याच तोंडांत उडी घालण्याप्रमाणें आहे असें जरी त्यांस वाटलें, तरी त्यांनीं हल्ला करण्यास अगदीं विलंब लाविला नाहीं. बिगुल वाजतांच त्या शूर लोकांस पुढें चालून जाणें आपलें कर्तव्यकर्मच आहे असें वाटून ते पुढें निघाले, व शत्रु गोळ्यांचा भडिमार करीत असतां तसेच मधून जाऊन हजारों शत्रूंशीं मोठ्या शौर्यानें लढले. ह्याप्रमाणेंच पुढें सर्वांनीं वर्तणूक केली, परंतु हें त्यांचें सर्व करणें व्यर्थ झालें; कारण कीं त्यांस कांहीं वेळ मागें पळून जावें लागलें.

लासवाडीची लढाई. ता० १ नोवेंबर. स. १८०३.

मग बाकी राहिलेली फौज मोठी जलदी करून येऊन पोंचली. ती फौज येतांच मराठ्यांनीं, आम्ही आपल्या तोफा टाकून निघून जातों, असें इंग्लिशांशीं बोलणें लाविलें. इंग्लिशांचा सरदार आपला जीव बचावण्यास व अगदीं दमून गेलेल्या आपल्या शिपायांस थोडीशी विश्रांति देण्यास फार उत्सुक होता, म्हणून त्यानें मराठ्यांचें बोलणें मान्य करून त्यांस एक तासभर विचार करण्यास मोकळीक दिली. तो तास निघून गेला, तरी त्यांजकडून कांहींच बातमी आली नाहीं, व त्यांच्या निघून जाण्याचेंही कांहीं चिन्ह दिसून आलें नाहीं. असें होतांच तत्काळ लढाईस प्रारंभ झाला. इंग्रेजी लोकांच्या पायदळ फौजेची एक टोळी पुढें निघाली. नंतर पुढें लवकरच युद्धाची गर्दी झाली. पहिल्यानें लोक गेले त्यांपैकीं कांहीं मागेंच राहिले व शहात्तरावें सगळें पलटण, काळे लोकांचे बारावे पलटणांतील कांहीं लोक, आणि सोळावे पलटणांतील सर्व लोक, हे सर्व, शत्रु गोळ्यांचा

भडिमार करीत असतां मोठ्या शौर्यानें त्यांचे अंगावर चालून जाण्यास व मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं हल्ला केल्यास त्यांस मागें हटविण्यास एकीकडेसच ठेविले होते. ज्यांस शूर ह्मणून जनरल लेक साहेब ह्मणत असे, असे जे हे लोक ते मोठ्या शौर्यानें लढले. परंतु त्यांस कुमकेची गरज असतां त्यांची व दुसऱ्या फौजेची गांठच पडली नाहीं. मग घोडेस्वारांस पुढें जाण्याचा हुकूम झाला. ते आले तेव्हां शहात्तरावे पलटणांतील लोकांनीं जयजयकाराच्या आरोळ्या मारल्या. मग घोडेस्वारांनींही उलट तशा आरोळ्या मारून शत्रूच्या फौजेंतून घोडे पिटाळीत नेले आणि शत्रूचा अगदीं पराजय केला. तदनंतर इंग्लिश लोकांच्या फौजेच्या जिलबीचे लोक आले, त्यांचा जनरल लेक साहेब स्वतः मुख्य झाला. लढाई चालली असतां लेक साहेबाचे घोड्यास गोळी लागली, आणि तो दुसऱ्या घोड्यावर चढत होता, इतक्यांत त्याचा मुलगा जो त्याचे बाजूसच होता तो पडला. परंतु लेक साहेबाच्यानें शोक करण्यास किंवा कांहीं साह्य करण्यास मागें राहवेना. कारण कीं इंग्लिश शिपायांची एक मोठी ओळच्या ओळ आपल्या संगिनींनीं शत्रूस मागें सारीत चालली होती. मराठे अगदीं हातघाईस येऊन जिवाची परवा न बाळगतां लढले, व त्यांजपाशीं एकही बंदूक राहिली नाहीं असें होईपर्यंत ते लढाई सोडून गेले नाहींत, तरी त्यांस इंग्लिश फौजेनें मागें हटविलें. कांहीं वेळपर्यंत ते मोठ्या बंदोबस्तानें मागें हटत गेले; परंतु इंग्लिशांचे घोडेस्वार मागें लागले, तेव्हां त्यांस अगदीं पळवलें तितकें पळावें लागलें. ह्या लढाईनंतर शिंद्याची फौज उत्तरेकडे नांवास मात्र होती.

संशय येण्याजोगी शिंद्याची वर्तणूक.

जनरल वेलस्ली साहेबानें दक्षिणेकडे, आसई ह्या ठिकाणीं जय मिळाल्यानंतर, मोठे हुशारीनें आणि जलदीनें चाल करून आपणास जय मिळाल्याचें सार्थक केलें. शिंद्यानें तह करण्याची इच्छा बाह्यात्कारीं दाखविली; आणि त्यांशीं कांहीं वेळ तह झाला, तरी वऱ्हाडचे राजानें लढाई सोडून दिली नव्हती, आणि वास्तविक पाहिलें असतां शिंदाही मदत मिळे तोंपर्यंत लढाई लांबेल असें करीत होता. जनरल वेलस्लीनें जलद चाल करून राजाच्या मुलखांतील अडगांवानजीक त्याचे सैन्याला गांठिलें; त्या सैन्यांत कांहीं शिंद्याचेही लोक होते. त्या वेळेस घटकाभरही दिवस नव्हता, तरी तेवढा वेळ शत्रूंचा नाश करण्यास पुरा होता. त्या लढाईमध्यें दोहों सैन्यांतील लोकांनीं परस्परांवर एकदम हल्ला केला. इंग्लिश लोकांचे पायदळांतील लोकांनीं मोठे धिम्मेपणानें चालून आपले पुढें

अडगांवची लढाई. ता० २९ नोवेंबर. स. १८०३.

कोणाचें कांहीं चालूं दिलें नाहीं. आसई येथील लढाईमध्यें जे काळे शिपाई मोठ्या शौर्यानें लढले होते, त्यांपैकीं कांहीं लोक येथें शत्रूचे तोफांच्या भडिमाराखालीं घाबरून गेले, तरी कांहीं वेळानें नीट सांवरून ते दिवस मावळे तोंपर्यंत इतरांसारखेच नेटानें लढले. त्या रात्रीं चांदणें पडलें होतें, ह्मणून मराठे जलद पळत असतां ते सहजच इंग्लिशांचे दृष्टीस पडले, ह्यामुळें इंग्लिशांचे घोडेस्वारांस कांहीं कोसपर्यंत त्यांचा पाठलाग करण्यास सोपें पडलें.

असें झालें असतांही शत्रु टिकाव धरून राहिले. अरगांवची लढाई झाल्यानंतर इंग्लिश लोकांनीं डोंगरांतून आणि दऱ्यांतून हाल सोशीत सोशीत कूच करून, जिवावर उदार होऊन लढणारे किल्लेदारांचा पराजय करून गाइलगडचा किल्ला आपले हस्तगत केला. ह्या प्रसंगीं रजपुतांचा सरदार हातांत तरवार धरवेनाशी होईपर्यंत लढला. हा किल्ला इंग्लिशांचे हस्तगत झाल्यानंतर त्यांशीं वऱ्हाडचे राजानें तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां कटक आणि बलासुर हीं इंग्लिशांचे स्वाधीन करावीं, आणि युरोपखंडांतील जे लोक चाकरीस होते ते घालवून द्यावे, असें त्यापासून कबूल करून घेऊन इंग्लिशांनीं त्याशीं तह केला.

गाइलगडचा किल्ला घेतात. ता० १६ डिसेंबर स. १८०३

भोंसल्याशीं तह. ता. १७ डिसेंबर सन १८०३.

शिंदाही इंग्लिशांचे ह्मणण्याप्रमाणें वागण्यास कबूल झाला. त्यानें गंगा आणि यमुना ह्या नद्यांचे मधला जो देश थोडक्याच दिवसांपूर्वीं फ्रेंच सरदारांच्या स्वाधीन होता तो इंग्लिशांस दिला; वसई येथील तहाप्रमाणें वागण्याचें त्यानें कबूल केलें; आणि पेशव्याशीं कांहीं आपला तंटा उत्पन्न झाल्यास इंग्लिश जें सांगतील तें ऐकण्याचेंही त्यानें पतकरिलें.

शिंद्याबरोबर तह. ता. ३० डिसेंबर स. १८०३.

ह्याप्रमाणें मराठ्यांचे बरोबर जें युद्ध झालें त्याचा शेवट झाला. तें पांचच महिने चाललें होतें, तरी तेवढ्या थोड्या वेळांतही पुष्कळ निकराच्या लढाया झाल्या; आणि इंग्लिशांस बहुत जय मिळाले.

## अकरावा भाग समाप्त.

# भाग बारावा.

## मराठ्यांशीं दुसरी लढाई व इंग्लिशांचा उत्कर्ष.

इसवी सन १८०४ पासून १८०६ पर्यंत.

होळकराची संशय येण्यासारखी वर्तणूक—त्याच्या लुटीकरितां स्वाऱ्या—त्याचा इंग्लिशांस उद्धटपणाचा निरोप—लार्ड लेक ह्याचें सैन्य चालू होतें—होळकराचा पाठलाग—इंग्लिशांचें सैन्य परत येतें—कर्नल मानसन ह्याचें मोठ्या संकटानें परत जाणें—दिल्लीचा बचाव—इंग्लिशांचे सैन्याचे दोन भाग होऊन तें होळकराचा पाठलाग करितें—फरकाबादेनजीक घोडेस्वार त्याचा पराभव करितात—दीग येथील पायदळ—पश्चिमेकडील हितावह कृत्यें—दीगचा किल्ला घेतात—भरतपूरचा वेढा—प्रत्येक हल्ला व्यर्थ जातो—अमीरखान—भरतपूरचा राजा शरण येतो—होळकर व शिंदे ह्यांच्यामध्यें सख्य—कार्नवालीस हिंदुस्थानास परत येतो—त्याचा मृत्यु—सर जार्ज बार्लो—शिंद्याशीं नवा तह—होळकर पंजाबास पळून जातो—त्याचा पाठलाग—त्याजबरोबर तह—सल्ला—इंग्लिश लोक आपल्या मित्रांस विसरतात.

होळकराची संशय येण्यासारखी वर्तणूक.

मागच्या भागांत सांगितलेल्या युद्धाचा असा शेवट झाला, तरी मराठ्यांचें भय होतेंच. त्या युद्धांत होळकराची वर्तणूक फार संदिग्ध होती. पहिल्यानें तो शिंद्यास आणि वऱ्हाडचे राजास मदत करितोसें वाटलें. परंतु तसें त्यानें केलें नाहीं. नंतर इंग्लिशांस वरचेवर जय मिळत गेले, ह्यामुळें तो घाबरा झालासें दिसून आलें, आणि शिंदे व वऱ्हाडचा राजा ह्यांचा नाश होई तोंपर्यंत त्यानें कांहीं हालचाल केली नाहीं. तथापि त्यांचा नाश झाल्यानंतर वास्तविक ह्याचे मनांत जे हेतु होते ते स्पष्ट दृष्टीस पडूं लागले. इंग्लिशांवर उठण्याविषयीं त्यानें कितीएक राजांस पत्रें पाठविलीं; आणि इंग्लिशांकडील कांहीं संस्थानिकांचे देश लुटिले. जनरल लेक साहेब ह्यास ही होळकराची वर्तणूक सोसेना म्हणून त्यानें त्यास कानउघडणी करून लिहिलें कीं, तुमचीं हीं कृत्यें सोसून घेण्याजोगीं नाहींत, तुम्हीं इंग्लिश सरकारच्या सरहद्दीवरून आपलें लुटारू सैन्य हालवावें; कारण शिंद्याचे पराजय पावलेल्या सैन्यांतील राहिलेले लोक आणि कांहीं दुसरे दांडगे आणि हत्यारबंद लोक येऊन, तें सैन्य उत्तरोत्तर वाढत चाललें आहे. ह्यावर होळकरानें जें उत्तर दिलें तें फार उद्दामपणाचें होतें.

जनरल लेक साहेब होळकराची कानउघडणी करतो.

त्यानें असें लिहिलें कीं, इंग्लिश सरकारांनीं कांहीं मोठाले प्रांत माझ्या स्वाधीन करावे, आणि हिंदु राजांच्या मुलखांत लूट होऊं नये म्हणून ज्या चवथाईवर माझा हक्क आहे ती द्यावी, आणि शिंद्याबरोबर तह केला त्याप्रमाणेंच मजबरोबर करावा; असें असेल, तर माझी तह करण्याची इच्छा आहे. हें होळकराचें उत्तर लढाईस या, असें म्हणण्यासारखेंच होतें. लार्ड लेक साहेबाचें सैन्य तत्क्षणींच लढाईस निघालें. आणि कर्नल मरे साहेबास गुजराथेंतून निघून उज्जनीकडे कूच करण्याविषयीं हुकूम झाला. त्या वेळेस जयपूरचा राजा इंग्लिशांकडचा होता म्हणून त्याचा मुलूख होळकर लुटीत होता; परंतु जेव्हां लार्ड लेक साहेबानें त्या राजास पाठबळ देण्याकरितां एका टोळीसहित कर्नल मानसन साहेबास पाठविलें, तेव्हां होळकर दक्षिणेकडे परतला. इंग्लिशांनीं तंकरामपूरचा किल्ला घेऊन त्याचा पाठलाग तसाच पुढें चालविला; परंतु होळकरानें इतके जलदीनें पळ काढिला कीं, त्यास इंग्लिशांस गांठतां येईना. आणि कडक ऊन, वाटेचे श्रम, आणि अन्नाची कमताई ह्या गोष्टींनीं लोकांचे फार हाल झाले. होळकराला वर तोंड काढूं देऊं नये ह्याकरितां कर्नल मानसन ह्याची टोळी पुरे आहे, असें लार्ड लेक साहेबास वाटलें, आणि येथें राहिलें असतां आपले लोकही मरतील असें मनांत आणून तो आपलें सैन्य घेऊन कानपुराकडे निघाला. सैन्यांतील लोक पूर्वीपेक्षां हल्लीं हजारपटीनें अधिक संकटांत पडले. कूच करितांना सर्व मार्ग त्यांस भयंकर वाटला, कारण सर्व दिवसभर जो उष्ण वारा सुटत होता त्यामुळें आणि तहान व वाटेचे श्रम ह्यांमुळें हाल होऊन शेंकडों लोक मरून पडूं लागले.

त्याचें दांडगें उत्तर.

लार्ड लेक साहेबाची फौज चालू होते. होळकराचा पाठलाग.

इंग्लिशांचें सैन्य परत येतें.

इकडे कांहीं घोडेस्वारांनीं शत्रूंचे एके टोळीवर हल्ला करून मोठा जय मिळविला. मग ते कर्नल मानसन ह्याच्या लोकांस जाऊन मिळाले. कांहीं काळे लोकांनीं तोफखान्यानिशीं एका किल्ल्यास वेढा घातला होता. तेव्हां तेथील सुभेदारानें किल्ला स्वाधीन करून देतों असें कबूल केल्यावर त्यांनीं त्याशीं कांहीं वेळ तह केला. असें असतां अमीरखान ह्या नांवाचा होळकराकडील एक सरदार त्यांचा विश्वासघात करून त्यांवर तुटून पडला; परंतु कांहीं वेळानें इंग्लिशांचे थोडकेच शिपायांनीं त्याचा पराभव केला.

थोडाबहुत जय.

अमीरखान.

लार्ड लेक साहेब परत जात असतां, इकडे कर्नल मानसन् साहेबानें

कर्नल मान-सन पुढें येतो.

कर्नल मरे साहेब दक्षिणेकडून येत होता त्यास मिळण्याचे हेतूनें तसेंच तिकडे आपलें कूच चालविलें. परंतु तो जसा जसा पुढें जाऊं लागला तसें तसें त्याचे सैन्यांतील लोकांस अन्न-पाणी मिळण्यास अधिक अधिक कठिण पडूं लागलें. कर्नल मरे हा मागें गेला, असें त्यास समजलें; आणि त्यास असें वाटलें कीं, होळकराला आपणावर चालून येण्यापुरता आवेश नाहीं आणि तितकें सामर्थ्यही नाहीं. ह्यामुळें त्यानें परत जाण्याचा निश्चय केला; आणि आपले छावणीचे जागीं कांहीं घोडेस्वारांसहित लेफ्तेनंत ल्युकन् ह्यास ठेवून एके घटकेनें तुम्ही आम्हांमागें या आणि शत्रु काय करीत आहेत तें आम्हांस कळवा, असें त्यास सांगून तो होळकराकडे पाठ करून निघाला.

त्याचें मोठ्या संकटानें परत जाणें. ता० ८ जुलै सन १८०४.

मानसन साहेब हा शूर व आस्थेवाईक सरदार होता, ह्मणून त्याचे हातून जी ही गोष्ट घडली ती केवळ चुकीनेंच घडली. मराठ्यांचे समोरून परत जाणें हें किती दुःखदायक आहे तें आपणांस पूर्वीपासून ठाऊकच आहे. कर्नल मानसन हा कूच करूं लागला असें त्यांचे कानीं पडतांच, ते त्याचे मागें धांवूं लागले, आणि जे कांहीं घोडेस्वार मागें राहिले होते त्यांजवर हल्ला करून डोंगरांत मुकुंद्र घांटाजवळ जें पायदळ गेलें होतें त्याचे मागें ते लागले. जे लोक परत जात होते त्या सर्वांवर येथें त्यांनीं चोहोंकडून हल्ला केला; तरी थोडकेच गोरे लोकांनीं धिमेपणानें टिकाव धरून त्यांचा पराजय केला. पहिल्यानें कर्नल मानसनच्या मनांत मुकुंद्र घांटापर्यंतच जाण्याचें होतें; परंतु शत्रु अडथळा करितील असा संशय मनांत आणून तो कोटें ह्या शहराकडे गेला. तेथील राजा आपणास इंग्लिशांचा मित्र ह्मणवीत होता खरा, परंतु त्यानें त्यास आपले शहरचे वेशीचे आंत येऊं दिलें नाहीं. मग ती टोळी तशीच हाल सोशीत सोशीत मागें चालली; त्या वेळेस नद्यांस पूर आले होते, व लोकांचे जवळचें अन्नही नाहीसें झालें होतें; तोफा टाकून द्यावयाच्या होत्या, ह्याकरितां खिळे मारून त्यांचे कानें बंद करावयाचे होते. इतकें असूनही शत्रूंकडील घोडेस्वार वरचेवर हल्ला करीत असत. तथापि इंग्लिशांनीं कांहीं दाद दिली नाहीं. ज्या ज्या वेळेस लढण्याचा प्रसंग येई त्या त्या वेळेस इंग्लिशांचाच जय होत असे; परंतु कांहीं काळे लोकांचे सरदार आपले धन्याचा विश्वासघात करून शत्रूंशीं कागदपत्र पाठविण्यासारखा संबंध ठेवूं लागले, आणि काळे शिपायांच्या दोन टोळ्या व कांहीं घोडेस्वार इतके इंग्लिशांचा पक्ष सोडून होळकराकडे निघून गेले. जेव्हां कर्नल मानसन् साहेब सुरक्षित स्थळाजवळ येऊन पोहोंचला, तेव्हां त्याचा पराभव करण्याकरितां

शत्रूंनीं जिवावर उदार होऊन एक वेळ यत्न केला, परंतु तो सफळ न होतां त्यांस मागें हटावें लागलें. ही लढाई झाल्यावर इंग्लिशांचे फौजेंतील लोकांचें सर्व धैर्य नाहींसें झालें. तें भय न जुमानण्याच्या ज्या गोष्टी सांगत होते त्या एकीकडेच राहिल्या, आणि सर्वांनीं आग्र्याकडे जाण्याकरितां पळ काढिला, तेव्हां सैन्य परत निघाल्यापासून सुमारें दोन महिन्यांनीं तारीख ३१ आगस्त ह्या दिवसापर्यंत सर्व लोक येऊन पोहोंचले.

इंग्लिश फौज पुन्हा जमते.

ह्या वरील संकटामुळें सर्व हिंदुस्थानचे लोकांचे मनांत इंग्लिशांविषयीं फार वाईट आलें असतें; परंतु तसें न येण्याविषयीं हें वर्ष संपायाच्या आंतच कांहीं गोष्टी घडल्या. लार्ड लेक साहेबाचें सैन्य लवकरच एकत्र होऊन सप्तेंबरचे बेविसावे तारखेस लढाईस निघण्याकरितां आग्रा येथें तयार झालें. यमुना नदीचे वरले बाजूस मथुरेकडे होळकर गेला होता, त्यानें आतां आपले घोडेस्वार तेथेंच ठेऊन पायदळ आणि तोफा हीं दिल्ली शहर हस्तगत करून घेण्याकरितां तिकडे पाठविलीं. हा त्याचा यत्न अगदीं निष्फळ झाला. कारण रेसिडेंत साहेब कर्नल आक्तरलोनी, आणि कर्नल बरन्स ह्यांनीं तोफा वगैरे चोहोंकडे ठेऊन उत्कृष्ट रीतीनें त्या शहराचें संरक्षण केलें होतें. त्यांचेजवळ थोडकेच काळे लोक असतांही ते होळकराचे सैन्याशीं नऊ दिवस लढले. संरक्षणार्थ जें सैन्य होतें त्यांतील कांहीं लोकांनीं दंगा केला; परंतु बाकीचे लोक वीरश्रीनें लढले. ह्या लढाईंत ज्या ज्या गोष्टी घडल्या, त्या सर्वांत दिल्ली येथें जें शौर्य दृष्टीस पडलें, तें विशेष स्तुत्य आहे.

होळकर दिल्लीवर हल्ला करितो.

मोठ्या शौर्यानें दिल्लीचें रक्षण करतात. ता० ८–१५ अक्टोबर सन १८०४.

दिल्ली येथें होळकराचा पराजय झाल्यावर, तो सभोंवतालचे इंग्लिशांचे मुलखांचा नाश करूं लागला, ह्मणून लार्ड लेक साहेबानें आपले सैन्याचे दोन भाग करून जनरल फ्रेजर ह्याचे हाताखालीं पायदळ आणि पायदळाकडील तोफखाना दिला आणि त्यास असें सांगितलें कीं, होळकराचें पायदळ लढाईस येईलसें करावें. आणि आपणाबरोबर बरेच घोडेस्वार व स्वारांकडील तोफखाना घेऊन, तो लेक साहेब, होळकर घोडेस्वारांनिशीं लुटालूट व नाश करीत होता, त्याचा पाठलाग करूं लागला. होळकर एकसारखी चाल करीत असतां, तो जिकडे जिकडे जाई तिकडे तिकडे त्याचे मागें इंग्लिशांचे घोडेस्वार एकसारखे जात असत. ह्याप्रमाणें बराच वेळ पाठलाग चालला होता. शेवटीं लार्ड लेक साहे-

इंग्लिश लष्कराचे दोन भाग होतात.

होळकराचा पाठलाग.

बास असें समजलें कीं, सुमारें छत्तीस मैलांवर फरकाबाद शहराजवळ शत्रु छावणी देऊन राहिला आहे. त्याचे लोकांनीं नुकतेंच मोठें कूच केलें होतें, तरी पुन्हा घोड्यावर बसण्याविषयीं सर्वांस त्यानें हुकूम केला. सर्व रात्रभर ते चालत असतां चांदणें पडलें होतें, आणि त्या सर्वांस आतां आपला मुख्य शत्रु भेटणार ह्या गोष्टीनें मोठा उल्हास झाला होता. त्यांनीं आपले लोकांस जय मिळाल्याविषयीं नुकतीच बातमी ऐकिली होती, आणि थंड हवाही सुटली होती, ह्यामुळें त्यांचिया श्रमांचें निवारण झालें होतें. अरुणोदयाचे सुमारास त्यांस होळकराची छावणी दिसूं लागली. घोडे बांधलेल्या जागींच उभे होते आणि बहुतेक लोक त्यांचे सभोंवताले निजून राहिले होते. कुलपी गोळे येऊं लागले त्यावरून इंग्लिश येत आहेत, असें त्यांस समजलें; आणि थोडक्या वेळानें त्यांचे घाबरलेले सैन्यांतून इंग्लिश लोकांचे स्वार आपले घोडे उडवीत चालले. जो थोडासा वेळ सांपडला त्यांत कांहीं मराठे लोकांनीं घोड्यांवर बसून फार जलदीनें पळ काढला. ह्यांतून जे पहिल्यानें पळाले त्यांतच स्वतः होळकर होता.

फरकाबाद येथें होळकराच्या फौजेची बाताहत होते. ता० १७ नोव्हेंबर सन १८०४.

लार्द लेक साहेब होळकराचे घोडेस्वारांस पळवीत असतां, इकडे जनरल फ्रेजर ह्यानें आपले सैन्यानिशीं त्याचे पायदळाचा नाश केला. नोवेंबरचे बारावे तारखेस त्यांस शत्रूंची छांवणी दृष्टीस पडली, त्या वेळेस त्यांचे छावणीची जागा त्यांस मजबूतशी दिसली. होळकराचे सैन्याचे उजवे बाजूस चढणीवर एक खेडें होतें, आणि डावे बाजूस दींग नांवाचा किल्ला होता (हा किल्ला आग्र्याचे वायव्येस आहे). पिछाडीस एक मोठा तलाव होता, आणि पुढें मोठें पाणथळ होतें. दुसरे दिवशीं सकाळींच इंग्लिश लोक शत्रूंवर हल्ला करण्याकरितां निघाले. पाणथळ एकीकडे टाकण्याकरितां त्यांस कांहींसें डावेकडे वांकडें जावें लागलें. शहात्तरावी पलटण हिनें पूर्वींच आपलें मोठें नांव गाजविलें होतें, तीच पुढें निघाली. तटबंदी करून गांव मजबूत केलें होतें तें तत्क्षणींच त्यांनीं घेतलें, आणि तेथून निघून शत्रूंचे तोफांची पहिली रांग होती तेथें धांवत जाऊन त्यांनीं त्या तोफा आपले हस्तगत करून घेतल्या. शहात्तरावे पलटणीचे मागून तिला पाठबळ देण्याकरितां दुसऱ्या पलटणी धांवत गेल्या. दुसरे मोरच्याजवळ लढाई झाली; त्या वेळीं जनरल फ्रेजर साहेबास जखम लागून त्याचें दुखणें जिवावरचें झालें; तेव्हां कर्नल मानसन् हा त्या सैन्याचा

दींगची लढाई. ता० १३ नोव्हेंबर स. १८०४.

[stamp]

नायक झाला. पाणथळाजवळचे शत्रूंचे लोकांस दाबांत ठेवण्याकरितां कांहीं लोक मागें राहिले होते. एकामागें एक असे मोरचे सुमारें कोसभर पसरले होते, ते संगिनीच्या जोरानें घेण्याकरितां बाकीचे लोक तसेच पुढें रेंटींत रेंटींत चालले. जेव्हां गोरे लोकांनीं हल्ला करून शेवटचा मोरचा हस्तगत केला, तेव्हां आपण दीग किल्ल्याजवळ आहों आणि त्यांतून आपणांवर तोफांचा भडिमार होत आहे असें त्या विजयी लोकांस समजलें. तेव्हां त्यांस मागें हटावें लागलें. इकडे शत्रूंनीं तोफांची पहिली रांग पुनः आपले स्वाधीन करून घेतली, आणि त्या तोफा ते इंग्लिशांवरच सोडूं लागले; तरी शहात्तरावे पलटणीचा मुख्य क्याप्तन नारफर्द ह्यानें मोठा पराक्रम करून त्या पुनः घेतल्या, त्या वेळीं त्याजवळ अठावीस मात्र लोक होते. ज्या लोकांनीं मोरचे घेतले ते आतां पाणथळाजवळ जे शत्रूंचे लोक होते त्यांस घालवून देण्याकरितां तेथें परत आले त्या वेळपर्यंत ते पाणथळाजवळचे लोक दाबांत ठेवण्याकरितां एक टोळी मागें राहिली होती, तींतील लोकांनीं आपलें काम चांगलें बजावलें होतें. मोरचे घेऊन परत आलेले लोक मराठ्यांचे दृष्टीस पडतांच त्यांनीं पळ काढिला, आणि फारच जलदीनें पळाल्यामुळें पुष्कळ लोक पाणथळांतल्या दलदलींत पडून मेले.

ह्या प्रसंगीं इंग्लिशांस उत्तम प्रकारचा जय मिळाला. जिंकलेल्या होळकराचे पायदळाचा नाश होऊन जे त्यांतील लोक राहिले ते दीग येथें जाऊन लपले. दीगच्या पूर्वेस कांहीं अंतरावर मथुरा आहे, तेथें कर्नल मानसन् साहेब आला, तेव्हां लार्द लेक साहेब घोडेस्वारांनिशीं आला होता त्याची आणि ह्याची गांठ पडली. तेथें जें मोठें सैन्य एके ठिकाणीं जमलें होतें त्याचे दोन्हीही टोळ्यांनीं निरनिराळे ठिकाणीं शत्रूंचा नाश करून होळकराचे सगळे सैन्यास पळावयास लावून आपलीं निरनिराळीं कामें उत्तम रीतीनें बजाविलीं होतीं.

*इंग्लिश लोकांचे स्वार व पायदळ हीं पुनः एकत्र होतात.*

दक्षिणेकडे कर्नल वालेस साहेबानें चांदूर आणि जालना हीं ठिकाणें घेऊन होळकराचा दक्षिण देशांतील सर्व मुलूख जिंकिला; आणि कर्नल मरे हा कांहीं वेळ मागें राहिला होता, हें एके प्रकारानें कर्नल मानसन ह्यास मागें हटण्यास कारण झालें होतें, तरी त्यानें उज्जनी, इंदूर, आणि सर्व माळवा देश हीं घेतलीं.

*दक्षिण व माळवा ह्यांतील कृत्यें.*

नंतर लार्द लेक साहेबाचें सैन्य दीग किल्ल्याकडे आणि दीग शहराकडे गेलें. लढाई झाल्यावर होळकराचें सैन्य ह्या ठिकाणीं येऊन लपलें होतें. हीं ठिकाणें भरतपूरचे राजाचे ताब्यांत होतीं. लढाईस आरंभ होण्याचे

*भरतपूरच्या राजाची घातकी वर्तणूक.*

वेळीं पहिल्यानें ज्यांनीं इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लाविलें त्यांतच हा राजा होता, ह्यामुळें ह्याशीं जे करार केले होते ते ह्यास अनुकूळ होते. असें असतां त्यानें होळकरास पुष्कळ रीतींनीं साहाय्य केलें. त्यांचा पत्रव्यवहार चालला होता असें-ही मग इंग्लिशांस समजलें. दीगचे लढाईचे वेळेस त्याचे लोक इंग्लिशांबरोबर लढले होते, आणि त्याचे लोकांनीं इंग्लिशांवर तोफा सोडल्या होत्या, आणि लढाई झाल्यावर शत्रु त्याचे किल्ल्यावर जाऊन लपून राहिले होते. त्यानें हा विश्वासघात केला, ह्याकरितां त्यास शासन करणें हें आवश्यक होतें.

*दीगचा किल्ला घेतात. ता० २३ डिसेंबर सन १८०४.*

दिसेंबरचे पंधरावे तारखेचे सुमारास इंग्लिशांचें सैन्य दीग शहरापुढें आलें. शत्रु शहराचे आंत आणि सभोंवते होते, आणि त्यांनीं दोहों बाजूंस तोफा रचल्या होत्या त्या मजबुत होत्या. थोडकेच दिवसांनीं आंत शिरण्याजोगी वाट झाली, तेव्हां ती जागा हस्तगत करून घेण्याकरितां इंग्लिशांनीं आपले सैन्याचे तीन भाग केले. त्यांत उजवे बाजूचे तुकडीनें एके बाजूचे मोरचे घ्यावे, डावे बाजूचीनें दुसरे बाजूच्या तोफा वगैरे घ्याव्या, आणि तिसरे तुकडीनें एकदम हल्ला करावा ह्याप्रमाणें ठराव झाला होता. सगळे तुकड्यांस आपलीं कामें करण्यांत यश आलें, आणि इंग्लिशांनीं तें शहर घेतलें. नंतर दुसरे दिवशीं किल्ल्यांतील लोकांनीं शरण येऊन किल्ला स्वाधीन केला.

*भरतपूरचा वेढा. ता० २ जानेवारी—ता० २२ फेब्रुवारी स० १८०५.*

सभोंवतालचा जो प्रदेश राजाच्या ताब्यांत होता तो सगळा इंग्लिशांच्या स्वाधीन झाला; तरी अद्यापि त्यांस त्याची राजधानी घ्यावयाची होती; आणि ती इंग्लिशांनीं घेतल्याशिवाय होळकर आपणास साहाय्य करणारे राजाचे मुलखांतून जाईना. ह्याकरितां इंग्लिश लोक भरतपुरास वेढा घालण्याची तयारी करूं लागले. त्या शहराचा घेर सुमारें चार कोस होता, आणि सभोंवतीं मोठी उंच आणि मजबूत अशी मातीची भिंत असून तेथें मोठा खोल खंदक होता, आणि संरक्षणार्थ शूर लोकांचा एक मोठा पहाराही होता, ह्यामुळें तें शहर मजबूत झालें होतें. हल्ला करून तें शहर घेण्याविषयीं इंग्लिशांनीं पुष्कळ यत्न केले, परंतु ते सर्व निष्फळ झाले. शत्रु जिवावर उदार होऊन वेड्यासारखे लढले. मोठमोठाले धोंडे, कढलेल्या तेलानें भरलेलीं भांडीं, मोठमोठ्या तुळया, इत्यादि जे पदार्थ त्यांच्या हातीं लागले, ते सगळे त्यांनीं पुढें येणाऱ्या इंग्लिशांच्या अंगावर टाकिले. गोरे लोकही मोठ्या शौर्यानें लढले, व भिंतींत संगिनी बसवून त्यांस धरून ते चढूं लागले; परंतु जेव्हां जेव्हां त्या

भिंतीवर निरनिराळ्या ठिकाणीं एकेक मनुष्य जाऊन इंग्लिशांचें निशाण उभारायास लागे, तेव्हां तेव्हां तेथच्या तेथेंच त्याचा प्राण जाई, ह्याप्रमाणें प्रत्येक वेळीं त्यांस परत जावें लागलें. लासवाडी आणि दीग ह्या ठिकाणचे लढाईंत ज्या पलटणी शौर्यानें लढल्या होत्या, त्यांतील कांहीं लोक एके दिवशीं आम्ही लढत नाहीं असें ह्मणाले. परंतु दुसरे दिवशीं तसें न करितां तेच जिवावर उदार होऊन मोठे शौर्यानें लढले. इतकें झालें तरी इंग्लिशांचें कांहीं चाललें नाहीं, आणि भरतपूरच्या मातीच्या कोटाला कांहीं धक्का लागला नाहीं.

इंग्लिश जिवाची आशा न धरितां हल्ला करितात व किल्ल्यांतील लोक तसेंच संरक्षण करितात.

प्रत्येक हल्ला व्यर्थ जातो.

इंग्लिशांनीं वेढा घातला होता, तेव्हां त्यांचा नाश करण्यापुरतें होळकरास स्वतः सामर्थ्य नव्हतें ह्मणून, सभोंवतालचा जो मुलूख इंग्लिशांच्या ताब्यांत होता त्यांत जितका उपद्रव होईल तितका करावा, ह्या हेतूनें त्यानें आपले पदरचा सरदार अमीरखान ह्यास पाठविलें. होळकराची अशी समजूत होती कीं, ह्याप्रमाणें कांहीं नाश केला ह्मणजे वेढा घालणारे लोक तिकडे संरक्षणार्थ जातील, आणि तेणेंकरून सहजच आंतले लोकांचा बचाव होईल. अमीरखानानें आपले रानटी घोडेस्वार एके ठिकाणीं जमवून कंपनीचे नवे मिळालेले मुलखावर हल्ला केला. वाटेनें जातांना त्यांनीं गावें जाळिलीं आणि शेतें तुडविलीं. ह्या अमीरखानानें ह्याप्रमाणें हल्ला केला, तरी भरतपूरचा वेढा अगदींही हालला नाहीं. त्याचे मागें इंग्लिशांनीं आपले घोडेस्वार पाठविले. तो जिकडे जिकडे जाई तिकडे तिकडे हे घोडेस्वार त्याचे मागोमाग चालत असत. तो डोंगरांत असो, दऱ्यांत असो, नदींतून चालत असो, किंवा घोर अरण्यांत असो, त्यांनीं नेहमीं त्याचे मागें राहून शेवटीं त्याचे लुटारू लोकांचा नाश केला, आणि विजयी होऊन ते इंग्लिशांचे छावणीकडे परत आले. भरतपूरचा किल्ला हस्तगत झाला नव्हता ह्मणून अद्यापि इंग्लिशांची छावणी त्याचे समोरच होती.

अमीरखानाची लुटीकरितां स्वारी.

इंग्लिशाचे स्वार त्यास गांठून त्याचे स्वारांचा नाश करतात.

हल्ला करून भरतपूर स्वाधीन होत नाहीं, असें जेव्हां लार्ड लेक साहेबास कळलें, तेव्हां नाकेबंदी करून आपोआप शत्रु किल्ला स्वाधीन करितील तोंपर्यंत तसाच तळ देऊन राहावें असा त्यानें निश्चय केला. परंतु भरतपूरचे राजास लढाईचा कंटा-

वेढा पुरा घालतात.

ळा आला होता. त्यानें होळकरास मदत करण्याकरितां लढाई आरंभिली होती; परंतु होळकराचें सामर्थ्य नाहींसें झालें, ह्यामुळें त्यास त्याचा पक्ष सोडावासें वाटलें.

इंग्लिशांनीं वेढा घातला होता त्या वेळांत ज्या तोफा निरुपयोगी झाल्या होत्या, त्या काढून त्यांचे जागीं ठेवण्याकरितां नवीन तोफा दररोज इंग्लिशांचे छावणींत येत असत. अन्नपाण्याचा वगैरे पुरवठा वरचेवर होत असे, ह्यामुळें लार्ड लेक साहेबाची छावणी शहरापुढें पहिल्यानें ज्या ठिकाणीं होती तें ठिकाण जरी त्यानें कांहीं वेळ सोडून दिलें होतें, तरी आपला हेतु सिद्धीस नेल्याशिवाय तो तेथून निघून जाईल ह्याचें कांहींच चिन्ह दिसत नव्हतें. ह्याकरितां राजानें तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां त्याशीं इंग्लिशांनीं तह केला. त्यांत जे करार ठरले ते त्यास बरेच अनुकूळ होते. ते येणेंप्रमाणें:—लढाईचे खर्चाबद्दल त्यानें वीस लक्ष रुपये द्यावे, इंग्लिशांनीं जो मुलूख त्यास पूर्वीं दिला होता तो त्यानें परत द्यावा, आपला खरेपणा नीट दिसून येईपर्यंत त्यानें दीगचा किल्ला इंग्लिशांचे ताब्यांत ठेवावा, आणि आपली पुढें चांगली वर्तणूक राहील अशी इंग्लिशांची खातरी करण्याकरितां आपले चार पुत्र ओलीस द्यावे.

भरतपूरचे राजाबरोबर तह. ता. १७ एप्रिल स० १८०५.

इकडे शिंदा पुनः लढाईची तयारी करीत असतां त्यास होळकर जाऊन मिळाला. पूर्वीं शिंदा आणि इंग्लिश ह्यांचेमध्यें जो तह झाला तो मागें सांगितलाच आहे; तेव्हांपासूनच त्यांचेमध्यें कलह होता. पुढें भरतपूर इंग्लिशांस मिळेनासें झालें, तेव्हांपासून तर उत्तरोत्तर शिंद्याची वर्तणूक फारच संदिग्ध दिसूं लागली. तेथून वेढा घालण्याचे कामांतून जेव्हां लेक साहेब मोकळा झाला, तेव्हां तो शिंद्याचे आणि त्याचा नवा साथी होळकर ह्यांचे पाठीस लागला. इंग्लिश येतांच ते दोघेही मागें हटले.

होळकर शिंद्यास मिळतो. ता. २१ एप्रिल स० १८०५.

ह्याच वेळेचे सुमारें मार्क्किस कार्नवालिस विलायतेहून गवरनर जनरलचे कामावर आला, आणि मार्क्किस् वेलस्लीनें जसा कारभार चालविला तसा न चालवितां आपण निराळेच रीतीनें वागण्याचा त्यानें निश्चय केला. स्वस्थता जितकी राखवेल तितकी राखावी असा त्यास हुकूम होता, परंतु ह्यास उत्तम उपाय कोणता ह्याविषयीं मत घेण्याकरितां तो लार्ड लेक साहेबाचे भेटीस येत असतां वाटेंतच आजारी पडून काशीचे जवळ मरण पावला. सर जार्ज बार्लो हा कौन्सिलांतील मुख्यां-

लार्ड कार्नवालीस हिंदुस्थानांत परत येतो. ता. ३० जुलै स. १८०५.

पैकींच होता, त्याची नेमणूक गव्हरनर जनरलच्या जाग्यावर झाली, तेव्हां त्यानें आपले अगोदरचे अधिकाऱ्याचे उद्देश सिद्धीस नेण्याचें मनावर घेऊन शिंदा आणि होळकर ह्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. शिंदा तत्क्षणींच तह करण्यास कबूल झाला. त्या तहांतील ठराव त्यास बरेच अनुकूळ होते. पूर्वी जनरल वेलस्लीनें जो त्यांशीं तह केला होता तो कायम झाला; ग्वाल्हेरचा किल्ला इंग्लिशांनीं दुसऱ्यानें घेतला होता, त्यास हल्लीं शिंद्यानें वारसा लावला, ह्यामुळें तो किल्ला आणि गोहदच्या राण्याचा कांहीं मुलूख इंग्लिशांनीं त्यास दिला. गोहदचा राणा हा पूर्वी इंग्लिशांकडच्या पैकींच होता. इंग्लिशांनीं शिंद्यास पेनशन देऊन, त्याचे बायकोस आणि मुलीस आपले ताब्यांतील कांहीं मुलूख दिला. इकडे इतकें झालें, तरी होळकरानें अद्यापि लढाई सोडून दिली नव्हती; तो शीक लोक व काबूलचा राजा हे साहाय्य देतील ह्या भरंवशावर पंजाबाकडे पळून गेला. त्यास वाटेनें अडथळा करण्याकरितां इंग्लिशांनीं सैन्य पाठविलें, परंतु तो त्या लोकांस फसवून शीक लोकांच्या देशास जाऊन पोहोंचला. तेव्हां लेक साहेबाचें सैन्य पाठलाग करूं लागलें. तें सैन्य बीया नदीचे कांठीं गेलें, तेव्हां शीक लोक होळकरास साहाय्य देईनात, ह्मणून तो दुष्ट आणि विश्वासघातकी असा शत्रु इंग्लिशांच्या हातीं आला. परंतु त्याच वेळेस लार्ड लेक साहेबास त्याशीं तह करण्याविषयीं हुकूम झाला. ही नवीन व्यवस्था चांगली नव्हे, ह्मणून शूर आणि विजयी असा जो लार्ड लेक साहेब त्यानें बहुत वेळ बजावलें परंतु त्याचे बोलण्याकडे लक्ष न देतां इंग्लिशांनीं जो होळकराचा मुलूख जिंकिला होता, तो त्यास परत दिला, त्या मुलखाकडे नेमलेल्या मार्गानें जाण्याची त्यास परवानगी मिळाली, आणि चंबळा नदीचे उत्तरेकडील जो मुलूख त्यांनीं आपणाकरितां ठेविला होता तोही सोडून दिला. फारच निर्दय व घातक असा जो इंग्लिशांचा शत्रु त्यास ह्या रीतीनें त्यांनीं अब्रूस चढवून श्रीमंत केलें.

त्याचा मृत्यु. ता. ५ अक्टोबर स० १८०५.

सर जार्ज बार्लो गवरनर जनरल होतो.

शिंद्याबरोबरतह. ता. २३ नवंबर स. १८०५.

होळकर पंजाबांत पळून जातो.

त्याजबरोबर तह. ता. २४ डिसेंबर स. १८०५.

ह्यापेक्षांही वाईट कृत्यें अद्यापि सांगावयाचीं राहिलीं आहेत. कांहींही नुकसान झालें तरी स्वस्थता असावी, मग ती इंग्लिशांचे अब्रूस बाधक असो किंवा नसो, ह्याप्रमाणें बार्लो साहेबाचा उद्देश होता, ह्मणून त्यानें इंग्लिशांचे मुलखाची उत्तर मर्यादा यमुना नदी असावी, असा आग्रह धरिला. त्या नदीचे पलीकडील बहुतेक संस्थानिकांशीं जो तह ठरला होता

सर जार्ज बार्लो ह्याची तह करण्याची पद्धत.

तोही त्यानें मोडून टाकिला. जयपूर आणि बुंदी येथील राजे पहिल्यापासून खरेपणानें व विश्वासूकपणानें वागत होते आणि लढाईचे वेळीं आपले शक्त्यनुसार इंग्लिशांची पाठ राखीत होते, असें असतां त्यांस इंग्लिशांनीं साहाय्य केलें नाहीं. उत्तरेकडील इतर सर्व राजांपेक्षां हे दोघे इंग्लिशांच्या आश्रयास अधिक योग्य असून होळकर आणि शिंदा हे त्यांचा सूड उगवीत असतां इंग्लिशांनीं त्यांचें कांहींच संरक्षण केलें नाहीं. इतकें सर्व बार्लो साहेबानें केलें. त्यानें ह्याप्रमाणें आपलेच कार्यावर लक्ष देऊन असाच क्रम चालविला असता, आणि तेणेंकरून भरतपूर आणि माकरी येथील राजांचा नाश झाला असता; परंतु तितक्यांत त्याची कानउघडणी करून त्यास लार्ड लेक साहेबानें सांगितलें कीं, ही रीति चांगली नव्हे. लढाईचे वेळेस भरतपूरचा राजा जयपूरच्या विश्वासूक राजाप्रमाणें अगदीं न वागतां फार गैर रीतीनें वागला, असें असून लेक साहेबानें तें अगदीं मनांत न आणितां, त्याविषयीं ह्याप्रमाणें बार्लो साहेबास सांगितलें.

हिंदुस्थानचे मोठमोठाले इतिहासकर्ते आणि विशेषेंकरून ज्याचे हातून शिंदा आणि होळकर ह्यांशीं तह झाला, तो कारभारी सर जान मालकम, हे, ह्या वेळेस जो मूर्खपणानें आणि अविचारानें राज्यकारभार चालला होता त्याची निर्भर्त्सना करितात.

ह्या योगानें सर्व राज्यांत स्वस्थता झाली; परंतु ती होण्याकरितां जें नुकसान झालें तें मोठे लढाईनें देखील झालें नसतें; कारण इंग्लिश लोकांनीं मनुष्यांचे जिवापेक्षां अब्रूची योग्यता अधिक मानावी हा त्यांचा धर्म होय. तात्पर्य हेंच कीं, ह्या स्वस्थतेनें जरी लोकांचे जीव वांचले तरी त्यांची अब्रू गेली.

बारावा भाग समाप्त.

# भाग तेरावा.

## सर जार्ज बार्लो व लार्ड मिंतो ह्यांची कारकीर्द.

इसवी सन १८०६ पासून १८१३ पर्यंत.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखांत अगदीं स्वस्थता—वेलूर येथें बंड—तेथें इंग्लिश शिपायांची कत्तल—अर्काटाहून घोडेस्वार येतात—बंड मोडून टाकितात—त्या बंडाचीं कारणें—लार्ड मिंतो गवरनर जनरल—मद्रासचा गवरनर सर जार्ज बार्लो—स्वस्थता मोडावी लागते—पर्शिया व काबूल येथें वकील जातात—सर जार्ज बार्लो ह्यावर लोकांची नाखुशी—तंबूबद्दल मक्ता—इंग्लिश अम्मलदार बंडावा करितात—श्रीरंगपट्टण येथील कारभार—ते कामावर परत येतात—पुनः स्वस्थता—जावा, बोर्बोन, व ऐल आफ् फ्रान्स ह्यांजवर स्वाऱ्या—नेपाळाशीं लढाई होण्याचा संभव—लार्ड मिंतो हिंदुस्थानांतून जातो.

आतां हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या सर्व मुलखांत अगदीं स्वस्थता झाली; परंतु त्या मुलखाचे पलीकडे नेहमीं दंगे होऊन लढाया होत असत. सर जार्ज बार्लो ह्याचे जे पूर्वी हेतु होते ते अद्यापिही होतेच, आणि त्याप्रमाणेंच त्यास विलायतेहून हुकूम येत असत. हिंदुस्थानांतील राजे एकमेकांशीं कलह करीत तरी तो त्यांमध्यें पडत नव्हता. मोठमोठाले हेतु सिद्धीस नेण्याकरितां इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत एवढा अंमल मिळविला, त्याचें त्यानें कांहींच सार्थक केलें नाहीं. मराठ्यांचे राजे एकमेकांशीं कलह करितात, ह्यामुळें त्यांस इंग्लिशांबरोबर लढाई करण्यास फावत नाहीं, व तेणेंकरून इंग्लिशांचा नफा होतो, असेंच त्यांस वाटून संतोष होत असे. (हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखांत स्वस्थता.)

जरी वरील गोष्टींच्या संबंधानें पाहिलें असतां सर जार्ज बार्लो साहेबाची राज्यकारभाराची रीत नापसंत करणें प्राप्त आहे, तरी त्यानें स्वस्थतेच्या योगानें आपले जवळचे लोकांचें कल्याण केलें, आणि बंगाल्यांतील मुलखांचा कारभार चांगले रीतीनें चालविला, त्याबद्दल त्याची स्तुति करणें हें योग्य आहे.

ह्याप्रमाणें चोहोंकडे स्वस्थता असतां, मद्रासेजवळ दंगा झाल्याचें वर्तमान ऐकून हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखांत रहाणारे लोक घाबरले. मद्रासचे किल्ल्याचे पश्चिमेस सुमारें बेचाळीस कोसांवर वेलूर ह्मणून शहर आहे, त्या ठिकाणचे काळे लोकांनीं उठून इ० स० १८०६ त जुलै महिन्याचे दहावे तार- (वेलूरचें बंड ता. १० जुलै स. १८०६.)

इंग्लिश शिपायांचा घात.

खेस पहांटेस अंधार असतांनाच, तेथें जे गोरे सरदार व सोजीर होते त्यांतील पुष्कळ लोकांस ठार मारिलें. कोणास न समजूं देतां हळूच ते आपले नेहमींचे कवाईत करण्याचे जागीं जमले; आणि तेथून गोरे लोकांच्या बराकींकडे जाऊन त्यांनीं त्यांस वेढा घातला; आणि दारापुढें एक तोफ ठेवून ती वरचेवर आंतले शस्त्रहीन मनुष्यांवर ते सोडीत असत. गोरे लोकांजवळ दारू नव्हती ह्मणून त्यांस उलट तोफा सोडण्याचा उपाय नव्हता; आणि शत्रु पुष्कळ होते ह्मणून त्यांजवर त्यांस हल्ला करण्याचेंही सामर्थ्य नव्हतें. कांहीं बंडवाले गोरे लोकांतील कामगारांचे घरांपाशीं जाऊन टपत बसले आणि त्यांतून जे जे बाहेर येत त्यांस ते ठार मारून टाकीत. सैन्याचा मुख्य कर्नल फान्कोर्त ह्यास त्यांनीं इतकें जखमी केलें कीं, तो अगदीं मरणोन्मुख झाला. कांहींजण दारूचें भांडार स्वाधीन करून घेण्याकरितां तिकडे गेले; आणि तिसरे टोळींतले लोकांनीं इंग्लिशांच्या घरांत शिरून आंत जे जे लोक सांपडले त्यांस ठार मारिलें. एके घरांत कांहीं कामगारांनीं आपला जीव राखण्याकरितां मोठें शौर्य खर्चिलें. त्यांतील कांहीं असामी उजाडल्यानंतर थोड्या वेळानें मोठे युक्तीनें बराकींत शिरले, आणि ज्या लोकांस जखमा लागल्या नव्हत्या त्यांस दारापाशीं नेऊन त्यांनीं तेथील तोफ घेतली, आणि लढाई करितां करितां मध्यें मार्ग करून ते बाहेर निघालें आणि एके दरवाज्यावर चढले. मग त्यांनीं कांहीं वेळ आपले शत्रूंचें कांहीं चालूं दिलें नाहीं, पण शेवटीं लढाईत वरिष्ठ कामगार पडले; तेव्हां ब्रोदी नांवाचा एक हवालदार बाकीचे लोकांचा मुख्य झाला.

तेथून चार पांच कोसांवर अर्काट हें गांव आहे, तेथें ह्या गोष्टीचें वर्तमान जाऊन पोहोंचलें. इकडे ब्रोदी हा आपले लोकांसहित जिवावर

अरकाटाहून कुमक येते.

उदार होऊन मोठे शौर्यानें लढत असतां त्यास कांहीं अंतरावर धुळीचे लोट दिसूं लागले, त्यावरून आपणास मदत येत आहे असें त्यास समजलें. करोलांची एक पलटण आणि काळे घोडेस्वारांची सातवी पलटण, ह्यांतील लोक घोडे भरधांव पळवीत साहाय्यास येत होते. करोलांचा मुख्य जो स्वार होता तो सर्वांपुढें आपला घोडा भरधांव काढून दरवाज्यापाशीं येऊन

स्वार लोक वेलूरच्या रस्त्यांत लढतात.

पोहोंचला. त्याला वर घेण्याकरितां तेथील लोकांनीं सोजिरांच्या पट्यांची एक दोरी करून खालीं सोडिली, तिचे साहाय्यानें तो मोठ्या आयासानें वर चढला. तो भिंतीवर गेल्यानंतर तेथील गोरे लोकांचा मुख्य झाला; मग त्यांनीं आपले देशबंधूंस मारणारांवर आणखी एकदां हल्ला केला. करोलांनीं

आपल्याबरोबर लहान लहान तोफा आणिल्या होत्या, त्यांचा त्या किल्ल्याच्या दरवाज्यावर भडिमार करून ते बंडवाल्यांवर हल्ला करीत चालले, आणि ज्यांनीं इंग्लिश लोक मारिले त्या दुष्टांतील शेंकडों लोकांचा प्राण जाईपर्यंत त्यांनीं आपल्या हातच्या तरवारी ठेविल्या नाहींत.

हा जो मोठा भयंकर दंगा झाला ह्यास बहुत कारणें झालीं. काळे लोकांस असा हुकूम झाला होता कीं, हिंदु लोक आपली जात ओळखतां यावी ह्मणून कपाळीं गंध वगैरे लावितात, तें कांहीं न लावितां तुह्मीं कवाइतीचे जागीं यावें, सर्वांनीं दाढी मिशा एकसारख्या ठेवाव्या, आणि सर्वांचे पागोट्यांची चाल हुकुमाप्रमाणें असावी. ह्या प्रकारचें पागोटें त्या लोकांस इंग्रेजांच्या टोपीसारखें वाटलें. सरकारचे मनांत जुलूम करून आपणांस ख्रिस्ती धर्मांत न्यावें असें आहे ह्मणून हे नवीन हुकूम झाले असें पुष्कळांस वाटलें. काळे शिपायांस कोणते तरी रीतीनें इंग्लिशांचें राज्य न आवडून त्यांनीं बंड करावें असें ज्यांचे मनांत होतें, त्यांनीं त्यांस चिथावून देऊन पुष्कळ मसलती सांगितल्या, तेणेंकरून इंग्लिशांचे मनांत बाटविण्याचें आहे हें त्यांस अधिकाधिक वाटूं लागलें. ही गोष्ट खरी, परंतु दंगा झाला ह्याचें कारण ह्याखेरीज निराळें असून तें एकाएकीं लक्षांत येण्याजोगें नव्हतें. वेलूर येथें टिपू साहेबाचे मुलगे बंदींत होते, त्यांस इंग्लिश चांगले प्रकारें वागवीत असत. त्यांस पुष्कळ लोकांबरोबर बोलण्याचालण्याची मोकळीक होती. पूर्वी ह्मैसूर येथें मुसलमानांची बढती होती हें आठवून, वेलूर येथील पुष्कळ लोकांस वाईट वाटत असे; आणि बहुत लोक टिपूसाहेबाचे पुत्रांस त्यांचे वडिलांची पदवी प्राप्त होण्यासाठीं चोरून यत्न करीत असत. तेथील भिकारी, फकीर व दरवेशी हे प्रत्येकापाशीं जाऊन इंग्लिशांच्या जुलमाच्या कितीएक गोष्टी सांगत असत; आणि मुसलमानांच्या संस्थानांतील लोक आपणास मदत करण्यास सिद्ध आहेत अशा गप्पा मारीत असत. वेलूर येथील पलटणींत बहुतकरून ह्मैसूरचे लोक आणि मुसलमान होते, ह्यामुळें त्यांस ह्या गप्पा आवडत असत. दंग्याचे वेळेस टिपू साहेबाचें हिरवें निशाण उभारलें होतें, आणि त्याचे पुत्रांनीं लोकांस आपणाकरितां बंड करण्याविषयीं जातीनें जरी भर दिली नसली, तरी तें मुसलमानाचें घराणें पुन्हा पूर्वीचे पदवीवर स्थापित करण्याचें बंडवाल्यांचे मनांत होतें हें खचीत आहे; आणि सरकार आपल्या धर्माचे आड येत आहे, ह्याविषयींच्या भलभलत्या गोष्टीही त्यांस खऱ्या वाटत.

इंग्लिशांनीं टिपू साहेबाचे पुत्रांस कलकत्ता एथें नेऊन ठेविलें, तेथेंही त्यांजवर सक्त पहारा नव्हता. बंडवाल्यांतील मुख्य होते त्यांची चौकशी

त्या बंडाचीं कारणें.

बंडवाल्यांबरोबर वर्तणूक.

करून, त्यांतील कांहीं जणांस ठार मारिलें व कांहींजण बरतर्फ केले, तेणेंकरून पुन्हा चोहोंकडे स्वस्थता झाली. तरी कितीएक महिनेपर्यंत काळे पलटणींतील लोक व त्यांजवरचे साहेब ह्यांचा एकमेकांवर दंग्याचे पूर्वींप्रमाणें विश्वास नव्हता. सरकारांनीं काळे लोकांचे कपड्यांबद्दल जे कायदे केले होते ते बदलले.

दुसऱ्या ठिकाणचीं बंडें दबतात.

वेलूर एथेंच बंड होऊन राहिलें असें नाहीं. शिकंदराबाद, बळजाबाद, नंदीदुर्ग, इत्यादि ठिकाणीं बंडाचीं चिन्हें दिसूं लागलीं; परंतु कांहीं मुख्य अंमलदारांनीं चांगला बंदोबस्त ठेविला, व कांहीं भले होते ह्मणून त्यांनीं शिपायांस न आवडणारें पागोटें घालण्याचा आग्रह केला नाहीं, ह्यामुळें बंड होण्याचें राहिलें.

लार्द मिंतो साहेब येतो.

दंगा करणारे लोकांची चौकशी चालली होती, तों इकडे गवर्नर जनरलचे जाग्यावर लार्द मिंतो साहेबाची कांहीं वेळापूर्वीं नेमणूक झाली होती, त्या जाग्यावर येण्याकरितां तो मद्रास येथें आला आणि तेथें कांहीं वेळ मुक्काम करून कलकत्त्यास गेला; आणि मद्रासचा गवर्नर विलायतेस गेला होता त्याची जागा सर जार्ज बार्लो ह्यास मिळाली.

स्वस्थता राखण्याचा यत्न सोडावा लागतो.

हिंदुस्थानांतले राजे एकमेकांमध्यें कलह करीत असतां आपण मध्यें पडूं नये असा बार्लो साहेबाच्या प्रमाणेंच लार्द मिंतो साहेबाचा निश्चय होता, आणि आपला वेळ आपले मुलखांतले राज्यकारभारांत घालवावा असा त्याचा बेत होता, व विलायतेंतील हुकूमही त्यास तसाच होता, तरी ती पूर्वींची राज्यकारभाराची रीत त्यास सोडून द्यावी लागली. त्यास असें दिसून आलें कीं, जेथें वास्तविक इंग्लिशांच्या आश्रयाची गरज आहे तेथें तो न दिल्यास आपणास कांहीं नफा व्हावयाचा तो एकीकडेच राहून, हिंदुस्थानांत जो इंग्लिशांचा मुलूख आहे त्यास देखील धोका येईल. अमीरखान ह्या लुटारू सरदाराविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे, त्यानें इंग्लिश कोणास मदत देत नाहींत ह्या गोष्टीवर पक्का भरंवसा ठेवून वऱ्हाडचे राजाचे मुलखावर हल्ला केला; परंतु गवर्नर जनरलाच्या हुकुमावरून इंग्लिशांचें सैन्य त्यास अडथळा करण्याकरितां गेलें, तेव्हां तो जलद पळून दूरचे मुलखांत लुटालूट करण्याकरितां गेला.

पेशव्याचे प्रजेपैकीं कांहीं बेकैदी लोकांस त्याचे ताब्यांत आणण्याकरितां इंग्लिशांनीं त्यास मदत दिली. निजाम हा पूर्वीं इंग्लिशांकडलाच होता, ह्याकरितां त्याच्याही मुलखाच्या कारभारांत गवर्नर जनरल मन घालं

लागला, आणि त्यानें निजामाचे मनांत नसतां हैदराबादचे दरबारांत प्रधानाचे पदवीवर एक मनुष्य नेमिला. ती जागा त्यास मिळावी हें गवरनर जनरलाचे मनांतच होतें.

पुणें व हैदराबाद येथील प्रकार.

फ्रेंच आणि रशियन हे डोंगरी देशांतून उत्तरेकडे येऊन हल्ला करणार आहेत, ह्मणून हिंदुस्थानांत राहाणारे इंग्लिश लोकांस त्या वेळेस भय पडलें होतें. हल्लीं असें भय अगदीं नाहींसें झालें असें नाहीं खरें, परंतु (ज्या वेळेची गोष्ट चालली आहे) त्या वेळेस तर हें भय फारच होतें. ह्याकरितां इंग्लिशांनीं काबूलचे राजाकडे वकील, नजरनजराणें वगैरे देऊन पाठविला. परंतु त्या देशांत आंतल्याआंतच कांहीं दंगा होता ह्यामुळें इंग्लिशांचे मनाप्रमाणें तह झाला नाहीं. इराणचे शहाकडे त्यांनीं वकील पाठविला होता त्याचा बराच उपयोग झाला. हे दोन वकील पाठविल्यामुळें, इंग्लिशांस ह्या देशांची पुरी माहिती नव्हती ती झाली.

परराज्यांतील दरबारांत इंग्लिशांचा वकील जातो.

मद्रासचा गवर्नर सर जार्ज बार्लो हा तेथील लोकांस अगदीं आवडत नव्हता. हा गवर्नर जनरल असतां कोर्ट आफ डैरेक्तर्स ह्यांच्या हुकुमावरून, ह्याचा काटकसरीनें खर्च करण्याचा स्वभाव पडून गेला होता; तो स्वभाव हा मद्रासेस आला तरी होताच, ह्यामुळें जरी सरकारचा खर्च कमी करण्याचें त्याचे मनांत होतें, तरी मद्रासचे सैन्यांतील अधिकाऱ्यांस नाखुष होण्यास मुख्य कारण बंगाल सरकारचाच हुकूम झाला. पलटणींतल्या अधिकाऱ्यांस आपले लोकांस तंबू पुरविण्याबद्दल कांहीं नेमणूक असे, ती नेमणूक बंद झाली; ह्या कारणानें त्या सर्व अधिकाऱ्यांस राग आला; व त्यांच्या कमांदर इनचीफ साहेबास कौन्सिलांत बसण्याची परवानगी नव्हती, हें कलहास दुसरें कारण झालें.

सर जार्ज बार्लोवर मद्रासचे लोकांची नाखुषी.

तंबूचा मक्ता.

पलटणींतील कामगार दिवसानुदिवस जास्ती नाखुष होऊं लागले. कर्नल जे. मन्रो ह्यानें तंबूच्या नेमणुकीविषयीं रिपोर्ट केला होता, त्याजवर भलतेच आरोप आणून सैन्याविषयीं तो सरकारांत खोटेंच समजावितो,' असें ते ह्मणूं लागले. नंतर थोडे वेळानें अशी गोष्ट झाली कीं, कमांदर इनचीफ कर्नल माकदोनल ह्यास कौन्सिलामध्यें बसण्याची परवानगी नसल्यामुळें राग येऊन त्यानें कर्नल मन्रो ह्यास कैदेंत ठेविलें. ह्याप्रमाणें मद्रासेंत दोन तट पडले. एका तटाचा (ह्मणजे कर्नल मन्रो ज्यांत होता त्याचा) मुख्य गवर्नर होता आणि दुसरे तटा-

मद्रास ह्या इलाख्यांतील अधिकाऱ्यांची नाखुषी.

चा मुख्य जनरल माकदोनल हा होता. गवर्नर व त्याजकडील सर्व मंडळी ह्यांनीं मनूरो ह्यास कैदेंतून सोडण्याविषयीं हुकूम दिला; पण कमांदर इनचीफ त्यांचा हुकूम मानीना, तेव्हां त्यांनीं आपणच त्या कैदीस सोडिलें. हा जास्ती अपमान झाला, ह्यामुळें जनरल मांकदोनल ह्यास राग येऊन तो राजीनामा देऊन विलायतेस गेला. तो गेल्यानंतर गवर्नरानें अदजूतंत जनरल आणि देप्युती अदजूतंत जनरल, ह्यांस कांहीं वेळ कामावरून काढिलें. ह्याचें कारण असें होतें कीं, कमांदर इनचीफ गेला तेव्हां त्यानें एक सरकारचे विरुद्ध हुकूम लिहून ठेविला होता. तो त्यांनीं प्रसिद्ध केला. गव्हर्नर जनरलाकडे सरकारावर पुष्कळ अर्ज्या झाल्या, त्यांजवर सैन्यांतील पुष्कळ अधिकाऱ्यांच्या सह्या होत्या, ह्यामुळें त्यांपैकीं कितीएकांस कांहीं वेळपर्यंत कामावरून काढिलें, व कितीएकांस अगदींच बरतर्फ केलें. ह्या कृत्यावरून वैमनस्य जास्तीच वाढत चाललें. हा वेळपर्यंत मुख्य मुख्य अधिकारी मात्र नाखुष होते; परंतु आतां लोक

मद्रासचें बंड.

देखील तसेच होत चालले. मछलीपट्टण येथें तर उघड बंडच झालें. एक आरोप आला होता त्याचा जबाब देण्याविषयीं श्रीरंगपट्टण एथील काळे लोक व त्यांजवरचे कामगार ह्यांमध्यें एक हुकूम फिरला होता, त्याबद्दल कितीएक अधिकाऱ्यांस राग येऊन ते उघड आपले लोकांस बंड करण्याविषयीं भर देऊं लागले. ह्या योगानें चितळदुर्गाहून श्रीरंगपट्टणास एक बंडखोर पलटण जात होती तिची आणि विश्वासूक काळे आणि गोरे लोक ह्यांतील कांहीं लोकांची एक लहानशी लढाई झाली.

अधिकारी लोक पुन्हा आपल्या कामावर येतात.

शिकंदराबाद येथेंही बंड झालें होतें, परंतु कोणते रीतीनें वागण्याचा आपला धर्म आहे हें गोरे कामगारांच्या लक्षांत लवकरच आलें. इंग्लिशांनीं शिकंदराबादेस पुण्याचा रेसिदेंत कर्नल क्लोस ह्यास पाठविलें. तेथें पहिल्यानें त्याचें बोलणें कोणीं जुमानिलें नाहीं, तरी लवकरच त्यानें दोन गोष्टी सांगून सर्वांचें ऐक्य केलें. शिकंदराबाद येथील लोकांप्रमाणेंच श्रीरंगपट्टणचे वगैरे बंडखोर लोकांनीं ऐक्य करून घेतलें. इतक्यांत आपणास मद्रासेस जाणें आवश्यक आहे असें लार्ड मिंतो ह्यास वाटल्यावरून तो तिकडे गेला होता, त्यास त्या बंडखोर लोकांनीं आपणास पश्चात्ताप झाल्याविषयीं एक विनंतीपत्र लिहिलें. सरकारानें कांहीं कामगार बरतर्फ केले व कांहीं जणांचे अपराध माफ केले. असें झाल्यावर पुन्हा पहिल्याप्रमाणें चोहोंकडे स्वस्थता झाली.

लार्ड मिंतो ह्याचे कारकीर्दींत हिंदुस्थानांत लढाई वगैरे कांहीं झाली नाहीं; तरी तेथील सैन्याचे लोक परदेशामध्यें लढाई करून जय मिळवीतच होते. त्यांनीं संपन्न व सुपीक जावा बेट जिंकिलें, बोर्बोन व ऐल आफ् फ्रान्स हींही बेटें घेतलीं, आणि काळे लोक आपले देशांत जसे शौर्यानें व निष्ठेनें लढत तसे या समयीं ते परदेशांत लढले.

जावा, बोर्बोन, व ऐल आफ्फ्रान्स एथें जय.

लार्ड मिंतो साहेब विलायतेस गेला तेव्हां हिंदुस्थानांत स्वस्थता होती तरी ती फार वेळ टिकेल असें त्या वेळेस वाटत नव्हतें. बंगाल्याचे उत्तरेस ह्मणजे हिंदुस्थानचे उत्तरेस आणि ईशान्येस नेपाळ ह्मणून एक डोंगरी देश आहे, त्यांत राहाणारे लोकांशीं इंग्लिशांच्या सरहद्दीविषयीं वाद, लार्ड मिंतो इंग्लंदास गेल्यावर, उत्पन्न झाला. कांहीं वेळानंतर नेपाळचे राजानें कंपनीचे ताब्यांतील एका मनुष्याची जमीन आपले स्वाधीन करून घेतली. गुरखे लोक हे फार शूर व दांडगे आहेत. ते आपले देशांत लढाई करीत असतां, त्यांनीं कंपनीच्या कांहीं मुलखावर हल्ला करून तेथें एक किल्ला बांधिला. एक लहानशी टोळी त्यांजवर जाऊन तिनें त्यांस मागें हटविलें. त्या समयीं त्यांची वर्तणूक व त्यांचें बोलणें हीं इतकीं मगरुरीचीं होतीं कीं, त्यांच्याशीं लढाई होण्याचा वेळ समीप आला असें त्या वेळेस स्पष्ट दिसत होतें.

लढाईचीं चिन्हें दिसूं लागतात.

ब्रह्मदेशांतील चितगांवचे सीमेवरील लोकांशींही इंग्लिशांचा वाद होता; आणि हिंदुस्थानचे मध्यभागीं एक नवीन शत्रु उत्पन्न झाला होता त्याविषयीं लवकरच लिहूं.

ह्याप्रमाणें चोहोंकडे शत्रु उत्पन्न झाले असतां लार्ड मिंतो गेला, तेव्हां अर्थातच पाठीमागें आपले जागेवर येणारे अधिकाऱ्यांस त्यानें लढाई करण्याचें काम उत्पन्न करून ठेविलें होतें.

तेरावा भाग समाप्त.

# भाग चवदावा.

## नेपाळची लढाई.

इसवी सन १८१३ पासून १८१७ पर्यंत.

अर्ल आफ् मोइरा हिंदुस्थानांत येतो—गुरखे लोक—ते सरहद्दीवरील इंग्लिशांच्या लहान टोळीवर हल्ला करितात—त्यांजबरोबर लढाई—नेपाळावर हल्ला करण्याची तजवीज—त्या देशाचें वर्णन—सैन्याच्या दुसऱ्या भागानें केलेलीं कृत्यें—कलुंगाचा वेढा—जैटकावर स्वारी—तिसरे व चवथे भागाचा अपजय—पहिला भाग चांगलीं कामें करितो—नळगड सोडितात—कांहीं वेळ तहकुबी—रामगड सोडितात—मलूनचे शिखरावर हल्ला—जय—अलमोडा घेतात—नेपाळचे लोक तहाचें बोलणें लावितात—तहाचीं कलमें—लढाई पुन्हा सुरू होते—आक्तरलोनी चिग्रिया घाटीच्या मार्गापासून फिरतो—मकानपुरची लढाई—हरिहरपुर घेतात—तह शेवटास जातो—मराठ्यांतील कारस्थानें—पेंढारी—त्यांची लढाईची रीत—कंपनीच्या मुलखांत लढण्याकरितां स्वारी—पेंढाऱ्यांच्या टोळीवर हल्ला करितात—त्यांचा नाश करण्याची तयारी—इंग्लिशांचें सैन्य पुष्कळ जमतें.

अर्ल आफ् मोइरा ऊर्फ मार्क्विस आफ् हेस्तिंग्स ह्याची गवर्नर जनरलचे जाग्यावर नेमणूक झाली. तो इ० स० १८१३ त आक्तोबरचे चवथे तारखेस कलकत्त्यास येऊन उतरला. तेथें येतांच त्यास लढाईची तयारी करावी लागली. हिंदुस्थानांतील इतर राज्यांचे कारभारांत मन घालावें किंवा न घालावें ह्याविषयीं विचार करण्याची ही वेळ नव्हती. इंग्लिशांच्या मुलखाचे उत्तर सीमेवरचा शत्रु फार उद्धट असून तो दुसऱ्याचे मुलखांत शिरावयास पाहत असे. तहाचे बोलण्यास किंवा युक्तीच्या चार गोष्टींस मान्य होण्यासारखा तो शत्रु नव्हता.

अर्ल आफ् मोइरा हा हिंदुस्थानांत येतो.

गुरखे लोकांनीं आपले देशांत मुलूख मिळविला असून दुसऱ्याचे देशांत आपला शिरकाव करण्याकडे त्यांचें किती लक्ष होतें हें पूर्वीच सांगितलें आहे. इ० स० १८१४ चे मे महिन्यांत त्यांचें सरकार व इंग्लिश सरकार ह्यांच्यामध्यें तहाचीं कलमें ठरत असतां भौवतालचे सीमेवर एक लहानसें इंग्लिशांचें सैन्य होतें त्याजवर त्यांपैकीं कांहीं लोकांनीं हल्ला करून सर्वांस ठार मारिलें. हा अपमान उपेक्षा करण्याजोगा नव्हता. इंग्लिश तत्काळ सैन्य जमवि-

गुरखे लोकांबरोबर कज्जा.

ण्याची तयारी करूं लागले. परंतु ती वेळ लष्करी काम चालविण्यास अनुकूळ नव्हती, ह्मणून लढाईस आरंभ झाला नाहीं. त्या वेळेस गवर्नर जनरल हा कमांदर इन्चीफ होता. तो जातीनेंच कंपनीच्या मुलखाचे मध्यभागीं गेला; आणि तेथें जलदीनें लढाईची तयारी चालवून बंगालचे नैर्ऋत्येच्या आणि दक्षिणदेशीचे उत्तरेच्या मुलखाचें पेंढाऱ्यांपासून संरक्षण व्हावें, ह्याकरितां त्यानें तेथें उत्तम रीतीचा बंदोबस्त केला. पेंढारी हे नवीन शत्रु उत्पन्न झाले, ह्याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे.

सर्व सिद्धता होऊन मोहिमेचा बेत ठरला. इंग्लिशांनीं आपले सैन्याच्या चार तुकड्या केल्या. त्यांत जनरल आक्तरलोनी ह्यानें पहिली तुकडी घेऊन पश्चिमेकडील देशावर हल्ला करावा; जनरल गिलेस्पी ह्यानें दुसरी तुकडी घेऊन नेपाळ देशांत गेल्यावर पहिल्यानें डोंगरांची रांग लागते तिच्या पलीकडील खोरें आपले स्वाधीन करून घ्यावें, आणि शत्रूच्या ताब्यांतला जैटक नांवाचा एक मुख्य किल्ला आहे तो घ्यावा; जनरल जे. एस्. वूड ह्यानें तिसरी तुकडी घेऊन नेपाळचे पूर्वेस पालपे ह्मणून एक गांव आहे तिकडे जावें; आणि जनरल मार्ली ह्यानें चवथे तुकडीनिशीं काटमांदु ह्या राजधानीकडे नीट जावें; ह्याप्रमाणें ठराव झाला होता. शत्रूच्या देशावर चोहोंकडून एकदम हल्ला व्हावा ह्याजकरितां असा बेत झाला. नेपाळ देशांत सर्व जगांतल्यापेक्षां मोठाले पर्वत आहेत, ह्याकरितां त्या देशाचा बंदोबस्त स्वतःसिद्धच चांगला झाला आहे. तेथील किल्ले बहुधा उंच डोंगरांच्या माथ्यांवर बांधलेले आहेत. त्या किल्ल्यांची चढण अवघड, रस्ते अरुंद व खडकाळ आहेत. त्या देशांत राहणारे लोक मेढेकोट बांधून त्यांचे मागून लढतात. तेव्हां अर्थातच त्यांस कोटामागें कांहीं धक्का न लागतां बाहेरचे लोकांचा नाश सहज करितां येतो. डोंगरांतून लढाई करणें हें मुळींच कठीण असून हल्ला करणारे लोकांस (इंग्लिशांस) त्या देशाची पुरी माहिती नव्हती ह्मणून फारच कठीण पडलें.

*हल्ल्याचा बेत.*

*नेपाळचें वर्णन.*

लढाईस दुसरे तुकडीनें आरंभ केला. ती पुढें गेली तेव्हां गुरखे लोक कलुंग नांवाचे एके लहानसे किल्ल्यावर गेले. तो किल्ला एके अवघड डोंगरावर असून त्याचे भोंवतीं लहान वृक्षांची झाडी होती. तो किल्ला लहान होता आणि तेथें संरक्षणार्थ सहाशें लोक होते; त्याजवर हल्ला करण्याचा बेत इंग्लिशांनीं ठरविला. त्यांनीं आपले लोकांच्या दोन टोळ्या केल्या, आणि असें ठरविलें कीं, सूचनेची तोफ सुटतांच दोहों टोळ्यांतील लोकांनीं एकदम हल्ला करावा. किल्ल्यांतील लोकांनीं बाहेरल्यांवर हल्ला केला;

*कलुंगास वेढा. ता. २९ अक्टोबर स. १८१४.*

परंतु त्यांस मागें हटावें लागलें. शत्रूंचे मागोमाग किल्ल्यावर जावें असें जनरल गिलेस्पीचे मनांत आल्यावरून त्यानें पुढें जाण्याविषयीं आपले लोकांस हुकूम केला. शत्रूंनीं एक तोफ अशा स्थळीं ठेविली होती कीं, तिच्या योगानें इंग्लिशांस भिंतीस शिड्या लावितां येऊं नयेत. भिंतींवरून चढून किल्ल्यांत जातां येईना, ह्मणून ते दरवाज्यांतून आंत शिरकाव करण्यास झटले. परंतु त्यांजवर तोफांचा असा भडिमार झाला कीं, त्यांस मागेंच हटावें लागलें.

हा पराजय झाला ह्मणून जनरलास त्रास येऊन तो असें बोलला कीं, किल्ला घेईन, नाहीं तर प्राण देईन. त्यानें आपले हाताखालीं त्रेपन्नावी पलटण आणि कांहीं घोड्यांवरून उतरलेले करोल घेतले, आणि त्या सर्वांसहवर्तमान तो पुनः दरवाज्यापाशीं गेला. शत्रूंच्या तोफांच्या भडिमाराखालीं जेव्हां त्रेपन्नावे पलटणींतले लोक आले, तेव्हां ते माघार घेऊं लागले; आणि जनरल गिलेस्पी त्यांशीं गोडीगुलाबीचीं भाषणें बोलत असतां गोळी लागून मरण पावला. ह्याकरितां ते लोक दुसऱ्यानें मागें हटले. गिलेस्पीच्या जाग्यावर एका सरदाराची नेमणूक झाली. त्यानें असा निश्चय केला कीं, आपले ताब्यांत जास्ती तोफा येत तोंपर्यंत कलुंग किल्ल्यासमोरून जावयाचें नाहीं. त्या तोफा आल्यानंतर दुसरी टोळी हल्ला करण्याकरितां गेली. गोरे लोकांजवळ बंदुका नव्हत्या ह्मणून ते संगिनी घेऊन निघाले; आणि जी वाट केली होती तींतून हल्ला करीत करीत किल्ल्यांत शिरले. तेथें किल्लेदार एक आवार करून बसले होते. तें आवार हल्ला करणारांच्या खालीं सुमारें दहा हात असून त्यांतून त्यांजवर तीर, धोंडे, आणि बरच्या ह्यांचा मार होत होता. इंग्लिशांस तर अशा प्रकारचा हल्ला उलट करितां येत नव्हता, ह्मणून त्यांस शेवटीं मागें हटावें लागलें. ह्या प्रसंगीं मेलेले व जखमी झालेले मिळून सहाशें लोक पडले.

कांहीं वेळ कुलपी गोळ्यांचा मार झाल्यानंतर गुरखे लोकांनीं किल्ला सोडून दिला; आणि ते आपले देशच्या तीनशें लोकांची टोळी होती तींत जाऊन मिळाले. मग थोडकेच काळें लोकांनीं रणामध्यें त्या सर्वांचा पराजय केला.

कांहीं वेळानें दुसरा जनरल आपली तुकडी घेऊन ह्या लोकांस मिळाला. आणि सगळे मिळून जैटक किल्ल्याकडे गेले. हा किल्ला डोंगराच्या एका रांगेच्या फार उंच सुळक्यावर आहे. त्याच्या सभोंवते कितीएक मोठे कोट बांधिले होते. किल्ल्यावरचे लोकांस पाण्याचा पुरवठा किल्ल्याबाहेरचे विहिरींतून होत होता. त्या विहिरीचे संरक्षणार्थ एक मजबूत मेढेकोट बांधिलेला होता, तो घेण्याचें जनरलाचे मनांत आलें. ह्याकार-

जैटकास वेढा. ता. २७ डिसेंबर सन १८१४.

णास्तव त्यानें दोन टोळ्या पाठविल्यां आणि असा हुकूम केला कीं, दोन्ही टोळ्यांनीं निरनिराळे मार्गानें जावें आणि त्या मेढेकोटावर एकदम हल्ला करावा. कांहीं चुकीच्या योगानें असें झालें कीं, दुसरी टोळी पोंहोंचण्याचे पूर्वी पुष्कळ वेळ एक टोळी गुरखे लोकांबरोबर लढूं लागली, आणि ह्यामुळें तींतील लोकांस मागें हटावें लागलें. पुष्कळ गुरखे लोकांनीं दुसरे टोळीवर हल्ला केला असतां तींतील लोकांनीं त्यांस मागें हटविलें; परंतु लवकरच जनरलानें त्या टोळीस परत येण्याविषयीं हुकूम दिला.

तिसरी व चवथी टोळी ह्यांस जय मिळत नाहीं.

पूर्वेकडे ज्या तुकडया गेल्या त्यांचाही पराजय होत असे. कितीएक टोळ्यांवर शत्रूनीं हल्ला करून त्यांस मागें हटविलें. ह्यामुळें तिकडील मोहिमेंत पहिल्यानें इंग्लिशांस यश मिळालें नाहीं.

पहिल्या तुकडीचा जय.

नेपाळच्या पश्चिम भागाचें वर्णन.

इंग्लिशांनीं पुष्कळ ठिकाणीं हल्ला करून दांडगे लोकांशीं पहिल्यानें लढाया केल्या, त्यांत बहुतेक ठिकाणीं त्यांचा पराजय झाला; तरी जनरल आक्तरलोनीचे हाताखालचे पहिले तुकडीस जय मिळाला. ती पश्चिमेकडे गेली, तिकडे गुरखे सरदारांतला मोठा प्रसिद्ध अमीरसिंग हा मुख्य होता. त्या देशांत डोंगरांच्या तीन रांगा होत्या, आणि त्यांमध्यें खोरीं होतीं, व तेथें संरक्षणार्थ पुष्कळ मजबूत किल्ले बांधिलेले होते. पहिले रांगेवर नलगड, दुसरीवर रामगड, आणि तिसरीवर मलूनगड, असे किल्ले असून त्यांचे मागें बिलासपूर ही एके राजाची राजधानी होती, व तो राजा गुरखे लोकांचे पक्षाचाच होता. ज्या डोंगरांवर हे किल्ले बांधिले होते ते अवघड, व त्यांची चढण खडकाळ होती; ह्यामुळें ते जास्ती मजबूत झाले होते. नोवेंबर महिन्याचे आरंभीं ती तुकडी डोंगरांचे पहिले रांगेपाशीं पोंहोंचली. इंग्लिशांनीं नलगडावर सोडण्याकरितां तोफा आणिल्या होत्या, परंतु थोडकेच वेळानें गुरखे लोकांनीं तो किल्ला सोडून दिला. तेणेंकरून अर्थातच इंग्लिशांस रामगडास जातांना कांहीं अडथळा झाला नाहीं. आपणास धक्का न लागतां ह्या किल्ल्यावर समोरून हल्ला करणें कठीण, असें जनरल आक्तरलोनी ह्यास वाटल्यावरून तो शत्रूंचे डावे बाजूनें गेला आणि डोंगरांच्या पलीकडे एका टेंकडांवर आपले लोकांनिशीं चढला; तेथून त्यास शत्रूची तोफा वगैरे सामग्री दिसत होती. तेथें तो कुमक येईपर्यंत थांबला, आणि त्या थोडया वेळांत त्यानें त्या देशाची पुरी माहिती करून घेतली. आपले लोकांस कलुंग किल्ल्यापाशीं संकटें प्राप्त झालेलीं त्यास तेथें समजलीं,

नलगड शत्रु सोडतात. ता० ५ नवंबर सन १८१४.

ह्यामुळें आपणास जय मिळेल अशी पक्की खातरी झाल्याशिवाय हल्ला करूं नये असें त्यास वाटलें.

मलूनाकडे कूच.

ह्या जनरलाचे तुकडींत लोक जास्ती येतांच तो रामगडासमोर कांहीं लोक ठेवून बाकीचे घेऊन मलूनगडाकडे गेला. ह्यामुळें आपण येथेंच राहिलों तर आपणास आपले मित्रांशीं पत्रव्यवहार वगैरे ठेवतां येणार नाहीं असें अमीरसिंगास भय पडून तो आपले बहुतेक लोक घेऊन मलून किल्ल्यांत जाऊन राहिला, तेथें त्यास इंग्लिशांनीं चोहोंकडून वेढिलें. बिलासपूरचा राजा इंग्लिशांचे स्वाधीन झाला, आणि त्यांनीं मलूनचे डोंगराजवळचीं गुरखे लोकांचीं ठाणींही घेतलीं.

मलूनच्या उंच प्रदेशावर हल्ला. ता० १५ एप्रिल स० १८१५.

मलूनगडाचे डोंगर आपले हस्तगत करून घेण्याचा जनरल आक्तरलोनी ह्यानें निश्चय केला. त्या डोंगरांच्या रांगेच्या दोहींकडे दोन किल्ले होते; डावे बाजूस सुराजगड आणि उजवे बाजूस मलूनगड. ह्या दोन किल्ल्यांच्या मध्यें एक मेंढेकोटांची रांग होती. डोंगरांतले प्रवाहाचे पलीकडे इंग्लिश होते; त्यांनीं मलूनचे उजवे बाजूस एके निराळे डोंगरावर रतनगड ह्मणून एक लहानसा किल्ला आहे तो घेतला. सुराजगड आणि मलूनगड ह्यांच्या मधले दोन डोंगर रिकामे होते, ते घेण्याचें जनरल आक्तरलोनी ह्यानें मनांत आणिलें, ह्याचें कारण हेंच कीं, दोहों किल्ल्यांवरचे लोकांचा एकमेकांशीं संबंध राहिला असतां त्यांस परस्परांस साहाय्य करितां येईल, हें घडूं देऊं नये. त्यानें एप्रिल महिन्याचे चवदावे तारखेस हें काम करण्याकरितां दोन टोळ्या पाठविल्या. त्यांतील एके टोळीनें सुराजगडचे जवळचा डोंगर घेतला आणि तेथें तींतील लोकांस जय मिळाला; दुसरी मलूनगडाजवळचे ठाण्याकडे गेली, आणि तिलाही तेथें जय मिळाला; परंतु शत्रूंच्या तोफांच्या भडिमाराखालीं कांहीं काळे लोक घाबरले. ह्या टोळीचे साहाय्यास्तव रतनगडाहून दुसरी टोळी गेली होती; परंतु पुष्कळ नाश होऊन तिला परत जावें लागलें. मलूनगडच्या जवळचें ठाणें इंग्लिशांनीं घेतल्यानंतर दोन दिवसांनीं त्याचा फार उपयोग आहे असें अमीरसिंगास वाटल्यावरून तो तें परत घेण्याकरितां जिवावर उदार होऊन झटला. गुरखे लोक मोठे शौर्यानें लढत असतां त्यांचा नाईक आपले पुत्रासह त्यांच्या निशाणापाशीं उभा होता, आणि त्यांस हल्ला करण्याविषयीं उत्तेजन देत होता. ते इंग्लिशांच्या संगिनींवर धांवून गेले, आणि त्या हातांनीं धरून त्यांनीं आपले शत्रूंचे हातांत बंदुका असतां त्यांस मारिलें. इंग्लिशांनीं डोंगरावर

दोन लहानशा तोफा आणिल्या होत्या, त्या तोफांनीं शत्रूकडील पुष्कळ लोक मेले, तरी ते वरचेवर लढाईस येतच होते. अशी निकराची लढाई दोन तास चालली होती. शेवटीं इंग्लिशांस जवळचे टोळीकडून कुमक आली; आणि त्यांनीं संगिनी घेऊन शत्रूंवर हल्ला केला, तेव्हां त्यांस जय मिळून त्या दिवसचे लढाईचा शेवट झाला. गुरखे लोकांकडून हा जिवावरचा हल्ला ज्यानें करविला, त्या नायकाचें प्रेत घेऊन ते मलून किल्ल्यावर पळून गेले. दोहों सैन्यादेखतां त्यांनीं दुसरे दिवशीं त्याचे प्रेतास अग्नि दिला.

किल्ल्यावरचे लोक किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन करून देण्याविषयीं अमीरसिंगास सांगत असतां तो ऐकेना, ह्मणून तेच मग लवकर बाहेर येऊन त्यांचे स्वाधीन झाले. जे लोक अमीरसिंगाकरितां ह्या वेळेपर्यंत मोठ्या शौर्यानें लढले, ते जेव्हां त्यास टाकून गेले, तेव्हां त्यानें किल्ला सोडून दिला; मग त्यास काटमांडूस जाण्यास परवानगी मिळाली. तिकडील लढाईचा शेवट झालाच होता; आणि जैटक किल्ल्याजवळ दुसरी टोळी कांहीं वेळ तळ देऊन राहिली होती; इतक्यांत मलून किल्ला स्वाधीन झाला असें समजल्यावरून शत्रूंनीं तोही किल्ला स्वाधीन करून दिला.

*किल्ल्यावरील शिबंदी स्वाधीन होतात.*

इकडे तिसरी व चवथी ह्या तुकड्यांची पूर्वेकडील प्रदेशावर हल्ला करण्यास नेमणूक झाली होती, त्यांशिवाय आणखी एक टोळी तिकडे गेली होती तिला पुष्कळ यश आलें. त्या लोकांनीं कमाऊन प्रांतावर हल्ला केला आणि आलमोडे हा मजबूत किल्ला घेतला; आणि जो देश मागून कंपनीचे मुलखांतलाच झाला तो सगळा त्यांनीं जिंकिला.

*नेपाळच्या पूर्व भागांत जय होतो.*

इंग्लिशांस असे वरचेवर जय मिळत गेले, ह्यामुळें नेपाळचा राजा अगदीं घाबरून गेला, आणि त्यानें तहाचें बोलणें लाविलें. गवर्नर जनरलानें तह करण्याचें कबूल करून जे ठराव सांगितले ते राजाच्या वकिलांनीं मान्य केले. काली नदीचे पश्चिमेकडील प्रदेशाविषयीं वाद होता, तो प्रदेश ज्या राजांचा असेल त्यांचा त्यांस द्यावा, गुरखे लोकांनीं आपले सरहद्दीवरचें पटांगण सोडून द्यावें, सिकीमच्या राजाचा जो मुलख घेतला असेल तो त्यास परत द्यावा, आणि काटमांडूचे दरबारांत एक रेसिडेंत ठेवावा, हीं गवर्नर जनरलाच्या बोलण्यांतलीं कलमें होतीं. राजानें आपणच तहाचें बोलणें लाविलें ह्मणून त्याचे मंत्र्यांनीं त्यास भर देऊन असें सांगितलें कीं, आपण तहनाम्यावर सही करूं नये, आणि तह करण्याची इच्छा नाहीं असें सांगावें. हें राजानें ऐकिलें, तेव्हां अर्थातच लढाई पुनः चालू झाली. इंग्लिशांनीं

*नेपाळचा राजा तहाचें बोलणें लावितो.*

पश्चिमेकडील देश जिंकिला होता, आणि तिकडे सैन्यांतील दोन तुकड्या कामावर गेल्या होत्या त्या हेट प्रांतांत आपले ठाण्यास आल्या. ह्याकरितां राजधानीकडच्या बाजूस ह्मणजे पूर्वेकडे नवीन मोहीम व्हावयाचा प्रसंग आला.

सर देविद आक्तरलोनी चिरियाघाटी घांटाकडून फिरतो. ता. १७ फेब्रुवारी सन १८१६.

जनरल ऊर्फ सर देविद आक्तरलोनी हा सरकारचे उपयोगीं फार पडला, ह्मणून त्यास नैतची पदवी मिळाली; आणि तोच ह्या प्रसंगीं मुख्य अधिकारी झाला. त्यानें आपले सैन्याचे चार भाग केले. एका टोळीनें उजवेकडच्या एका घांटानें नेपाळांत जावें, दुसरीनें डावेकडच्या घांटानें जावें, आणि आपण जातीनें दोन टोळ्या घेऊन मकानपुराकडे जावें, असा त्यानें बेत केला. ह्या शहरास जाण्याचे वाटेवर चिरीघाटी ह्मणून एक घांट आहे, त्याची चढण फार अवघड असून मध्यें गुरख्यांनीं तीन मजबूत मेढेकोट एकामागें एक असे बांधिले होते. हा भयंकर मार्ग वाटेनें लागूं नये, ह्मणून सर देविद ह्यानें दुसरा मार्ग काढिला. कांहीं लोक चिरीघाटीचे पायथ्याशीं ठेवून तो बाकीच्या लोकांनिशीं दुसऱ्या मार्गानें निघाला. ती वाट अवघड, अरुंद, व खडकाळ अशी असतांही तो जातीनें आपले लोकांनिशीं हाल सोशीत सोशीत कूच करीत होता.

मकानपुरची लढाई. ता. २८ फेब्रुवारी सन १८१६.

जनरल ह्याप्रमाणें आपले लोक एकीकडे टाकून गेला, असें गुरखे लोकांस समजल्यावर, ते मेढेकोट टाकून मकानपुरास निघून गेले. तेथपर्यंत जनरल त्यांचे मागें गेला आणि मकानपुराजवळचे लहान डोंगरी किल्ल्यांसमोर छावणी देऊन राहिला. शत्रूंच्या ठाण्याच्या डावे बाजूस शिखरक्षेत्र ह्मणून एक गांव आहे, तें इंग्लिश येतांच गुरखे लोकांनीं सोडून दिलें, तेव्हां तें इंग्लिशांनीं आपले स्वाधीन करून घेतलें. हें ठाणें फार उपयोगाचें आहे असें गुरखे लोकांचे ध्यानांत येतांच ते मोठे सैन्यानिशीं तें परत घेण्याकरितां झटले. पांच तासपर्यंत निकराची लढाई झाली आणि शेवटीं गुरखे लोक मागें हटले.

हरिहरपूर घेतात.

इकडे चिरीघाटीचे उजवे बाजूस हरिहरपुरावर हल्ला करण्याकरितां कर्नल केली हा एक टोळी घेऊन गेला होता. त्यानेंही लढाईत शत्रूंचा पराजय केला. कांहीं अडथळा न होतां तो किल्ल्यापर्यंत गेला. त्याजवळ दोन सुळके होते, आणि त्यांच्यामध्यें एक मेढेकोट होता, तो इंग्लिशांनीं एक मैदान आपले स्वाधीन करून घेतलें त्याच्या मध्यांत होता. तेथें इंग्लिश असतां त्यावर शत्रूंचे मोठे सैन्यानें हल्ला केला; परंतु फार वेळ निकराचें युद्ध होऊन जय

इंग्लिशांसच मिळाला, आणि दुसरे दिवशीं सकाळीं तो किल्ला इंग्लिशांच स्वाधीन झाला.

मकानपुरानजीक लढाई झाल्यानंतर त्या शहरावर व किल्ल्यावर हल्ला करण्याची सर देविद तयारी करूं लागला. तेव्हां इंग्लिश सरकाराबरोबर लढाई करून जय मिळण्याची आपणास आशा नाहीं, असें गुरखे सरकारास वाटून त्यांनीं गव्हरनर जनरलानें ठरविलेल्या तहाप्रमाणें वागण्याचें कबूल केलें. तह ठरल्यानंतर लार्ड मोइरा ह्यानें, गुरखे लोक आपले ताब्यांत येऊन जें व्हावयाचें तें झालें, असें समजून जिंकलेल्यापैकीं कांहीं मुलूख त्यांस परत दिला.

नेपाळच्या लढाईचा शेवट. ता. १२ मार्च स. १८१६.

हिंदुस्थानांत दुसरे ठिकाणीं इंग्लिशांस शत्रु होते, त्यांपासून तिकडील मुलखाचें संरक्षण होण्याकरितां फौजेची गरज होती, ह्यामुळें ह्या वेळेस गुरख्यांचे लढाईचा शेवट झाला, हें चांगलें झालें. हिंदुस्थानचे मध्यभागीं नीट व्यवस्था नव्हती. सर्वांनीं एक होऊन इंग्लिशांवर उठण्याविषयीं, पेशवे, शिंदे, आणि इतर मराठी सरदार ह्यांचे दरबारांत बेत चालले होते. पेंढारी आणि इतर दरवडेखोर हे धिटाईनें मध्यभागीं लुटालूट करीत होते, आणि अलीकडे कंपनीचा मुलूख लुटण्यासही भिईनातसे झाले होते.

मध्यहिंदुस्थानांत अव्यवस्था.

मराठ्यांचे सैन्यांत पेंढारी हे पूर्वी ज्या लढाया झाल्या त्या वेळेस चाकरीस होते. परंतु मराठे लोकांचा भरभराट नाहींसा झाल्यापासून त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या होऊन, त्यांजवर त्यांपैकींच मुख्य होऊं लागले. त्या वेळेस त्यांच्यांतले मुख्य छटू, करीमखान, आणि दोस्तमहंमद हे होते. ह्यांतील प्रत्येकाजवळ पुष्कळ स्वार असत. तरी पेंढारी लोक नेहमीं एका नायकाला लागून नसत; जो पुष्कळ लूट मिळवी त्याजवळ पुष्कळ लोक असत.

पेंढारी.

दसऱ्याचे समारंभाचे वेळेस, म्हणजे आक्टोबरचा शेवट आणि नोवेंबरचा आरंभ, ह्या सुमारास पेंढाऱ्यांतील मुख्य मुख्य एका नेमलेल्या ठिकाणीं जमत, आणि कोठें दरवडा घालून मारहाण करावी म्हणजे लूट पुष्कळ मिळेल ह्याविषयीं तेथें विचार करीत. प्रत्येक जातीचे व धर्माचे लोक, सभोंवतालचे देशांतले दांडगे व लबाड लोक, बरतर्फ केलेले शिपाई, आणि दरवड्यानें त्रासून आपण दरवडा घालूं लागलेले लोक, असे हजारों लोक त्यांत शिरत. सर्व तयारी झाल्यावर लागलेच ते निरनिराळ्या टोळ्या करून निघत, आणि लुटालूट झाल्यावर शेवटीं लूट वांटून घेण्यास

त्यांची लुटण्याची व लढण्याची रीति.

सर्वांनीं एके ठिकाणीं जमावें असें ठरवीत. मग ते घोड्यांवर बसून गांवो-गांव हिंडत, आणि जातांना घरें जाळीत, लोकांचे फार फार हाल करून त्यांस लुटीत, आणि असेच नानाप्रकारचे अनर्थ करीत.

त्यांच्या आंगावर पोषाक, शस्त्रें, वगैरे इतकीं हलकीं असत कीं, त्यांस दररोज पंचवीस कोस चालण्यास कठीण पडत नसे. बहुतेकांजवळ भाले असत. तरी कांहीं लोकांजवळ चापाच्या बंदुका असत. वास्तविक पाहिलें असतां त्यांस शस्त्रांची गरजच नसे. कारण त्यांचा मुख्य हेतु लुटण्याचा असे, आणि जेव्हां एकादें सैन्य त्यांजवर हल्ला करण्यास जाई, तेव्हां ते पळ काढीत. ते इतके चपळ असत कीं, ते मोठमोठाले सैन्यांतून नजर चुकवून सहज निघून जात असत आणि त्यांना आपला बचाव करणें ह्मणजे कःपदार्थ वाटत असे; आणि ते इतके जलदीनें पळत कीं, बहुधा सैन्याला त्यांस गांठितां येत नसे.

हीं लुटारू लोकांचीं सैन्यें कितीएक वर्षेपर्यंत मराठ्यांच्या व शेजारचे इतर राजांच्या मुलखांत दंगा करीत होतीं; आणि शिंदे, पेशवे, वगैरे संस्थानांचें जरी त्यांचे हातून नुकसान होत असे, तरी ते लोक लढाईचा प्रसंग आल्यास चांगले उपयोगीं पडतील अशा समजुतीनें ते संस्थानिक त्यांशीं गोडीगुलाबीनें होते.

इसवी सन १८१५ त जेव्हां नेपाळचे लढाईत इंग्लिशांचें नशीब फिरलेंसें दिसलें, तेव्हां जे मराठे त्यांचे वैरी होते त्यांस धीर आला. मछलीपट्टणाजवळचे मुलखांत छट्टू ह्यानें पेंढाऱ्यांनिशीं स्वारी केली. दुसरे वर्षाचे प्रारंभींच आपणास कोणी अडथळा करीत नाहीं असें समजून पुष्कळ पेंढारी एकत्र मिळून पुनः कंपनीचे मुलखांत शिरले. ते पहिल्यानें गंतूर येथें शिरून कडप्यावरून गेले; आणि दाहा दिवसांतच त्यांनीं तीनशें गांवांचा नाश केला.

*इंग्लिशांच्या मुलखांत ते लुटण्याकरितां स्वारी करितात.*

इकडे इंग्लिश लोक पेंढाऱ्यांच्या शोधांतच होते. पांच चार ठिकाणीं त्यांच्या लहान लहान टोळ्यांवर हल्ला करून, इंग्लिशांनीं त्यांचा नाश केला; आणि इ० स० १८१६ त दिसेंबरचे सव्विसावे तारखेस मेजर लशिंगतन ह्यानें, मद्रासचे घोडेस्वारांचे चवथे पलटणीनिशीं जाऊन हजारों चोर धरून आणिले, आणि त्यांतून सातआठशें लोकांस ठार मारिलें. पेंढारी हे आपणास कांहीं भय नाहीं असें समजून लूट वांटून घेत होते व भाग करीत होते; तेव्हां पूर्वीं पंचवीस कोस एकसारखा पाठलाग केला त्यामुळें फार श्रम झाले असूनही, काळे लोकांनीं त्यां-

*इंग्लिशांचे स्वार त्यांजवर हल्ला करितात. ता. २६ डिसेंबर स. १८१६.*

जवर एकदम हल्ला केला, आणि त्यांचा पराजय करून थोडा वेळ पाठलागही केला. इसवी सन १८१७त जुलई महिन्याचे सुमारें ह्या शत्रूंच्या नाशाची तयारी संपूर्ण झाली. (त्यांस शत्रु हें नांव देखील योग्य नव्हतें.) उत्तरहिंदुस्थानांत एक मोठें सैन्य होतें त्याच्या चार टोळ्या केल्या होत्या; तसेंच दक्षिण देशांत एक दुसरें मोठें सैन्य सर थामस हिस्लाप ह्याचे हाताखालीं होतें. त्याच्या पांच टोळ्या केल्या होत्या.

उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांतील प्रचंड सैन्यें.

पुण्यास व वऱ्हाडच्या राजधानीचें शहर जें नागपूर तिकडे आणि हैदराबादेकडेही कांहीं टोळ्या ठेविल्याच होत्या. सर विलियम केर ह्याचे हाताखालींही गुजराथेंत एक सैन्य होतें त्याचा व दक्षिणेंतील सैन्याचा कांहीं अंशीं संबंध ठेवावा, असा सरकारचा बेत होता; हे सर्व मिळून एकंदर ११३००० लोक होते.

पेंढारी व मराठे ह्यांजवर जाण्याची तयारी.

ह्याप्रमाणें इंग्लिशांचीं मोठमोठालीं सैन्यें हिंदुस्थानचे मध्यभागचे सभोंवतीं होतीं. ह्यामुळें पेंढाऱ्यांस पळून जाण्याला जागा नाहींशी होऊन, त्यांच्या नायकास सुटून जाण्याची आशाही नाहींशी झाली. मराठे लोकांनीं बंडाई केल्यास ह्याच सैन्यानें त्यांबरोबर लढाई करून शेवटीं त्यांचा नाश करावा असा बेत होता. त्यांशीं मग लढाई करण्याचा प्रसंग लवकरच आला. खुद्द गवर्नर जनरल साहेबाचे हाताखालीं हिंदुस्थानचें मोठें सैन्य होतें, तें व दक्षिण देशांतील सैन्याची पांचवी टोळी, ह्यांनीं मिळून पेंढाऱ्यांस पश्चिमेकडील डोंगरांत हांकून दिलें. आणि जेथें जेथें ते चोर भेटले तेथच्या तेथेंच त्यांचा नाश केला, तेव्हां शेवटीं अगदींच थोडया आणि भिकार अशा पेंढाऱ्यांच्या टोळ्या राहिल्या. इकडे जे मराठे इंग्लिशांचे वैरी होते, त्यांचा नाश करण्याकडे दक्षिण देशांतील सैन्याच्या दुसऱ्या टोळ्या लागल्या होत्या.

**चवदावा भाग समाप्त.**

# भाग पंधरावा.

## पेशवा व भोंसला ह्यांची कपटी वर्तणूक हिजविषयीं वर्णन.

### इ० स० १८१६ पासून सन १८१७ पर्यंत.

पेशव्याचा इंग्लिशांशीं संबंध—त्रिंबकजी—पेशवा व गाईकवाड ह्यांच्या मध्यें वाद—गंगाधर शास्त्र्याचा खून—त्रिंबकजीस इंग्लिश किल्ल्यांत कैदेंत ठेवितात—त्याची सुटका—तो बंडखोर लोक जमवितो—पेशवा त्यास साह्य करितो—रेसिडेंटाची पुण्याचे दरबारीं निस्पृहतेची वर्तणूक—त्रिंबकजीस धरण्याबद्दल बक्षीस देऊं करितात—पेशव्याबरोबर नवा तह—पेशव्याच्या मसलती—पुण्याचें वर्णन—रेसिडेंटाचे ठाण्यावर हल्ला—खडकीची लढाई—इंग्लिशांस कुमक येते—पेशवा पळतो—नागपुराकडील वर्तमान—आपासाहेबास कारभारी करितात—इंग्लिशांबरोबर मैत्री—आपासाहेब राजा होतो—त्याचे मित्रांच्या विरुद्ध मसलती—नागपुरचें वर्णन—सिताबल्दीची लढाई—कपतान फित्जरल्द ह्याचा मोठ्या शौर्याचा मारा, व इंग्लिशांचा जय—मराठे मागें सरतात—राजाबरोबर तह—कुमक येते—नागपुरची लढाई—नागपुरास वेढा—हल्ला परतवितात—शहर स्वाधीन होतें—जबलपुरची लढाई—आपासाहेबाची पुन्हा स्थापना करितात.

*पेशव्याचा इंग्लिशांशीं संबंध.*

वसई येथें तह झाल्यानंतर पेशव्याचें व इंग्लिशांचें एकमत होतें. त्याचे राजधानीपाशीं इंग्लिशांचे लोक छावणी देऊन राहिले होते. पेशव्याचे दरबारांत रेसिडेंट होता, आणि त्यास बाह्यात्कारीं तरी इंग्लिशांची मसलत घ्यावी लागत होती. ह्या सर्व गोष्टींपासून आपलें चांगलें होईलसें त्यास वाटलें नाहीं. तो इंग्लिशांस भीत असे खरा, परंतु आंतून त्यांचा द्वेषही करीत असे. लार्ड हेस्तिंग्स आल्यानंतर लवकरच पेशवा व रेसिडेंट ह्यांचें फारच वांकडें पडलें.

*त्रिंबकजी.*

त्रिंबकजी ह्मणून एक हलक्या कुळांतला नीच मनुष्य होता, तो पेशव्याच्या अत्यंत कृपेंतला होता. ह्यामुळें इंग्लिशांशीं लढाई करण्याविषयीं वारंवार तो आपले धन्यास भर देत असे. त्रिंबकजीचे सांगण्यावरून पेशवा सर्व मराठी राजांस इंग्लिशांवर उठण्याविषयीं आंतून भर देतच होता; आणि पूर्वींचे पेशव्याप्रमाणें तो सर्व मराठे राजांचा मुख्य झाला; आणि इंग्लिशांशीं लढाई करण्याची तयारी करूं लागला. इंग्लिशांशीं लढाई करण्याचें आपले मनांत आहे, असें त्यानें एकदां बाह्यात्कारीं दाखविलें असतें ह्मणजे लढाई होण्यास उशीर नव्हता हें पुढील इतिहासावरून कळेल.

इसवी सन १८१४ त गुजराथचा अधिकारी गाईकवाड आणि पेशवा ह्यांच्यामध्यें कलह उत्पन्न झाला. त्यांत गाईकवाड ह्यास इंग्लिशांचा आश्रय होता. कलह मिटविण्याकरितां गाईकवाडानें पेशव्याच्या दरबारांत गंगाधरशास्त्री ह्मणून एक वकील पाठविला. तो आला तेव्हां त्याचा पेशव्यानें नीट सन्मान राखिला नाहीं, तरी मग आपल्या मनांतलें हें बाहेर कळूं नये ह्मणून त्याशीं तो बाह्यात्कारीं गोडीगुलाबीनें वागूं लागला. पेशव्यानें त्या वकिलास बोलावून पंढरपुर एथें देवाचे दर्शनास नेलें. तो तेथें असतां त्रिंबकजीचे हुकमानें मारेकऱ्यांनीं त्यास ठार मारिलें. हें नीच काम पेशव्याचे संमतानें झालें, असा इंग्लिश लोकांचे मनांत संशय आला.

पेशवा व गाईकवाड ह्यांजमध्यें कलह. सन १८१४.

रेसिडेंत एल्फिन्स्तन साहेब ह्यानें पेशव्यास असें लिहून पाठविलें कीं, तुह्मीं त्रिंबकजीस आमचे स्वाधीन करावें. पेशव्यानें कांहीं वेळ नाहीं होय ह्मणून शेवटीं हें बोलणें मान्य केलें. मग इंग्लिशांनीं त्रिंबकजीस नेऊन मुंबईजवळ ठाणें ह्मणून एक गांव आहे तेथें कैदेंत ठेविलें. त्याचे जे साथी होते त्यांचे मनांत त्याला सोडविण्याविषयीं फार होतें, ह्याकरितां त्यांतील एकजण तेथील पलटणींतील एका साहेबाचे चाकरीस राहिला, आणि त्यानें मोतद्दारीचें काम पत्करलें. तो ज्या तबेल्यांत चाकरी करीत असे तो त्रिंबकजीचे तुरुंगालगत होता; तो घोड्यास खरारा करीत असतां मराठी गाण्याचे कांहीं चुटके गात असे. ही फसविण्याची युक्ति त्या वेळेस कळून आली नव्हती; परंतु एके दिवशीं बंदिखान्यांतून जेव्हां त्रिंबकजी नाहींसा झाला, तेव्हां असें समजून आलें कीं, मोतद्दारानें जीं गाणीं गाइलीं होतीं, तीं केवळ त्रिंबकजीस पळून जाऊन बंड करण्याविषयीं सूचनार्थ होतीं.

गंगाधर शास्त्र्याचा खून. सन १८१५.

त्रिंबकजीची सुटका.

त्रिंबकजी आणि तो गवई मोतद्दार हे दोघे डोंगरांत पळून गेले. तेथें त्रिंबकजीनें कांहीं दांडगे लोक जमा केले. हे लोक दिवसानुदिवस जास्ती होत चालले. त्याजवर पेशव्याची मर्जी असे आणि त्यास त्याजकडून पैशाचीही मदत मिळत असे; असें असतां पेशवा इंग्लिशांस नानाप्रकारच्या भुलथापा देत असे. इंग्लिश लोकांनीं बंडवाल्यांचा पराजय केला तेव्हां त्रिंबकजीस डोंगरामध्यें पुनः लपावें लागलें. पेशवाही आतां आपणावर उठणार, असा जेव्हां रेसिडेंत साहेबाचे मनांत संदेह आला, तेव्हां चोवीस तासांत पेशव्यानें त्रिंबकजीस आमच्या स्वाधीन करावें आणि बंडाचे वेळेस उपयोगीं पडणाऱ्यांपैकीं तीन मजबुत किल्ले आ-

तो दांडगे लोक जमा करतो.

रेसिडेंताची धैर्याची वर्तणूक.

मच्या ताब्यांत द्यावे, असा त्यानें आग्रह धरिला. एलफिन्स्तन साहेबानें आपण अगदीं निकरावर आलों, असें दर्शविण्याकरितां शहराभोंवताले इंग्लिश लोकांचे पहारे ठेविले; अशा घोर उपायांनीं पेशवा इतका घाबरून गेला कीं, रेसिडेंत जें जें सांगेल तें तें ऐकण्यास तो कबूल झाला. पेशव्यानें त्रिंबकजीस जो धरून देईल त्यास पुष्कळ बक्षीस देऊं केलें होतें, त्याची मालमत्ता काय होती ती जप्त केली, आणि पूर्वी जे किल्ले रेसिडेंतानें मागितले होते ते इंग्लिशांस दिले.

पेशव्याचे बोलण्याचें प्रमाण नाहींसें झाल्यामुळें, त्याच्यावरचा भरंवसा इतका उडाला कीं, गवर्नर जनरलाचे हुकमानें वसईचा तह रद्द झाला, आणि त्याशीं नवीन तह ठरला; तेणेंकरून तो अगदीं इंग्लिशांचे हातांत आला. ह्या नव्या तहांत असें ठरलें कीं, इंग्लिश फौजेच्या खर्चाबद्दल पेशव्यानें आणखी कांहीं मुलूख द्यावा, आणि रेसिडेंताचे संमताशिवाय दुसऱ्या दरबारांशीं पत्रव्यवहार चालवूं नये. ह्या तहनाम्यावर खुषी नसतां त्यानें इसवी सन १८१७ चे जून महिन्यांत सही केली.

पेशव्याशीं नवा तह. ता० १३ जून सन १८१७.

ह्या गोष्टीमुळें पेशवा पूर्वीपेक्षां जास्ती इंग्लिशांचा द्वेष करूं लागला आणि पहिल्यापेक्षां अधिक उत्सुकतेनें तो इंग्लिशांशीं आपलीं कपटें लढवूं लागला. त्यानें पुणें येथें मोठें सैन्य जमविलें, आणि बाह्यात्कारीं असें सांगितलें कीं, पेंढाऱ्यांबरोबर युद्ध करितांना इंग्लिशांस साहाय्य करावें ह्मणून ही फौज जमविली आहे. तेथें जे इंग्लिशांकडचे काळे लोक होते त्यांस फितुरी करण्याकरितां तो फार यत्न करूं लागला. पुण्यामध्यें थोडे लोक होते, तरी रेसिडेंतानें जनरल लियनल स्मिथ ह्याच्या बरोबर एकंदर मोठे सैन्यांतली एक तुकडी पेंढाऱ्यांवर पाठविली आणि त्यास असें सांगितलें कीं, आह्मांकडून नियमानें कागदपत्र येईनातसे झाले, ह्मणजे तुह्मीं परत यावें.

इंग्लिशांच्या विरुद्ध पेशवा बेत चालवितो.

पुणें हें शहर एका लहानशा नदीच्या कांठीं आहे, आणि त्याच नदीच्या पलीकडल्या कांठावर रेसिडेंताचें ठाणें असे. त्या नदीचा प्रवाह तेथून अर्धवर्तुळाकृतीनें खालीं गेला आहे. पुण्यापासून एक कोसावर खडकी ह्मणून एक गांव आहे, त्या ठिकाणीं इंग्लिशांनीं काळे लोक नेऊन त्या गांवींच ठेविले होते. खडकीजवळच दापुडी ह्मणून एक गांव आहे, पण तें नदीचे दुसरे बाजूस आहे. तेथें थोडेसे लोक ठेविलेले होते. इंग्लिशांकडचे २८०० लोक होते, आणि पेशव्याकडचे पंचवीस हजारांपेक्षांही जास्ती होते

पुण्याचें वर्णन.

दोहों सैन्यांची लवकरच लढाई होण्याचा प्रसंग आला. नोवेंबरचे पांचवे तारखेस पेशव्याचे लोकांनीं रेसिदेंताचे ठाण्यावर हल्ला केला; तेव्हां एलफिन्स्तन साहेबास शत्रु घरांत शिरण्याचे पूर्वीं, आपले घराजवळ नदीचा उतार होता तेथून पार जाण्यास मात्र वेळ होता. नदीपार गेल्यावर तो पुनः एके पुलावरून नदीचे आलीकडे आला, आणि खडकीस लोक होते त्यांस जाऊन मिळाला; आणि ते लोक पेशव्याचे सैन्यावर हल्ला करीत असतां त्यांजबरोबर गेला. दापुडीहून लोक जंवळ येतांच लढाईस प्रारंभ झाला. सैन्याचे उजवे बाजूवर मराठ्यांचे घोडेस्वारांनीं मोठा हल्ला केला, परंतु त्या लोकांस इंग्लिशांनीं तेव्हांच मागें हटविलें. डावे बाजूकडील एक शिपायांचीं पलटण पेशव्याचे लोकांनीं घेरून घाबरविली, आणि तिचा अगदीं नाश व्हाव-याचा प्रसंग आला होता, परंतु तितक्यांत मुंबईची गोरी पलटण धांवत येऊन, तींतील लोकांनीं त्यांस वांचविलें. मग त्या लोकांस धैर्य आलें. दापुडीहून कांहीं लोक घोडेस्वारांचे लोट येत होते त्यांतून मार्ग काढून आले तेव्हां इंग्लिशांनीं संगिनींचा हल्ला करून शत्रु पळविले. मग इंग्लिशांपैकीं कांहीं लोक खडकीस व कांहीं दापुडीस परत गेले. मराठ्यांनीं पूर्वीचेच ठिकाणीं छावणी दिली. परंतु इंग्लिशांचे छावणीवर हल्ला करण्यास त्यांस धैर्य होईना.

रेसिदेंताच्या ठाण्यावर हल्ला.

खडकीस लढाई. ता० ५ नोव्हेंबर सन १८१७.

इकडे रेसिदेंताकडून कांहीं वर्तमान येईना, तेव्हां पुण्यांत कांहीं तरी गलबल आहे असें जनरल स्मिथ ह्यास वाटून तो आपली तुकडी घेऊन तेथें आला. तो आल्यावर दुसरे दिवशीं मराठ्यांचे छावणीकडे इंग्लिश लोक चालून गेले, परंतु तेथें कोणीच नव्हतें. इंग्लिशांचें प्राबल्य वाढल्यामुळें पेशवा घाबरून रात्रीसच पळून गेला होता.

पुणें शहर इंग्लिशांनीं घेतलें, तेव्हां त्यांस कोणीं अडथळा केला नाहीं; कारण तेथील बहुतेक लोकांचीं मनें त्यांजकडेच वळलेलीं होतीं.

ह्यानंतर लवकरच नागपुरचे राजाशीं इंग्लिशांचा तह झाला असतां पेशव्याप्रमाणेंच तो विश्वासघात करूं लागला. जनरल वेलस्लीनें इ० स० १८०३ त वऱ्हाडचे राजाचा पराजय केला. इंग्लिशांनीं आपणास जिंकिलें ह्याकरितां त्यांशीं आपला अत्यंत स्नेह नसावा असें त्याचे मनांत असे. तो इ० स० १८१५ त मरण पावला. त्याचा वारस पुत्र वेडगळ होता, ह्याकरितां राज्याचा अधिकार चालवावयास कोणी तरी कारभारी पाहिजे होता. पुष्कळ लोक कारभारी होऊं पाहत होते, परंतु राजाचे जवळचा नातलग आपासाहेब

नागपूर येथील प्रकार.

आपासाहेब मुखत्यार होतो.

ह्मणून होता, तो इंग्लिशांचे आश्रयाचे योगानें कारभारी झाला. आपणास इतके दावेदार असून ज्यांचे आश्रयानें आपलें कल्याण झालें, त्यांशीं तह करावा ही शहाणपणाची आणि आपले कल्याणाची गोष्ट होय, असें समजून त्यानें इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लाविलें; आणि पेशवा, निजाम, आणि अयोध्येचा नवाब ह्यांच्याशीं जसे तह झाले त्यांप्रमाणेंच ह्याशींही तह झाला. त्यांत दोघांचे संमतानें असें ठरलें कीं, सर्व शत्रूंपासून त्याचें कंपनीनें संरक्षण करावें, आणि ह्याकरितां कांहीं लोक इंग्लिशांनीं नागपुरास ठेवावे, आणि त्यांचा खर्च राजाचे तिजोरींतून मिळावा.

इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लावतो.

त्याचे इंग्लिशांविरुद्ध बेत.

नंतर थोडे वेळानें वेडगळ राजपुत्र मरण पावला, आणि आपासाहेब गादीवर बसला. नवीन राजानें जें इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लाविलें होतें तें आपल्या कामापुरतें होतें, आणि त्याच्या मनांत त्या तहाप्रमाणें वागण्याचें नव्हतें ही गोष्ट स्पष्ट दिसून आली. तो इतर मराठी संस्थानिकांशीं पत्रव्यवहार ठेवूं लागला. हल्लीं पेशवाही इंग्लिशांवर उठला होता, त्याच्याशींही तो स्नेह करूं लागला. पेशव्यानें त्यास मराठ्यांचें सेनाधिपत्य देऊन त्या हुद्देदाराजवळ असणारें एक भव्य निशाण दिलें. आपासाहेबानें आपलें सैन्य जमा केलें, आणि पेशव्याप्रमाणेंच बाह्यात्कारीं असें सांगितलें कीं, पेंढाऱ्यांचा नाश करितांना इंग्लिशांस मदत करण्याकरितां मीं हें सैन्य जमविलें आहे. शांतता असावी अशी त्याची बाह्यात्कारीं अद्यापि इच्छा होतीच; तरी त्यानें रेसिडेंटाचे छावणीवर व इंग्लिश लोकांवर हल्ला करण्याची तयारी केली. रेसिडेंट जेंकिन्स ह्यानें मदत मागितल्यावरून त्याचे साहाय्यास जनरल दवतन् हा दक्षिण देशांतील सैन्याची एक तुकडी घेऊन नागपुरास येत असतां, इकडे जे लोक त्या शहरांत होते त्यांनीं पुण्याचे लोकांप्रमाणें हल्ला करणारे शत्रूंशीं मोठे शौर्यानें लढण्याचा निश्चय केला. इंग्लिश लोकांपेक्षां त्यांचे शत्रु वीसपट अधिक होते, तरी आपले देशाच्या शत्रूंशीं शौर्यानें लढाई करावयाची असा लष्करी व इतर कामदार ह्या सर्वांनीं निश्चय केला.

त्यांजवर हल्ला करण्यास तयार होतो.

नागपुरचें वर्णन.

नागपूर शहर व रेसिडेंटाचें ठाणें ह्यांच्यामध्यें सितावळदी ह्मणून एक लहानशी टेंकडी आहे. त्या टेंकडीच्या उत्तरेच्या कांठीं एक डोंगर शंक्वाकृति आहे, ह्मणजे ता शेंड्याकडे अरुंद होत गेला आहे; आणि तिच्या दक्षिणेस एक आहे तो नमून बराच

सपाट आहे. ह्या दोन ठिकाणीं बहुतेक पायदळ राहिलें होतें, आणि उत्तरेकडच्या डोंगरावर दोन तोफा ठेविलेल्या होत्या. रेसिदेंताचे ठाण्याजवळचे मैदानावर पायदळाची लहानशी तुकडी व सर्व घोडेस्वार होते.

सव्विसावे नोवेंबरचे तिसरे प्रहरीं राजाचे पदरचे आरब लोक डोंगरावरचे इंग्लिश लोकांभोंवताले मिळाले. अजूनही राजा बाहेरून इंग्लिशांचा स्नेहीच ह्मणवीत असे. परंतु इकडे त्याचे दोन प्रधान रेसिदेंताशीं तह करीत असतां, त्याचे लोकांकडून तोफांचे ध्वनि येऊं लागले, तेव्हां अर्थातच त्याचा खोटेपणा उघडीस आला.

अरब लोकांच्या कपटाची शाबुदी.

सर्व रात्रभर दोहोंकडून तोफांचा भडिमार चालला होता. ह्यामुळें अंधार नाहींसा होऊन चोहोंकडे उजेड दिसत होता. आरब लोक धाकटा डोंगर घेण्याचा प्रयत्न करीत होते, आणि इंग्लिशांकडचे काळे लोक त्याचे संरक्षणार्थ मोठे शौर्यानें लढत होते. असें चाललें असतां मराठ्यांचें एक सैन्य शहरांतून मैदानांत आलें, आणि त्यांतील लोकांनीं रेसिदेंताचें ठिकाण व त्याजवळचे साहेब लोक ह्यांस प्रातःकाळापूर्वींच वेढा घातला. मग तेथें पूर्वीपेक्षां मोठे निकरानें लढाई चालूं लागली, तेव्हां तिचा काय परिणाम होतो हें तेथील सर्व इंग्रज लोक सचिंत होऊन पाहूं लागले. इंग्लिशांचा पराजय होतोसें पहिल्यानें वाटलें; कारण उजवेकडच्या डोंगरावरची तोफ अगदीं निरुपयोगी झाली. अरब लोकांनीं वर चढून तेथें थोडे काळे लोक होते ते घाबरविले. त्यांनीं आपल्या कांहीं तोफा वर आणिल्या; आणि दुसऱ्या डोंगरावर जे इंग्लिश होते त्यांजवर ते मोठा भडिमार करूं लागले. मैदानांत जे मराठे होते ते जवळ जवळ येऊं लागले, तेव्हां अगदीं मोड झाला असें वाटलें; तरी कपतान फित्जरल्द ह्यानें तीनच घोडेस्वारांच्या टोळ्यांनिशीं मराठ्यांवर हल्ला करून त्यांस मागें हटविलें, त्यांच्या तोफा घेतल्या, आणि रेसिदेंताचे छावणीकडे परत जातांना त्याच तोफा सोडिल्या.

सिताबल्दी टेंकडीवर हल्ला. ता. २६, २७ नोवेंबर सन १८१७.

अरबलोकांवर जय.

हें फित्जरल्द साहेबाचें अचाट कृत्य डोंगरांतल्या लोकांनीं पाहिलें, तेव्हां काळे लोकांनीं तेथें जयजयकार करून अरबांवर संगिनींचा हल्ला केला. ते लोकही मोठे निकरानें लढले; परंतु त्यांस मागें हटावें लागलें. ते परत जातांना त्यांचे ताब्यांतील डोंगरावरचे दारूचे खजिन्यास आग लागली, तेव्हां ह्या घोंटाळ्यामध्यें काळे लोकांनीं पुढें जाऊन शत्रूंस हांकून लाविलें, आणि पुनः तो डोंगर आपले स्वाधीन करून घेतला. ह्याच

वेळेस कांहीं घोडेस्वारांनीं आपले घोडे भरधांव काढून शत्रूंस पळवून लाविलें. ह्याप्रमाणें थोडेशा शूर मनुष्यांनीं पुष्कळ लोकांवर जय मिळविला.

झालेल्या गोष्टीचें मला फार दुःख वाटतें, असें तो ढोंगी राजा बाह्यात्कारीं दर्शवूं लागला, आणि रेसिडेंतापाशीं तहाचें बोलणें लावूं लागला. तेव्हां रेसिडेंतानें त्यास सांगितलें कीं, तुमचें सैन्य येथून हालल्याशिवाय तुमच्याशीं तह होणार नाहीं. ह्या गोष्टीस त्यानें मान्य होऊन आपलें मराठे लोकांचें सैन्य शहरचे दुसरे बाजूस नेलें, तेव्हां कांहीं मुदतीचा तह ठरला. ह्या वेळेस इंग्लिशांचे लोक चोहोंकडून येत होते. तेरावे डिसेंबरास जनरल दवतन ह्याचे हाताखालची टोळी आली, आणि रेसिडेंतास हवें होतें तितकें पाठबळ मिळालें, ह्यामुळें राजाशीं तह करितांना आपणास पाहिजेत ते ठराव करण्यास त्याच्या अंगीं सामर्थ्य आलें. त्याचें बोलणें असें होतें कीं, न्यायदृष्ट्या पाहिलें असतां खरोखरी माझा राज्यावरचा अधिकार नाहींसा झाला, असें राजानें कबूल करावें, आपले सैन्याचीं हत्यारें घ्यावीं आणि तुर्त नागपूर इंग्लिशांच्या स्वाधीन करावें. तेव्हां राजा घोटाळून जाऊन, ह्याचें उत्तर आतां सांगतों, मग सांगतों असें लांबणीवर टाकून तो वास्तविक आपले मनांत काय आहे हें स्पष्ट सांगेना; तेव्हां पंधरावे तारखेस प्रातःकाळीं इंग्लिशांचें सैन्य युद्धास सिद्ध झालें; आणि रेसिडेंतानें एक कायम वेळ ठरवून राजास सांगितलें कीं, त्या वेळेच्या आंत तुह्मांस काय तें उत्तर दिलें पाहिजे. सोळावे तारखेस मराठ्यांचे छावणीकडे इंग्लिश लोकांनीं कूच केलें. शेवटीं जेव्हां कांहीं चालेनासें झालें, तेव्हां राजा घोड्यावर बसून इंग्लिशांचे सैन्यांत गेला, आणि इंग्लिशांचे स्वाधीन होऊन आपला तोफखाना स्वाधीन करून देतों असें बोलला. राजाचे बोलण्याप्रमाणें इंग्लिशांचें सैन्य तोफा स्वाधीन करून घेण्याकरितां पुढें निघालें. पहिला मोरचा इंग्लिशांचे स्वाधीन होऊन ते पुढें चालले, तेव्हां शत्रूंनीं अडथळा केल्यावरून नागपुरचे लढाईस आरंभ झाला.

राजाबरोबर तह.

इंग्लिशांचे स्वार येतात.

नागपुरची लढाई. ता. १६ डिसेंबर सन १८१७.

इंग्लिशांचे पायदळांतील लोकांनीं संगिनींचा हल्ला करून तोफा स्वाधीन करून घेतल्या; आणि घोडेस्वारांनीं आपलेकडील तोफखाना देऊन शत्रूंचे उजवे बाजूवर हल्ला केला.

नागपुरास वेढा घालितात. ता. २०।१२।१७.

ह्याप्रमाणें रणामध्यें मराठ्यांची पळापळ झाल्यावर, अरब लोकांचे हातीं नागपूर शहर होतें तें घेण्याचें मात्र राहिलें. वेढा घालण्याचा तोफखाना तेथें नव्हता, ह्यामुळें

थोडया तोफांनिशीं इंग्लिशांस मोठीशी वाट पाडतां येईना. तेव्हां त्यांनीं हल्ला करण्याचा एकवार यत्न केला, तो सफळ न होतां त्यांचे पुष्कळ लोक मेले; तरी दुसऱ्या वेळीं यत्न करण्याचे पूर्वींच अरब लोकांनीं शहर इंग्लिशांच्या स्वाधीन केलें.

इकडे जनरल हार्दिमन् ह्यांस आपले टोळीनिशीं रेव्याहून नागपुरावर जाण्याचा हुकूम झाला होता. तिकडे जात असतां त्याची व मराठयांची जबलपूर येथें गांठ पडली. ते मजबूत ठिकाणीं होते, त्यांचे उजवे बाजूस उंच आणि खडकाळ असा एक डोंगर होता, आणि डावे बाजूस खंदक व शहर हीं होतीं. इंग्लिशांनीं हल्ला केला तेव्हां शत्रूंकडचे घोडेस्वार मार्गे हटले; तरी त्यांच्या पायदळांतले लोक डोंगरावर चढले, आणि कांहीं वेळ तेथून मोठे शौर्यानें व धिमेपणानें लढले; परंतु शेवटीं इंग्रेज लोकांनीं त्यांस तेथून हांकून देऊन पळावयास लाविलें.

जबलपूरची लढाई. ता० १९ डिसेंबर सन १८१७.

ही लढाई झाल्यावर जनरल हार्दिमन् हा नागपुराकडे जावयास निघाला. परंतु तो फार लांब गेला नाहीं तोंच, नुकती लढाई झाली तींत नागपूर स्वाधीन झालें, असा रेसिडेंताकडून त्यास निरोप आला; तेव्हां नागपूर येथें आपलें कांहीं काम नाहीं असें समजून तो जबलपुरास परत गेला.

नागपुरांत झालेलें वर्तमान गवर्नर जनरलास कळलें, तेव्हां त्यानें असा हुकूम केला कीं, नागपुरचे राजास गादीवर राखण्याचें तुह्मीं वचन दिलें नसल्यास त्या विश्वासघातकी राजास पदच्युत करावें. रेसिडेंतानें ह्याप्रमाणें वचन दिलें होतें, ह्मणून आपासाहिबास राजा हें नांव आणखी कांहीं वेळ राहिलें. ह्यामुळें हा काळपर्यंत विश्वासघाताकरितां त्यास जितकें शासन व्हावयाचें तितकें झालें नाहीं.

राजाविषयीं कांहीं दया दाखवितात.

पंधरावा भाग समाप्त.

# भाग सोळावा.

## पेंढारी व मराठे ह्यांच्याशीं चाललेल्या लढाईचा शेवट.

इ० स० १८१७ पासून सन १८१९ पर्यंत.

शिंदे—यशवंतराव होळकर ह्याच्या मागून त्याचा मुलगा गादीवर बसतो—शिंदा भयभीत होतो—होळकराकडील बहुतेक सरदार लढाईचा हेतु प्रगट करितात—तुळजाबाई हिचा खून—महिदपूरची लढाई—होळकराचें राज्य जिंकतात—पेंढाऱ्यांचा बीमोड करितात—करीमखान स्वाधीन होतो—छटूचा शेवट—पेशव्याचा पाठलाग—तो त्या पाठलाग करणाऱ्यांस ठकवितो—तो पुण्याकडे येतो—त्या शहराच्या कुमकेस एक टोळी जाते—कोरेगांवीं शूरत्वाचें कृत्य—पेशवा पळतच सुटतो—बापू गोखले—अष्टें येथें घोडेस्वारांची लढाई—पेशवा स्वाधीन होतो—त्यास ऐषआराम करण्यासारख्या कैदेंत ठेवितात—साताऱ्च्या राजास गादीवर बसवितात—त्रिंबकजीस पुन्हा धरितात—थालनेरचा किल्ला घेतात—पहारेकऱ्यांस फांशीं देतात—नागपूरचा राजा—तो पुनः फितुरी चालवितो—त्यास कैद करून नेतात—त्यास अलाहाबादेस पाठवितात—तो तेथून पळतो—तो महादेवाच्या डोंगरांत पळून जातो—अशिरगडचा किल्ला घेतात—आपासाहेब पुन्हा पळतो—तो पंजाबांत आश्रय धरून राहतो—नागपूर येथें नवा राजा—लढाईचा शेवट.

पेशवा आणि आपासाहेब ह्या दोन विश्वासघातकी अधिकाऱ्यांची कांहीं वेळ गोष्ट सोडून दुसऱ्या दोन मराठे सरदारांचें वर्णन करावें, हें बरें दिसतें; कारण ह्या दोघांनींही इंग्लिशांस फार त्रास दिला. परंतु पुष्कळ अंशीं त्यांस त्रास देण्याचा मार्ग नाहींसा झाला होता. शिंदा हा त्यांचा जुना शत्रु अद्यापि जिवंत होता. होळकर वेड लागून मरण पावला; आणि त्याचे मुलखाचा कारभार त्याचा मुलगा मल्हारराव व त्याची राख तुळजाबाई हीं करूं लागलीं. ही राख मुलगा लहान होता तोंपर्यंत कारभार करीत होती. पहिल्यानें शिंदा व इंग्लिश ह्यांचे वैरभावाचीं चिन्हें दिसत होतीं खरीं, परंतु मार्क्विस आफ् हेस्तिंग्स ह्याचे हाताखालीं मोठें भयंकर सैन्य होतें, ह्यामुळें शिंदा बाह्यात्कारीं वैरभाव दिसण्याजोगीं कामें करीत नव्हता. इंग्लिशांस साहाय्य करण्याकरितां त्यानें एक सैन्य तयार केलें होतें, पळालेल्या पेंढाऱ्यांस तो आश्रय देत नव्हता, आणि तो जातीचा मराठा असून इंग्लिशांशीं चांगले रीतीनें वागला. पण वास्तविक पाहिलें असतां इंग्लि-

शिंद्याची वर्तणूक.

शांशीं सख्य असावें हें त्याचे मनांत नव्हतें. त्याचे हाताखालचे सरदार एकाएकीं वश होईनात; त्याचा हुकूम त्यांस दाखविला असतां ते आपले हाताखालचे किल्ले स्वाधीन करीनात; आणि असें ह्मणत कीं, शिंद्यांनें आह्मांस आंतून निराळे प्रकारचे हुकूम दिले आहेत.

तुळजाबाई इत्यादि होळकराच्या मुलखाचा कारभार करणाऱ्यांपैकीं कांहीं लोकांचे मनांत इंग्लिशांशीं गोडीगुलाबीनें राहण्याचें होतें; परंतु पुष्कळ सरदार ह्या गोष्टीस अगदीं अनुकूल नव्हते. लढाई करायाचें ज्यांचे मनांत होतें, त्यांचें बळ चालून त्यांनीं तुळजाबाईचा खून केला आणि तिच्या पक्षाकडचे लोक बंदींत ठेवून लढाईस सैन्य तयार केलें. सर तामस हिस्लाप ह्याचे हाताखालची इंग्लिशांची टोळी जवळच होती, त्या लोकांची छावणी हरणई येथें होती, तेथून निघून ते लवकरच महिदपूर येथें शत्रु होते त्यांचे दृष्टीसमोर आले. ते व मराठे ह्यांचेमध्यें एक लहानसा ओढा होता. मराठे समोरचे कांठावर असून त्यांचे संरक्षणार्थ मोठी तोफांची रांग होती. ओढयाचे ज्या बाजूस इंग्लिश लोक होते तिकडे जे शत्रु होते त्यांस त्यांनीं हाकून लाविलें. मग ते नदी उतरून गेले तेव्हां मध्यें तोफखाना होता ह्यामुळें शत्रूंच्या दृष्टीस ते पडले नाहींत. पलीकडील कांठ उंच होता, ह्यामुळें यांस पलीकडे गेल्यावर सहज एके शेजेनें उभें राहतां आलें.

होळकराचे सरदार लढाईचा हेतु प्रगट करितात.

महिदपूरची लढाई. ता० २१ दिसेंबर स १८१७.

सर जान मालकम ह्याचे हाताखालचे पायदळांतील पुष्कळ लोकांनीं शत्रूंचे सैन्याचे डावे बाजूवर हल्ला करावा, आणि बाकीचें पायदळ व घोडेस्वार ह्यांनीं मिळून उजवे बाजूचे लोकांशीं लढावें, असा बेत झाला होता. ते नदी उतरावयास लागतांच त्यांजवर तोफांचा मोठा भडिमार चालू झाला; असें असतां ते तसेच नेट देऊन उतरून गेले, आणि लढत लढत तोफा होत्या तेथपर्यंत जाऊन त्यांनीं शत्रूंस मागें हटविलें. मराठे लोक ओढयाचे कांठानेंच फुटाफूट न होतां व्यवस्थेनें मागें हटले, आणि एके ठिकाणीं उतार होता तेथून उतरून जाण्याचे उद्देशानें तेथें उभे राहिले; ही युक्ति त्यांनीं पळून जाण्याकरितांच काढिली; कारण जेव्हां इंग्लिश आले तेव्हां कांहीं अडथळा न करितां ते पळून गेले.

ही लढाई झाल्यावर होळकराचे सरदारांचा वैरभाव दिसून आला नाहीं. कांहीं लहानशा चकमकी झडल्या, पण मग लवकरच इंग्लिशांनीं त्यांचा मुलूख जिंकिला; आणि मल्हारराव होळकराबद्दल जे मुत्सद्दी कारभार करीत होते

होळकराचें राज्य जिंकितात. सन १८१७.

त्यांच्याशीं इंग्लिशांचा तह झाला, त्याचे योगें पुष्कळ मुलूख इंग्लिशांचें हातीं आला. होळकराचे मुलखांत इंग्लिशांचें ठाणें बसलें, आणि सगळा अंमल त्यांचे हातीं आला.

इंग्लिशांचे सैन्याची एक टोळी पेशवा व त्याचे लोक ह्यांचा पाठलाग करीत होती, तिजखेरीज बाकीचें सर्व सैन्य मराठ्यांचे लढाईतून मोकळें झालें; ह्यामुळें पेंढाऱ्यांची समाप्ति करण्याचे कामास पुष्कळ लोक लागले. करीमखान आणि छट्टू हे, ह्या लुटारू लोकांनिशीं अद्यापि लुटालूट करीतच होते. कांहीं जण महिदपूरच्या लढाईंत होते, कांहीं जावद येथें होते, आणि कांहीं जण चंबळा नदीचे पश्चिमेस पुष्कळ ठिकाणीं होते. कांहीं टोळ्यांतील लोक वाटेस चालावयाजोगा हलका पोषाख करून जिकडे तिकडे पेंढाऱ्यांचा पाठलाग करूं लागले. जेथें जेथें ते भेटले तेथें तेथें त्यांनीं त्यांचा नाश करून त्यांस पळवून लाविलें; पेंढाऱ्यांचे मुख्यांस जेव्हां त्यांचे लोकांनीं सोडिलें, तेव्हां ते गांवोगांव फिरून जेथें जेथें आश्रय मिळाला तेथें तेथें लपून राहूं लागले. शेवटीं करीमखान आणि कांहीं लोक इंग्लिशांच्या स्वाधीन झाले, तेव्हां त्यांनीं त्यांस कंपनीच्या मुलखांत पाठविलें. येथें, जो करीमखान पूर्वी मोठें भयंकर राक्षसासारखा होता, तो हल्लीं शांतवृत्ति धरून मोठा उद्योगी शेतकरी होऊन राहिला.

**पेंढाऱ्यांचा नाश. सन १८१७.**

**करीमखान स्वाधीन होतो.**

छट्टू अद्यापि मोकळाच होता. तो एक वर्षापेक्षांही अधिक वेळ फिरत होता. तो पहिल्यानें भोपाळचे राजाकडे पळून गेला; तेथें जर इंग्लिश मला कांहीं मालमत्ता हिंदुस्थानांत देतील, तर मी स्वाधीन होतों, असें त्यानें त्या राजाचे द्वारें बोलणें लाविलें. ह्या बोलण्यास इंग्लिश मान्य होईनात, तेव्हां त्यानें पुनः लुटालूट आरंभिली. जेव्हां नागपूरचा राजा दुसऱ्यानें इंग्लिशांशीं विरुद्ध होऊन ते त्यास धरण्याचे बेतांत असतां त्यांस चुकावून पळून गेला, तेव्हां त्याजबरोबर छट्टू होता; परंतु तो त्याजबरोबर फार वेळ राहिला नाहीं. एके दिवशीं आपासाहेब अशिरगडच्या किल्ल्यांत आश्रय पहात असतां त्यास आंत जाण्यास परवानगी मिळाली, पण छट्टूस मिळाली नाहीं. अशिरगडांतले लोक आपणास अनुकूल नाहींत, असें समजून तो पेंढारी तेथून निघून निर्भयपणानें दुसरे ठिकाणीं चालला; परंतु तो आश्रय मिळण्याजोगे जागेचा शोध करीत करीत एका भयंकर घाटांतून घोड्यावर बसून चालला असतां जवळ जी दाट झाडी होती, तेथून एका वाघानें एकदम उडी मारून त्यास खाऊन टाकिलें.

**छट्टूचा शेवट.**

आतां पुनः पेशव्याची गोष्ट चालवावी हें बरें दिसतें. ह्याजवर हल्ला

करण्याची तयारी इंग्लिश करूं लागलें, तों तो पुण्याहून पळून गेला. त्या शहराच्या रक्षणार्थ तेथें कांहीं थोडे लोक ठेवून जनरल स्मिथ साहेब आपले हाताखालचे लोकांनिशीं पेशव्याचे मागोमाग पाठलाग करीत चालला. तो फार जलद पळे, ह्यामुळें पाठलाग करणारे लोकांस सांपडत नसे. दक्षिणेकडे जाऊन आपली सुटका होत नाहीं, असें समजून तो पुणें स्वाधीन करून घेण्याच्या हेतूनें परत आला; तेव्हां त्या ठिकाणीं जे लोक होते त्यांस पाठबळ देण्याकरितां पुण्याहून दोन मजलांवर घोडनदी आहे तेथून एक टोळी यावी असा हुकूम झाला. ती टोळी कपतान स्तांतन ह्याचे हाताखालीं असून तींत सहाशें काळे लोक, तोफखान्यावरचे २६ गोरे लोक, दोन तोफा, आणि सुमारें तीनशें घोडेस्वार इतके होते. ही लहान टोळी घोडनदीहून दिसेंबरचे ३१ वे तारिखेस निघाली. दुसरे दिवशीं जेव्हां ती एके डोंगरावर गेली आणि तीस तेथून पुणें दिसूं लागलें, तेव्हां २०००० घोडेस्वार आणि ८००० पायदळ इतकें पेशव्यांचें सैन्य तिचे दृष्टीस पडलें. दोहों सैन्यांपासून सुमारें सारखे अंतरावर एका लहानशा नदीचे कांठीं कोरेगांव ह्मणून एक गांव आहे, तेथील घरांच्या मध्यें लहानशा दगडांच्या भिंती होत्या. कपतान स्तांतन साहेब लागलाच हें गांव स्वाधीन करून घेण्याकरितां निघाला, आणि शत्रूचे पायदळांत दांडगे अरब लोक होते तेही ह्याप्रमाणें निघाले. पहिल्यानें ती जागा घेण्याकरितां दोहों सैन्यांतील लोक दोहोंकडून एकदम शिरून जिवावर उदार होऊन लढले. जास्ती लोक जिकडे होते तिकडचा जय झाला, आणि अरब लोकांनीं बहुतकरून सगळें गांव आणि एक लहानसा किल्ला आपले स्वाधीन करून घेऊन, त्या किल्ल्यावर लहानशा दोन तोफा ठेविल्या. त्या गांवाच्या दुसरे बाजूस जे इंग्लिश होते त्यांस ते हांकून देऊं लागले. ह्या वेळेस दोहों सैन्यांची झटपट जवळून झाली आणि तींत पुष्कळ लोक मेले. अरब लोक सभोंवतालचे भिंतीवर चढून आपले शत्रूंशीं लढण्याकरितां घरांचे कवलारांवरूनच चालले. इंग्लिशांची व त्यांची गांठ पडल्यावर इंग्लिशांनीं त्यांजवर संगिनींचा हल्ला केला. इंग्लिशांकडचे काळे लोकांजवळ कांहीं खावयास नव्हतें, ह्याकरितां ते फार कासावीस झाले होते. त्या दिवशीं त्यांचे तोंडांत पाण्याचा थेंब देखील गेला नव्हता; असें असतांही जीव वांचलाच तर लढाई करून वांचेल, असें समजून ते लढले; कारण, अरब लोक आपणावर दया करणार नाहींत, हें त्यांस पक्कें

पेशव्याचा पाठलाग.

तो पुण्याकडे परततो.

त्या शहराकडे एक टोळी पाठवितात.

कोरेगांवची लढाई. ता. १ जून सन १८१८.

ठाऊक होतें. त्यांचे वरचे अधिकाऱ्यांनीं मोठे शौर्यानें आपलें काम बजाविलें; आणि त्यांजबरोबर जे शस्त्रवैद्य होते त्यांनीं आपलीं शस्त्रें टाकून देऊन त्या लोकांस उल्हासकारक भाषणें बोलून पुढें नेलें, आणि आपले बरोबरचे शूर लोकांनिशीं लढाई दिली. ह्या निकराचे लढाईस दोन प्रहरींच प्रारंभ झाला, आणि संध्याकाळ व्हावयास आली, तरी ती तशीच पहिल्याप्रमाणें जोरानें चालली होती. त्या वेळीं अरब लोकांस जय मिळतोसें दिसलें; कारण इंग्लिशांचे आठ सरदार होते त्यांतले पांच कापले गेले; शत्रूंनीं त्यांची एक तोफ घेतली, आणि जखमी झालेले इंग्लिशांकडचे लोक एके छपरींत निजले होते, तींत त्यांनीं शिरून त्यांतून प्रत्येकाचा निर्दयपणें जीव घेतला. ती वेळ शरण जाण्याची नव्हती; कारण, आपण अरब लोकांचे हातीं सांपडलों तर आपले जखमी लोकांची जशी त्यांनीं अवस्था केली, त्याप्रमाणें आपणास कापून ते आपले तुकडे तुकडे करतील, हें सर्वांस माहीत होतें, इंग्लिशांस अगदीं आशा नाहींशी झाली, तरी ते शूर ह्यामुळें त्यांचें धैर्य खचलें नाहीं. जोंपर्यंत जीव आहे तोंपर्यंत आशा आहेच, असें समजून आणखी एकदां हल्ला करावा असा त्यांनीं बेत केला; आणि त्या वेळेस त्यांस जय मिळून त्यांनीं जयजयकार केला. कपतान स्तांतन, लेफ्तेनेंत जोन्स, आणि असिस्तंत् सर्जन बाइली हे त्या शूर लोकांचे मुख्य झाले. त्यांनीं छपरीमध्यें शिरून अरबांवर संगिनींचा हल्ला केला. त्या वेळेस ते ज्या आवेशानें लढले, तो आवेश मनुष्य निराश झाल्याशिवाय येत नाहीं. लेफ्तेनेंत पतिन्सन जखमा लागून भुईवर पडला होता, त्यानें जेव्हां शत्रूंचा हल्ला आला तेव्हां आपल्या वेदना वगैरे विसरून एकाच्या बंदुकीचें तोंड धरिलें, आणि आपले लोकांस मदत देण्याकरितां, उतावळा होऊन जो अरब हातीं सांपडे त्यास तो मारून पाडूं लागला. ह्याप्रमाणें आपलें शौर्य दाखवून काळे लोकांस उत्तेजन देत असतां गोळी लागून तो पुनः खालीं पडला. इंग्लिशांची गेलेली तोफ पुन्हा त्यांनीं घेतली आणि अरब लोक मागें हटविले. लढाई तशीच कांहीं वेळ चालली. नऊ वाजावयाचे वेळेस शत्रूचे लोकांस गांव सोडून द्यावें लागलें. ह्या लढाईचे दिवशीं काळे लोक फार झटले ह्यामुळें त्यांस बहुत श्रम झाले. मग शत्रु गेल्यानंतर त्यांस थोडेंसें पाणी प्यावयास मिळून ते ताजेतवाने झाले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठे लोकांनीं पुनः हल्ला केला नाहीं, तेव्हां संध्याकाळीं कपतान स्तांतन् घोडनदीस जाण्याकरितां निघून त्या गांवीं आपलें निशाण उडवीत आणि रणवाद्यें वाजवीत अशा समारंभानें शिरला.

इंग्रेज लोकांनीं हिंदुस्थानांत ज्या ज्या लढाया केल्या त्यांत कोरेगांव येथील लढाईंत त्यांचें फार शौर्य दिसून आलें.

पेशवा अद्यापि पळतच होता. तो जात्या भित्रा होता, ह्यामुळें कांहीं भय उत्पन्न होतांच तो पळत असे. त्याचे जवळ बापू गोखला ह्मणून एक शूर सरदार होता, त्याजकडेच सेनाधिपत्य असे; तो अष्टें एथें जेव्हां इंग्रजांचे घोडेस्वारांनीं मराठ्यांस गांठून त्यांचा अगदीं पराजय केला, तेव्हां त्या गर्दींत मारला गेला. पेशवा पळतच राहतो.

बापू गोखला मरण पावल्यानंतर पेशवा कोठें कोठें गेला हें सांगूं लागलों तर वांचणारांस कंटाळा येईल. त्याचें सैन्य दिवसानुदिवस कमी होत चाललें, आणि शेवटीं त्याजपाशीं थोडेसे अरब लोक मात्र राहिले. तो जिकडे जिकडे जाई तिकडे तिकडे त्यास इंग्रजांची टोळी भेटतच असे. शेवटीं तो उत्तरेकडे पळून गेला. तिकडे सर जान मालकम् ह्यांचे हाताखालीं इंग्लिशांचें सैन्य होतेंच; त्या सरदाराच्या स्वाधीन पेशवा झाला. ही गोष्ट इ०स०१८१८ ह्या वर्षीं जून महिन्याच्या तिसऱ्या तारखेस झाली. तो स्वाधीन होतो. ता० ३ जून सन १८१८.

पेशवा शरण आला तेव्हां सर जान मालकम् ह्यानें जें त्यास वचन दिलें होतें तें गवर्नर जनरलास आवडलें नाहीं, तरी तें त्यानें मान्य केलें. कानपुराजवळ ब्रह्मवर्त येथें इंग्लिशांनीं त्यास नेऊन ठेवून आठ लाख रुपये सालीना पेनशन करून दिलें. तेथें त्यानें आपले बाकीचे आयुष्याचे दिवस नानाप्रकारच्या ऐषआरामांत घालविले. त्याला पेनशन देतात.

मग इंग्लिशांनीं पेशव्याचा हुद्दा अगदीं मोडून टाकिला. सातारचा राजा हा शिवाजीचा वंशज असून मराठ्यांचा वास्तविक मुख्य होता, त्यास त्याच्या पूर्वीच्या गादीवर त्यांनीं बसविलें, आणि त्यास इंग्लिशांनीं आश्रय देत असावें आणि त्यानेंही ह्यांचे अनुमतानें वागावें असें ठरविलें. सातारच्या राजास गादीवर बसवितात. स० १८१८.

वास्तविक पहातां पेशव्याच्या कृपेंतला त्रिंबकजी ह्यानें ही लढाई करण्याविषयीं पेशव्याच्या मनांत भरून दिलें होतें. तो नाशिक येथें लपला होता. पेशवा स्वाधीन झाल्यावर, तेथें त्याला धरून, पूर्वीं तो ठाण्याच्या तुरुंगांत असतां तेथून पळून गेला होता, तेथेंच त्याला इंग्लिशांनीं पुनः बंदींत ठेविलें; परंतु पुढें तेथून उचलून त्याला त्यांनीं काशीजवळ चुनारगड येथें नेऊन ठेविलें. त्रिंबकजीस धरून कैद करतात.

ह्या मोहिमेंत इंग्लिशांचे मुख्य उद्देश होते ते सिद्धीस गेले, ह्याकरितां

इंग्लिश लष्करास विश्रांति मिळते. ता० २७ फेब्रुवारी स. १८१८.

त्यांनीं जे मराठे अद्यापि हत्यारबंद होते त्यांस दाबांत ठेवण्यापुरतें सैन्य ठेविलें व बाकीचे सैन्याच्या सर्व टोळ्या कंपनीच्या मुलखांत जाऊं लागल्या. सर तामस हिस्लाप ह्याचे हाताखालची टोळी माळव्याहून दक्षिण देशांत जात असतां वाटेनें थालनेर किल्ला लागला; त्यावरून तापी नदीचा उतार दिसत होता. तो किल्ला होळकराचे ताब्यांतला असून इंग्लिशांचे स्वाधीन करण्याविषयीं त्यानें दिलेला हुकूम सर तामस हिस्लाप ह्याजपाशीं होता. तेथील किल्लेदार इंग्लिश सरदारानें सांगितलेलें न ऐकतां आपले धन्याचाही हुकूम मानीना, इंग्लिश जवळ आले तेव्हां तो त्यांजवर तोफांचा भडिमार करूं लागला. इंग्लिशांनीं तत्काळ हल्ला करण्याची तयारी केली. हल्ला करणारे लोकांनीं त्या किल्ल्याचे दोन दरवाजे आपले स्वाधीन करून घेतले, आणि जेव्हां ते तिसऱ्या दरवाज्यापाशीं गेले, तेव्हां शत्रूकडील कांहीं लोक किल्लेदारासहित हत्यारांशिवाय आले. मग इंग्लिशांनीं त्यांस धरून बंदींत ठेविलें. दुसरे दरवाजे जोरानें उघडून, शेवटल्या दरवाज्याजवळ (म्हणजे जो दरवाजा ओलांडून गेलें म्हणजे मनुष्य किल्ल्याचे आंत जातें त्याजवळ) जेव्हां इंग्लिश गेले, तेव्हां किल्ल्यावरचे लोक स्वाधीन होतों असें म्हणाले; मग तें त्यांचें बोलणें खरें असो किंवा बाह्यात्कारी असो. दरवाज्याचे आंतलें एक लहानसें दार उघडलें; पण त्या दारांतून कांहीं इंग्लिश सरदार व लोक हे जाऊं लागले, तोंच दाराचे भोंवताले कांहीं अरब लोक मिळाले होते त्यांनीं ते कापून टाकिले. मग इंग्लिशांनीं दरवाज्यावर हल्ला केला. अरब लोकांनीं हा मोठा विश्वासघात केला असें इंग्लिश लोकांस वाटल्यावरून त्यांस मोठा संताप आला, आणि त्यांनीं आंत शिरून तेथें जे हत्यारबंद होते ते सर्व ठार मारिले. किल्लेदारानें बंड करून विश्वासघात केला, ह्याकरितां किल्ल्याचे तटावर त्यास फांशीं द्यावें म्हणून सर तामस हिस्लाप ह्यानें दुसरे दिवशीं सकाळीं हुकूम केला. इंग्लंद व हिंदुस्थान ह्या दोहों ठिकाणचे अधिकाऱ्यांनीं हें काम करणाऱ्यास दोष लाविला. हें काम बरोबर केलें असो किंवा नसो, परंतु त्यामुळें इतकें झालें कीं, दुसरे कोणींही पुन्हा ह्याप्रमाणें हुकूम मोडिला नाहीं.

थालनेरचा किल्ला घेतात. ता० २७ फेब्रुवारी सन १८१८.

अरब लोक विश्वासघात करतात.

मुख्य अधिकारी फांशीं देतात.

पेशवा शरण आल्यानंतर वश न झालेला असा मुख्य शत्रु नागपूरचा राजा मात्र राहिला होता. इंग्लिशांनीं क्षमा करून मोठे मेहेरबानीनें

त्यास गादीवर बसविलें तों लागलाच तो त्यांजवर उठण्याचा बेत करूं लागला. पेशवा पळत असतां मदत देण्याविषयीं त्यास त्यानें लिहिलें, व तो पेंढाऱ्यांशीं पत्रव्यवहार ठेवूं लागला. ह्याप्रमाणें, ज्यांनीं त्याचें इतकें कल्याण केलें, त्यांजवर, महाराष्ट्र देशांतले नाखुष झालेले सगळे लोक उठविण्याचा तो यत्न करूं लागला. हें सर्व वर्तमान रेसिदेन्तास कळलें होतें; आणि एके मजबूत किल्ल्यामध्यें राजानें आपलीं मुलें माणसें व तिजोरी पाठविली असून तोही तेथें जाण्याच्या बेतांत होता. ह्यामुळें त्या त्रास देणाऱ्या राजास कैद करावें हें रेसिदेन्तास बरें वाटलें. त्यानें आपणास राज्य मिळावें ह्मणून आपला पूर्वीचा अधिकारी ठार मारिला, ही गोष्ट तो कैदेंत पडल्यावर उघाडीस आली.

आपासाहेब विश्वासघात करतो.

त्यास कैद करितात. ता. १५ मार्च स. १८१८.

त्या वेळेस असें वर्तमान कळलें होतें कीं, पेशवा नागपुरावर येऊन जिवावर उदार होऊन लढाई देणार आहे. ह्यास्तव त्या ठिकाणचे संरक्षणाकरितां इंग्लिशांनीं भोंवतालचें सैन्य बोलाविलें. पण जेव्हां पेशवा येण्याची वेळ गेली असें इंग्लिशांस वाटलें, तेव्हां त्यांनीं आपासाहेबास पळतां येऊं नये, ह्मणून त्याबरोबर पहारा देऊन त्यास प्रयागाकडे पाठविलें. वाटेनेंच त्यानें काळे लोकांस लांच देऊन त्यांस फितूर केलें, आणि आपण नागपुरचे उत्तरेस महादेवाच्या डोंगराकडे पळून गेला. तेथें जे रानटी डोंगरी लोक होते त्यांमध्यें ह्यास आश्रय मिळून चनिशाहा ह्मणून त्यांचा एक राजा होता त्यानें ह्यास साह्य केलें. कांहीं वेळ तो तसाच गुप्तपणें राहिला; आणि त्यानें आपलेजवळ दांडगे रानटी लोक मिळविले होते, ते घेऊन तो सभोंवतालचे मुलखावर हल्ला करून त्याचा नाश करूं लागला. हवा पालटली ह्मणजे इंग्लिशांचें सैन्य आपणावर हल्ला करणार असें त्यास समजलें, ह्मणून तो आणखी एकदां पळून गेला. ह्या वेळेस त्याजबरोबर छटू हा पेंढारी होता हें पूर्वीं सांगितलेंच आहे. अशीरगडचा किल्ला पेंढाऱ्यांचा जुना मित्र यशवंतराव लाड ह्याचे हाताखालीं होता, तेथें आपासाहेबास आश्रय मिळाला. हा किल्ला शिंद्याचे ताब्यांतला असून तो इंग्लिशांचे स्वाधीन करण्याविषयीं आपले धन्याचा हुकूम तो किल्लेदार मानीना. इंग्लिशांनीं कांहीं दिवस कुलपी गोळ्यांचा मारा केला, तेव्हां त्या किल्लेदाराचा निश्चय पाल-

त्याला दुसरे तुरुंगांत पाठवितात.

त्याची सुटका व त्यास आश्रय डोंगरी लोकांत मिळतो. ता. १३ मे सन १८१८.

आपासाहेब अशिरगडास जातो. अशिरगडचा वेढा. ता. ९ एप्रिल स. १८१९.

टला, आणि त्यानें तो किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन केला. शिंद्याचा विश्वासघात करण्याचा बेत असून तो काय करितो हें समजूं देत नाहीं, असें ते किल्ल्यांत गेले तेव्हां त्यांस समजलें, ह्यामुळें त्यांनीं तो किल्ला आपले ताब्यांत ठेविला.

आपासाहेब पळतो व त्यास शेवटीं आश्रय मिळतो.

इतकें इंग्लिशांनीं केलें तरी आपासाहेब अशिरगडांत सांपडला नाहीं. इंग्लिश तेथें येतांच तो तेथून निघून फकिराचें रूप धरून फिरत फिरत पंजाबास गेला, तेथें रणजितसिंग ह्यानें त्यास कांहीं नेमणूक करून दिली. मग तो हिंदुस्थानाकडे परत आला, तेव्हां इंग्लिश सरकारानें त्यास जोधपूरचे राजाचे मुलखांत राहण्याची परवानगी दिली. नंतर त्यानें इंग्लिशांस कांहीं त्रास दिला नाहीं व कांहीं विश्वासघातही केला नाहीं.

नागपुरची व्यवस्था.

नागपुरचे राजाचा वारस जो बाजीराव त्यास इंग्लिशांनीं तें राज्य दिलें; आणि तो फार लहान होता म्हणून सर्व कारभार त्याचे आईचे हातीं दिला. परंतु वास्तविक पाहिलें असतां सर्व खरा अधिकार इंग्लिशांचे हातीं होता.

लढाईचा शेवट. सन १८१९.

इंग्लिशांनीं अशिरगडास वेढा घातला तेव्हांपासून पुढें कांहीं लढाया झाल्या नाहींत. पेंढाऱ्यांशीं लढाई व मराठ्यांशीं लढाई ह्यांचा त्याच वेळेस शेवट झाला. इंग्लिशांनीं पेंढारी अगदीं नाहींतसे केले, मराठ्यांस अगदीं आपले ताब्यांत आणिलें; आणि हिंदुस्थानांत त्यांनीं आपला पराक्रम इतका जाज्वल्य व इतका उत्तम रीतीनें गाजविला कीं, तसा लोकांस पूर्वीं कधींही वाटला नव्हता. पुष्कळ मुलूख त्यांचे हाताखालीं आला; आणि लवकरच हिंदुस्थानचे मध्यभागीं पुष्कळ फेरफार दिसूं लागला. ज्या गांवांचा नाश पूर्वीं रानटी लुटारू येऊन करीत होते, तेथें स्वस्थता होऊन लोक सुखी झाले. लुटारू लोकांचे वगैरे बेशिस्त सैन्यांनीं तुडविल्यामुळें ज्या रानांचा नाश होऊन गेला होता, त्यास टवटवी येऊन तीं हिरवीं दिसूं लागलीं; आणि ज्या लोकांस पूर्वीं क्षणोक्षणीं जिवाचें भय उत्पन्न होत असे, ते इंग्रज सरकारचे आश्रयामुळें सुखी होऊन भरभराटीस आले.

सोळावा भाग समाप्त.

# भाग सतरावा.

## ब्रह्मदेशची लढाई व भरतपूरच्या किल्ल्याचा वेढा.

### इसवी सन १८२३ पासून १८२६ पर्यंत.

लार्ड आमहर्स्त नवे गवर्नर जनरल—ब्रह्मी लोकांबरोबर कलह—शहापुरीविषयीं वाद—ब्रिटिश लोकांचे त्या बेटांत संरक्षणार्थ ठेविलेले लोक ह्यांचा पराभव होतो—काचार येथील कृत्यें—लढाईविषयीं निश्चय होतो—ब्रह्मी लोकांची लढाईविषयीं उत्कंठा—लढाईचा बेत—रंगून घेतात—मेंढेकोटांवर हल्ला—किमांडीन घेतात—इंग्लिशांची स्थिति—शत्रूंस मोठया देवळापासून मागें हटवितात—मेंढेकोट घेतात—मार्ताबान व दुसरीं किनाऱ्यांवरील स्थळें घेतात—महाबंधुला सरदार—ब्रह्मी लोकांची चाल—त्यांचे खंदक—त्यांची दाणादाण होते—रंगुनास आग लावितात—ब्रिटिश लोक आंत शिरतात—पाण्यांतून जाणाऱ्या टोळीचा दानाबू येथें पराजय—जमिनीवरची टोळी परत येते—दोनाबू घेतात—महाबंधूलाचा मृत्यु—प्रोम येथें मुक्काम—आराकान जिंकतात—तहाचीं बोलणीं—अदलाबदल—शत्रूचा पराभव—मेलून घेतात—पाघामची लढाई—आवानजीक ब्रिटिश लोक—तह—भरतपूर येथील बंडें—राजास नागवितात—सर देवीद आक्तरलोनी ह्याचे बंदोबस्त—तो काम सोडून जातो—नवा रेसिदेंत—सरकार राजाचा पक्ष धरितें—भरतपुरास वेढा—तें हस्तगत होतें.

इसवी सन १८२३ चे जानेवारी महिन्यांत मार्क्विस आफ् हेस्तिंग्स हिंदुस्थानांतून इंग्लंदास जावयास निघाला. मग त्याचे जागेवर लार्ड आम्हर्स्त हा आगस्त महिन्यांत येऊन दाखल झाला.

लार्ड आम्हर्स्त ह्याची गवर्नर जनरलाच्या जाग्यावर नेमणूक झाल्यानंतर लवकरच, ज्या देशांत पूर्वी कधींही इंग्लिशांनीं लढाई केली नव्हती, तेथें लढाई करण्याचा प्रसंग येऊन पोहोंचला. ब्रह्मी लोकांनीं नुकताच आसाम देश जिंकला होता, ह्यामुळें त्यांचा मुलूख बंगालच्या पूर्वेकडच्या सरहद्दीपर्यंत वाढला होता. ते लोक वरचेवर लुटालूट करून, हद्दीवर राहणारे कंपनीचे प्रजेस त्रास देत असत. चितगांव आणि आराकान

ब्रह्मी लोकांबरोबर कलह. सन १८२३.

ब्रह्मी लोक शहापुरी घेतात. ता० २४ सप्टेंबर स.१८२३.

ह्यांच्या मध्यें, इंग्रेज लोक व ब्रह्मी लोक ह्यांचे राज्यांच्या सरहद्दीवर शहापुरी ह्मणून एक लहानसें ओसाड बेट आहे, तेथें इंग्लिशांनीं थोडेसे काळे लोकांचा पाहरा ठेविला होता. ह्या बेटाच्या मालकीविषयीं कलह उत्पन्न होऊन इ० स० १८२३ च्या सप्टेंबर महिन्यांत ब्रह्मी लोक तेथें आले, आणि त्यांनीं तेथल्या थोडे लोकांस जेर करून हांकून दिलें. गवर्नर जनरलानें आवाचे दरबारीं असें लिहून पाठविलें कीं, तुह्मी करितां हें फार वाईट आहे. ह्यावरून इंग्रेज लोक भ्याले असें समजून त्यांनीं त्यांचा धिकार केला. पुढले जानेवारीमध्यें ब्रह्मी लोकांचें मोठें सैन्य काचार प्रांतामधून जाऊन इंग्लिशांचें ठाणें सिलहट्ट येथें होतें, त्याजवळ पोहोंचून तेथें त्या लोकांनीं मेढेकोट बांधिले. इंग्लिशांच्या टोळीनें त्यांजवर हल्ला करून त्यांचा पराभव केला. इंग्लिशांनीं पुढेंही असाच पुष्कळ वेळां हल्ला केला, त्यांतून त्यांस एकदां मात्र जय मिळाला नाहीं. शहापुरीजवळ सोफाया ह्मणून एक इंग्लिशांचें लहानसें जहाज होतें, त्याचा मुख्य व त्यांतील दुसरे लोक ह्यांस कांहीं भुलथाप देऊन ब्रह्मी लोकांनीं धरून नेलें; हा त्यांनीं पहिल्यानें विश्वासघात केला, आणि मग कांहीं वेळानें ते लोक सोडून दिले; परंतु आमच्या हातून ही चुकी झाली अशा प्रकारचें कांहींच ते ब्रह्मी लोक बोलले नाहींत.

काचार येथील कृत्यें. जानेवारी. स.१८२४.

अशी कांहीं दिवस सरहद्दीवर आंतून आंतून लढाई चालली होती ती हल्लीं उघडपणें चालू झाली.

ब्रह्मी लोकांस लढाई करण्याविषयीं फार उत्कंठा होती. त्यांनीं आपल्याजवळच्या ज्या ज्या राज्यावर हल्ला केला त्या त्या ठिकाणीं त्यांस जयच मिळत गेला, ह्यामुळें गोरे लोकांवरही त्याचप्रमाणें जय मिळेल असें त्यांस वाटलें होतें. आणि असें सांगतात कीं, त्यांनीं महाबंधूला ह्मणून एक आपला मुख्य सरदार मोठें सैन्यानिशीं आराकानाकडे पाठविला होता, त्यानें बंगाल्यावर हल्ला करण्याचा आव घातला होता. तो गेल्यावर जय मिळाला ह्मणजे गव्हरनर जनरल ह्याचे पायांत घालण्याकरितां सोन्याची बेडी करून ठेविली होती. त्या लोकांची लढण्याची रीत नेपाळचे लोकांसारखीच होती. मेढेकोट आणि मातीच्या भिंती बांधून त्यांचे मागून ते लढत असत, आणि इंग्लिशांस मोकळे रानांतच लढण्याची संवय आहे, ह्मणून अशा रीतीनें लढलें असतां आपणासच जय मिळेल अशी त्यांची पक्की खातरी होती.

ब्रह्मी लोकांची लढाईविषयीं उत्कंठा.

ब्रह्मदेशच्या राजाची उमेद मोठी असून तो गर्वानें मोठमोठया फुशारक्या मारीत असे; पण त्याची भ्रांति जाऊन खातरी होण्याचा प्रसंग जवळच आला होता. त्याच्या राज्यावर हल्ला करून, इंग्लिश लोकांच सुशिक्षित आणि शूर लोक ह्यांच्यापुढें आपला लढण्याचा उपयोग नाहीं, अशी त्याची खातरी करण्याकरितां इंग्लिशांचें सैन्य तयारच होतें. सरहद्दीवरचे इंग्लिश लोकांनीं आपलें संरक्षण करण्याकडे मात्र लक्ष द्यावें, हल्ला करणारे लोकांनीं ब्रह्मदेशच्या ज्या मुलखांत शत्रूचे लोक संरक्षणार्थ कमी आहेत त्यांवरच हल्ला करावा, शत्रूच्या बंदरांचा नाश करावा, आणि इरावती नदी ब्रह्मदेशांत वाहते, तींतून त्या देशाच्या मध्यभागीं आपला शिरकाव करावा, असा इंग्लिशांनीं निश्चय केला.

लढाईचा बेत.

सर आर्चिबाल्ड क्यांबेल ह्याचे हाताखालचे सैन्याच्या सर्व तुकडया मे महिन्याच्या प्रारंभीं एके ठिकाणीं जमल्या. दहावे तारखेस कांहीं लढाऊ व कांहीं लोक भरलेलीं अशीं गलबतें रंगून येथें येऊन उतरलीं; तेव्हां त्यांच्यावर तोफांचा मारा होऊं लागला; परंतु जेव्हां लिफी ह्या गलबतांतून इंग्लिश तोफांचा भडिमार करूं लागले, तेव्हां शत्रूंचे मोरच्यांचें कांहीं चालेनासें झालें; मग गोरे लोकांनीं गलबतांतून उतरून शहरांत जाऊन पाहिलें, तों तें अगदीं ओसाड त्यांचे दृष्टीस पडलें. ब्रह्मी लोकांचे सैन्यांतलि लोक तेथून पळून गेले होते, आणि त्या शहरांतले राहणारे सर्व लोक आपले सरकारचे हुकुमाप्रमाणें आपलीं घरें सोडून रंगूनचे सभोंवतालचे रानांत गेले होते. तेथें ब्रह्मी लोक मेढेकोट बांधून त्यांच्या आश्रयानें दिवसानुदिवस हळू हळू इंग्लिशांस नकळत त्यांचे ठाण्याजवळ येऊं लागले. हा वेळपर्यंत ते दाट झाडीच्या आंत असल्यामुळें इंग्लिशांचे दृष्टीसच पडत नव्हते; पण मे महिन्याचे सव्विसावे तारखेस ते फारच जवळ आले, ह्यामुळें इंग्लिश जनरलानें शत्रूस तेथून हांकून देण्याचा निश्चय केला. त्याचेजवळ कांहीं गोरे व कांहीं काळे लोक होते, व दोन तोफा होत्या. त्यांपैकीं तोफा काळे लोकांजवळ ठेवून नुसते गोरे लोकांनिशीं त्यास पुढें चाल करावी लागली. एके लांबणीचे रस्त्यानें चालून तो मेढेकोटांचे पहिले रांगेपाशीं जाऊन पोहोंचला. तेथें शत्रु लढाई करण्याकरितां उभे राहिले होते. इंग्लिशांनीं कांहीं वेळ संगिनींचा हल्ला केल्यामुळें अगदीं थोडे वेळांत मेढेकोट त्यांचे स्वाधीन झाले; आणि ब्रह्मी लोक आश्रयाकरितां चोहोंकडे पळूं लागले. कांहीं वेळ ते मोठे शौर्यानें

रंगून घेतात. ता. ११ मे सन १८२४.

मेढेकोट घेतात. ता० २६ मे सन १८२४.

लढले, पण इंग्लिश लोक नेट देऊन इतके आवेशानें लढले कीं, ह्यांचेपुढें त्यांचें कांहीं चालेनासें झालें. रंगुनापासून थोडके अंतरावर किमांडीन ह्मणून एक ब्रह्मी लोकांचें बंदर होतें, त्याजवर इंग्लिशांनीं जून महिन्याचे दहावे तारखेस हल्ला केला. त्यांत त्यांस पुरतेपणीं जय मिळाला. त्यांनीं हे नवीन मेढेकोट पूर्वीच्या प्रमाणेंच मोठ्या शौर्यानें घेतले, आणि शत्रूंस पळवून लाविलें.

किमांडीन घेतात. ता० १०जून सन १८२४.

पुढें कांहीं वेळ लढाई बंद झाली. रंगूनचे सभोंवतालचे रानांतून ब्रह्मी लोक निघून गेले होते, आणि त्यांचा फार वेळ पराजय झाला, ह्यामुळें त्यांस लढाई करण्यापुरतें सामर्थ्यही आलें नव्हतें. इंग्लिशांसही पुढें चालण्याचा उपयोग नव्हता; कारण ते दिवस लढाई करण्याजोगे नव्हते, त्यांचे लोकांमध्यें आजाराची सात आली होती, त्यांजकडचे लोकही कमी झाले होते, आणि रंगून शहर ओसाड पडून पावसामुळें सभोंवतालचे प्रदेशांतले नद्यांस पूर आले होते ह्यामुळें पोटगीचें वगैरे सर्व सामान त्यांस हिंदुस्थानांतून न्यावें लागत होतें.

इंग्लिशांची स्थिति.

ब्रह्मी लोकांनींच पुनः लढाई चालू केली. थकियावुंगी ह्मणून त्यांचे दरबारांतला एक मुख्य सरदार होता, त्यास त्यांनीं हल्ला करणारे इंग्लिश लोकांस हांकून देण्याचे कामावर पाठविलें. तो मोठें सैन्यानिशीं इंग्लिशांचे छावणीवर चालून गेला. तेथें हल्ला करण्याजोगी मुख्य जागा ह्मटली तर एक मोठें देऊळ होतें. त्याची इमारत चांगली ढबदार असून शिखरास मुलामा दिलेला होता; ह्यामुळें ती चकचकत होती. तें देऊळ एका शंक्वाकृति डोंगरावर असून, रंगुनास जाण्याचा रस्ता त्याच्या माऱ्यांत होता. शत्रूंनीं मुख्यत्वेंकरून हें स्वाधीन करून घेण्याविषयीं यत्न केला; पण इंग्लिशांकडून त्यांजवर दोन तोफांचा थोडा वेळ भडिमार झाला, आणि काळे लोकांनीं संगिनींचा हल्ला केला; ह्यामुळें त्यांस मागें हटून पुनः रानांत पळून जावें लागलें. ह्या ब्रह्मी लोकांचे सरदारानें आपलें काम बजाविलें नाहीं, ह्यामुळें त्यांचे सरकारानें त्यास बडतर्फ केलें. त्यांचा नवा सरदार सुंभावुंगी ह्यास हल्ला करण्याचें धैर्य होईना, ह्मणून पूर्वीप्रमाणेंच मेढेकोट बांधून आपला बचाव करून घ्यावा, हें त्यास बरें वाटलें. आतां हल्ला करण्याचें काम अर्थातच इंग्रेज लोकांचें होतें. ज्या लोकांची हल्ला करण्याकडे योजना झाली, त्यांच्या त्यांनीं दोन टोळ्या केल्या, आणि त्यांतून एकीनें पाण्यांतून जावें व एकीनें जमिनीवरून जावें असा हुकूम केला. दोन्ही टोळ्यांतले लोकांनीं

थकियावुंगी ह्याचा हल्ला. ता० १जुलै सन १८२४.

डागोन देवळावरील हल्ला परतवितात.

सुंभावुंगी.

मोठमोठाले पराक्रम केल्यामुळें त्यांस जय मिळाला. इंग्लिशांचे गलबतांतून तोफांचा मारा होऊं लागला, तेव्हां शत्रूंचे मुख्य मेढेकोटांतून जो मारा होत होता तो बंद झाला आणि मेढेकोटाचे मध्यें वाट पडली. गोरे लोकांनीं गलबतांतून उतरून दोन मेढेकोट घेतले, तेव्हां तिसरा आपोआप शत्रूंनीं सोडून दिला. जमिनीवर जे लोक गेले त्यांजकडे तर ह्यापेक्षांही दुर्घट काम होतें; असें असतां त्यांनीं तें चांगले रीतीनें बजाविलें. त्यांनीं एके घटकेंत सात मेढेकोट आपले स्वाधीन करून घेतले. तोफा मागें राहिल्या होत्या ह्मणून त्यांस हें काम हल्ला करूनच करावें लागलें. गोरे लोकांस लढाई करण्याची इतकी उत्कंठा होती कीं, कितीएक वेळ शिडयांची वाट न पाहतां भिंतीवर वगैरे ते एकमेकांच्या खांद्यावरून चढत असत. आपणांस शेवटीं जय मिळतो किंवा न मिळतो अशी ब्रह्मी लोकांस शंका येण्याला पहिली हीच गोष्ट झाली. आवाचे दरबारांत ह्यापूर्वीं, आपणांस जय मिळेल अशी ब्रह्मी लोकांची पक्की खातरी होती.

मेढेकोट घेतात.ता०८ जुलै सन १८२४.

दुसरे ठिकाणींही लढाया चालल्या होत्या. सैन्याला चाल करण्याला हवा चांगली नव्हती, ह्यामुळें समुद्रकिनाऱ्यावरचीं शत्रूंचीं ठाणीं कमी करण्याचा जनरलानें निश्चय केला. कर्नल गादविन् ह्यानें मार्ताबान घेतलें. तावाय, मर्गुई, आणि तेनासरीम हीं तिन्ही कर्नल मैल्स ह्यानें घेतलीं. सिरिआम आणि दाला हींही इंग्लिशांनीं आपले स्वाधीन करून घेतलीं. कैलूवर जो त्यांनीं हल्ला केला तेथून मात्र त्यांस मागें हटावें लागलें; त्याचें कारण हेंच कीं, सैन्यांत एकही गोरा मनुष्य नव्हता, सर्व काळे लोक होते. त्यांचे कांहीं सरदार मेल्यामुळें त्यांस धास्ती बसून ते पळून गेले. ह्या वेळेस नाश झाला तो उगवून घेण्याकरितां इंग्लिशांनीं दुसरी टोळी पाठविली; पण तें ठाणें शत्रूंनीं सोडून देऊन मेढेकोट नाहींतसे केले होते.

मार्ताबान व दुसरीं कित्येक स्थळें घेतात.

आगस्त महिन्याचे अखेरीस ब्रह्मी लोकांचें मोठें सैन्यानें तेथील मख्यात देवळावर मध्यरात्रीस हल्ला केला. ह्या सैन्यांत बहुतेक राजाचे खासगीकडले लोक होते, ते आपणास अजिंक्य वीर असें ह्मणवीत असत; आणि संगिनी व गोळे ह्यांच्यानें आपलें कांहीं व्हावयाचें नाहीं असें त्यांस वास्तविकच वाटत असे. परंतु जेव्हां इंग्लिशांनीं थोडासा तोफांचा भडिमार करून त्यांस पळवून लाविलें, तेव्हां आपण अजिंक्य नाहीं अशी त्यांची पक्की खातरी झाली.

राजाचे अजिंक्य वीरांचा पराभव. ता० ३० आगस्ट सन १८२४.

ब्रह्मी लोकांचे सेनेवरील अधिकाऱ्यांची वरचेवर बदली होत असे. त्या सर्वांचा पराजय झाला, ह्यामुळें हें काम महाबंधूला ह्यास सांगावें, हा शेवटला उपाय होय असें आवाचे राजास वाटून त्यानें त्यास बोलावणें पाठविलें. तो सरदार राजाचे कृपेंतला असून त्यास आराकान येथें बराच जय मिळाला होता. कंपनीचे कांहीं लोकांचे गैर वर्तणुकीमुळें त्या प्रांतांत इंग्लिशांकडचे कांहीं काळे लोक होते त्यांस मागें हटावें लागलें, आणि ब्रह्मी लोक काचारांत पुनः शिरले, तेव्हां तेथें कांहीं क्षुल्लक लढाया झाल्या, पण त्या देशांतून बंधूला निघून गेला. तेव्हां इंग्लिशांस तिकडची काळजी अगदीं नाहींशी झाली.

महाबंधूला.

आराकानांतील कृत्यें.

बंधूला ह्यानें जल्दीनें मोठे सैन्यानिशीं रंगुनाकडे कूच केलें. तो आपले सभोंवतीं तटबंदी करून रानामध्यें राहिला आणि दिसेंबरचे पहिले तारखेस हल्ला करण्यास निघाला. ब्रह्मी लोकांचें सैन्य पुढें येऊं लागलें तेव्हां त्यांतील लोक मोठे डौलानें निशाणें उडवीत होते, आणि त्यांचे सरदारांच्या मुलामा दिलेल्या छत्र्या उन्हामध्यें चमकत होत्या; ह्यामुळें तें सर्व सैन्य भव्य दिसत होतें. असें दिसत असतां तें एकाएकीं नाहींसें झालें. सर्वांनीं मोठया त्वरेनें खांचा खणून एकेका खांचेंत दोघे दोघे ह्याप्रमाणें सगळेजण आपला बचाव करून राहिले. ज्या ठिकाणीं थोडके वेळापूर्वी मोठें भव्य सैन्य दिसत होतें त्या ठिकाणीं नवीन रचलेल्या मातीचे ढिगांशिवाय कांहींच दिसेनासें झालें, इतक्यांत एकाएकींच गोरे लोकांची टोळी त्यांचे पुढें जाऊन उभी राहिली; आणि त्यांनीं त्यांस तेथून हांकून लाविलें. ब्रह्मी लोकांनीं किमांडिनावर हल्ला केला, तेव्हां त्यांस तेथलि खलाशांनींच हांकून लाविले, आणि गलबतांस आगीचा उपद्रव व्हावा म्हणून त्यांनीं जळते ताफे पाठविले, पण त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

बंधूला निघतो. ता० १ –७ दिसेंबर स. १८२४.

ब्रह्मी लोकांचे खंदक.

दिसेंबर महिन्याचे पांचवे तारखेस इंग्लिशांनीं शत्रूंवर हल्ला करून त्यांस पळवून लाविलें; मग दोन दिवसांनीं ते बरेच वेळ धैर्यानें लढले, तरी त्यांचा कांहीं उपयोग न होतां त्यांचा पुन्हा पराजय झाला.

इकडे रंगून शहरांतले राहणारे लोक तेथून निघून गेले होते, त्यांस तेथें पुन्हा यावेंसें वाटून त्याप्रमाणें ते आले; त्यांजबरोबर शत्रूंकडचे पुष्कळ लोकही वेष पालटून आले; त्यांनीं शहरास आग लाविली, ती पुष्कळ नाश झाल्यानंतर शांत झाली. दुसरे दिवशीं, इंग्लिशांनीं शत्रूंचें शासन करण्याकरितां एक

रंगुनास आग लावितात.

मोठी टोळी पाठविली. ह्या टोळींतील लोकांनीं ज्या जाग्यां- वर हल्ला केला, ती मजबूत असून तेथें हजारों लोक संरक्ष- णार्थ होते. तरी अर्धे घटकेंत, इंग्लिशांकडचे लोकांनीं संगि- नींचा हल्ला करून शत्रूंस तेथून हांकून दिलें. तेव्हां ते आपले देशाचे मध्यभागीं पळून गेले, आणि रंगुनाजवळ पुन्हा कधींही आले नाहींत.

रंगुनाहून शत्रूचें झें- वटलें परत जाणें.

इंग्लिश लोकांचे सैन्यांत पूर्वीसारखा आजार हल्लीं नव्हता. शत्रु पळून गेले, आणि लोकही त्यांशीं गोडीगुलाबीनें होते. सर अर्चिबाल्द क्यांबेल ह्यानें आपला लढाई करण्याचा मुख्य उद्देश सिद्धीस नेण्याकरितां देशाचे आंतले प्रदेशांत जाऊन हल्ला करण्याचा निश्चय केला. ह्या कामाकरितां ज्या सैन्याची योजना झाली त्याच्या त्यानें दोन टोळ्या केल्या. त्यांत एकीनें इरावती नदींतून नावांतून जावें, आणि आपलेबरोबर कांहीं लढाऊ नौकाही घ्याव्या आणि दुसरीनें जमिनीवरून जाऊन दोहोंनीं मिळून शत्रूंवर हल्ला करावा असा हुकूम झाला. सर अर्चिबाल्द क्यांबेल हा जमिनीवरचे टोळीबरोबर होता, तो जलद चाल करून कांहींसा लांब गेला; तों त्यास असें वर्तमान कळलें कीं, डोनोबू ह्मणून रंगुनापासून वीस कोसांवर शत्रूचें ठाणें आहे त्यावर पहिले टोळीनें हल्ला केला, परंतु जय मिळाला नाहीं.

दोन टोळ्या करून आंतल्या प्रदेशांत जातात.

जमिनीवरची टोळी जलदी जाते.

रंगुनापाशीं पराजय झाल्यावर ब्रह्मी लोक डोनोबू येथें पळून जाऊन राहिले होते. तेथून त्यांस हांकून द्यावें ह्मणून, पाण्यांतून जाणारे टोळीचा मुख्य जनरल कातन ह्यास हुकूम झाला होता; पण डोनोबूसारखें मजबूत ठाणें घेण्यापुरते लोकच त्याच्यापाशीं नव्हते. त्याच्याजवळ जे थोडे लोक होते त्यांनिशीं त्यानें मोठे शौर्यानें पहिला मेढेकोट आपले स्वाधीन करून घेतला. दुसऱ्याचे रक्षणार्थ इतक्या तोफा होत्या कीं, वेढा घालणाऱ्यांस मागें हटावें लागलें. हें इंग्लिशांस संकट प्राप्त झाल्याचें वर्तमान सर अर्चिबाल्द क्यांबेल ह्यास कळतांच तो परतून डोनोबूजवळ आला. गलबतांतले लोक नदीचे खालचे बाजूकडे कांहीं कोसांवर गेले होते, त्यांस वारा अनुकूळ होतांच तेही ह्यास येऊन मिळाले. मग बाहेर एके ठिकाणीं जमलेल्या फौजेवर महाबंधुला ह्यानें आंतून हल्ला केला. इंग्लिशांनीं मोठे धैर्यानें व धिमेपणानें लढून शत्रूंस मागें हटविलें, आणि ते चालीप्रमाणें वेढा घालण्याची तयारी करूं लागले; मोरचे तयार झाले तेव्हां इंग्लिश मारा करूं लागले; पण लढाईखेरीजच तें ठाणें त्यांच्या

पाण्यांतून जाणारे टोळीचा डोनोबू येथें पराजय. ता० ८ मार्च सन १८२५.

जमिनीवरची टोळी परत येते.

बंधूला मरण पावल्यावर डोनोबू घेतात. ता० २ एप्रिल सन १८२५.

स्वाधीन झालें. महाबंधूला ह्याचा कुलपी गोळ्यानें प्राण गेला, आणि आपला मुख्य सरदार मरण पावला असें जेव्हां ब्रह्मी लोकांस कळलें, तेव्हां त्यांस अगदीं आशा नाहींशी झाली. ते मग जलदीनें पळून गेले; तें शहर इंग्लिशांचे स्वाधीन झालें आणि तेथें त्यांस पुष्कळ महिन्यांची पोटगी सांपडली.

डोनोबू हें शहर इंग्लिशांच्या स्वाधीन झाल्यावर ते पुढें कूच करूं लागले; इकडे मेजर सेल ह्यानें एक लहानसे टोळीनिशीं वसीन हें आपले स्वाधीन करून घेतलें होतें; परंतु त्याचा कांहीं उपयोग नव्हता.

प्रोम येथें मुकाम. ता० २५ एप्रिल स. १८२५.

एप्रिल महिन्याचे पंचविसावे तारखेस सर अर्चिबाल्द क्यांबेल प्रोम शहरास जाऊन पोहोंचला; तेव्हां तत्क्षणींच तें ओसाड पडलें. शत्रूंनीं त्या शहरास आग लाविली; तरी इंग्लिशांनीं झटून कांहीं भागाचा नाश होऊं दिला नाहीं. पावसाळा जवळच आला होता, ह्याकरितां शहरासभोंवतें सुस्थळीं छावण्या देऊन इंग्लिशांचें सैन्य कितीएक महिनेपर्यंत तेथेंच राहिलें. मग शहरांतले पूर्वींचे राहणारे लोकही आपले घरीं परत आले.

आराकान घेतात. ता० १एप्रिल सन १८२५.

हें वर्तमान इकडे चाललें असतां इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत आराकान प्रांताकडे दुसरें सैन्य पाठविलें; ह्या प्रांताचे पूर्व सीमेवरून इरावती नदी वाहते. त्यांनीं त्यास असा हुकूम केला कीं, तो प्रांत स्वाधीन झाल्यानंतर तुह्मी सर अर्चिबाल्द क्यांबेल ह्याचे सैन्यास जाऊन मिळा. त्या प्रांतांतील मुख्य शहराचे संरक्षणार्थ जे लोक होते ते मोठे शौर्यानें लढले; तरी इंग्लिशांनीं तें शहर आपले स्वाधीन करून घेऊन सर्व देश जिंकिला. पण इंग्लिशांचे सैन्यांतील लोकांस हवा मानेना ह्यामुळें पहाडांतून जाऊन मुख्य सैन्यास मिळणें आपल्याच्यानें होणार नाहीं असें समजून ते लोक परत आले.

आवाच्या दरबाराशीं तह.

सर अर्चिबाल्द क्यांबेल हा प्रोम शहरामध्यें असतां इंग्लिशांचें आवाचे दरबाराशीं सल्लयाचें बोलणें चाललें होतें; आणि दोहों सरकारांमध्यें तह झाला, त्याची मुदत नोवेंबरचे दुसरे तारखेपर्यंत होती. ब्रह्मी लोकांनीं सल्लयाची इच्छा दाखविली, परंतु ती खरी नव्हती; कारण इंग्लिश कमांदरानें सांगितलेलीं कलमें योग्य असतांही त्यांस तीं मान्य होईनात; ह्मणून तहाची मुदत संपतांच पुनः लढाई सुरू झाली.

ब्रह्मी लोक प्रोम शहराकडे जाऊन त्याजवळ मेढेकोट करून तेथें

राहिले होते. त्यांस तेथून हांकून देण्याकरितां इंग्लिशांनीं तीन टोळ्या पाठविल्या; परंतु त्यांतील दोन टोळ्या आपला उद्देश सिद्धीस नेल्याशिवाय परत आल्या. ब्रह्मी लोक जवळ जवळ येत होते; परंतु त्यांस हल्ला करण्याचें धैर्य होईना. ह्याकरितां इंग्लिश जनरलानेंच पुरेशी फौज घेऊन हल्ला केला आणि त्यास ह्या वेळेस जयही मिळाला. एकामागून एक ह्याप्रमाणें थोडे वेळांत त्यानें सर्व मेढेकोट आपले स्वाधीन करून घेतले. शत्रूंची चोहोंकडे पळापळ होऊन ते मैदानांतून नदीकडे पळून गेले, तेव्हां तेथें त्यांस इंग्लिशांचे घोडेस्वारांचे तोफखान्याकडील लोकांनीं कापून टाकिलें. ब्रह्मी लोकांचा वृद्ध सेनापति हाही मेढेकोटाचे आंत असतांनाच मारला गेला. शान नांवाचे लोक लढाईस आले होते, त्यांनबरोबर तीन मोठ्या सुंदर तरुण स्त्रिया होत्या, त्या आपणास अजिंक्य असें मानून त्या लोकांस धीर देण्याकरितां त्यांजबरोबर आल्या होत्या; त्यांतील एकीला तर जखम लागून ती रणामध्यें मरणोन्मुख होऊन पडली होती. इंग्लिशांस हा जय मिळाल्यावर मग वरचेवर त्यांस जय मिळतच गेले. शत्रूंचे मेढेकोट वगैरे सर्व इंग्लिशांनीं घेतले; आणखी जसजशी पुढें फौज चालली तसतसें शत्रूंनीं प्रत्येक ठाणें मोकळें करून दिलें.

प्रोम येथें ब्रह्मी लोकांचा मोड.

पुन्हा तहाचें बोलणें चालू झालें, तरी इंग्लिश लोक मेलूनचे किल्ल्यापर्यंत गेले होते ते आपलें कूच बंद करीनात. ब्रह्मी लोकांनीं तह करण्याविषयीं विनंती केली, तरी त्यांनीं आपलें ह्या किल्ल्यापुढचें ठाणें उठविलें नाहीं. इंग्लिशांनीं जशीं दुसरीं ठिकाणें स्वाधीन करून घेतलीं होतीं त्यांप्रमाणेंच त्या किल्ल्यावर हल्ला करून, शत्रूंचें मोठें सैन्य असतां त्यांनीं तो स्वाधीन करून घेतला.

मेलून घेतात. ता. १९ जानेवारी स.१८२६.

राजानें इंग्लिशांशीं तह करण्याकरितां, अमेरिकन धर्मोपदेशक व इंग्लिशांनीं सोडलेला एक बंदीवान हे दोघे पाठविले होते, ते इंग्लिशांचें विजयी सैन्य कूच करीत असतां त्यास वाटेनें भेटले. इंग्लिशांचें बोलणें पूर्वीप्रमाणेंच होतें; परंतु त्यांस तो ब्रह्मी लोकांचा लोभी राजा अद्यापि मान्य होईना. त्या विजयी लोकांस मागें हटविण्याचा त्यानें आणखी एक वेळ प्रयत्न केला. त्यानें आपले सैन्यावर एक नवीन सरदार नेमिला, त्यास नरकाधिपति हा किताब असे. १८००० ब्रह्मी लोक इंग्लिशांबरोबर लढण्यास सिद्ध होऊन तयारीनें उभे होते. त्यांची व इंग्लिशांची फेब्रुवारीचे ९ वे तारखेस गांठ पडली; त्या वेळेस इंग्लिशांचे लोक दोन हजारांवर नव्हते. ब्रह्मी लोकांचे सर-

पागामची लढाई. ता. ९ फेब्रुवारी स.१८२६.

दारानें तटबंदींतून लढण्याचा आपला नेहमींचा सांप्रदाय सोडून आपलें सर्व लढणारें सैन्य उघड मैदानांत नेलें. आवा शहरचे रस्त्यावरच त्यानें आपलें सैन्य आडवें अर्धवर्तुलाकृति उभें केलें. त्या मैदानांत कांटेरी झाडें होतीं म्हणून तें कवाइतीचे उपयोगीं नव्हतें. शत्रूचे सैन्यांतील जे लोक पुढें आले होते, त्यांजवर इंग्लिशांनीं पहिल्यानें हल्ला केला, तेव्हां ते लोक घाबरले; म्हणून त्यांस पाठबळ देण्याकरितां ब्रह्मी लोकांचे सरदारानें मध्य स्थानीं जे लोक होते ते पुढें लोटले. पण सर्वांचा पराजय होऊन ब्रह्मी लोकांच्या राजाची आशा अगदीं नाहींशी झाली.

आवाजवळ तह शेवटास जातो. ता० २४ फे०सन १८२६.

आतां राजधानीकडे इंग्लिशांस अडथळा करणारें कोणी नाहींसें झालें. राजास धास्ती बसून त्यानें तह करण्याविषयीं इंग्लिशांची प्रार्थना केली, तेव्हां तहाचीं कलमें ठरलीं; त्या वेळेस इंग्लिशांचें सैन्य आवापासून सुमारें पंचवीस कोसांवर यादाबू म्हणून एक गांव आहे, तेथें होतें. आसाम, काचार, जिंत्या आणि मणिपूर ह्या प्रांतांवरचा वारसा अगदीं सोडून देण्यास ब्रह्मी लोक कबूल झाले, आणि आराकान व तेनासरिम हे प्रांत विजयी इंग्लिश लोकांस देऊन एक कोटी रुपये तीन हप्त्यांनीं देण्यास ते मान्य झाले. दुसरा हप्ता वसूल होई तोंपर्यंत इंग्लिशांनीं रंगून आपले ताब्यांत ठेवून, मग त्यांचे स्वाधीन करावें असा ठराव झाला होता. ह्याप्रमाणें ब्रह्मी लोकांशीं जी पहिली लढाई झाली, तिचा शेवट होऊन इंग्लिशांचें कांहीं नुकसान न होतां, ते अब्रूस चढले.

भरतपुराकडील कृत्यें.

इकडे ही लढाई चालली असतां दुसरेकडेही ह्याप्रमाणेंच लढाया चालल्या होत्या. इंग्लिशांचें व भरतपूरच्या राजाचें एकमत होतें, तो राजा इ० स० १८२५ चे फेब्रुवारी महिन्यांत मरण पावला. त्याला एक मुलगा होता तो त्याचे मरणसमयीं बाल्यावस्थेंत होता. तो मुलगा त्या राजाचा खरा वारस असें दिल्लीचा रेसिडेंत सर देविद आक्तरलोनी ह्यानें कबूल केलें होतें; परंतु त्याचा चुलता दुर्जनसाल ह्यानें त्या राज्यावर वारसा लावून, भरतपूरचा किल्ला आपले स्वाधीन करून घेऊन खरा राजा बळवंतसिंग ह्यास कैद केलें, आणि त्याचें पालनपोषण करणाऱ्या लोकांस ठार मारिलें. सर देविद आक्तरलोनी ह्यानें लागलेंच आपलें सैन्य जमा करून दुर्जनसालाचा बंडावा मोडण्याकरितां त्यास भरतपुराकडे कूच करण्याकरितां हुकूम केला; परंतु हें कृत्य सरकारास अमान्य झाल्यामुळें रेसिडेंतानें जें सैन्य पाठविलें होतें, तें परत आणण्याचा सरकारानें हुकूम केला, आणि रेसिडेंतानें जो आपले कामाचा राजीनामा दिला तोही मान्य केला.

ग्रंथ संग्रहालय

मग भरतपूरच्या मुलखांत फार दंगा झाला. दुर्जनसालाचा भाऊ पुष्कळ लोकांनिशीं त्याजवर उठला; ह्यामुळें सर्व मुलखाची दाणादाण होऊन गेली.

भरतपूर येथील दंगा. स. १८२६.

लार्ड आम्हर्स्त ह्याचे मनांत ह्यामध्यें हात घालण्याचें नव्हतें, परंतु दिल्लीचा नवा रेसिदेंत सर चार्ल्स मेटकाफ ह्यानें ही गोष्ट चांगली नव्हे असें लिहून, ह्याचीं पुष्कळ कारणें लिहून पाठविलीं. ह्यावरून त्यानें बळवंतसिंगाचा पक्ष स्वीकारला आणि भरतपूरचे किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां मोठें सैन्य पाठविलें. दुर्जनसाल चांगला बंदोबस्त करून राहिला होता. तीस वर्षांचे पूर्वीं लार्ड लेक साहेबाचे सैन्यानें ह्या किल्ल्यावर हल्ला केला होता, परंतु तेव्हां त्याचें कांहीं चाललें नाहीं; ह्यामुळें ह्या देशांतले लोकांस तो किल्ला अजिंक्य वाटला होता. त्यांची इंग्लिशांवर प्रीति नव्हती, आणि जेव्हां आपले आवडते किल्ल्याचें संरक्षण दुर्जनसाल करीत आहे असें त्यांस कळलें, तेव्हां त्याजवर लोकांची मर्जी बसली.

त्या देशाविषयीं इंग्लिशांचा बेत.

दिसेंबरचे दाहावे तारखेस इंग्लिशांचा कमांदर इनचीफ लार्ड कांबर्मरी हा किल्ल्यापुढें येऊन दाखल झाला. तेव्हां त्याजबरोबर शंभर तोफा व वीस हजारांवर लोक होते. इंग्लिशांनीं मोरच्यांचें काम सुरू केलें, तरी किल्ल्यास मातीच्या मजबूत भिंती होत्या ह्मणून त्यांपुढें साधे गोळे व कुलपी गोळे ह्यांचें कांहीं चालेनासें झालें. ह्याकरितां सुरुंग उडवून वाट पाडण्याचा त्यांनीं निश्चय केला. सुरुंगाचा प्रयत्न दोन तीन वेळां निष्फळ झाला; परंतु शेवटीं मोठा सुरुंग त्यांनीं उडविला तेणेंकरून फारच नाश झाला. त्यांत थोडासा इंग्लिशांचा देखील नाश झाला, तरी त्याचे योगानें जी वाट पडली तींतून त्यांस हल्ला करण्यास कठीण पडलें नाहीं. ह्यापूर्वींच किल्ल्याचे दुसरे बाजूस वाट पडली होती, तींतून दुसरी टोळी किल्ल्यांत शिरली. थोडकेच वेळानें किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन झाला, आणि दुर्जनसाल पळून जाण्याचे बेतांत होता तों त्यास धरून त्यांनीं कैद केलें. इंग्लिशांस हा जय ह्या वेळीं मिळाला त्याचा त्यांस फार उपयोग झाला. इंग्लिश लढत असतां ह्या किल्ल्यास ढका न लागतां कांहीं वेळ इंग्लिशांचा पराजय होत गेला. असें कोणताही किल्ला घेतांना इंग्लिशांस झालें नाहीं, पण शेवटीं असलाही किल्ला इंग्लिशांनीं आपले स्वाधीन करून घेतला. तेव्हां ज्यांस त्यांचें राज्य आवडत नव्हतें त्यांस अगदीं राज्य पालटण्याची आशा नाहींशी झाली. ह्यांचें राज्य असल्यानें जे संतुष्ट नव्हते, त्या सर्वांस धाक बसून देशांत चोहोंकडे अगदीं स्वस्थता झाली.

भरतपुरास वेढा घालून तें घेतात. ता० १८ जान्युआरी स. १८२६.

**सत्रावा भाग समाप्त.**

# भाग अठरावा.

## अफगाणिस्थानचे उंच प्रदेशांतील लढाई.

### इसवी सन १८२८ पासून सन १८४२ पर्यंत.

लार्ड विलियम बेंतिक—त्याची कारकीर्द—कुर्ग जिंकून तें आपल्या राज्यांत दाखल करतात—सती जाण्याची बंदी—कंपनीच्या मक्तेपत्रांत फेरफार—रशियन लोकांच्या स्वारीची भीति—त्यांच्या दगाबाज्या—अफगाणिस्थान व तेथील बंडें—दोस्तमहंमदाकडे वकील पाठवितात—पर्शियन लोकांची हिरातावर स्वारी—हिरातास वेढा घालतात—दोस्तमहंमदाबरोबर लढाई—तिघांचा सल्ला—बंगाला व मुंबई येथून आलेलें लष्कर अफगाणिस्थानांत जातें—शाहासुजा ह्यास कंधार येथें गादीवर बसवितात—गिजनी घेतात—काबुलाकडे चाल—लष्कर परत येतें—अफगाण लोकांचा स्वभाव—दोस्तमहंमदाचा पुनः उद्भव—त्याचा पराभव होतो—तो स्वाधीन होतो—काबूल येथें बाह्यात्कारीं स्वस्थता—कांहीं सरदार लोक दगाबाजी करून सोडून जातात—सर आरसेल हा त्यांचा पराजय करितो—काबूल येथील बंड—इंग्लिश लोकांत धैर्याविषयीं कमताई—बेमारू येथें त्यांस मागें हटवितात—सर विल्यम मेक्नातन ह्याचा खून—पळ—भयंकर साहसें—लार्ड एलिन्बरो गवर्नर जनरलच्या जागेवर येतो—सर आरसेल जलालाबादेवर जातो—जय—जनरल पालक त्यास सोडवितो—तो शत्रूचा पराभव करितो—तो काबुलास जातो—जनरल नात अफगाण लोकांचा पराजय करितो—तो गिजनी पुनः घेतो आणि काबुलास जातो—बंदीवान लोकांची सुटका—स्वार हिंदुस्थानास आणितात.

लार्ड विलियम बेंतिक हा कांहीं वर्षांपूर्वी मद्रासचा गवर्नर होता तो लार्ड आमहर्स्त ह्याचे मागून गवर्नर जनरल झाला. त्याचे कारकीर्दींत बहुतकरून लढाई वगैरे न होतां स्वस्थता होती. तरी कुर्गचा राजा आपले प्रजेशीं व इंग्लिशांशीं उन्मत्तपणानें वागत होता, ह्मणून त्यास जिंकून त्याचें राज्य गवर्नर जनरलानें इंग्रेजांचे राज्यास सामील केलें.

कुर्ग जिंकतात. ता० ६ एप्रिल सन १८३४.

भ्रतार मेल्यावर त्याचे मेताबरोबर सती जाऊन बायकांनीं आपला देह दग्ध करावा, असा जो हिंदु लोकांमध्यें वाईट संप्रदाय होता, तो बंद करण्याकरितां लार्ड विलियम बेंतिक हा फार झटला, ह्यामुळें याची कीर्ति फार दिवस राहील. ह्या प्रचाराचा दोष ज्यावर येईल त्यास शिक्षा करण्याचा त्यानें ठराव केला.

सती जाण्याची बंदी. ता० ४ डिसेंबर सन १८२९.

इ०स०१८३३ त ईस्तइंदिया कंपनीचे अधिकारामध्यें विलायत सरकारानें पुष्कळ फेरफार केले. कंपनीस ह्यापूर्वी हिंदुस्थानावर राज्य करण्याची मुखत्यारी असून तिला मात्र त्या देशाशीं व चीन देशाशीं व्यापार करण्याचा अधिकार होता. दुसरे कोणास त्या देशाशीं व्यापार करण्याची परवानगी नव्हती. कंपनीचे लोकांशीं मात्र व्यापार करावा, हा ठराव हल्लीं रद्द होऊन सर्वांस त्या देशांशीं व्यापार करण्याची मोकळीक झाली, आणि कंपनीकडे राज्य करण्याचा मात्र अधिकार राहिला. हिंदुस्थानावर पुढें आणखी वीस वर्षे राज्य करण्याचे अधिकाराची नवी सनद कंपनीस मिळाली. तींत वर सांगितलेले कलमाशिवाय जीं इतर कलमें होतीं, तीं पूर्वीचे सनदेंतल्याप्रमाणेंच राहिलीं.

कंपनीच्या सनदेंत फेरफार. सन १८३३.

कांहीं वर्षेपर्यंत इंग्लिश स्वस्थ होते, ह्मणजे त्यांस लढाई करण्याचें प्रयोजन नव्हतें; पण इ० स० १८३९ त त्यांची स्वस्थता नाहींशी होऊन अशा गोष्टी घडल्या कीं, त्यांचे योगानें सर्व इंग्लिश लोक घाबरून गेले, त्या गोष्टींचें अद्यापि त्यांस पुरतें स्मरण आहे. हिंदुस्थानांतला इंग्लिशांचा मुलूख घेण्याविषयीं रशियन लोकांचे बेत चालले होते, ह्मणून जें इंग्लिशांस भय पडलें होतें त्याविषयीं पूर्वी सांगितलेंच आहे. ह्या वेळेस तर तें भय फारच वाटूं लागलें होतें, आणि तें वाटण्यास कारणही तसेंच होतें. ह्या पन्नास वर्षांत रूस देशच्या बादशाहाचें राज्य अतिशयच वाढलें होतें; आणि इतर दिशांप्रमाणेंच हिंदुस्थानचे दिशेकडे फार पसरलें होतें. वास्तविक पाहिलें असतां त्याचे दक्षिण सीमेपासून सेंतपीतर्सबर्ग ह्या शहरापेक्षां लाहोर हें अधिक लगत होतें. त्या सरकारचे मनांत काय होतें, हें मुख्य कारभाऱ्यांचे व वकिलाचे वर्तणुकीवरून सहज कळून येण्याजोगें होतें. अफगाणिस्थान व इराण ह्या देशांतून हिंदुस्थानाला येण्यास रस्ता आहे, ह्मणून त्याच देशांत पहिल्यानें ते वकील कलागती उत्पन्न करूं लागले होते. असें जरी होतें तरी इतकें भय वाटण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें; कारण रशियन सरकारचे कसेही बेत असले, तरी रस्ता लांब व बहुत अडचणीचा होता ह्यामुळें, कलागती लावून हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याच्या सीमेवर भय उत्पन्न करण्यापेक्षां कांहींही अधिक त्यांच्यानें झालें नसतें.

रशियन लोकांच्या हल्ल्याची भीति. सन १८३९.

रशियन लोकांच्या मसलती.

ह्या वेळेस अफगाणिस्थानांत फार गडबड होती. तेथील राजा शाहामुजा ह्यास कांहीं वेळापूर्वी त्याचा भाऊ महंमद ह्यानें पदच्युत करून

अफगाणिस्थानांतील बंड.

हद्दपार केलें होतें; आणि तो इंग्लिशांचा आश्रय मागून त्यांचे राज्यांत येऊन राहिला होता. हें राज्य महंमदास फत्तेखान नांवाच्या त्याच्या एका प्रधानाच्या मदतीनें मिळालें असतां, त्यास त्यानें हाल करून ठार मारिलें. ह्या वजिराचे भावांनीं दंगा करून महंमदाचें बहुतेक राज्य बळकाविलें आणि तें सर्वांनीं वांटून घेतलें. ह्या भावांत दोस्तमहंमद हा मोठा पराक्रमी होता. ह्यांनीं राज्य घेतलें तेव्हां महंमदाकडे हिरात नामक प्रांत मात्र राहिला. महंमद पुढें थोडके दिवसांनीं मरण पावला, आणि त्याचे गादीवर त्याचा मुलगा कामरान हा बसला. इकडे महंमदास हांकून लावल्यानंतर दोस्तमहंमद आणि लाहोरचा प्रबळ राजा रणजितसिंग ह्यांचे मध्यें लढाई सुरू झाली; तेव्हां रणजितसिंगास पेशावर हा प्रांत मिळाला, तो त्यानें आपले राज्यांत सामिल केला.

दोस्तमहंमदाकडे वकील पाठवितो.

ह्या वेळीं अफगाणिस्थानांत सर्वांमध्यें प्रबळ दोस्तमहंमद होता, ह्मणून त्याच्याशीं तह करण्याकरितां वकील पाठवावा असें नवीन गव्हरनर जनरल लार्ड आक्लंड ह्यांचे मनांत आलें. ह्या वकिलानें व्यापारासंबंधी बोलावें असा बाह्यात्कारीं बेत होता, तरी वास्तविक पाहिलें असतां ह्यानें बोलावयाचीं कलमें निराळींच असून, त्यांत अधिक महत्व होतें. दोस्तमहंमद हा इंग्लिशांकडचा करून, अफगाणिस्थान हें हिंदुस्थानाचा बचाव करणारी सरहद्द होईलसें करावें, हा मुख्य उद्देश होता. ह्या वेळेस इंग्लिशांकडचा वकील कपतान अलेक्जांदर बरन्स हा होता. तो गेला तेव्हां रशियन लोकांचें वजन जास्ती पडल्यामुळें, आपले हातून कांहीं काम होत नाहीं, असें समजून तो आपली कामगिरी न बजावितां हिंदुस्थानास परत आला.

हिरातास वेढा घालतो. नवंबर १८३७पासून सप्टेंबर १८३८ पर्यंत.

हिरात हातीं आलें ह्मणजे हिंदुस्थान सहज घेतां येईल, असें समजून इराणचे शाहानें तें घेण्याकरितां सैन्य पाठविलें. त्या शाहासही भर देऊन रशियन लोकांनीं तो आपणाकडला करून घेतला होता. सर्व अफगाणिस्थानावर आपला वारसा आहे असें तो मानीत असे, ह्यामुळें हिरात जर त्याचे स्वाधीन झालें असतें; तर तो देश घेण्याचा यत्न आणखी त्यानें पुढें चालविला असता; पण हिरातचें संरक्षण चांगले रीतीनें केलेलें होतें. एल्ड्रेद पातिंजर ह्मणून एक तरुण इंग्रेज तेथें होता. सिलिस्त्रा आणि कार्स येथें इंग्लिश कामगारांनीं ज्याप्रमाणें पुढें केलें, त्याप्रमाणेंच त्यानें येथें मोठे धिमेपणानें व शौर्यानें आपले लोकांस

धीर देऊन त्यांजकडून मोठाले पराक्रम करविले. इराण देशचें सैन्य मोठें होतें, परंतु तें अडाणी सरदारांच्या ताब्यांत होतें; ह्यामुळें त्याचा अगदीं पराजय होऊन त्यास मागें हटावें लागलें. त्या सैन्याचा वेढा तेथें नऊ महिने होता.

इराणचे सैन्याचे छावणींत इंग्लिश व रशियन ह्या दोहों लोकांकडील वकील होते; त्यांतून इंग्लिशांकडचे वकिलाचा फार अपमान होत असे; ह्याचें कारण सांगून इराणच्या दरबारानें आपली समजूत करावी म्हणून इंग्लिशांनीं, इराणचे अखातांत खराक म्हणून एक बेट आहे तेथें सैन्य पाठविलें. हें सैन्य आल्याची बातमी कांहीं अंशीं शत्रूस हिरातेंतून मागें हटण्यास कारण झाली.

इराणचे आखातांत सैन्य पाठवितात.

गोडीगुलाबीनें सांगितल्यानें आपल्या बोलण्यास, दोस्तमहंमद मान्य होत नाहीं असें गवर्नर जनरलास समजल्यावर, लढाई करून आपला उद्देश सिद्धीस नेण्याचा त्यानें निश्चय केला. ह्याकरितां त्यानें रणजितसिंग आणि शहासुजा ह्यांच्याशीं तह केला. त्यांत असा ठराव झाला कीं, सर्वांनीं मिळून अफगाणिस्थानावर हल्ला करून शहासुजास त्याचे पहिले गादीवर बसवावें; "सिंधुनदांतलें सैन्य" ह्या किताबाचें एक इंग्लिशांचें सैन्य सिंधेंतून व बलुचिस्थानांतून काबूलचे उंच प्रदेशांत जावें; व त्या सैन्यांत कांहीं लोक बंगालचे असावे, कांहीं मुंबईचे असावे, आणि कांहीं शहासुजाचे असून त्यांजवर गोरे लोक मुख्य असावे. मग सर जानकीन हा त्या सर्व सैन्याचा मुख्य झाला. बंगालचे लोक पहिल्यानें गेले; ते कंधारास पोहोंचत तोंपर्यंत त्यांची व मुंबईचे लोकांची गांठ पडली नाहीं. ह्या मुंबईचे लोकांस सिंधचे अमिरांनीं कांहीं वेळ अडविलें होतें, पण इंग्लिशांकडील राखून ठेवलेल्या फौजेनें त्या अमिरांकडचें कराची हें शहर घेतलें, तेव्हां त्यांचें कांहीं चालेनासें झालें. ह्या दोन्ही (बंगाला व मुंबई ह्यांकडील) लोकांस वाटेनें त्रास होऊन ते फार दमले. रस्ता फारच लांबणीचा असून वाटेनें मनुष्यांस व जनावरांस पाण्याचा मोठा तोटा होता. वाटेवरचे डोंगरांत दांडगे दरवडेखोर लपून राहिले होते तेही ह्यांस वरचेवर त्रास देत असत.

तिघांचा सल्ला. ता. २६ जून सन १८३८.

अफगाणिस्थानावर हल्ला.

कंधार येथें शहासुजास इंग्लिशांनीं आपल्या सर्व सैन्यादेखतां गादीवर बसवून मोठा समारंभ करविला.

इंग्लिशांचे सैन्याचें कूच तसेंच पुढें चालून त्यानें २१ वे जुलईस

गिजनी घेतात. ता० २ जुलै सन १८३९.

संध्याकाळीं दिवे लागल्यावर गिजनीजवळ येऊन छावणी दिली. गिजनी हा एक मजबूत किल्ला आहे; तेथूनच महंमूद हा पूर्वी हिंदुस्थान जिंकण्यास स्वारी करण्यास आला होता; त्यापूर्वी कोणतेंही मुसलमानानें ह्या देशावर स्वारी केली नव्हती. ह्या किल्ल्यांत एक दोस्तमहंमदाचा मुलगा होता. तेथील तटबंदींतून सभोंवतालचे डोंगरांवर तोफांचा मारा होतोसें दिसल्यावरून शत्रु आपणावर एकद्दम हल्ला करणार असें इंग्लिशांस वाटलें; परंतु असें कांहीं न होतां तेविसावे तारखेस इंग्लिश लोक किल्ल्यावर तोफा सोडूं लागले. ह्याप्रमाणें भडिमार चालला असतां कांहीं लोकांनीं काबूल दरवाज्यापाशीं पुष्कळ दारू नेऊन ठेवून बत्ती दिली, तेव्हां तो दरवाजा उडून गेला. तत्क्षणींच हल्ला करणारे लोक शहरांत शिरले, मग जिवावरचा झगडा होऊन शत्रूंचा पराजय झाला. शहर इंग्लिशांचे स्वाधीन झालें, तेव्हां किल्ला स्वाधीन होण्यास पुरती एकही चकमक झाडावी लागली नाहीं. इंग्लिशांचा जय झाला तेव्हां गिजनीचे तटबंदीवरून त्यांचें निशाण झळकूं लागलें. गोरे लोकांस जय मिळाल्यावर त्यांनीं चांगली व्यवस्था राखून कांहीं दंगा होऊं दिला नाहीं. मग लवकरच इंग्लिश लोक काबुलाकडे गेले, आणि तें शहर लढाईशिवाय त्यांचे स्वाधीन झालें. दोस्तमहंमद आपलेबरोबर थोडेसे लोक घेऊन आक्सस नदीचे पलीकडले रानांत पळून गेला; आणि शहासुजा आपले पूर्वीचे गादीवर बसला. तेव्हां त्याचे भोंवताले इंग्लिश लोक संगिनी घेऊन संरक्षणार्थ होते; परंतु त्याजविषयीं प्रजेचें मन मोकळें नसून तिनें कांहीं त्याचा आदरसत्कार वगैरे नीट केला नाहीं.

काबूलचें आक्रमण. ता. ६ आगष्ट सन १८३९.

शहासुजा गादीवर बसल्यावर, त्यास बसविणाऱ्या सैन्यांतील पुष्कळ लोक परत आले. देशांत स्वस्थता राखण्यास पुरेसे वाटले तितके लोक मात्र इंग्लिशांनीं काबूल येथें ठेविले, आणि मेक्नातन साहेबास सनद देऊन शहासुजाचे दरबारांत इंग्लिशतर्फे कारभारी नेमिलें. ह्या साहेबास मग लवकरच बारोनेत ही पदवी मिळाली.

लष्कर परत येतें.

मुंबईची टोळी हिंदुस्थानांत परत येत असतां तिनें खिलात ह्या शहरावर हल्ला करून तें घेतलें. ह्याचें कारण हेंच होतें कीं, "सिंधुनदांतलें सैन्य" अफगाणिस्थानाकडे कूच करीत असतां, तेथील अधिकाऱ्यानें फार लबाडी केली होती. हल्ला करणारे लोक थोडके होते तरी, त्यांनीं मोठे शौर्यानें आपलें काम बजाविलें. शत्रु अगदीं वेड्यासारखे लढले,

खिलात घेतात. ता० २ नवंबर स.१८३९.

आणि किल्लेदार आपले लोकांनिशीं जिवावर उदार होऊन लढत असतां मारला गेला.

इंग्लिशांचे लोक दोन वर्षें काबूल येथें राहिले. अफगाणिस्थानांतले रानटी लोक जात्याच क्रूर स्वभावाचे असून इंग्लिश लोकांनीं नवीन राजाची स्थापना केली ह्मणून त्यांचा ते द्वेष करीत असत, हें वरचेवर त्यांचे कृतीवरून दृष्टीस पडे. कोणी गोरे सरदार किंवा शिपाई आपले लोक सोडून थोडेसे दूर गेले ह्मणजे, त्यांवर हल्ला करून ते त्यांस कापून टाकीत असत. कांहीं दांडगे लोक आपले साथी जमा करून शक्त्यनुसार दंगा करावयास चुकत नसत. इंग्लिशांचे लोक शिधापाणी वगैरे आणावयास जात तेव्हां, त्यांच्या भोंवताले ते क्रूर शत्रु जमत, ह्यामुळें चकमक होऊन मोठा नाश झाल्याखेरीज त्या लोकांस परत येतां येत नसे. पण ह्याप्रमाणें दंगा नेहमीं होत नव्हता; आणि काबूल येथें इतकी स्वस्थता झाली होती कीं, पुष्कळ गोरे लोक आपलीं मुलेंमाणसें आणवून त्यांसुद्धां त्या शहरांत स्वस्थ राहिले.

अफगाणिस्थानांतील लोकांच्या मनाची स्थिति.

दोस्तमहंमद आश्रय मागण्यासाठीं बुखाऱ्याचे राजाकडे गेला, तेव्हां तेथें त्या राजानें त्यास कैदेंत ठेविलें होतें. तेथून आपली सुटका करून घेऊन आपले देशांतून इंग्लिशांस हांकून देण्याचा आणखी एक वेळ यत्न करण्याकरितां तो त्या देशांत आला; तेथें पुष्कळ अफगाण लोक त्यास मिळाले. इंग्लिशांनीं त्याच्या बरोबर लढण्याकरितां सर रार्बट सेल ह्यास कांहीं लोकांनिशीं पाठविलें. मग लढाई होऊन परवान येथें दोस्तमहंमदाचे लोकांचा पराजय झाला; आणि ते लोक पळूं लागले. तेव्हां त्यांचा पाठलाग करण्यास तो देश सोईचा नव्हता, ह्यामुळें बंगालचे घोडेस्वारांचे एके पलटणीशिवाय दुसरे कोणी तें काम केलें नाहीं. ते स्वार शत्रूंचे मागें थोडेसे गेले, तों दोस्तमहंमदाचे कांहीं घोडेस्वारांनीं त्यांजवर हल्ला केला. मग इंग्लिश लोकांस हल्ला करण्याचा हुकूम झाला, तेव्हां आपले लोक मागोमाग येतील असें समजून इंग्लिशांचे सरदार शत्रूंवर चालून गेले, पण काळे लोक घाबरे होऊन पळून गेले, ह्मणून त्या सरदारांस मारामारी करीत करीत शत्रूंतून वाट काढीत यावें लागलें.

दोस्तमहंमद परत येतो.

परवान येथील लढाई. ता० २ नवंबर सन १८३९.

आतां दोस्तमहंमदाचा पराजय होऊन त्यास अगदीं आशा राहिली नव्हती. काबूल येथें इंग्लिशांचा, वकील होता, तो एके दिवशीं घोड्यावरून रपेट करून परत येत असतां, एक स्वार आपला घोडा

दोस्तमहंमद स्वाधीन होतो. ता. ३ नवंबर सन १८३९.

पिटवींत त्याजपाशीं आला आणि ह्मणाला कीं, दोस्तमहंमद आपले स्वाधीन होण्याकरितां आला आहे, तेव्हां त्या साहेबास मोठें आश्चर्य वाटलें. त्या जासुदाचें बोलणें संपत आहे तों इतक्यांत दोस्तमहंमद जातीनें घोड्यावरून आला, आणि खालीं उतरून त्यानें आपली तलवार सर विलियम मेक्नातन् ह्याचे स्वाधीन केली. त्यास कैद केल्यावर इंग्लिशांनीं त्याचा नानाप्रकारचा आदरसत्कार केला, आणि त्याला हिंदुस्थानांत पाठवून बंदींत ठेविलें होतें, तरी त्याजवरचा पहारा अगदीं कडक नव्हता.

परवानची लढाई नोवेंबर महिन्यांत झाली. इंग्लिशांनीं खिलातचा अधिकारी मारून तें शहर पूर्वी आपले स्वाधीन करून घेतलें होतें, तें त्याच्या मुलानें परत घेतलें ह्मणून जनरल नात त्याच महिन्यांत तेथें गेला; आणि दिसेंबरचे पहिले तारखेस थोडकेच काळे लोकांनीं लढाई करून त्या उन्मत्त राजाचा पराजय केला. इ० स० १८४१ चे आरंभीं इंग्लिशांस अफगाण लोकांपैकीं कोजक आणि खिलजी इत्यादि जे दंगा करणारे होते, त्यांशीं लढाया करण्यांत वेळ घालवावा लागला; असें असून पुढें सप्टेंबर महिन्यांत त्या देशांत इतकी स्वस्थता झालीसें वाटलें कीं, नवीन राजास आतां अधिकार करण्यास कठीण पडणार नाहीं अशा समजुतीनें, तेथून आपली फौज उठवावी, हें देखील इंग्लिशांचे मनांत आलें होतें. तेथील वकिलाची मुंबईचे गवर्नरचे जाग्यावर नेमणूक झाली होती, ह्यामुळें त्यानें तर तेथून निघण्याची तयारी करून ठेविली होती.

काबूल येथील बाह्यात्कारीं स्वस्थता.

वास्तविक पाहिलें असतां ही स्वस्थता बाह्यात्कारीं मात्र होती, आणि इंग्लिशांस संकटाचे दिवस जवळ जवळ येत चालले होते. ते स्वदेशचे लोकांपासून तीनशें कोसांवर असून, अफगाणिस्थानांत थंडी फारच कडक ह्यामुळें बहुत हाल सोशीत होते; आणि रानटी शत्रु त्यांस घेरून वरचेवर दंगा करीत, ह्यामुळें त्यांचे पुष्कळ लोक अन्नपाण्याच्या तोटयानें मरतच होते; अशा संकटावस्थेंत असतां अब्रू जाऊन पुष्कळांस मरण येण्याचा, समयही समीप आला होता.

अफगाणिस्थानांतील सरदारांचें बंड. अक्टोबर १८४०.

अक्तोबर महिन्याचे प्रारंभीं कांहीं सरदारांनीं शहासुजाचे दरबारांतून निघून बंडाचा झेंडा लाविला. ते खुद्द काबूलचा घांट बळकावून बसले; आणि सर राबर्त सेल ह्यांजबरोबर जें सैन्य जलालाबादेस जात होतें, तें इंग्लिशांनीं त्यांजवर पाठविलें. बंडखोर लोकांनीं मजबूत जागीं आपला बचाव करून घेतला होता. रस्त्यावर एक तट बांधलेला होता त्याच्या आश्रयानें

कांहींजण राहिले होते, आणि बाकीचे लोक सभोंवताली अवघड चढणीचे डोंगरावरून पसरले होते; गोरे लोकांनीं त्यांस मागें हटवून ते घाटांतून नाहींतसे केले; तरी अद्यापि शत्रु स्वस्थ राहिले नव्हते. रात्रंदिवस इंग्लिशांचे सैन्यावर ते हल्ला करीत. तेव्हां इंग्लिशांनीं जगदलक ह्या ठिकाणीं मोठे शौर्यानें लढून त्यांस मागें हटविलें. मग गोरे लोक जलालाबादेस गेले; तेथें तत्क्षणींच त्यांच्या सभोंवता शत्रूंनीं वेढा घातला. त्या ठिकाणची तटबंदी जुनी होऊन फार मोडकळीस आली होती, तरी तेथें तोफा वगैरे ठेवून इंग्लिशांनीं उत्तम रीतीचा बंदोबस्त ठेविला होता; आणि काय होईल तें होवो, परंतु शेवटपर्यंत येथून हालावयाचें नाहीं असा सर राबर्त सेल ह्यानें निश्चय केला. ह्या उद्योगांत तो असतां, काबूल येथें मोठा दंगा झाला आहे, तिकडे तुह्मीं परत जावें, असा त्यास हुकूम आला. पण वाटेनें लढण्याचे प्रसंग येतील त्यांस आपले जवळचे लोक हल्लीं उपयोगीं पडायाजोगे नाहींत, असें समजून त्यानें तें काम पत्करिलें नाहीं. संकटावस्था जाई तोंपर्यंत जलालाबादेस राहून त्यानें आपले जवळचे शूर गोरे लोकांनिशीं त्या जाग्याचा उत्कृष्ट रीतीनें बचाव केला आणि तेणेंकरून इंग्लिशांचें नांव राखलें.

सर राबर्त सेल हा जलालाबादेस जातो.

आतां काबूल येथें जें दुःखकारक वर्तमान झालें तें सांगतों. त्या शहरापासून दीड कोसावर इंग्लिशांची छावणी होती तेथें कांहीं सैन्य होतें, आणि कांहीं सैन्य बालाहिसार ह्मणून एक मोठा वाडा जवळच होता त्यांत होतें. कांहीं इंग्रेज लोक शहरांत होते. हे सर्व लोक नोवेंबरचे दुसरे तारखेस दंगा होऊन गलबलून गेले. अफगाण लोकांनीं इंग्लिशांचे घरांवर हल्ला केला आणि सर अलेक्जांदर बरन्स आणि इतर कामगार ह्यांस ठार मारलें. ह्याप्रमाणें वरचेवर दंगा वाढत गेला. त्यांनीं शहाचा खजिना लुटला आणि त्यास व इंग्लिश कामगारांचे घरांस आग लाविली खजिन्यावरचे काळे लोक मोठे शौर्यानें लढले, परंतु, शत्रूंचे लोक फार ह्यामुळें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. ह्याप्रमाणें दंगा चालला असतां तो बंद करण्याजोगा कांहींच प्रयत्न इंग्लिशांचे हातून झाला नाहीं. त्या वेळेस इंग्लिशांस नेहमींप्रमाणें उत्साह व धैर्य हीं नव्हतीं. हिंदुस्थानांतील इंग्लिशांचे राज्याची उत्तरोत्तर वृद्धि होत असतां त्या लोकांचें जें अवसान होतें, तें अफगाणिस्थानांतील डोंगरांत नाहींसें झालें; आणि पुष्कळ वेळानंतर वास्तविक लढाई चालली असतां, गोरे लोक धैर्य सोडून भिऊन पळून गेले,

काबूल येथील बंड. ता. २ नवंबर स. १८४१.

इंग्लिश लोकांत धैर्याविषयीं कमताई.

ही गोष्ट त्यांनीं फारच वाईट केली: त्या वेळचें स्मरण झालें ह्मणजे इंग्लिशांस लज्जा वाटून त्यांचे डोळ्यांवाटें पाणी येतें; ह्यामुळें, गोष्ट वास्तविक घडली ती इतिहासांत लिहावी हा जो खऱ्या इतिहासकाराचा धर्म त्याचा जर प्रतिबंध नसता, तर इंग्लिश इतिहासकारांनीं ह्या लढाईचा वृत्तांत मोठे खुषीनें आपले ग्रंथांतून गाळला असता.

बंडाची वृद्धि. तिसरे तारखेस सकाळींच कांहीं लोक खुर्द काबूल येथें होते, ते तेथून निघून, वाटेनें कोणी आल्यास त्याच्याशीं लढावें, अशा रीतीनें काबुलास आले. वास्तविक पाहिलें तर हल्लीं इंग्रेज लोक आपली छावणी आणि बालाहिसार ह्या दोन ठिकाणीं कोंडले गेले होते. पुष्कळ अफगाण लोक भोंवतालच्या प्रदेशांतून आले आणि एक किल्ला बळकाऊन बसले, तरी त्यांस हांकून देण्याविषयीं प्रयत्न इंग्लिशांचे हातून झाला नाहीं. इंग्लिशांनीं ज्या किल्ल्यांत पोटगी वगैरे ठेवली होती त्यावर दुसरे दिवशीं अफगाण लोकांनीं हल्ला केला. तेथें एक गोरा सरदार व कांहीं काळे लोक होते; पण कांहीं पाठबळ न मिळाल्यामुळें त्यांस पळून जावें लागलें. ह्या वेळेस मुख्य अधिकारी जनरल एलफिन्स्तन् होता, तो ह्मातारा व अशक्त होता, ह्यामुळें त्याच्यानें कांहीं काम होईलशी त्याची चर्या दिसत नव्हती; ह्यास्तव बालाहिसार येथें त्याचा दुय्यम जनरल शेलतर होता, त्यास ह्याला मदत करण्याकरितां बोलावणें गेलें. तो आल्यावर कांहीं चलाखी दिसूं लागली. इंग्लिशांच्या छावणीजवळ जो किल्ला होता, तो प्रयत्न करून त्यानें घेतला; परंतु त्या वेळेस त्यांचा फार नाश झाला; कारण गोरे शिपाई पहिल्यानें पळून गेले तेव्हां जनरल शेलतर ह्यानें त्यांस लढाईकरितां मोठे धिरा एके ठिकाणीं जमविलें. हा जनरल सेनाधिपत्यास योग्य नव्हता; तरी प्राचीनकाळीं युरोपखंडामध्यें नैत ह्मणून जे शूर सरदार होऊन गेले, त्यांप्रमाणें तो मोठ्या उत्साहानें लढला.

इंग्लिशांच्या संकटाची वृद्धि. मेजर पातिंजर ह्यानें हिरातचा बचाव केला. तो व दुसरे दोन असामी करीकर येथून पळ काढून काबुलाकडे ह्या संकटसमयीं गेले. दोहोंकडील लोकांचे हातून कांहीं न होतां थोडे दिवस गेले. बेविसावे तारखेस इंग्लिशांनीं बेमारू ह्मणून एक गांव आहे त्यावर हल्ला केला. तेथून त्यांस हा वेळपर्यंत अन्नाचा वगैरे पुरवठा होत होता. तेथें पराजय झाल्यावर पुन्हा दुसरे दिवशीं त्यांनीं हल्ला केला, त्या वेळेसही यांचें कांहीं चाललें नाहीं. ह्या वेळेस सेनाधिपति चांगला नव्हता आणि कांहीं लोक शौर्यानें लढले तरी, बहुतेकांची त्या वेळची वर्तणूक त्यांचे नांवास बट्टा आणण्याजोगी होती.

मग इंग्लिशांनीं दोस्तमहंमदाचा मुलगा अकबरखान ह्याशीं तहाचें बोलणें लावलें. त्यानें सांगितलेलीं तहांतील कलमें इंग्लिशांच्या नांवास अतिशय बट्टा लावणारीं होतीं, तरी त्यांनीं तीं मान्य केलीं. सर विलियम मेकनातन ह्यानें पूर्वी अकबरखानाशीं तह केला होता, त्यास अकबरखानानें दिसेंबरचे तेविसावे तारखेस एकांतस्थानीं भेटीस बोलाविल्यावरून तो आपलेबरोबर तीन सरदार घेऊन त्या नेमिलेल्या जागीं बोलणें चालविण्याकरितां गेला. तेथें तो अकबरखानाशीं बोलत असतां त्या सर्वांभोंवतालें कितीएक हत्यारबंद लोक येऊन उभे राहिले. त्या लोकांनीं मागें जावें अशी इंग्रेजांचे वकिलानें विनंती केली, तरी अकबरखान त्याचे बोलण्यास मान्य झाला नाहीं; मग लवकरच त्या लोकांनीं पुढें चाल करून मारामारी केली, तींत सर विलियम मेकनातन आणि दुसरा एक सरदार असे दोघे गोळी लागून पडले. मेकनातन साहेबास तर अकबरखानानेंच गोळी मारली, असें ह्मणतात. त्या माणसांनीं इंग्लिशांकडचे बाकीच्या सरदारांच्या मुसक्या बांधून त्यांस कैद करून नेलें; आणि त्या निर्दय लोकांनीं आपण मारलेल्या मनुष्यांचे प्रेतांचे देखील कापून हाल करण्यास सोडलें नाहीं. हें वर्तमान हिंदुस्थानांत कळलें, तेव्हां इंग्लिशांच्या आंगावर शहारे येऊन त्यांची काय अवस्था झाली, ह्याचें त्या वेळचे लोकांस पक्कें स्मरण आहे; आणि मेकनातन साहेबाचे मरणाबद्दल निशाणें उभारलेलीं त्यांनीं पाहिलीं, आणि तोफांचे आवाज ऐकले तेव्हां जें त्यांस दुःख झालें, तें तर ते कधींही विसरणार नाहींत.

अकबरखानाबरोबर तह.ता.२३ डिसेंबर स. १८४१.

सर विलियम मेकनातन साहेबाचा खून.ता.२३ डिसेंबर स. १८४१.

त्या वेळेस जे लोक काबुलामध्यें होते, त्यांनीं आपले आंगीं जितकें सामर्थ्य होतें तितकें जर सूड उगविण्याकडे खर्चलें असतें, किंवा मेजर पातिंजर ह्याचे सांगण्याप्रमाणें, सर राबर्त सेल ह्या शूर सरदाराकडे ते जोरानें मार्ग काढीत गेले असते, तर फार चांगलें झालें असतें; पण तसें कांहींच न होतां तहाचें बोलणें चालूं लागलें आणि असा ठराव झाला कीं, अकबरखानानें इंग्लिशांचे सैन्यास काबुलांतून जाऊं द्यावें आणि वाटेनें त्यांस कांहीं उपद्रव होऊं नये, आणि त्याबद्दल इंग्लिशांनीं पुष्कळ पैसा द्यावा. इंग्लिशांनीं चार सरदार त्यांजकडे ओलीस पाठविले, आणि आजारी व जखमी झालेले लोक काबुलांत ठेविले.

अकबरखानाबरोबर नवा तह.

जान्युआरी महिन्याचे सहावे तारखेस इंग्लिशांचे लोक काबुलाहून

इंग्लिश काबुलाहून परततात. ता० १६ जान्युआरी सन १८४२.

निघाले. त्यांमध्यें गोरे व काळे मिळून ४५०० लोक असून त्यांबराबर पुष्कळ लष्करी माणसें होतीं, ह्यामुळें ते आपले छावणींतून निघाले तेव्हां त्यांच्यामध्यें धांदल व अव्यवस्था फार होती. वाटेवर घाट होते ते अरुंद व अवघड चढणीचे असून पुष्कळ बर्फानें भरून गेले होते, आणि त्या बर्फावरूनही पूर्वीं कोणी चाललें नव्हतें. त्या लोकांचें कूच चाललें असतां थंडीनें आणि भुकेनें हजारों लोक वाटेवर मरून पडत, आणि अफगाण लोक प्रत्येक डोंगराच्या शिखरावर भरले होते, त्यांच्या गोळ्यांनीं कांहीं लोक पडत; कारण इंग्लिशांस कांहीं उपद्रव होऊं द्यावयाचा नाहीं हें अकबरखानाचें बोलणें बाह्यात्कारींच मात्र होतें. बायका व मुलें हीं त्याजकडे इंग्लिशांनीं ओलीस पाठवून दिलीं असतां तो आपले बोलण्याप्रमाणें वागला नाहीं. वाटेनें त्यांस वरचेवर अधिक संकटें येऊं लागलीं. आणि जे लोक अफगाणांच्या लढायांतून वांचले ते श्रम, भूक, आणि थंडी ह्यांच्या योगानें मरण पावले. ह्याप्रमाणें बहुतेक लोक मेल्यावर कांहीं बाकी राहिले त्यांनीं तसेंच नेटत नेटत जलालाबादेस जाण्याचा निश्चय केला. पण त्यांतून एक मनुष्य मात्र फुटकळ तेथें जाऊन पोहोंचला. लोक बंदींत पडले त्यांखेरीज काबुलांतले सैन्यांतील तेवढाच मात्र जिवंत राहिला.

खैबरघाटांतील संकटें.

सकटाच्या निवारणाची तयारी.

तिकडे असें झालें, तरी सर राबर्त सेल ह्यानें मोठे शौर्यानें अजूनपर्यंत टिकाव धरला, ह्यामुळें त्यास व त्याचे लोकांस पराक्रमी ही पदवी प्राप्त झाली. पेशावर येथें जनरल पालक हा सैन्य जमवीत होता आणि जनरल नात ह्यानें ज्यानुआरीचे १२ वे तारखेस कंधार येथें शत्रूंचा पराजय केला होता. तो शहरांत टिकाव धरून राहिला.

इ० स० १८४२ च्या प्रारंभीं लार्द आक्लंद साहेब गवरनर जनरलाची जागा सोडून गेला. आणि त्याच्या जाग्यावर लार्द एलन्बरो साहेब आला. त्यानें पुष्कळ विचार करून असें ठरविलें कीं काबूल येथें जो इंग्लिशांचा नाश झाला तो उगवून घेण्याकरितां, आणि अकबरखानाचे कैदेंत गोरे लोकांच्या बायका व सरदार लोक आहेत त्यांस सोडविण्याकरितां तिकडे मोठ्या सैन्यानें कूच करावें. अफगाण लोक गिजनी परत घेऊन तेथें सांपडलेल्या इंग्लिश लोकांस कैद करून त्यांचे फार हाल करीत होते, हें एक गवरनर जनरलाच्या वरील निश्चयास कारण झालें.

लार्द एलन्बरो गवरनर जनरलच्या कामावर येतो. ता० २८ फेब्रुआरी स० १८४२.

सर राबर्ट सेल ह्यानें जलालाबादेस पुढें काय केलें तें आतां सांगतों. त्याच्या जवळ थोडे लोक होते ते शत्रूंनीं हल्ला केल्यापासून आपणास कांहीं उपद्रव होऊं नये, ह्मणून तटबंदी वगैरे मोठे हुशारीनें नीट करीत होते; पण धरणीकंप झाला त्याच्या योगानें त्यांचे श्रम निष्फळ होऊन त्यांस पुनः त्या कामास लागावें लागलें. त्यांनीं मोठया आनंदानें त्या कामास आरंभ करून लवकर तटबंदी वगैरे नीट केली. ह्याच वेळेस अकबरखानानें येऊन शहरासभोंवतीं तळ दिला, आणि त्याच्या लोकांच्या व इंग्लिशांच्या पुष्कळ झटापटी निकरानें झाल्या. एप्रिलच्या ७ वे तारखेस इंग्लिशांनीं किल्ल्यांतून बाहेर येऊन अफगाण लोकाचे छावणीवर हल्ला केला, आणि शत्रूंच्या सर्व तोफा घेऊन छावणीला आग लावून दिली, ह्यामुळें अकबरखानास मोठया जलदीनें पळून जावें लागलें. ह्या वेळेस इंग्लिशांकडे थोडे लोक आणि शत्रूंकडे पुष्कळ लोक, असें असतांही इंग्लिशांस जय मिळाला; पण ह्या सर्व मोहिमेमध्यें कर्नल देनीनें पराक्रम करून यश मिळविलें, तो ह्या वेळीं मरण पावला, ह्यामुळें त्या लोकांस फार दुःख झालें.

विजयी शिपाई.

पुढें नऊ दिवसांनीं जनरल पालक जलालाबादेस जाऊन पोहोंचला. त्यानें पेशावराहून निघून खैबर घाटावर हल्ला केला होता, आणि त्याच्याकडचा तेथें फारसा नाश न होतां त्यास मोठा जयही मिळाला होता. तो हल्लीं पराक्रमी लोकांस सोडविण्याकरितां जलालाबादेस गेला. कांहीं महिनेपर्यंत तेथें राहिल्यावर त्यास पुढें जाण्याची परवानगी मिळाली. आगस्त महिन्याचे विसावे तारखेस तो आपलें सर्व सैन्य घेऊन काबुलास जावयास निघाला. गंदमकाजवळ कांहीं किल्ल्यांवर व सभोंवतालचे डोंगरांवर अफगाण लोक होते, त्यांस त्यानें हांकून लावलें. थोडकेच महिन्यांपूर्वीं इंग्रेज लोक काबुलाहून जलालाबादेकडे येत असतां त्यांचा जगदलक येथें फार नाश झाला होता. तेथून हल्लीं ते जात असतां सभोंवतालच्या डोंगरांवर जमून अफगाण लोकांनीं त्यांजवर गोळे मारले, ह्मणून इंग्रज लोकांनीं त्यांचा पराजय करून त्यांस पळायास लावलें. तजीन येथें मोठया जोरानें लढाई होऊन इंग्लिशांस जयही मोठाच मिळाला; आणि त्या लोकांनीं जयजयकार करीत मोठया उत्साहानें सप्तेंबरचे १५ वे तारखेस काबूल येथें येऊन पुनः तेथें छावणी दिली.

जनरल पालक काबुलास जाण्यास निघतो.

इकडे जनरल नात हाही कंधारांतून काबुलाकडे जावयास निघाला. त्यानें आगस्त महिन्याचे ३० वे तारखेस गिजनीचा गवर्नर शमसुद्दीन ह्याचे हाताखालचे सैन्याचा पराजय केला; मग सप्तेंबर महिन्याचे ६ वे तार-

जनरल नात काबुलास जातो.

खेस शत्रु गिजनी हें शहर सोडून गेले; जनरल नात ह्याचे वाटेवरचे खिंडींतून पुष्कळ अफगाण लोक जमले होते, त्यांस त्यानें १४ वे व १५ वे तारखेस तेथून हांकून लावलें, आणि मग लवकर तो जनरल पालक ह्यास काबूल येथें जाऊन मिळाला.

बंदिवानांची सुटका.

जनरल पालक काबुलाकडे येत आहे, हें वर्तमान अकबरखानास समजतांच त्याचे जवळ इंग्लिशांचे लोक बंदींत होते ते त्यानें आपले देशाचे मध्यभागीं नेऊन ठेविले, आणि असें भय घातलें कीं, त्यांस गुलामाप्रमाणें मी कुर्दिस्थान येथील रानटी सरदारांस विकीन. ह्यानें धाक घातला तरी ज्याचे स्वाधीन ते लोक होते त्याचें मन इंग्लिशांस जय मिळाल्यामुळें इतकें बदललें कीं, त्यांपासून बराच लांच घेऊन त्यानें त्यांस सोडून दिलें. ते काबुलाकडे येत असतां, सर रिचमंद शेक्स्पीयर हा सातशें घोडेस्वार घेऊन तिकडे जात होता तो त्यांस भेटला, आणि काबुलाजवळजवळ जों ते आले तों, आपले लोकांत पुनः आपण आलों हें पाहून त्यांस मोठा आनंद झाला. ह्या बंदीवानांमध्यें खुद्द सर राबर्त सेल ह्याची पत्नी व कन्या ह्या होत्या, ह्मणून त्यांस सामोरे जाऊन त्यांचा बचाव करून आणण्याकरितां तो आपलेबरोबर कांहीं लोक घेऊन गेला. त्यांची भेट झाल्यावर जनरलापासून भिकार शिपायापर्यंत जितके लोक होते, तितक्यांत कोणास स्वतः आनंद होत आहे, कोणाचे नेत्रांतून अश्रु येत आहेत, कोणास दुसऱ्याचा आनंद पाहून आनंद होत आहे, असा काळ घालवीत ते सर्व इंग्लिशांच्या छावणीपाशीं येऊन पोंचले.

इंग्लिशांचा अपमान झाला होता तो त्यांनीं उगवून घेतला. बंदीवान पुनः आपले लोकांत परत आले ह्यामुळें सर्वांस आनंद झाला. आणि इंग्लिश लोकांस जय मिळून कांहीं अंदाधुंदी वगैरे न होतां त्यांचें सामर्थ्य दिसून आलें. इतकें झाल्यावर इंग्लिशाचा हेतु पूर्ण होऊन त्यांकडे कांहीं विशेष करावयाचें राहिलें नाहीं.

शेवटचा जय होऊन इंग्लिश सैन्य परततें. ता० १२ अक्टोबर सन १८४२.

अपमान न होतां इंग्लिशांस अफगाणिस्थानांतून येण्यापुरता त्यांस जय मिळतांच सर्व फौज हिंदुस्थानांत आणावी असा सरकारानें निश्चय केला. शहासुजा ह्यास त्याचे पदरचे एका सरदारानें ठार मारिलें, ह्यामुळें त्याचे संरक्षणार्थ सैन्याची गरज राहिली नाहीं. ह्याकरितां काबुलाजवळ इस्तालिफ ह्मणून एक गांव आहे, तें व करोकर हीं घेऊन त्यांचा नाश करून इंग्लिशांचें सर्व सैन्य हिंदुस्थानांत परत आलें. मग अफगाणिस्थानांतील रानटी सरदार एकमेकांशीं लढाया

करोत अथवा कोणत्याही प्रकारचा कब्जा करोत, आपण मध्यें तोंड घालूं नये, असा इंग्रज सरकारानें निश्चय केला.

अफगाणिस्थानांतील लढाईचा प्रारंभ चांगले रीतीनें झाला; ह्मणजे आरंभीं आपले सरकारास जय मिळाला, पुढें ती लढाई चालत असतां त्यांचा एक वेळ मात्र पराजय होऊन वरचेवर अपमान होत गेला, आणि तिचा शेवट चांगले रीतीनें होऊन त्यांस यश मिळालें. ह्या लढाईचें स्मरण झालें ह्मणजे त्या लोकांस दुःख होतें तरी त्यांची उमेद खचत नाहीं.

अठरावा भाग समाप्त.

# भाग एकोणिसावा.

## सिंध व ग्वालेर येथील लढाया.

### इ० स० १८४२ पासून सन १८४४ पर्यंत.

सिंधचे अमीर—इंग्लिशांविषयीं त्यांची वाईट बुद्धि—तह मोडतात—तहाविषयीं नवीन ठराव करून त्यांजकडे मान्यतेकरितां पाठवितात—इंग्लिशांच्या रेसिडेन्सीवर हल्ला—मियानी येथील लढाई—हैदराबाद हस्तगत होतें—बंडखोर सरदार धरतात—देश जिंकितात—ग्वालेर—पुत्रसंतान नसतां महाराजांचा मृत्यु—त्याचा वंशज दत्तक घेतात—मामा साहेबास राज्यकारभार चालविण्यास नेमितात—दगाबाज्या—मामांच्या जागीं दादा खासगीवाले ह्यांस नेमितात—ब्रितिश लोकांचा रेसिडेंत दरबारांतून जातो—मराठ्यांच्या लष्कराची स्थिति—ब्रिटिश लोकांचें सैन्य येतें—तहाचीं बोलणीं—तीं सिद्धीस जात नाहींत—महाराजपूरची लढाई—पन्यारची लढाई—महाराजांबरोबर तह—एलन्बरो कलकत्त्यास माघारा जातो—देरेक्तर्स त्यास परत बोलावितात.

सिंधचे अमीर.

अफगाणिस्थानांतील लढाई झाल्यावर कांहीं अंशीं तिचेच योगानें दुसरी एक लढाई झाली. इंग्लिशांचें सैन्य मुंबईहून काबुलास जात असतां वाटेनें सिंधचे अमीर ह्यांनीं त्यास अडथळा केला, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या वेळेस इंग्लिशांनीं त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं; परंतु सिंधेंतून इंग्लिशांचे लोक गेले तेव्हांपासून तेथील अधिकाऱ्यांचे मनांत इंग्लिश सरकाराविषयीं वैमनस्य राहिलें. काबूल येथें इंग्लिशांस संकटावस्था प्राप्त झाली, तेव्हां त्यांच्या शत्रूंचा व अमीरांचा एकमेकांशीं पत्रव्यवहार चालत होता; अमीर हे हत्यारबंद लोकांच्या टोळ्या जमवीत होते, आणि पूर्वीं त्यांच्याशीं झालेल्या तहाच्या ठरावाप्रमाणें वागेनातसे झाले. ह्यावरून त्यांचे मनांत वांकडें आलें ह्याविषयीं संशय राहिला नाहीं. अफगाणिस्थानांत इंग्लिशांचा नाश होत आहे, ही संधि आपला नफा करून घेण्यास चांगली आहे असें त्यांनीं मनांत आणिलें; पण जनरल पालक आणि जनरल नात ह्यांहीं जय मिळवून कूच केलें, ह्यामुळें त्यांच्यानें कांहींच झालें नाहीं. ह्या वेळेस शत्रूंवर हल्ला करण्यास इंग्लिशांचें सैन्य तयार असून, सर चार्लस नेपियर हा इ० स० १८४२ चे अक्तोबर महिन्यांत सरकारानें त्यावर अधिकारी नेमला.

इंग्लिशांविषयीं त्यांची वाईट बुद्धि.

सिंध देश अफगाणिस्थानचे दक्षिणेस असून त्यांत सिंधु ह्मणून एक मोठा प्रशस्त नद आहे. त्या नदांतून गलबतें चालविण्याबद्दल इंग्रेज सरकार व त्या देशांतले अमीर ह्यांच्यामध्यें पुष्कळ वेळां तहाचीं बोलणीं चाललीं होतीं. त्यांच्यामध्यें तह होऊन त्यांत असें ठरलें होतें कीं, इंग्लिशांच्या व्यापाराच्या जिनसांवर जी जकात त्यांच्या कामगारांच्या विद्यमानें पहिल्यानें ठरली होती, तिजशिवाय नवीन जकात अमीरांनीं बसवूं नये. ह्या कराराप्रमाणें ते वागले नाहींत, आणि अशींच त्यांनीं पुष्कळ दुसरीं द्वेष वाढण्याजोगीं कृत्यें केलीं; परंतु हीं कृत्यें करण्यास त्यांस कांहीं निमित्तें होतीं. त्या सरदारांचे मनांत इंग्लिशांशीं संबंध अगदीं असूं नये, असें होतें; तरी इंग्लिशांनीं आपले तर्फे एक कारभारी सिंधहैदराबाद येथें नेमला, आणि आपलें सैन्य त्यांच्या मुलखांत ठेवलें. ह्याप्रमाणें त्यांचें स्वातंत्र्य जाऊन हिंदुस्थानांतील इतर परतंत्र संस्थानिकांची आणि त्यांची एकच अवस्था झाली.

तहाकडे दुर्लक्ष.

अमीर लोकांचे चांगले वर्तणुकीचा संशय आल्यामुळें गव्हरनर जनरल ह्यानें नवा तहनामा तयार करून त्यांजकडे रुजू करण्याकरितां पाठविला. ह्यांतील कलमें अमीरांस आवडण्याजोगीं नव्हतीं. अमीर हा वेळपर्यंत इंग्लिशांस खंडणी देत होते त्याबद्दल त्यांनीं कांहीं मुलूख इंग्लिशांस द्यावा; सिंधुनदावरच्या इंग्लिशांच्या आगबोटींस त्यांनीं कोळसे पुरवावे; आणि नाणें पाडण्याचा जो त्यांस अधिकार होता तो त्यांनीं इंग्लिश सरकारास द्यावा; हीं गवर्नर जनरलानें ठरविलेलीं कलमें होतीं. ह्या तहास अमीर अगदीं मान्य नव्हते; पण कांहीं वेळानें इंग्लिशांचा कमिशनर मेजर औत्रम ह्यानें त्यांजकडून त्या तहनाम्यावर सह्या करविल्या. कमिशनराच्या व अमीराच्या भेटीच्या अंतीं, त्यांचे मनांत ह्याजविषयीं कांहीं वाईट वागत आहे, असें उघड दिसून आलें; आणि दुसरेच दिवशीं त्या बंडखोर लोकांनीं कमिशनराचे घरावर हल्ला करून तें घर तिहीं बाजूंनीं घेरिलें. तेथें नजीकच आगबोट होती तेथील तोफांच्या माऱ्यामुळें चवथे बाजूकडे त्यांचा प्रवेश झाला नाहीं. चार तासपर्यंत त्या घरांतील पाहरेकरी हल्ला करणारांचें कांहीं चालूं न देतां स्वस्थ त्या आगबोटींत शिरले.

तहाविषयीं नवीन ठराव करून ते त्यांजकडे मान्यतेकरितां पाठवितात. स. १८४३.

इंग्लिशांच्या कमिशनरावर हल्ला. ता० १५ फेब्रुआरी सन १८४३.

सर चार्लस नेपियर ह्याचे हाताखालचें सैन्य जवळच होतें. तें हैदराबादेजवळ मीयानी येथें दोन दिवसांत आलें. तेव्हां तेथें सगळे अमीर सज्ज होऊन मोठे सैन्यानिशीं शत्रूंची वाट पाहातच होते; त्यांचे सैन्यां-

मीयानीची लढाई. ता० १७ फेब्रुवारी १८४३.

तील लोक शूर व बळकट होते. ते मजबूत ठिकाणीं होते आणि त्यांच्या व इंग्लिशांच्या सैन्यांमध्यें फलेली नामक नदी होती. त्या नदीचें पात्र खोल असून त्या वेळेस तिला पाणी नव्हतें. दांडगे बलोची लोक लढाई करण्यास उत्सुक होऊन डगरीवर जमले होते; आणि सैन्याच्या दोहों बाजूंस दाट झाडी होती, ह्यामुळें दोहोंकडे कांहीं धोका नव्हता. शत्रूंचें सैन्य इंग्लिशांचे सैन्यापेक्षां दसपटीहूनही अधिक होतें, तरी प्रसंग येईल त्याप्रमाणें झटून काम करण्यास इंग्लिश तयार होते.

इंग्लिश लोक तेथें जातांच शत्रूंनीं त्यांजवर तोफांचा मोठा भडिमार चालू केला. इंग्लिशांचे उजवे बाजूस त्यांचा तोफखाना होता, तेथून तेही उलट भडिमार करूं लागले; शत्रूंनीं आपलें सैन्य किती आहे तें दाखवावें ह्याकरितां इंग्लिशांनीं आपले कांहीं लोक पुढें पाठविले. मग पायदळ नदीच्या पलीकडच्या तटावर हल्ला करण्याकरितां पुढें निघालें. त्यांतील लोकांनीं आपलें काम बजाविण्याकरितां मोठे शौर्यानें चाल केली; परंतु त्यांचें काम फार लांबणीचें व मेहेनतीचें होतें. दोहोंकडे लोक मोठया निकरानें लढूं लागले; आणि शत्रूंच्या अघाडीचे लोक इंग्लिशांनीं मागें हटविले, तोंच त्यांचे जागीं दुसरे आले, आणि ते खवळलेल्या इंग्लिश लोकांबरोबर लढूं लागले. आपले शिरास धक्का लागूं नये ह्मणून तीं मोठाल्या ढालांच्या आड करून बलोची लोक इंग्रेज लोकांमध्यें घुसले, आणि रानटी लोकांसारखे अगदीं जिवावर उदार होऊन लढले. त्यांनीं आपण शरण जाऊन जीवदान मागण्याची आशा धरिली नाहीं, आणि शत्रूकडील कोणी शरण आल्यास त्यांनीं त्यासही जीवदान दिलें नाहीं; आणि ते आपले शत्रूंशीं झुंजून शेवटपर्यंत झटले. ते त्या खडकाळ जमिनीवर होते ह्यामुळें संगिनींच्या योगानें देखील इंग्लिशांस त्यांस मागें हटवितां येईनासें झालें.

ही जिवावरची लढाई तीन तास चालून मग नाल्याचे पार जाऊन शत्रूंचे उजवे बाजूवर हल्ला करण्याचा घोडेस्वारांस हुकूम झाला. ह्या हल्ल्यांत त्यांस यश मिळून त्यांचेच योगानें त्या दिवशीं इंग्लिशांस जय मिळाला. इंग्लिशांचे संगिनींचा थाट चमकूं लागला, तेव्हां शत्रूंच्या मुख्य भागांतील लोकांचें कांहीं चालेनासें होऊन ते मागें हटले. बलोची लोक मोठे शौर्यानें, धीरानें व कोणास न भितां लढले होते. त्याप्रमाणेंच परत जातांना आपला पराजय झाला, असें त्यांस न वाटतां विजयी लोकांसारखेच ते डौलानें गेले.

दुसरे दिवशीं सकाळीं सहा अमिरांनीं हैदराबाद हें शहर इंग्लिशांचे स्वाधीन करून, आपल्या तरवारी त्यांचे जनरलाचे हातीं दिल्या; तरी कज्जा संपला नाहीं. शत्रु लढाईचे तयारीनेंच सैन्य घेऊन हैदराबादेस येत होते.

त्या शहरापासून दोन कोसांवर दबा ह्मणून एक गांव आहे, तेथपर्यंत ते आले. तेव्हां इंग्लिशांचें सैन्य त्यांजवर हल्ला करण्याकरितां गेलें. ह्या वेळेस ह्या सैन्यांत पूर्वींपेक्षां कांहीं लोक अधिक होते. ह्या ठिकाणचें शत्रूंचें ठाणें मीयानीचे ठाण्याप्रमाणेंच होतें. फलेलीचे डगरीवर ते असून त्यांनीं त्या जाग्याची स्वतःसिद्ध बळकटी तोफांनीं वगैरे फार वाढविली होती. लढाईचे आरंभीं इंग्लिशांकडून तोफांचा भडिमार चालू झाला, तेव्हां शत्रूंकडील लोक मरायास लागून त्यांचे सैन्याच्या मध्यभागीं धांदल झाली. इंग्लिशांचे घोडेस्वारांनीं मग त्या सैन्याच्या डावे बाजूवर हल्ला केला, तेव्हां त्यांनीं नाल्यांतून मोठे शौर्यानें जाऊन बलोची लोक हांकून लाविले. त्याच वेळेस राणीचे बेविसावे पलटणीनें डावे बाजूचे तटांवर हल्ला करून शौर्यानें ते काबीज केले; आणि कांहीं घोडेस्वारांनीं उडवे बाजूवर हल्ला केला. बलोची मीयानीचे लढाईचे वेळीं जसे शौर्यानें लढले तसेच ह्या वेळेस लढले, आणि इंग्लिशांचा नाशही फार झाला.

हैदराबादची लढाई. ता० २४ मार्च सन १८४३.

मग ही लढाई फार वेळ चालली नाहीं. शीयर महंमद, शहा महंमद इत्यादि सरदार अद्यापि लढाईचे उद्योगांतच होते, पण त्यांचे हाताखालीं मोठें सैन्य त्यांस मिळेना, ह्यामुळें त्यांचा पराजय झाला. त्यांत मेजर जेकब ह्यानें शीयर महंमदाचा पराजय केला, आणि त्यास पळायास लाविलें. दुसरी एक लढाई झाली, तींत इंग्लिशांनीं शहा महंमद ह्यास कैद करून त्याचे थोडे लोक होते ते पळवून लाविले.

अमीर लोकांस शेवटीं जिंकतात. स. १८४३.

मग सिंध देश इंग्लिशांच्या स्वाधीन होऊन त्यांचे ताब्यांत राहिला, आणि तेथें त्यांनीं सर चार्लस नेपियर हा आपल्या तर्फे कमिशनर नेमिला. अमीर अन्यायानें व निर्दयपणानें राज्य चालवीत होते, ह्यामुळें ते जाऊन त्यांच्या जागीं इंग्रेज आल्यानें तेथील लोकांस आनंद झाला असें ह्मणतात. हें खरें असो किंवा नसो, परंतु ह्या योगानें त्यांचा नफा झाला एवढी गोष्ट खरी आहे. नवीन राज्यांत पूर्वींपेक्षां चांगली व्यवस्था झाली, प्रतिस्पर्धी सरदारांचे कज्जे मिटले, व्यापार वाढला, आणि जेथें पूर्वीं कोणाचाही प्रवेश होणें फार कठीण, आणि प्रतिस्पर्धा फार; अशा सिंधेंतील मुलखांत आलीकडे कांहीं वर्षें एक बंदर प्रसिद्धीस आलें आहे, तेथें व्यापाराची घडामोड वगैरे फार चालते. असले प्रकारचीं बंदरें आशिया खंडांत थोडींच आहेत.

सिंध प्रांत राज्यांत सामील करतात. सन १८४३.

ही लढाई संपल्यानंतर, ग्वालेर एथील स्वतंत्र संस्थानांत बखेडा झाला

होता, हें गवर्नर जनरलाचें चित्त अस्वस्थ होण्यास दुसरें कारण झालें.

ग्वालेरचीं कृत्यें.

दवलतराव शिंदा पूर्वी इंग्रेजांचा प्रबळ शत्रु असून जनरल वेलस्ली आणि लार्ड हेस्तिंग्स ह्यांच्या कारकिर्दीत त्यांनीं त्याशीं तह करून सल्ला केला होता; तो इ० स० १८२७ त मरण पावला. तेव्हां त्यास कांहीं मूल नव्हतें, ह्यामुळें त्याचे गादीवर त्याचा कोणीएक संबंधी बसला, तोही मूल झाल्याशिवाय इ० स० १८४३ चे फेब्रुवारींत मरण पावला.

हा राजा मेला तेव्हां त्याच्या बायकोचें वय केवळ तेरा वर्षांचें होतें. तिनें आपले नवऱ्याचा कोणीएक लांबचा संबंधी दत्तक घेतला. तो गादीवर बसून ग्वालेरचा महाराज झाला; पण हा नवा राजा आठ वर्षांचा होता, ह्याकरितां इंग्रेजांचे रेसिडेंताचे ह्मणण्याप्रमाणें, मामा साहेब ह्मणून एक सरदार होता तो सर्व राज्याचा कारभारी राणीचे लोकांनीं नेमिला.

महाराजाचे दरबारांतील कंत्राटें.

पुढें ग्वालेरच्या दरबारामध्यें नानाप्रकारचीं कंत्राटें होऊं लागलीं. ज्या लोकांस अमलाची इच्छा होती, ते व खुद्द राणी हीं नेहमीं सर्व प्रकारांनीं मामासाहेबाच्या विरुद्ध असत; ह्यामुळें त्यास कारभारी होऊन नुकते तीन महिने झाले तों, तो कामावरून निघाला; तेव्हां इंग्रेजांशीं आश्रय मागून त्यांचें मुलखांत त्याला रहावें लागलें. दादा खासगीवाला हा मनुष्य इंग्लिशांचा अगदीं प्रतिपक्षी होता. त्याची मामासाहेबाचे जाग्यावर नेमणूक झाली. ग्वालेर सरकारानें इंग्रेजांनीं नेमिलेला कारभारी कामावरून काढून रेसिडेन्टास न विचारतां त्याचे जागीं दुसरा नेमिला. ही गोष्ट इंग्रेज व शिंदे ह्यांचेमध्यें तह झाला होता त्याचे विरुद्ध झाली, तेणेंकरून गवर्नर जनरलाची इतराजी झाली, ह्याकरितां खासगीवाल्यास ग्वालेरचें दरबार बंद होण्याचा हुकूम झाला.

इतकें झालें तरी त्या दरबारांतील प्रतिस्पर्धा व कंत्राटें मिटलीं नाहींत. तेथील सरदारांस आपला सर्वांवर अंमल असावा, अशी इच्छा होती, ह्यामुळें त्यांचा एकमेकांवर भरंवसा नसे, आणि दरबारामध्येंच अशी गडबड असल्यामुळें सर्व देशांत दंगे होत होते.

मराठ्यांच्या लष्कराची स्थिति.

सैन्यही मोठें सबळ होतें, ह्यामुळें दंगा करण्यास किंवा लुटालूट करण्यास तें तयार होतें. मराठे लोकांचे फौजेंत नीट बंदोबस्त व व्यवस्था नसून लोक आपलेवरचे अधिकाऱ्यांचे स्वाधीन नव्हते, आणि त्यांस आपलें सामर्थ्य मोठें असें वाटत होतें; ह्यामुळें लढाई करण्याची त्यांस फार उत्कंठा होती. त्यांच्यामध्यें युरोपियन अधिकारी होते त्यांतील बहुतेकांस ह्या वेळेस त्यांनीं का-

डून टाकिलें; ह्यावरूनच त्या सैन्याचें सामर्थ्य व धमक किती होती हें सहज लक्षांत येईल.

तुह्मी करितां हें फार वाईट, आणि असाच जर क्रम चालवाल तर परिणाम चांगला होणार नाहीं, असें राणी आणि तिचे मुत्सद्दी ह्यांस गवरनर जनरलानें पत्र पाठविलें, परंतु त्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं; तेव्हां सभोंवतालचे देशाचा बचाव होऊन तेथें स्वस्थता व्हावी, ह्यास्तव कानपूर येथें सर ह्यू गो ह्याच्या हाताखालीं कांहीं महिन्यांपूर्वीं सैन्य जमलें होतें. त्यास कूच करण्याचा हुकूम करणें शेवटीं त्यास अवश्य झालें. गवर्नर जनरल जातीनें त्या सैन्याबरोबर मराठ्यांचे मुलखांत आला; तेव्हां लागलेंच त्या सरकारानें दादा खासगीवाल्यास इंग्लिशांचे स्वाधीन केलें, परंतु देशांत स्वस्थता होऊन दरबारामध्यें बखेडा नाहींसा झाल्याशिवाय फौज परत नेतां येत नाहीं, ह्मणून तिनें परत जाऊं नये असा ठराव झाला. फौज चंबळा नदीपर्यंत आली होती, तेव्हां मराठे सरदारांनीं गवर्नर जनरलास पुष्कळ वेळां अशी विनंती केली कीं, मराठी सैन्यांतील लोकांमध्यें बंदोबस्त व व्यवस्था अगदीं नाहीं, आणि ते आमच्या स्वाधीन नाहींत, यास्तव आपलें सैन्य नदी उतरून पार आलें, तर ते शत्रूंचें सैन्य आलें असें समजतील आणि तेणेंकरून कलागत होईल, आणि हें तर आपणांस आवडणार नाहीं; कारण देशांतला बखेडा मोडून नीट व्यवस्था करण्यासाठीं महाराजांचे मित्र ह्मणून येथें आह्मी आलों असें आपण ह्मणतां, ह्याकरितां कसेंही करून आपलें सैन्य नदीचे आलीकडे येऊं नये अशी तजवीज करावी. मग गवर्नर जनरलानें एक दिवस नेमून असा ठराव केला कीं, ते दिवशीं महाराजानें भेटीस यावें आणि तो त्या दिवशीं न आला तर इंग्लिशांचे सैन्यानें चंबळा नदी उतरावी.

इंग्लिशांचें लष्कर येतें. स. १८४३.

ही मुदत संपली तरी महाराज भेटीस आला नाहीं ह्मणून सैन्य चालतें झालें. बाबू शितोळे हा शिंद्याकडील सरदार आपणास अनुकूल आहे असें इंग्लिशांस वाटत होतें, आणि तोच शिंद्याचे दरबारांतून मराठ्यांचे तर्फेनें तह करण्याकरितां आला, तेव्हां वाद तुटून चांगले रीतीनें सल्ला होईल असें इंग्लिशांस वाटलें; पण तो सरदार इंग्लिशांचे छावणींतून मराठ्यांचे सैन्यांत गेला आणि त्याचे हाताखालीं कांहीं सैन्य येऊन त्याचा तो मुख्य झाला. २९ वे दिसेंबरास खुद्द सर ह्यू गो ह्याचे हाताखालचे लोक शत्रूंच्या दृष्टीसमोर आले, तेव्हां ते महाराजपूर ह्या गांवाजवळ तयारीनेंच होते. मराठे लोक मोठे मजबूत ठिकाणीं असून त्यांनीं पु-

महाराजपूरची लढाई. ता. २९ दिसेंबर. सन १८४३.

फळ मोठमोठाल्या तोफा तेथें ठेविल्या होत्या, त्या तोफांच्या योगानें इंग्लिशांचा मोठा नाश झाला; तेव्हां त्यांनीं शत्रूंस तेथून त्या गांवाकडे हांकून लाविलें. तेथें एक निकराची लढाई झाली, तींत मराठे आपले हातांतून रंजकेच्या बंदुका फेकून देऊन आपल्या शत्रूंशीं मोठे झटून लढले. ह्या वेळेस लढणारे लोकांस पाठबळ देण्याकरितां जनरल बेलियंत साहेब त्या गांवांत दुसऱ्या बाजूनें शिरला. मग त्यानें अठ्ठावीस तोफा घेऊन शत्रूस महाराजपुरांतून हांकून दिलें, आणि आपण पुढें चाल करून कोंडा ह्या ठिकाणीं तीन मजबूत तट होते त्यांवर हल्ला केला. मराठे मोठे शौर्यानें लढून अगदीं शेवटपर्यंत आपले तोफांपासून हलले नाहींत; पण त्यांस पळूं न देतां इंग्लिशांनीं तथल्या तेथें कापून टाकिलें. ह्या वेळेस इंग्लिशांस पुरता जय मिळाला खरा, परंतु त्यांचा नाश फार झाला; कारण फारच लोक व सरदार मेले.

पन्यारची लढाई. ता० २९ दिसेंबर. सन १८४३.

जनरल ग्रे ह्याचे हाताखालची सैन्याची टोळी ग्वालेरचे मुलखांत दुसऱ्याच रस्त्यानें शिरली होती, तिनें त्याच दिवशीं पन्यार मुक्कामीं शत्रूंशीं दुसरी लढाई केली. इंग्लिशांच्या सभोंवतालचे डोंगरावर जे मराठे होते, त्यांचा इंग्लिशांनीं डोंगरांडोंगरांवरून पाठलाग केला आणि त्यांच्या तोफा घेतल्या; ह्यामुळें लढाई सोडून त्यांस पळून जावें लागलें.

राणी शरण येते. सन १८४४.

इंग्लिशांस ह्याप्रमाणें दोनदां जय मिळाला, तेव्हां गवर्नर जनरलच्या बोलण्यास मान्य व्हावें, असें राणी आणि तिचे मुत्सद्दी ह्यांचे मनांत आलें. महाराज स्वतः राज्य चालविण्याजोगा मोठा होई तोंपर्यंत ग्वालेरचें राज्य पंचांनीं चालवावें; त्यांनीं इंग्रेजांकडील रेसिडेंटाचे मतानें नेहमीं कारभार करावा; मराठ्यांचें सैन्य अगदीं थोडें असावें; ग्वालेर येथें इंग्लिशांची फौज ठेवून तिचा खर्च तेथील सरकारानें आपले वसुलांतून द्यावा; आणि राणीचे हातीं कांहीं अंमल न ठेवितां तिची अब्रू राहून उपजीविका होण्यास्तव तिला मोठी नेमणूक करून द्यावी; असा ठराव झाला.

महाराजांबरोबर तह. सन १८४४

वर सांगितल्याप्रमाणें ठरलेल्या तहास महाराज आणि मराठे मुत्सद्दी मान्य झाले. ह्याप्रमाणें ग्वालेर येथें झालेला दंगा मोडून, इंग्लिशांविषयीं तेथें वैरभाव उत्पन्न होत होता तो मोठे चलाखीनें गवर्नर जनरलानें नाहींसा केला, आणि तो कलकत्त्यास निघून गेला. ही लढाई संपल्यावर तो हिंदुस्थानांत फार वेळ राहिला नाहीं. चोहोंकडे स्वस्थता न राखितां लढाईंत आनंद मानून त्यानें सिंध न ग्वालेर ह्या ठिकाणीं लढाया केल्या, असें

कोर्त आफ् दैरेक्तर्स ह्यांस वाटलें, ह्मणून त्यांची त्याजवर गैरमर्जी झाली, आणि ब्रितिश सरकारचें देखील मत न घेतां ती मोठी जागा सोडून देण्याविषयीं त्यांनीं त्यास लिहून पाठविलें. त्याचे जाग्यावर सर हेन्री हार्दिंग ह्याची नेमणूक झाली. लार्द एलिन्बरो ह्यास प रत बलावितात. सन १८४४.

ह्याप्रमाणें लार्द एलिन्बरो साहेबाची अप्रतिष्ठा झाली, तरी त्यानें लढाईत जय मिळवून हिंदुस्थानांत स्वस्थता केली; बंडखोर संस्थानांमध्यें त्यानें इंग्रेजांचा अंमल कमी होऊं दिला नाहीं, आणि त्याची कीर्ति मागें रहाण्याजोगें कांहीं अंशीं त्यानें गवर्नर् जनरलाचें काम केलें नसलें, तरी त्यानें अफगाणिस्थानचे डोंगरांमध्यें आपले देशाचें नांव गाजवून, तेथें प्राप्त झालेलीं संकटें दूर केलीं, आणि बंदींत पडलेले इंग्रेज लोक सोडविले, ह्या गोष्टी त्याचा विसर पडूं देण्याजोग्या नाहींत.

एकूणिसावा भाग समाप्त.

## भाग विसावा.

### पंजाबांतील लढाई.

इसवी सन १८४४ पासून सन १८४७ पर्यंत.

सर हेन्री हार्दिंग—शीख—रणजितसिंगाचा मृत्यु—लाहोर येथें गडबड—शीख लोकांचे सैन्याचें धैर्य—तें सैन्य ब्रितिश हिंदुस्थानावर स्वारी करितें—इंग्लिशांचें सैन्य येतें—मुडकीची लढाई—शीख लोकांची सभोंवतीं खंदक खणलेला अशी छावणी—फेरोजशहा येथील लढाई—रणभूमीवर रात्र होते—जय—शीक लोक परत येतात—सर हारी स्मिथ ह्यास लुधियाना येथें पाठवितात—अलिवलची लढाई—सोबरानची लढाई—इंग्लिशांचें सैन्य सतलज नदी उतरतें—गुलाबसिंग तहाचें बोलणें लावितो—महाराज व गव्हरनर जनरल ह्यांची भेट—सल्ला—इंग्लिशांचे लष्करापैकीं कांहीं भाग लाहोरास रहातो व बाकीचे लोक परत येतात—लार्ड हार्दिंगच्या कारकीर्दीची अखेरी.

सर हेन्री हार्दिंग साहेब हा हिंदुस्थानांत आला, तेव्हां तेथें स्वस्थता राखण्याचा त्याचा वास्तविक मनोदय होता. पण लवकरच लढाई करण्याचा त्यास प्रसंग आला. नवीन शत्रूंनीं ह्मणजे शीख लोकांनीं इंग्लिशांच्या मुलखावर हल्ला केला; ह्याकरितां त्यांस हांकून देणें प्राप्त झालें. ह्या वेळेच्या पूर्वींच्या इतिहासामध्यें ह्या लोकांचें नांव फार वेळां आलें नाहीं; तरी इंग्रजांचे राज्याचा उत्कर्ष होत असतांनाच त्यांचें प्राबल्य वाढलें.

*सर हेन्री हार्दिंग साहेब येतो. सन १८४५.*

*शीख.*

त्यांचा पंथ खिस्ती शकाच्या सोळावे शतकांत उत्पन्न झाला, तेव्हां त्यांचा मुख्य नानक ह्मणून एक गरीब मनुष्य होता. त्यानें हिंदु धर्मांतील कांहीं मतें व मुसलमानी धर्मांतील कांहीं मतें घेऊन त्यांचा एक नवीन धर्म बनविला आणि त्याचा तो लोकांमध्यें उपदेश करूं लागला. ह्या लोकांस औरंगजेबानें फार छळिलें; तेव्हां गुरु गोविंद हा त्याचा मुख्य असतां आपलें मूळचें स्वरूप एकीकडे ठेवून ते धर्मशील होते त्याप्रमाणें लढाऊ लोकही बनून गेले. मोंगल लोकांचें राज्य लयास जाऊं लागलें, तेव्हां त्यांनीं पुष्कळ मुलूख मिळविला. रणजितसिंगाचे राज्यांत ते फार प्रबळ झाले. फ्रान्स देशांतील व इताली देशांतील लोक त्यांचे सैन्यांतील लोकांस कवाईती वगैरे शिकवीत असत; ह्यामुळें ते लोक लढाईचे कामांत हुशार होऊन गेले होते; तोफखाना तर फारच उत्कृष्ट होऊन गेला होता, ह्यामुळें शीख लोकांचे शिपाई ज्या ज्या

शत्रूंशीं लढाई करीत त्यांचा त्यांचा ते पराभव करून टाकीत. रणजितसिंगानें इंग्रेजांशीं तह केला होता; पण तो इ. स. १८३९ त ह्मणजे अफगाणिस्थानांत लढाई होत होती त्या वेळेस मरण पावला. तो मेल्यावर त्या देशांत फार गडबड होऊन गेली; मुख्य शहरांत अंदाधुंदी होऊन बंडें होऊं लागलीं. मारेकऱ्यांच्या हातून वरचेवर मुडदे पडत असत, आणि ह्याप्रमाणें दंगल होत असतां त्या सैन्याचें प्राबल्य मोठें होतें. इ० स० १८४५ त धुलीपसिंग ह्या नांवाचा एक लहान मुलगा लाहोरास महाराज होता. तो लहान होता ह्मणून त्याची आई राज्यकारभार चालवीत होती. तिनें ह्या वर्षाचे प्रारंभीं कांहीं 'उलटापालट' झाल्यावर आपला भाऊ वजीर नेमला; पण ह्याप्रमाणेंच दुसरी उलटापालट झाली, तेव्हां तो मारला गेला, आणि राजा गुलाबसिंग ह्मणून जो एक सरदार होता, व ज्याचें लोकांमध्यें वजन होतें, त्यास कारभारी हें नांव प्राप्त झालें नाहीं, तरी त्या हुद्याचा अंमल त्याचे हातीं आला. ह्याप्रमाणें दंगा व धांदल चालली असतां शीख लोकांचे सैन्यानें इंग्रेजांचे मुलखावर हल्ला करण्याचा निश्चय केला; कारण त्या सैन्यास नेहमीं लढाई करण्याची उत्सुकता असून रिकामें राहणें आवडत नव्हतें. आपल्याजवळचे बेकैदी लोक नाहींतसे व्हावे, ह्याकरितां महाराजांची आई व तिजकडचे लोक ह्यांनीं, तुह्मी आपला उद्देश सिद्धीस न्यावा, अशी सैन्यास भर दिली; आणि सैन्याच्या त्या उद्देशास अनुकूळ होण्याची इच्छा गुलाबसिंगानेंही बाह्यात्कारीं दाखविली. पण वास्तविक पाहिलें असतां, ह्या कृत्याचा परिणाम दृष्टीस पडे तोंपर्यंत वैरभावाचें कोणतेंही कृत्य त्यानें केलें नाहीं.

पंजाबांत अव्यवस्था.

शीख लोकांची राज्यकारभाराची स्थिती.

शीख लोक इंग्रेजांचे मुलखावर हल्ला करितात. ता० १२ दिसेंबर सन १८४५.

शीख लोकांचे सैन्यानें चाल केल्यावरून गवर्नर जनरलास संशय आल्यामुळें, त्यानें कांहीं लोक सरहद्दीवरचे लोकांस मदत करण्याकरितां पाठविले. तेथें लुधियाना व फिरोजपूर हीं दोन इंग्लिशांचीं ठाणीं होतीं. ज्या प्रदेशावर शीख लोक हल्ला करतील असें वाटलें, तिकडे गवर्नर जनरल जातीनें गेला. बारावे दिसेंबरास त्या लोकांस राग येण्याजोगें इंग्लिशांनीं कांहीं केलें नसतां, ते सतलज नदी उतरून इंग्लिशांचे मुलखांत शिरले, आणि फिरोजपुरापासून पांच कोसांवर फिरोजशाहा येथें छावणी देऊन मोरचेबंदी करूं लागले. अंबाला येथील सर ह्यू गो ह्याचे हाताखालचे लोकांनीं होईल तितकी जलदी करून,

इंग्लिशांचें लष्कर येतें.

मुडकीची लढाई. ता० १८ दिसेंबर. सन १८४५.

लुधियाना एथील लोकांस येऊन मिळावें असा हुकूम झाला. ते लोक दिसेंबरचे अठरावे तारखेस मुडकी ह्या गांवीं आले. तेव्हां कूच केल्यामुळें ते फार थकले होते. पण शीख लोकांचें सैन्य आपणावर हल्ला करण्याकरितां येत आहे, असें त्यांस समजल्यामुळें त्यांस विश्रांति घेण्यास देखील पुरता वेळ सांपडला नाहीं. मग लवकरच श्रम व क्षुधा ह्यांचा त्यांस विसर पडून ते लोक लढाईचे तयारीनें शत्रूंशीं तोंड देण्याकरितां निघाले. तेथील जमीन सपाट होती, पण कांहीं ठिकाणीं लहानशी झाडी होती. तिचे आड शत्रूंनीं आपलें पायदळ व तोफखाना ठेविला होता. इंग्लिश कूच करीत असतांना शत्रु त्यांजवर तोफांचा मारा करूं लागले, तेव्हां तेही मोठया कडाक्यानें उलट मारा करूं लागले; मग इंग्लिशांचे घोडेस्वार शत्रूंच्या सैन्याचे दोहों बाजूंवर हल्ला करण्याकरितां पुढें चालले. ही इंग्लिशांची चलाखी पाहून शत्रु घाबरून गेले असतां इंग्लिशांचें पायदळ पुढें सरसावलें, आणि त्यांतील लोकांनीं शीख लोकांस जाग्याजाग्यावरून हांकून देऊन त्यांच्या सर्व तोफा घेतल्या. ताऱ्यांच्या उजेडामध्यें लढाई कांहीं वेळ चालून शेवटीं इंग्लिशांस जय मिळाला. त्यांनीं पूर्वी ह्या नवीन शत्रूंस तुच्छ मानिलें होतें, परंतु ह्या पहिल्या लढाईत त्यांस असें दिसून आलें कीं, शीख लोक मोठे चतुराईनें व अपूर्व शौर्यानें लढतात. ह्या वेळीं इंग्लिशांचा फार नाश झाला, आणि जलालाबाद येथें पराक्रम करून त्या शहराचें ज्यानें संरक्षण केलें, तो सर राबर्त सेल ह्या प्रसंगीं मारला गेला.

फिरोजशाह येथें मोरचेबंदी केलेली छावणी होती. तिकडे शीख लोक परत गेले. फिरोजपूर येथील टोळी इंग्लिशांच्या मदतीस आल्यावर ते २१वे तारखेस शत्रु तटबंदींत असतां त्यांजवर हल्ला करण्याकरितां गेले. त्या तटबंदींत शंभरांपेक्षांही अधिक तोफा होत्या, ह्यास्तव ती फार मजबूत होती. शीख लोक पुष्कळ असून लढाई करण्याविषयीं उत्सुक होते. तेथील मोरचेबंदी केलेली छावणी चौकोनाकृति होती, तिची जी बाजू लांब होती तिकडून इंग्लिशांनीं हल्ला केला. इंग्लिशांचा तोफखाना शीख लोकांच्या तोफखान्याप्रमाणें मजबूत नव्हता; तरी तोफांचा मारा शत्रूंवर सुरू झाला असतां, पायदळांतील लोकांनीं शत्रूंच्या भयंकर मोरच्यांवर हल्ला करून त्यांच्या छावणींत आपला शिरकाव केला; मग मोठी भयंकर लढाई झाली. तींत शीख लोकांस आवेश येऊन धर्माचे उत्कंठेनें ते वेडे होऊन गेले, आणि रानटी लोकांसारखे जिवावर उदार होऊन लढले. जखमा लागून दुर्बल होऊन जे इंग्लिशांचे लोक

फिरोजशाह येथील लढाई. ता० २१ डिसेंबर स. १८४५.

धरणीवर पडले होते, त्या सर्वांस त्यांनीं ठार मारिलें; आणि त्या लढाईंत पुष्कळ सुरुंग उडाले ह्मणून ती फारच भयंकर झाली.

इकडे सर जान लित्लर ह्याची टोळी शत्रूंचे डावे बाजूवर हल्ला करण्याकरितां गेली, पण तिला इतरांसारखा जय मिळाला नाहीं. हल्ला करणारांमध्यें कत्तल फारच उडाली; आणि एके ठिकाणीं मोरचा अर्धचंद्राकृति होता, तेथें तर राणीचे एका पलटणीचा इतका नाश झाला कीं, तिला मागेंच हटावें लागलें.

रणभूमीवर रात्र होते.

ह्याप्रमाणें मोठे झपाट्यानें लढाई चालून तोफांचा कडकडाट चालला असतां रात्रीचा समय प्राप्त झाला. इंग्लिशांस कांहींसा जय मिळून शीख लोकांचे छावणींत त्यांचा शिरकाव झाला होता; पण अद्यापि त्यांनीं शत्रु येथून हांकून दिले नव्हते. अंधकार पडला ह्यामुळें कांहीं वेळ लढाई बंद झाली. इंग्लिश लोक आपले शत्रूंचे जवळच होते व त्या वेळेस अंधकार होता, ह्यामुळें मित्र कोणता व शत्रु कोणता हें ओळखतां येत नसे; पण मधून मधून, ज्या तोफा अद्यापि शत्रूंच्या स्वाधीन होत्या, त्यांतून इंग्लिशांवर गोळे येत असत. हे इंग्लिशांचे लोक लढाईचे पूर्वीं आठ कोस चालून आले होते, ह्यामुळें फार थकून त्या वेळीं त्यांस क्षुधेनें व थंडीनें फार श्रम होत होते. परंतु गवर्नर जनरल व कमांदर इन्चीफ हे तेथें त्यांच्या बरोबर हाल सोशीत होते, ते त्या शूर लोकांस धीर देत असत.

जय.

पहांट झाल्याबरोबर लढाई पुनः सुरू झाली. इतके हाल झाले असून त्या धीरवान् गोरे लोकांस पुष्कळ आवेश व उत्कंठा होती. त्यांच्या अंगीं विलक्षण वीरश्री येऊन त्यांनीं शत्रूंस जिंकण्याचा निश्चय केला. सर हेन्री हार्दिंग हा सर ह्यू गो ह्याचे हाताखालीं दुय्यम होता तो डावे बाजूचे लोकांचा, आणि कमांदर इन्चीफ हा उजवे बाजूचे लोकांचा, मुख्य होऊन ते दोघे पायदळानिशीं जय मिळविण्याकरितां निघाले. ते हल्ला करूं लागले. तेव्हां त्यांचे पुढें कोणाचें कांहीं चाललें नाहीं. त्यांनीं शीख लोकांस मागें हटवून त्यांच्या ७८ तोफा घेतल्या. ह्याप्रमाणें इंग्लिशांनीं शीख लोकांचे सैन्याचे एका टोळीचा पराजय करितांच दुसरी आली. शीख लोकांचा एक सरदार तेजासिंग ह्याचे हाताखालीं त्यांनीं ३०००० लोक शिलकेस ठेविले होते, ते विजयी लोकांबरोबर लढून मोरचेबंदी पुनः आपले स्वाधीन करून घेण्याकरितां पुढें सरसावले. इकडे इंग्लिशांच्या पायदळांतील शूर लोकांस दोहोंकडून घोडेस्वारांचा आश्रय होताच; तेव्हां त्यांनींही पुनः हल्ला केली. तेजासिंगाचा पराजय करून त्यांनीं त्याचे सैन्याचा नाश

केला, तेव्हां त्या सैन्यास सतलज नदी उतरून पळून जावें लागलें.

गोरे लोकांनीं फिरोजशाहा येथें पराक्रम केला त्याप्रमाणें त्यांनीं कधींही केला नसावा. ह्या वेळच्याप्रमाणें शूर सरदार त्यांजवर कधींही नव्हते ह्यांत तर संशयच नाहीं. लढणारे लोकांचे जे हाल होत होते त्यांमध्यें त्यांचा वांटेकरी गवर्नर जनरल असून त्याची सर्वांवर कृपादृष्टि होती. आपले बरोबरचे लढणारे सर्व लोक आणि विशेषेंकरून जखमी झालेले लोक ह्यांस आपलेकडून होईल तितकें साह्य करून, त्यानें त्यांचें कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. प्रत्येकाजवळ जाऊन त्यास तो धीर देत होता, ह्यामुळें सर्वांस आनंद होत असे; अन्नवस्त्रांची कमताई कोणास असल्यास तो तत्काळ पुरवीत असे, कोणी धीर सोडूं लागले, ह्मणजे आपला हात तुटला होता तो पाहून त्यांस धीर यावा, अशा हेतूनें त्यांस तो आपली रिकामी अस्तनी दाखवी, आणि त्यांस प्रिय जो स्वदेश त्याविषयीं गोष्टी सांगत असे.

शीख लोक पुनः सतलज उतरतात.

इंग्लिश लोकांचा पुष्कळ नाश होऊन जेथें त्यांस जय मिळाला तेथेंच ते राहिले; कारण तोफखाना जास्ती वाढून लोकांची मदत मिळाल्याखेरीज त्यांचा लाहोराकडे जाण्याचा कांहीं उपयोग नव्हता. इंग्लिश लाहोरास जाईनात, तेव्हां त्यांस धैर्य नाहीं, असें शीख लोकांस वाटल्यावरून त्यांनीं सतलज नदी उतरून पुन्हा इंग्लिश लोकांचे मुलखावर हल्ला केला, तेव्हां अर्थातच जास्ती लढाया होण्याचा प्रसंग आला; शत्रूंनीं लुधियानावर हल्ला करितों असा धाक घातला; ह्यास्तव कमांदर इन्‌चीफ ह्यानें एके टोळीनिशीं सर हारी स्मिथ ह्यास त्या शहराचा बचाव करण्याकरितां पाठविलें. सर हारी स्मिथ ह्यास वाटेनें कांहींका ठिकाणीं थोडथोडे शीख लोक भेटत गेले आणि त्या वेळेस चकमकीही झडल्या, त्यांत सर्वदां इंग्लिशांस जय मिळाला नाहीं; पण असल्या लढाया क्षुल्लक, ह्यामुळें त्यांमधील जय अपजय ह्यांनीं कांहीं फार नुकसान झालें नाहीं. सर हारी स्मिथ ह्यानें लुधियाना येथून शत्रूंचा तळ उठविला; आणि तेथील व आपले बरोबरचे लोक एकत्र करून तो शत्रूंशीं तोंड देण्याकरितां अलिवालाकडे गेला. शीख लोकांजवळ ५६ तोफा असून मातीच्या भिंतीची मजबूत तटबंदी करून, ते तिचे आड राहिले होते. त्यावेळेस इंग्लिशांचे लोक शीख लोकांच्या निमे देखील नव्हते. इंग्लिश लोक जवळ येऊं लागले तेव्हां शत्रूंनीं त्यांजवर तोफांचा मारा चालू केला; तेव्हां शत्रूंचे छावणीचें ठिकाण नीट लक्षांत यावें ह्याकरितां सर हारी स्मिथ ह्यानें आपले लोकांस कूच बंद करण्याचा हुकूम केला; मग ती छावणी नीट रीतीनें पाहून त्यानें पुनः चाल केली आणि पहिल्यानें अलिवालावर हल्ला केला; कारण तें गांव

हस्तगत झालें ह्मणजे शीख लोकांची छावणी घेण्यास कठीण पडणार नाहीं असें होतें. त्यांनीं तें गांव लवकरच घेऊन शत्रूस सतलज नदीचे पलीकडे हांकून दिलें, आणि ते पळून गेल्यावर, त्यांचा दारूगोळा वगैरे सर्व युद्धसामग्री व तोफा, हीं इंग्लिशांचे हातीं सांपडलीं. ह्या वेळीं शीख लोक मोठे शौर्यानें लढले. सोळावे भालेवाल्यांचे पलटणीनें त्यांजवर हल्ला केला, तेव्हां पुढें येणारे स्वारांशीं आपल्या ढाली व तरवारी घेऊन ते मोठ्या आवेशानें लढले. ही लढाई झाल्यावर सर हारी स्मिथ मुख्य सैन्यास येऊन मिळाला.

अलिवालची लढाई. ता. २८ जानेवारी सन १८४६.

शत्रूचे पुष्कळ लोक अद्यापि सतलज नदीचे कांठचे डावे बाजूवर होतेच; ते सोब्रान ह्या गांवीं आपले छावणीची जागा मजबूत करीत होते. त्या ठिकाणास छावणी असें ह्मणावें ह्यापेक्षां किल्ला हें नांव द्यावें हें बरें, कारण तें तसेंच दिसत होतें. इकडे इंग्लिशांचे साह्यास कांहीं लोक येऊन पुष्कळ तोफा व दारूगोळा वगैरे सामान आलें; आणि शत्रूंवर हल्ला करण्याची व लाहोराकडे कूच करण्याची सर्व तयारी झाली. फेब्रुवारीचे दहावे तारखेस पहांटेसच लोक हत्यारें घेऊन हल्ला करण्यास सिद्ध होते. चोहोंकडे दाट धुकें पडलें होतें, तरी तें कमी व्हावयास लागतांच इंग्लिशांनीं तोफांचा मारा चालू केला. एकसारखे तीन तास इंग्लिशांचे तोफांचा कडकडाट व कळकी बाण, कुलपी गोळे, ह्यांचा दणदणाट चोहोंकडे चालला होता; त्यावर जो शत्रूंनीं उलट मारा केला त्याच्या योगानें कांहीं झालें नाहीं. हा इंग्लिशांचे नुस्ते तोफांचाच मारा तटबंदीचा नाश करून तेथून शत्रूस हांकून देण्यापुरता नव्हता, ह्यामुळें घोडेस्वार व पायदळांतील लोक हे केवळ मौज पाहातच राहिले नाहींत. इंग्लिशांचे पायदळांतील लोक मातीच्या कोटावर हल्ला करण्याकरितां पुढें सरसावले. तेव्हां एक लढाई झाली, तींत इंग्लिशांचे लोक फार मेले. इंग्लिश लोक हल्ला करीत होते तेव्हां शीख लोकांनीं आपले तोफांच्या योगानें त्यांचा सप्पा उडविला, मग कांहीं ठिकाणीं त्यांस वरचेवर मागें हटण्याचा प्रसंग आला; तरी ते दमदार व धैर्यवान् ह्यामुळें शेवटीं त्यांसच जय मिळाला. त्यांनीं तोफांच्या अगदीं सन्निध जाऊन संगिनींच्या जोरानें त्या घेतल्या. इकडे तटबंदीला लहान लहान भोंकें पडलीं होतीं त्यांतून घोडेस्वार दरएकांत दोन दोन तीन तीन ह्याप्रमाणें जाऊन सगळे आंत शिरले; आणि समोरचे बाजूस सगळ्यांनीं एकत्र हो-

इंग्लिश व शीख ह्यांची तयारी.

सोब्रानची लढाई. ता. १० फेब्रुवारी सन १८४६.

ऊन शीख लोकांचे गोलंदाज आपल्या ठिकाणीं असतां त्यांजवर हल्ला केला. इंग्लिशांनीं हांकून दिल्यावर सर्व शीख लोक पळून नदीपाशीं गेले; तेथेंही त्यांजवर घोडेस्वारांकडील तोफांचा भडिमार होत होता. कांहीं लोक गोळे, बाण वगैरे लागल्यानें पडून मेले; कांहींजण नदी उतरून जातांना मध्यें बुडाले; आणि लाहोरास फारच थोडे जाऊन पोहोंचले. हिंदुस्थानावर हल्ला करून परदेशचे लोक जे इंग्लिश, त्यांस जिंकण्याची शीख लोकांनीं प्रतिज्ञा केली असून, त्यांसच उलटें इंग्लिशांनीं जिंकिलें.

ही लढाई झाल्यावर तेच दिवशीं संध्याकाळीं इंग्लिशांचे सैन्यांतील कांहीं लोक सतलज नदी उतरून गेले. दोन तीन दिवसांत ते कसुरास जाऊन पोहोंचले; तेथून लाहोर फार लांब नव्हतें. महाराजाचे आईनें तह करण्याकरितां गुलाबसिंगास पाठविलें होतें, त्याची व गव्हरनर जनरलाची त्या ठिकाणीं गांठ पडली. इंग्लिशांचें सैन्य पुढें चाललें होतें तें बंद करावें, असें गुलाबसिंगाचे पहिल्यानें मनांत होतें, पण सर हेन्री हार्डिंग ह्या गोष्टीस मान्य होईना; कारण शीख लोकांचा पुरता अपमान व्हावा, आणि इंग्लिशांचे सैन्यानें लाहोरास जाऊन तेथें तहाचीं कलमें सांगावीं असें त्याचें मनांत होतें. गव्हरनर जनरल साहेबाची भेट घेण्याकरितां तो महाराज इंग्लिशांचे छावणींत आला, तेथें त्या साहेबानें त्याजवर कृपादृष्टि ठेवून त्याचा चांगला सन्मान राखिला, आणि कांहीं दिवसांनीं लाहोरास आलेले आपले सैन्यावरचे अधिकारी त्याजबरोबर देऊन त्यास राजवाड्यांत पोहोंचविलें, ते अधिकारी आपले लोक घेऊन किल्ल्यावर राहिले; आणि दंगा धोपा न होतां शहरही त्यांचे स्वाधीन झालें. मार्च महिन्याचे आठवे तारखेस तह ठरून त्याप्रमाणें शीख लोकांनीं लढाईचे खर्चाबद्दल इंग्लिश सरकारास पुष्कळ पैसा दिला; बीया व सतलज ह्या दोन नद्यांच्या मधला त्रिकोणाकृति मुलूखही त्यांनीं इंग्लिशांस दिला; त्यांनीं आपले सैन्याचीं हत्यारें घेऊन नुकत्या लढाया झाल्या त्यांत इंग्लिशांनीं न घेतलेल्या तोफा त्यांच्या स्वाधीन केल्या; आणि इंग्लिश सरकारास पाहिजे होता तितका पैसा देण्याचें सामर्थ्य लाहोर सरकारास नव्हतें, त्याबद्दल त्यांनीं त्यांस आणखी कांहीं मुलूख दिला; तो पुढें इंग्लिशांनीं गुलाबसिंगास नजर केला, आणि त्याचेबरोबर त्यांनीं निराळाच तह करून त्याच्याशीं स्नेह केला; कारण त्यानें ह्या लढाईत निःपक्षपात राहून लाहोर सरकाराशीं इंग्लिशांचे मनाप्रमाणें तह करण्यास पुष्कळ मदत केली.

इंग्लिश लोक लाहोरावर येतात.

लाहोर स्वाधीन होतें.

महाराजाबरोबर तह, ता० ८ मार्च स. १८४६.

त्याप्रमाणें इंग्लिशांनीं शीख लोकांचा पुरता पराजय केला. त्यांनींच पहिल्यानें हिंदुस्थानावर हल्ला केला असून इंग्लिशांनीं त्यांस तेथून हांकून देऊन त्यांच्या देशावर उलटा हल्ला केला. ते जय मिळवून लुटालूट करण्याविषयीं फार उत्सुक होते, पण त्यांसच जिंकून इंग्लिशांनीं त्यांचे ताब्यांतला मुलूख कमी केला, कलकत्त्यास जाऊन परदेशचे लोक जे इंग्लिश त्यांस हांकून देण्याचे ते मनामध्यें पोकळ बेत करीत होते; परंतु प्रत्येक लढाईत त्यांचा पराजय होऊन त्यांचे राजधानीचे जागीं पुष्कळ इंग्लिशांचें सैन्य गेलें. इतकें होऊनही त्यांची धमक गेली नव्हती. इंग्लिशांचा त्यांजवर पक्का अंमल बसण्यास आणखी एका लढाईची गरज होती.

शेवटची व्यवस्था.

कांहीं शीख सरदारांच्या अर्जावरून इंग्लिशांनीं दहा हजार लोक लाहोर येथें ठेवून बाकीचें सैन्य आपले राज्यांत परत आणिलें; तेव्हां पंजाबांतील पहिली लढाई समाप्त झाली. लार्ड हार्डिंग साहेब मग हिंदुस्थानांत राहिला तोंपर्यंत त्यानें आपला वेळ आपले ताब्यांतील लोकांचें कल्याण करून चोहोंकडे स्वस्थता राखण्यांत घालविला. इ० स० १८४७ चे अखेरीस तो स्वदेशास परत गेल्यावर मागें त्याची फार कीर्ति राहिली. त्याच्या जागीं लार्ड दलहौसी हा गवर्नर जनरल झाला.

लार्ड हार्डिंगच्या कारकीर्दीची समाप्ति. सन १८४७.

विसावा भाग समाप्त.

# भाग एकविसावा.

## लार्ड दलहौसी साहेबाची कारकीर्द.

### इ० स० १८४८ पासून १८५६ पर्यंत.

-लार्ड दलहौसी साहेबाच्या कारकीर्दीचा आरंभ—मूळराज—त्याची दग्याची वर्तणूक—त्यास राज्यावरून काढितात—नव्या गव्हर्नराची स्थापना करण्यास अग्न्यू साहेब व अंदरसन साहेब ह्यांस पाठवितात—मुलतान येथें बंड—इंग्लिशांच्या कामगारांचे खून—शीरसिंगास मुलतानास पाठवितात—मिस्तर एदवर्द्स्—त्याची आश्चर्यकारक वर्तणूक—तो मूळराजाच्या सैन्याचा पराभव करितो—तो मुलतानांत प्रगट होतो—जनरल व्हिश मुलतान येथें दाखल होतो—पंजाबांतील बंड—शीरसिंगाचा अप्रामाणिकपणा—मुलतानच्या वेढा उठवितात—इंग्लिशांचें सैन्य पंजाबांत शिरतें—रामनगर येथील प्रकार—चिलियनवाला येथील लढाई—मुलतान घेतात—इंग्लंदांतील लोकांचें दुःख—गुजरातची लढाई—पंजाब राज्यांत सामील करतात—रंगून येथील गव्हर्नराची वर्तणूक—कमांदर लांबर्त ह्याची नेमणूक—ब्रह्मदेशाची लढाई—ब्रह्मी लोकांचे किल्ले घेतात—ब्रह्मी लोकांबरोबरच्या लढाईचें स्वरूप—प्रोम शहराकडेस चाल—पेगू राज्यांत सामील करतात—तह—निजामाबरोबर नवा तह—नागपूर—सांताळ लोकांचें बंड—अयोध्येंतील कृत्यें—धर्मसंबंधी लढाई—अयोध्या राज्यांत सामील करतात—लार्ड दलहौसी ह्याच्या कारकीर्दीची अखेर, व लार्ड क्यानिंग ह्याचें येणें—उपयोगी विद्येची सुधारणूक—कंपनीच्या सनदेंत फेरफार—इंग्लंदानें हिंदुस्थानाविषयीं जें चांगलें केलें तें—उपसंहार.

लार्ड दलहौसी साहेबाची कारकीर्द चालू झाली, तेव्हां देशांत देहमीं स्वस्थता राहून कोठें दंगा धोपा होणार नाहीं, असें वाटत होतें; तरी तो हिंदुस्थानांत येऊन फार दिवस झाले नाहींत तोंच पंजाबांत दंगा होऊं लागला, आणि प्रबळ व जिवावर उदार होऊन लढणारे इंग्लिशांचे शत्रु जे शीख लोक, त्यांची व ह्यांची दुसरी लढाई झाली, तेव्हां ह्या दंग्याचा शेवट झाला. मुलतान ह्मणजे सिंधु व सतलज ह्या नद्यांच्या मधले मुलखाचे राजधानीची जागा, येथील सुभेदार लाला मूळराज हा कांहीं वेळापूर्वी लाहोरचे शीख लोकांस फितुरी करून, इंग्लिशांचे सैन्यावर उठण्याची त्यांस भर देत असे. तें सैन्य मुख्य मुख्य शीख सरदारांच्या अर्जावरून तेथें इंग्लिशांनीं ठेविलें असून त्यांस तेथून हांकून देण्याविषयीं

मूळराज ह्याची दग्याची वर्तणूक.

मुलतानच्या गादीवरून त्याला काढतात. सन १८४८.

मूळराज हा लाहोरचे शीख लोकांस चढवून देत होता. ह्याकरितां त्याला पदच्युत करणें हें अवश्य आहे, असें इंग्लिशांस वाटलें. मग त्यांनीं त्याप्रमाणें करून त्याच्या जागीं सरदार खानसिंग हा सुभेदार नेमिला. बंगाल्यांतील मुलकी कामगार व्हान्स अग्न्यूसाहेब, व मुंबईचे सैन्यांतील अंदरसन साहेब ह्यांस इंग्लिशांच्या तर्फेनें वकील होऊन नव्या सुभेदाराबरोबर मुलतानास जाण्याविषयीं हुकूम झाला होता. ह्या फेरफारास मूळराज मान्य झाला, असें पहिल्यानें बाह्यात्कारीं दिसलें, ह्मणून दंगा होईलसें वाटलें नाहीं, पण इंग्लिशांचे वकील शहरांत जातांच मूळराजाचे लोकांनीं त्यांजवर हल्ला करून त्यांस जखमी केलें, मग ते त्या शहरानजीक ईदगा ह्मणून एक लहान किल्ला आहे, तेथें सरदारखान व आपल्याबरोबरचे लोक घेऊन गेले, ते तेथें असतां शत्रूंनीं शहरांतून त्यांजवर तोफांचा भडिमार चालू केला. पण त्यांच्यानें त्यांचें कांहीं झालें नाहीं. तीन दिवसांनीं शत्रूंनीं ईदगा किल्ल्यावर हल्ला केला, त्या वेळेस गुरखे शिपाई व इंग्लिश वकिलांबरोबरचे शीख लोक ह्यांनीं विश्वासघात करून शत्रूस किल्ल्याचे दरवाजे उघडून दिले. ते जखमी झालेले दोघे साहेब हातांत हात घालून आपल्या आवडत्या भाषेंत बोलून एकमेकांस धीर देत होते, तों अकस्मात् त्या लोकांनीं त्यांस ठार मारिलें, आणि त्या रानटी मनुष्यांनीं त्यांच्या प्रेतांचे देखील हाल हाल केले.

इंग्लिशांचे वकिलांचा वध. सन १८४८.

ह्याप्रमाणें दुसरे ठिकाणींही विश्वासघाताचीं उदाहरणें दृष्टीस पडलीं. इंग्लिशांस अशी बातमी लागली कीं, लाहोर येथील शीख लोक बंड करण्याच्या उद्योगांत आहेत; त्यांनीं तेथील काळे लोकांस फितुरी करण्याचा प्रयत्न केला; पण तो सिद्धीस गेला नाहीं.

लाहोर येथील कंत्राटें.

शीरसिंग ह्मणून एक शीख लोकांचा सरदार होता. त्याचे खरेपणाविषयीं इंग्लिशांस शंका नव्हती; ह्मणून मुलतानचें वर्तमान कळतांच, त्यांनीं त्याजबरोबर सैन्य तिकडे पाठविलें, पण ह्यापेक्षांही अधिक उपयोगी मदत दुसरीकडून जवळच आली होती. कंपनीचे सैन्यांत एदवर्द्स् साहेब ह्मणून एक लेफतेनेंत होता तो सिंधुनदावर लिया ह्मणून एक गांव आहे, तेथील व्यवस्था करून वसूल उत्पन्न करण्यास मूळराजास मदत करण्याकरितां तेथें होता. त्याजपाशीं विश्वासू शीख लोकांची एक टोळी होती, ती घेऊन तो मुलतानास जावयास निघाला, आणि तेथून भावलपूरचा प्रांत जवळच होता, तेथील नवाबास त्यानें जलद साहाय्यास येण्याविषयीं लिहिलें; तें त्यास मान्य

एदवर्द्स् साहेबाचीं हुशारीचीं व धैर्याचीं कृत्यें.

मूळराजाचे लोकांचा तो मोड करतो.

होऊन तो नवाब ह्या सर्व लढाईमध्यें बरेपणानें वागला आणि त्यांच्या उपयोगींही पडला. लढाईस उपयोगीं पडण्याजोगी मदत येऊन पोहोंचण्याचे पूर्वींच एदवर्द्स् साहेब व त्याजवळचे लोक ह्यांजवर, त्यांच्या इतकेच बंडखोर लोकांनीं हल्ला केला. तेव्हां त्यांस इंग्लिशांनीं मोठे शौर्यानें मागें हटविलें. एदवर्द्स् साहेब हा मोठे जलदीनें पुढें चाल करून, धेराइस्मायलखान ह्या किल्ल्यावरचा सुभेदार कर्नल कोर्तलंद ह्याचे हाताखालचे लोक, व भावलपूरचे नवाबाचे लोक, ह्यांस जाऊन मिळाला. जून महिन्याचे १८ वे तारखेस चिनाब नदीवर सदूसम ह्या गांवीं मूळराजाचा त्यानें पुन्हा पराजय केला. तेथें उभयतां सैन्यांची लढाई मोठी निकरानें ९ू तासपर्यंत झाली. तेव्हां जय कोणास मिळेल हें कळेनासें झालें होतें. एदवर्द्स् साहेब आपले पायदळानिशीं ती नदी उतरून गेला, तेव्हां कर्नल कोर्तलंद त्याचे बरोबर गेला नाहीं; पण मग त्यास गरज लागली तेव्हां तो दोन पलटणी व सहा तोफा घेऊन त्याचे मदतीस गेला. रणामध्यें मूळराजाचा अगदीं पराजय झाला, तेव्हां तो मुसलमान पळून गेला. मग तेथें एदवर्द्स् साहेबही सैन्य घेऊन गेला. त्यांचें सैन्य दररोज जास्ती वाढत असे. ह्या लढाईत धैर्य, शौर्य व चातुर्य हे त्या सरदाराचे गुण दृष्टीस पडले. त्यानें आपलेजवळचे लोकांस धीर देऊन त्यांजकडून मोठमोठे पराक्रम करविले आणि दंग्याचा जोर पहिल्यानें होता तो नाहींसा करून टाकिला. ह्याप्रमाणें तो इकडे पराक्रम करीत असतां, इतर लोकांस मोठमोठया खटपटी करण्याच्या मसलती करण्यास वेळ फावला; पण मूळराजाचा मोड त्याच्या एकटयाच्यानें होईना.

*सदूसम येथील लढाई. ता० १८ जून सन १८४८.*

*मूळराजाचें लष्कर मुलतानास पळून जातें.*

जनरल व्हिश आगस्ट महिन्यांत मुलतानासमोर येऊन तेथील सैन्याचा मुख्य अधिकारी झाला. त्याच्या बरोबरचे लोक व तेथीलें लोक मिळून एकंदर २८,००० लोक झाले.

*मुलतानचा वेढा. सन १८४८.*

इकडे हजारा प्रांतांतील शीख लोक इंग्लिशांवर उठले तेव्हां चतुरसिंग हा त्यांचा मुख्य होता, आणि ह्याप्रमाणें सर्व पंजाबांतील लोकांचीं मनें फिरून, बंड चोहोंकडे पसरत गेलें; तथापि मुलतानाजवळचे इंग्लिशांच्या सैन्यांतील लोक वरचेवर पुढें च सरसावत होते. त्यांनीं शहराभोंवतालचे प्रत्येक कोटांतून शत्रूस बाहेर हांकून देऊन त्या शहरास चोहोंकडून घेरा घातला होता; पण जय मिळत असतांनाच त्यांस तेथून वेढा उठविणें प्राप्त झालें. वेढा घालणारे सैन्याबरोबर शीरसिंग

*पंजाबांतील बंडें.*

*शीरसिंगाचा अप्रामाणिकपणा.*

हा असून त्याजवर इंग्लिशांचा पूर्ण भरंवसा होता; पण तोच पांचशें शीख लोक बरोबर घेऊन शत्रूकडे निघून गेला. ह्याप्रमाणें शीरसिंगाचे हातून विश्वासघात होऊन आपणास वेढा उठवावा लागेल, असें पूर्वी इंग्लिशांस वाटलें नव्हतें.

एथून पुढें लढाया झाल्या त्यांचे वेळेस दोहोंकडलीं सैन्यें मोठमोठालीं होतीं. पूर्वीचे पंजाबचे लढाईंत हिंदुस्थानचा कमांदर इन्‌चीफ लार्ड गो साहेब ह्याचा पुष्कळ उपयोग पडल्यामुळें इंग्लिश सरकारानें त्याचें नांव बडे लोकांत घातलें होतें. तो साहेब ह्या वेळीं मोठे सैन्यानिशीं फिरोजपूर येथें होता. शीरसिंग व त्याचा बाप चतुरसिंग ह्या उभयतांचें सैन्य एकत्र मिळालें होतें, त्याजबरोबर लढण्याकरितां लार्ड गो साहेबाचे हाताखालचे सैन्यांस तिकडे कूच करण्याचा हुकूम झाला.

इंग्लिशांची फौज येते.

नोवेंबरचे २१ वे तारखेस, इंग्लिश लोक शत्रूंजवळ गेले; ते ह्या समयीं चिनाब नदीवर रामनगर येथें मजबूत ठिकाणीं छावणी देऊन होते. दुसरे दिवशीं सकाळींच इंग्लिशांचे घोडेस्वारांकडील तोफखान्याचे लोकांनीं शीख लोकांवर हल्ला केला; आणि शीख लोकांचे पुष्कळ घोडेस्वार नदी उतरून गेले होते, त्यांबरोबर लढण्याचा इंग्लिशांचे घोडेस्वारांस हुकूम झाला. करोलींची चौदावी पलटण व नेटिव घोडेस्वारांची एक पलटण, ह्यांनीं शत्रूंस आपले समोरून हांकून दिलें, पण त्यांनीं मागें पुढें न पाहतां अचाट कृत्य करून हल्ला केला; ह्यामुळें उखरवाखर जमिनीवर ते अगदीं शीख लोकांच्या तोफांच्या माऱ्याखालीं सांपडले, आणि पुष्कळ नाश होऊन त्यांस मागें हटावें लागलें.

रामनगर येथील लढाई. ता० २२ नोवेंबर सन १८४८.

लढाईकरितां कांहीं वेळपर्यंत उभयतां सैन्यांची गांठ पडली नाहीं. जान्युआरी महिन्याच्या पंधरावे तारखेच्या सुमारास पुढें चाल करून आपणच लढाईस आरंभ करण्याचा लार्ड गो साहेबानें निश्चय केला. शीख लोकांनीं मजबूत मोरचेबंदी बांधली होती तिच्या जवळ तो साहेब गेला. तेव्हां जातांना त्यास फार श्रम झाले होते, ह्यामुळें दुसरे दिवसपर्यंत लढाई लांबवावी असें त्याचे मनांत होतें; पण त्यास वाटलें होतें त्यापेक्षां शीख लोकांचे मोरचे अधिक जवळ होते, आणि त्यांचे तोफांच्या भडिमारानें इंग्लिशांचे सैन्याचा फार नाश झाला; ह्यामुळें त्या साहेबानें लढाई करण्याकरितां जे हुकूम द्यावयाचे ते दिले. तेथील जमिनीची माहिती इंग्लिशांचे जनरलास नसून ती जमीन मोठे सैन्यास चाल

चिलीयनवाला येथील लढाई. ता० १३ जा० स. १८४९.

करण्यास योग्य नव्हती, तरी इंग्लिशांचे लोक शत्रूंशीं लढूं लागले. मागें हटलें तर अप्रतिष्ठा होईल असें समजून जमिनीची वगैरे गैरसोय असतांही ते मोठ्या शौर्यानें लढले. त्यांनीं मोठमोठाले मजबूत मोरचे संगिनींच्या जोरानें घेतले आणि शीख लोकांस मागें हटविलें. मग रणामध्यें मोठी लढाई झाली, तींत इंग्लिशांस जय मिळाला. पण त्या जयाचें सार्थक झालें नाहीं. ते लोक छावणी देऊन राहिले, आणि शत्रु पळून गेले तेव्हां त्यांचा त्यांनीं पाठलाग केला नाहीं. शत्रूंनीं कांहीं इंग्लिशांच्या तोफा घेतल्या. इंग्लिशांकडील मेलेले व जखमी झालेले लोक मिळून त्यांचा पुष्कळ नाश झाला. ह्याप्रमाणें इंग्लिशांचा भयंकर नाश झाला खरा, पण त्यांच्या पेक्षांही, ह्या चिलियनवाला येथील लढाईत, शीख लोकांचा पराकाष्ठेचा नाश झाला.

मुलतान घेतात. ता० २२ जान्युआरी सन १८४९.

जय कोणास मिळतो हें लढाईत न समजल्यामुळें हिंदुस्थानचे इंग्लिशांच्या राज्यांतील सर्व लोक उदास होऊन गेले होते; तरी लवकरच त्यांचें औदासीन्य नाहींसें झालें. जानुआरी महिन्याच्या एकविसावे तारखेस मुलतान इंग्लिशांचे स्वाधीन झालें. दिसेंबर महिन्यांत जनरल व्हिश ह्याचे मदतीस मुंबईहून लोक आल्यामुळें त्यास त्या किल्ल्यास पुनः वेढा घालण्यास सामर्थ्य आलें. त्या महिन्याच्या २१ वे तारखेस किल्ल्यांतील लोकांनीं बाहेरचे इंग्लिशांवर हल्ला केला, तेव्हां त्यांनीं त्यांस मागें हटविलें, आणि इंग्लिशांनीं हल्ला करून शहर हस्तगत करून घेतलें. पुढें २२ वे तारखेस मूळराजा ह्यानें किल्ला स्वाधीन केला. पुष्कळ लोक त्या किल्ल्यास वेढा घालण्याचे कामांत फार दिवस गुंतल्यामुळें फार त्रासले होते ते, हा किल्ला स्वाधीन झाला, तेव्हां लार्ड गो ह्याचे हाताखालचे सैन्यास मदत करण्यास मोकळे झाले.

इंग्लिश वकिलांस मूठमाती व मारेकऱ्यांचीचौकशी.

मुलतान स्वाधीन झाल्यावर मोठे समारंभानें अग्न्यू साहेब व अंदरसन साहेब ह्यांचीं प्रेतें इंग्लिशांनीं उकरून काढिलीं; आणि मध्यें वाट पडली होती तींतून किल्ल्याचे तटावर नेऊन त्यांनीं तीं तेथें पुरिलीं. त्यांस मारल्याबद्दल मूळराजावर आरोप ठेवून त्याची चौकशी झाली, आणि तींत तो अपराधी ठरून पहिल्यानें त्यास मृत्यूची शिक्षा मिळण्याचा ठराव झाला, पण पुढें ती शिक्षा रद्द होऊन तिचे ऐवजीं त्यास जन्मठेप झाली.

चिलियनवाला येथील लढाईचें वर्तमान विलायतेस पोहोंचलें, तेव्हां तेथील सर्व प्रकारचे लोकांस दुःख झालें, आणि सर चार्लस नेपियर ह्यास

हिंदुस्थानांतील सैन्याचा मुख्य अधिकारी नेमून पंजाबांतील लढाई पुढें चालवावी हें सरकारास बरें वाटलें; पण नेपियर साहेब ह्या देशांत येऊन पोहोंचण्याचे पूर्वीं बहुत दिवस ह्या लढाईचा शेवट चांगले रीतीनें झाला होता. बाविसावे फेब्रुआरीस गुजरात (हें ठिकाण पंजाबांत जेलम व चिनाब ह्या दोन नद्यांच्या मधील प्रदेशांत आहे) येथें एक लढाई झाली, तींतच काय तो सोक्षमोक्ष झाला. ह्यामुळें पुनः दुसरी लढाई करण्याची गरज राहिली नाहीं. शीरसिंग हा तेथें मजबूत ठिकाणीं राहिला होता आणि त्याजवळ ६०,००० लोक व ५९ तोफा असून दोस्तमहंमदखानाचा मुलगा अफगाणिस्थानांतील घोडेस्वारांची एक टोळी घेऊन त्याचे मदतीस आला होता. गुजरातची लढाई बहुतकरून तोफांवरच चालली होती. इंग्लिशांनीं शीख लोकांवर मोरच्यांचा मारा तीन तासपर्यंत चालविला होता, आणि तितक्याच वेळांत पायदळांतील लोकांनीं शीख लोकांचें सर्व सैन्य पळावयास लाविलें, त्यांच्या सर्व तोफा घेतल्या आणि अंधकार पडे तोंपर्यंत त्यांचा पाठलाग केला. अफगाण लोक जलद पळून जाऊं लागले तेव्हां सर वाल्तर गिलबर्त ह्यानें खैबर घांटापर्यंत त्यांचा पाठलाग केला.

इंग्लंदांतील लोकांचें दुःख.

गुजरात येथील लढाई. ता० २१ फे० सन १८४९.

ह्या वेळेस शीख लोकांचा पुरता पराजय झाला. सर्व मोठमोठाले शीख सरदार इंग्लिशांचे स्वाधीन झाले, आणि त्यांचे सैन्याची अगदीं दाणादाण झाली. पंजाब जिंकिल्यानंतर इंग्लिशांनीं तो सुपीक देश आपले राज्यांत सामील केला. तेव्हांपासून इंग्लिशांनीं त्या देशाचें राज्य चांगले रीतीनें करून तेथें कडक अंमल चालविला; तेणेंकरून तेथें सर्व प्रकारें सुधारणा होऊन हल्लीं हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या इतर मुलखांप्रमाणें तेथें स्वस्थता असून तो देश सुखी झाला आहे.

पंजाब जिंकून तो राज्यांत सामील करतात. ता. २९ मार्च स. १८४९.

लार्ड दलहौसी साहेब पंजाबचा राज्यकारभार चालविण्याविषयीं जी व्यवस्था करावयाची ती करीत असतां, त्यास रंगून येथें घडलेल्या एका गोष्टीचें वर्तमान कळलें, आणि त्यावरून आपणांस ब्रह्मी लोकांशीं दुसरी लढाई करण्याचा प्रसंग येतो, असें त्याचें अनुमान झालें. इंग्लिशांचे दोन गलबतांच्या अधिकाऱ्यांचे हाल, त्या शहरांतील सुभेदारानें कारणाशिवाय केले, हा मोठा त्यानें अन्याय केला, आणि ह्याप्रमाणेंच त्या बंदरीं जें इंग्लिशांचें काम येई त्यांत तो बहुतकरून त्यांचे विरुद्ध वागत असे.

ब्रह्मी लोकांबरोबर कलह.

कमोदोर लांबर्त ह्याची नेमणूक. स.१८५१.

ह्यास्तव कमोदोर लांबर्त ह्यास कांहीं गलबतांनिशीं तिकडे पाठविण्याची गव्हर्नर जनरलानें योजना केली. लांबर्त ह्यास गव्हर्नर जनरलाचा असा हुकूम झाला कीं, तुह्मी आमचे लोकांशीं वाईट रीतीनें वागतां ह्याचें कारण काय, असें तुह्मीं त्या सुभेदारास विचारावें आणि त्यानें चांगले रीतीनें तुमची समजूत न केल्यास त्यास परत बोलवण्याविषयीं आवाचे राजास तेथून पत्र लिहावें. रंगूनचे सुभेदारानें इंग्लिशांचे वकिलाचा फार अपमान केला. ह्यामुळें कमोदोर ह्यानें आवाचे सरकाराकडे पत्र पाठविलें; तेव्हां तत्क्षणींच ब्रह्मी राजानें त्या सुभेदारास इंग्लिशांचा अपमान केल्याबद्दल कामावरून काढून त्याचे जागीं दुसरा अंमलदार नेमिला.

वादास आरंभ. सन १८५१.

नवा सुभेदार पूर्वीच्या सुभेदारापेक्षांही आपले शक्त्यनुसार अधिक उन्मत्तपणानें वागला; ह्याकरितां कमोदोर लांबर्त ह्यानें रंगून व त्याजवळचीं ब्रह्मी लोकांचीं बंदरें ह्यांस प्रसिद्धपणें वेढा घालून नाकेबंदी करण्याविषयीं प्रतिज्ञा केली. त्यानें ब्रह्मी राजास लिहिलें कीं, सुभेदाराशीं आह्मी इतःपर पत्रव्यवहार ठेवणार नाहीं, आणि शत्रु आपणाबरोबर वाईट रीतीनें वागले ह्याचा सूड उगविण्याकरितां रंगून नदीमध्यें आपले गलबताजवळ त्यांची लढाऊ नौका होती ती त्यानें घेतली. दुसरे दिवशीं, आपण बोलल्याप्रमाणें वेढा घालण्याकरितां तो आपले लोक नदींतून घेऊन चालला, तेव्हां शत्रूंपासून घेतलेली लढाऊ नाव त्याचे बरोबरचे एका गलबताला बांधलेली होती. नदींतून हीं गलबतें चाललीं असतां, किनाऱ्यावरले मेढेकोटांतून व ब्रह्मी लोकांचे लढाऊ नावांतून त्यांवर तोफांचा मारा होऊं लागला. इंग्लिशांनींही शत्रूंवर उलट मारा चालू केला, तेव्हां शत्रूंचा फार नाश झाला आणि त्यांनीं अगदीं तोफा सोडावयाचें बंद केलें. इकडे वेढा चालू करून कमोदोर साहेब, पुढें काय करावयाचें ह्याविषयीं गव्हर्नर जनरलाची मसलत घेण्याकरितां कलकत्त्यास आला.

ब्रह्मी लोकांबरोबर लढाई. एप्रिल स.१८५२.

ब्रह्मी लोकांचे हातून झालेलें इंग्लिशांचें नुकसान भरून देण्याविषयीं त्यांनीं आवाचे राजास पत्र लिहिलें, तेव्हां त्यानें तें भरून न देतां रंगूनचे सुभेदारानें केलेलीं कामें मान्य केलीं; त्यामुळें लार्ड दलहौसी हा तंटा लढाईशिवाय मिटविण्याकरितां मनापासून झटला असतां, त्यास लढाईची तयारी करण्याविषयीं जाहिरात देणें प्राप्त झालें. त्या वेळेस लढाई करण्याचे दिवस जाऊन पावसाळा समीप आला होता, तरी ब्रह्मी लो-

कांची चांगली खोड मोडण्याकरितां. मोठे सैन्यानिशीं त्यांजवर एकदम हल्ला करावा, ह्मणून गवर्नर जनरलानें मोठे जलदीनें लढाईची तयारी चालविली. इ० स० १८५२चे एप्रिल महिन्याचे प्रारंभीं जनरल गादविन मोठ्या सैन्यानें भरलेलीं गलबतें घेऊन रंगून नदीचे मुखाशीं आला, त्यानें मार्ताबान घेतलें; रंगून येथें मोठे निकरानें लढून तेंही हल्ला करून हस्तगत केलें; आणि बेसीन ह्मणून एक मोठें उपयोगी ठाणें होतें तें घेतलें; त्यामुळें लढाईचा अनुकूळ काळ संपला नाहीं तोंच इंग्लिशांचे सैन्याचा पेगूमध्यें पक्का शिरकाव झाला. इतकें झालें तरीं, अद्यापि ब्रह्मी राजाचे राजधानीपासून हल्ला करणारे लोक फार लांब होते, ह्मणून त्यास तहाचें बोलणें लावावेंसें वाटलें नाहीं.

किनाऱ्यावरील शहर घेतात.

पेगू प्रांताचें मुख्य शहर पेगू हें इंग्लिशांनीं जून महिन्यांत घेतलें; पण त्यांनीं तेथें पुरेसे लोक ठेवले नव्हते, ह्मणन कांहीं महिन्यांनीं ब्रह्मी लोकांनीं जिवावर उदार होऊन तें शहर परत घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां मद्रासचे पायदळाचे पलटणींतील मेजर हिल साहेबानें आपले हाताखालचे थोडे लोकांनिशीं मोठे शौर्यानें व धिमेपणानें लढून त्यांचा पराजय केला. मेजर हिल ह्याचे हाताखालचे लोकांनीं, त्यांजवर हल्ला करणारांची संख्या अत्यंत मोठी होती, तरी त्याचें कांहीं चालूं न देतां आपले ठाण्याचा बचाव केला होताच; तितक्यांत त्यांना रंगुनाहून मदत येऊन पाठबळ मिळालें.

पेगू शहराचें मोठ्या पराक्रमानें संरक्षण करितात. जून स.१८५२.

जितक्या लढाया झाल्या तितक्यांमध्यें जखमी झालेले व पाडाव केलेले जे इंग्लिशांकडचे लोक असत, त्यांचे ब्रह्मी लोक नेहमीं फार हाल करीत असत; पण त्या वेळेस रोग हा इंग्लिशांशीं झुंजणारा मुख्य शत्रु होता. ब्रह्मी लोकांचे शस्त्रांपेक्षां पटकी आणि ज्वर ह्यांच्या योगानें त्यांचा अधिक नाश होत असे.

लढाईचें स्वरूप.

प्रोम शहर जनरल गादविनच्या हाताखालचे लोकांचे स्वाधीन होतें; तिकडे कांहीं वेळानें तो जातीनें गेला. ह्याप्रमाणें एवढा मोठा पेगू प्रांत सगळा इंग्लिशांचे फौजेचे स्वाधीन झाला; आणि तो प्रांत आपल्या अमलाखालीं राखावा हें गवरनर जनरलास बरें वाटलें, ह्मणून त्यानें पेगू हा प्रांत इंग्लिशांचे राज्यांतला समजावा अशी एक जाहिरात दिली. ब्रह्मी लोकांची राज्यकारभारांतील अव्यवस्था नाहींशी होऊन हल्लीं तो प्रांत इंग्लिशांचे हाताखालीं हळू हळू चांगल्या दशेस येत आहे.

पेगू जिंकून तें ताब्यांत घेतात. ता० २०डिसेंबर १८५२.

इकडे आवाचे राजाचा भाऊ त्यास पदच्युत करून आपण गादीवर बसला; त्यास हें पक्कें समजलें कीं, इंग्लिशांचें सामर्थ्य मोठें आहे, ह्याकरितां त्यांच्यापुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं. म्हणून त्यानें तह करण्याचा आपला अभिप्राय दर्शविला. मग इंग्लिशांनीं घेतलेल्या नवीन मुलखाच्या सरहद्दीवरून त्यानें आपले लोक परत नेले आणि त्यांचे लोक आवा येथें बंदींत होते ते सोडिले, तेव्हां त्यांनीं त्याशीं तह केला.

ब्रह्मी लोकांबरोबर तह. ता० ३० जून सन १८५३.

पुढले वर्षी कंपनीचे राज्यांत नवीन मुलूख सामील झाला. इ० स० १८५४ चे मे महिन्यांत इंग्लिशांनीं निजामाशीं नवीन तह केला. कारण त्याचे मुलखांत जें इंग्लिशांचें सैन्य होतें त्याचा पगार ह्याचे पूर्वी कांहीं वेळ नियमानें पोहोंचत नव्हता; ह्या कारणानें जें निजामावर कर्ज झालें त्याबद्दल त्यानें हैदराबादचे उत्तरेकडील वऱ्हाडचे चार प्रांत इंग्लिशांचे अमलाखालीं दिले. ह्याच वर्षी नागपूरचा राजा मरण पावला, आणि त्यास पुत्र नव्हता ह्याकरितां तेंहीं राज्य इंग्लिशांनीं कंपनीचे मुलखांत सामील केलें. तेथील राज्यकारभार हल्लीं इंग्लिश लोक चालवितात. हे फेरफार झाले, तेव्हां कांहीं दंगाधोपा न होतां हिंदुस्थानांत कांहीं वेळ स्वस्थता राहिली, पण इ० स० १८५५ चे जुलै महिन्यांत ही स्वस्थता नाहींशी होऊन बंगाल्यांत एक मोठें बंड एकाएकीं झालें, तेणेंकरून सर्व लोक दचकून गेले. जे सांताळ लोक भागलपूर व राजमहाल ह्या प्रांतांतील डोंगरांवरून राहात असत, त्यांचा ह्या वेळेपर्यंत इतर लोकांस उपद्रव न होतां ते कायद्याप्रमाणें वागत असत, ह्यामुळें ते लोक दंगा करणारे नव्हत, असें सर्वांस वाटलें होतें, पण त्यांनीं एकदम बंड केलें; आणि त्यांचे नायक असत ते आह्मांस ईश्वरप्रेरणा झाली असें ह्मणत असत. त्यांनीं ह्या वेळेस बंड केलें ह्याचें कारण असें सांगतात कीं बंगाल्यांतील सावकारांनीं त्यांस छळिल्यामुळें ते फार त्रासले होते. त्या लोकांनीं डोंगरांवरून आपले शेजारचे मैदानांत उतरून तेथील गांवें लुटून जाळून टाकिलीं, आणि त्यांतील राहणारे लोकांचें कांहीं चालूं न देतां त्यांची कत्तल उडविली. ह्याप्रमाणें नानाप्रकारचा जुलूम करून त्यांनीं अनर्थ मांडिला होता. त्यांनीं ज्या प्रांतांवर हल्ला केला, त्यांत सैन्यांतील लोक फार थोडे होते तरी दुसरे प्रांतांतून फार जलदीनें तेथें पलटणी येऊन पोहोंचल्या. ते पावसाळ्याचे दिवस होते, ह्यामुळें त्या दाट झाडींत कायदा न मोडतां त्या रानटी लोकांशीं लढल्यानें त्यांचा नाश होणार नाहीं, असें

निजामाशीं तह. मे सन १८५४.

नागपूर ताब्यांत घेतात. स. १८५४.

सांताळ लोकांचें बंड. जुलै सन १८५५.

इंग्लिशांस वाटल्यावरून त्यांनीं सांताळ लोकांस इतर प्रांतांत शिरतां येऊं नये ह्याकरितां, त्या ओसाड झालेल्या प्रदेशाच्या सभोंवतें सैन्य ठेविलें, आणि हे लढाई करण्याचे अडथळे कांहीं अंशीं नाहींतसे होतांच जनरल लाइड ह्यानें त्या सैन्यानिशीं बंडखोर लोकांवर चाल केली, आणि ज्या ज्या ठिकाणीं त्यांची गांठ पडली त्या त्या ठिकाणीं त्यांजबरोबर लढून त्यांस आपापले गांवींच जाणें प्राप्त केलें. मग दंगा झालेल्या मुलखांत स्वस्थता होऊन बंड अगदीं मोडलें.

ह्या वेळेस लार्ड दलहौसी साहेबाची हिंदुस्थानांतील कारकीर्द संपत आली होती. त्यानें अयोध्येचें राज्य कंपनीचे राज्यांत सामील केलें. त्या वेळीं त्यास गव्हरनर जनरलाचे कामांवरून परत जाण्यास थोडा वेळ राहिला होता. इ० स० १८०१ मध्यें इंग्लिशांनीं नवाबाशीं तह केला, तेव्हांपासून अयोध्या प्रांताचा राज्यकारभार फार वाईट रीतीनें चालत होता; आणि इ० पू० १८५५ त तर ह्या प्रांतांतील राज्यकारभारांत जी फारच अव्यवस्था होती, तिच्या प्रमाणें त्या वेळीं हिंदुस्थानांतील कोणतेही संस्थानांत नव्हती, हें सर्वांस माहीत आहे. नवाब हा जातीनें दुर्व्यसनी असून त्याच्या कृपेंतले लोकही मोठे दुराचारी होते, ह्यामुळें त्यांचे हातून राज्यकारभार करण्यामध्यें फार हयगय होत असे; हें त्यांस मोठें लांछन होतें. त्यानें मुख्य मुख्य कारभाऱ्यांच्या जागा आपल्या कृपेंतल्या हलक्या लोकांस दिल्या होत्या. लुटालूट होऊन रयतेचा फार खराबा होत असे, आणि सैन्यांतील लोकांमध्यें चांगला बंदोबस्त व व्यवस्था नसून त्यांस बरोबर पगार मिळत नसे, ह्यामुळें त्यांनीं लोकांवर जुलूम करावा, लुटालूट करावी, त्यांचे मुडदे पाडावे, हा त्यांचा उपजीविकेचा क्रम होता. ह्या प्रकारचे संकटांत लोक असतां, धर्मसंबंधी कज्जा उत्पन्न झाला, ह्यामुळें त्यांचें संकट फार वाढलें. एका हिंदूंच्या देवळावर कांहीं मुसलमानांनीं हल्ला केला, त्यांतील देवावर हिंदूंची फारच श्रद्धा होती, ह्यामुळें त्या देवळाच्या संरक्षणार्थ त्यांनीं एकत्र जमून त्या मुसलमानांचा पराजय केला; तेव्हां त्यांस मागें हटावें लागल्यानें मोठा आवेश येऊन, अमीरअली ह्मणून एक धर्मवेडा सरदार होता, त्याचे हाताखालीं पुष्कळ लोक जमले. ह्या कज्जांत नवाब कोणाचा पक्ष स्वीकारील ह्याचा कांहीं वेळ संशय होता, पण शेवटीं मुसलमान लोकांनीं दंगा करण्याचा बेत केला होता तो मोडण्याचा त्यानें निश्चय केला. इंग्लिशांचे कामगारांनीं त्यांचे सैन्यानिशीं त्या धर्मवेडे लोकांवर हल्ला केला, आणि त्यांचा पराजय करून त्यांचा नायक ठार मारिला.

अयोध्येची स्थिति.

अयोध्या प्रांताचे सभोंवतीं इंग्लिशांचा मुलूख असून त्या प्रांतामध्यें ध-

इंग्लिशांची फौज एकत्र होते.

र्मसंबंधीं लढाई बहुतकरून होणार, आणि इंग्लिशांच्या सैन्यांतील पुष्कळ काळे लोकांचे सोयरे धायरे त्या लढाईत गुंतल्यामुळें ते लोक फार घाबरून जातील, असें गवरनर जनरलास वाटल्यावरून त्यानें सरहद्दीवर गोरे लोक जमविण्याचा हुकूम केला; पण त्यांस लढाईमध्यें शिरण्याची गरज पडली नाहीं, हें फार चांगलें झालें.

आपले ताब्यांतले राज्यांत अशी अंधाधुंदी चालूं देतां उपयोगीं नाहीं, असें इंग्लिशांस वाटलें, आणि कोर्ट आफ् दैरेक्तर्स ह्यांनीं लार्ड दलहौसी ह्यास लिहिलें कीं, अयोध्येचें राज्य पूर्वींच्या स्थितींत ठेवावें किंवा साक्षात् आपले अमलाखालीं घ्यावें ह्याविषयीं तुह्मांस नीट दिसेल तशी तजवीज

अयोध्या प्रांत ताब्यांत घेतात. ता० ९ फेब्रुआरी स.१८५६.

करावी. त्यावरून गवरनर जनरलानें तें राज्य आपले राज्यांत सामील करण्याचा निश्चय केला. त्यानें नवाबास सामोपचारानें असें सांगितलें कीं, तुमचा आमचा सल्ला आहे तो कायम असून तुह्मी आपले मुलखाचें राज्य करण्यास अयोग्य आहां असें आह्मांस दिसून आल्यामुळें तुह्मीं तें राज्य आमचे स्वाधीन करावें, आणि तुमची सांप्रतची स्थिति कायम राहून अब्रूचें संरक्षण व्हावें, ह्याकरितां आह्मीं तुह्मांस मोठी नेमणूक करून द्यावी; असा आपणा उभयतांच्या मध्यें ठराव व्हावा. हा ठराव नवाबानें मान्य न केल्यामुळें, त्याचे अनुमताशिवाय लार्ड दलहौसी साहेबानें एक जाहिरात फिरवून अयोध्या प्रांत इंग्लिशांनीं आपले राज्यास सामील केला, असें प्रसिद्ध केलें. हें राज्य इंग्लिशांनीं घेतल्याचीं कारणेंही ह्याच लेखांत सांगितलीं होतीं. त्यांत असें लिहिलें होतें कीं, अयोध्येचे नवाबास परदेशांत किंवा स्वदेशांत शत्रु उत्पन्न झाल्यास त्यापासून त्याचें संरक्षण करण्याविषयीं इंग्लिशांनीं, इ० स० १८०१ त तह झाला, त्या समयीं कबूल केलें होतें, आणि त्या वेळीं त्यानेंही अशी प्रतिज्ञा केली होती कीं, प्रजेचा उत्कर्ष होऊन लोकांच्या जिन्नसांचा व जिवाचा बचाव व्हावा अशा प्रकारचा राज्यकारभार मी आपले हाताखालचे कामगारांच्या हातून करवीन. इंग्लिश आपल्या बोलण्याप्रमाणें वागले असतां नवाबानें आपले वचनाप्रमाणें चालण्याची हयगय केली, ह्याकरितां ज्या देशाचा राज्यकारभार त्यानें वाईट रीतीनें केला तो देशच त्याचे ताब्यांतून इंग्लिशांनीं घेतला.

इंग्लिशांनीं पंजाबामध्यें ज्या रीतीनें राज्यकारभार केला, तीच रीत त्यांनीं अयोध्या प्रांतांत चालू केली. त्यांनीं सरकारकामाचे मुख्य अधिकारी गोरे लोक नेमिले; आणि जनरल औत्रम ह्यांस मुख्य कमिशनर नेमिलें; त्या वेळेसच त्या साहेबास नैत कमांदर आफ् दि बाथ ही पदवी मिळाली.

कंपनीनें अयोध्या प्रांतांतील लोकांचे कल्याणाकरितां तो मुलूख आपले स्वाधीन करून घेतला; त्या वेळेस तेथें कांहीं दंगा न होतां, त्या लोकांचे मनांत दुष्टभाव आहे असें वाटण्याजोगीं कांहीं चिन्हेंही दिसत नव्हतीं.

लार्ड दलहौसी साहेब ह्यास नियमापेक्षां जास्ती वेळ हिंदुस्थानांत राहून राज्यकारभार करण्याचा हुकूम झाला होता; त्या हुकुमाप्रमाणें इ० स० १८५६ त फेब्रुआरी महिन्याचे २९ वे तारखेस त्याची कारकीर्द संपली. त्याचे जाग्यावर कांहीं वेळापूर्वी लार्ड क्यानिंग साहेबाची नेमणूक झाली होती; त्यावरून त्याच तारखेस त्यांनीं हिंदुस्थानांतील राज्याचा चार्ज घेतला. लार्ड दलहौसी साहेबाचे कारकिर्दींत हिंदुस्थानचे लोकांमध्यें नानाप्रकारची सुधारणा झाली, तेणेंकरून कांहीं वेळानें त्यांचें फार कल्याण होईल. लोकांमध्यें उपयोगी विद्येचा चांगले रीतीनें प्रसार होण्यास सरकारांतून मदत मिळाल्यामुळें, त्यांस तिचें संपादन करण्यास उत्तेजन आलें. सरकारानें लोकांस विद्या शिकविण्याचे उपाय योजिले, आणि शिकविण्याचें काम त्या उपायांच्या योगानें तडीस नेण्याकरितां नवीन कामगार नेमिले. जमिनीला (पाटानें) पाणी लावण्याकरितां व व्यापार वाढविण्याकरितां पाट वगैरे बांधिले होते, ते सरकारानें जास्ती केले. इंग्लिशांनीं लोखंडी सडका बांधिल्या, आणि तारायंत्राचे योगानें पत्रव्यवहार चालू करून कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्या हिंदुस्थानांतल्या तीन मुख्य शहरांचा निकट संबंध करून ठेविला.

लार्ड दलहौसी परत जातो. ता. २९ फेब्रुआरी स. १८५६.

उपयोगी विद्येची सुधारणूक.

ईस्त इंदिया कंपनीचे राज्यरीतीमध्यें फेरफार झाले. सन १८३५ त जी कंपनीस नवीन सनद मिळाली ती व पूर्वीची सनद ह्या दोन पाहूं गेलें असतां त्यांमध्यें पुष्कळ भेद दृष्टीस पडेल. नवीन सनदेप्रमाणें कांहीं देरेक्तर्स कमी झाले; आणि त्यांतून कांहीं राणी सरकारानें नेमावे असें ठरलें. सरकारानें सर्व हिंदुस्थानाकरितां एक कायदे करणारी मंडळी नेमिली; आणि ठराव झाल्याप्रमाणें ज्या उमेदवारांची परीक्षा उतरेल त्या सर्वांस वैद्यकीचे खात्यांत किंवा मुलकी खात्यांत जागा द्याव्या असें ठरलें.

कंपनीच्या सनदेंतील फेरफार.

मुळापासून, म्हणजे हिंदुस्थानांत इंग्लिशांचें कांहीं तरी राज्य असावें ह्याकरितां पहिल्यानें क्लैव साहेब व लारेन्स साहेब हे लढाया करीत होते, तेव्हांपासून इ० स० १८५६ पर्यंत, म्हणजे जेव्हां त्यांचेंच राज्य पेशावरापासून पेगूपर्यंत पसरलें, तेव्हांपर्यंत त्यांनीं राज्यवृद्धि कसकशी केली ह्यांचा आम्हीं इतिहास सांगितला. ह्याच इतिहासाचें आपण विचार करून अवलोकन केलें, तर

इंग्लिशांचे सत्तेची वृद्धि.

असें दृष्टीस पडेल कीं, प्रत्येक वर्षी त्यांचे राज्याची वृद्धीच होत गेली, आणि ह्याप्रमाणें वाढत वाढत हल्लीं तर त्याचा विस्तार फारच मोठा झाला आहे. ज्याचे हुकमांशिवाय काडी देखील हालत नाहीं असा जो परमेश्वर, त्यानेंच हें एवढें मोठें राज्य इंग्लिशांस दिलें आहे; तेव्हां हिंदुस्थानचे लोकांचें कल्याण व्हावें ह्याकरितांच तें दिलें आहे ह्यांत संशय नाहीं; आणि त्यांच्या कल्याणाचे पुष्कळ उपाय अद्यापि करावयाचे राहिले आहेत, तरी इंग्लिशांनीं आजपर्यंत पुष्कळ केले.

कोणी असें ह्मणतात कीं, इंग्लिश लोक हिंदुस्थानचें राज्य सोडून उदईक निघून जातील, तर ते तेथें होते असें स्मरण होण्यास त्यांचा कांहीं मागमूस देखील राहणार नाहीं; पण असें होणार नाहींसें वाटतें. कारण त्यांनीं एथील लोकांचें इतकें कल्याण केलें आहे कीं, त्यांचा त्यांस कधींही विसर पडणार नाहीं. इंग्लिशांनीं हिंदुस्थानांतील लोकांचें कल्याण होण्याकरितां उपाय केले आहेत त्यांत दोष आहेत खरे; पण जितक्या मनुष्यांच्या कृति आहेत तितक्यांत असले दोष असतातच, आणि ते कधींही नाहींतसे व्हावयाचे नाहींत. ह्या देशाची सांप्रतची स्थिति, व मुसलमान राज्यांतून मोठमोठाले प्रबळ राजे त्याजवर राज्य करीत होते त्या वेळची स्थिति, ह्यांचें अंतर किती आहे ह्याचा आपण विचार करून पाहिला, तर हा देश हल्लीं किती सुख भोगीत आहे हें स्पष्ट दिसून येईल. सांप्रत आपआपसांत लढाया होत नाहींत, अंधाधुंदी नाहीं, आणि पूर्वी एकसारखी लढाई होऊन गावोगांवचीं घरें ओसाड पडत आणि तेथें घोर प्राणी ओरडत असत, तें नाहींसें झालें आहे. सरकारानें मोठमोठ्या अमलाच्या जागा गोरे लोकांस दिल्या आहेत, आणि त्यांतले बहुतेक लोक प्रामाणिक व विश्वासूक असून ते आपलें काम बरोबर बजावतात. इंग्लिशांचा काम करण्याविषयीं उत्साह व नेट हीं हिंदुस्थानचे लोकांचे दृष्टीस पडतात, ह्यामुळें चोहोंकडील लोक ह्यांचा कित्ता घेऊं लागले आहेत. सरकारापाशीं सर्वांची सारखी दाद लागून न्यायानें इनसाफ होतो; एकादे वेळेस अन्यायाची गोष्ट झाली, तर ती येथील लोकांचे कपटानेंच होते. सती जाणें, बालहत्या, व नरयज्ञ हीं बहुतकरून अगदीं नाहींतशीं झालीं आहेत; आणि लोकांस खरें खोटें चांगलें समजूं लागलें आहे. असेच उत्तरोत्तर सद्गुण वाढत जाऊन देशाचा उत्कर्ष होईल अशी आशा बाळगणें योग्य आहे.

इंग्लिशांच्या सत्तेपासून फायदा.

**एकविसावा भाग समाप्त.**

---

हा ग्रंथ येथें समाप्त झाला.

